**सदरहू भूसंपादन प्रस्तावाची पूर्वपीठीका :**

प्रस्तुत सि.स.नं. ६७ व ६८ मधील जमिनीचे भूसंपादनाबाबत पूर्वी भूसंपादनाचे प्रकरण होते. याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे श्रीमती पुंजाबाई बाबुराव कवडे यांनी दिवाणी दावा क्रमांक ३८१/१९८० दाखल केलेला होता. सदरहू दाव्यात संस्थान व अर्जदार यांचेमध्ये समझोता झालेला आहे. सदरहू समझोत्याचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे :

०१. भूसंपादनामधील उत्तरेकडील नकाशात B या अक्षरांने दाखविलेली १८ फुट x २० फुट जागा ही दावा करणार यांचे मालकीची राहिल. सदर क्षेत्रापुरते भूसंपादन रद्द करण्यात येत आहे.

०२. मे.एस.एच.गोडबोले यांनी तयार केलेल्या प्लॅन व एस्टीमेटप्रमाणे दोन मजली इमारत सामनेवाले (संस्थान) यांनी त्यांच्या खर्चाने बांधून द्यावी.

प्रत्यक्षांत वर नमुद केलेल्या तडजोडीप्रमाणे प्रश्नाधिन जागेच्या उत्तरेकडील बाजूस संस्थानने दोन मजली इमारत बांधून अर्जदास यांस दिली व दक्षिणेकडील भाग संस्थानने ताब्यात घेतला आहे.

दिनांक २८ जानेवारी, २००१ रोजीच्या मा. कार्यकारी अधिकारी यांचे आदेशाप्रमाणे संस्थान वकील अॅड.पी.डी.गुजराथी, कोपरगांव यांचेकडेस खालील मुद्यांवर अभिप्राय मागविण्यांत आलेला होता :

सि.स.नं. ६७ व ६८ पैकी मिळकतीचे भूसंपादन कायदा, १८९४ खाली भूसंपादन करता येईल, असे मा.उपसंचालक, नगर रचना, नाशिक यांनी सुचविले आहे. परंतु यापुर्वी या जागेच्या मालक श्रीमती

पुंजाबाई कवडे, श्रीमती चंद्रभागा लुटे यांचेशी मा. सर्वोच्च न्यायालयात झालेली तडजोड तसेच दिनांक १७ ऑगष्ट, १९९६ रोजी झालेले अपील यांचा विचार करता प्रस्तुत मिळकत मागणी करता येईल काय ?

उपरोक्त मुद्यांवर ॲड.पी.डी.गुजराथी, कोपरगांव यांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे :

पुर्वी एकदा भूसंपादन कायद्याखाली या संबंधीचे प्रकरण झाले होते व ते थेट सुप्रीम कोर्ट, नवी दिल्ली येथे जाऊन त्यात श्रीमती पुंजाबाई बाबुराव कवडे व संस्थान यांच्यामध्ये तडजोड होऊन सि.स.नं. ६७ व ६८ मधील उत्तरेकडील जागेत संस्थानने त्यास दुमजली इमारत बांधून द्यावी व त्याचा ताबा श्रीमती पुंजाबाई बाबुराव कवडे यांना देण्याचे ठरले व त्याप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयाचा आदेश झालेला दिसतो. अशा परिस्थितीत सदर जागा परत भूसंपादन कायद्याखाली संपादन करुन मागणे, त्या तडजोडीशी व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाशी विसंगत होईल. त्यामुळे संपादनाची मागणी योग्य ठरेल, असे वाटत नाही.

प्रश्नाधिन जागेचे भूसंपादन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ खाली करता येणार नाही, असे मा.उपसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक यांनी दिनांक २७ डिसेंबर, २००१ रोजी कळविलेले आहे. तसेच संस्थान वकील ॲड. पी.डी. गुजराथी यांनी प्रश्नाधिन जागा तडजोडीनुसार बांधून दिल्यानंतर पुन्हा भूसंपादन कायद्याखाली मागणे हे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाशी विसंगत होईल, असा अभिप्राय सदरहू भूसंपादन प्रस्तावाबाबत दिलेला आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करुन सि.स.नं. ६७ व ६८ मधील जमिनीच्या भूसंपादनाबाबत खालील दोन मुद्दयांवर निर्णय होणेस विनंती आहे.

०१. भूसंपादन करावयाचे क्षेत्र महाराष्ट्र राज्य प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ च्या तरतुदीप्रमाणे शिर्डी विकास आराखडयात आरक्षित नसल्याने आणि संस्थानने पाठविलेला भूसंपादन प्रस्ताव हा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ खाली पाठविलेला असल्याने, तो कायदेशीर नाही असा अभिप्राय मा. उपसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक यांनी दिलेला असल्याने सदरचा भूसंपादन प्रस्ताव रद्द होणे उचित राहील. सदरचा पुर्वीचा पाठविलेला प्रस्ताव रद्द होणेकामी निर्णय होणेस विनंती आहे.

०२. प्रश्नाधिन जमीन भूसंपादन कायदा,१८९४ प्रमाणे भूसंपादीत करता येणे शक्य आहे परंतु याच प्रश्नाधिन जमिनीबाबत पूर्वी भूसंपादन प्रकरण होते त्यावेळेस मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दिवाणी दावा क्रमांक ३८१/१९८० मध्ये झालेल्या तडजोडीप्रमाणे दावा करणार यांना दोन मजली इमारत संस्थानने बांधून दिलेली आहे. त्याचा घर क्रमांक ७९७ आहे. याबाबत संस्थान वकीलांनी प्रश्नाधिन जागेचा भूसंपादन कायदा,१८९४ खाली दाखल केलेला भूसंपादन प्रस्ताव मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाशी विसंगत होईल, असा अभिप्राय दिलेला आहे. त्यामुळे प्रश्नाधिन जागेचा भूसंपादन कायदा,१८९४ खाली देखील भूसंपादनाचा प्रस्ताव पाठविणे योग्य होणार नाही. त्यामुळे सि.स.नं. ६७ व ६८ बाबत भूसंपादन कायदा १८९४ खाली भूसंपादन प्रस्ताव पाठविणे अथवा न पाठविणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४१५** | **सि.टी.सर्व्हे नं.६७ व ६८ हे शिर्डी विकास आराखड्यात आरक्षित नसल्याने संस्थानने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ खाली पाठविलेला भू-संपादनाचा प्रस्ताव मागे घेतलेबाबत मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांना कळविणेत यावे.**<br>**सि.टी.सर्व्हे नं.६७ व ६८ बाबत यापूर्वी मा.सर्वोच्च न्यायालय,दिल्ली येथील दिवाणी दावा क्रमांक ३८१/१९८० मध्ये झालेल्या तडजोडीप्रमाणे दावा करणार यांना दोन मजली इमारत संस्थानने बांधून दिलेली आहे. याबाबत संस्थान वकीलांनी प्रश्नाधिन जागेचा भूसंपादन कायदा, १८९४ खाली दाखल करण्यात येणारा भू-संपादन प्रस्ताव मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाशी विसंगत होईल, असा अभिप्राय दिलेला आहे. ही बाब विचारात घेता प्रश्नाधिन जमिनीचा भू-संपादनाचा प्रस्ताव तूर्त पाठवू नये,तसेच मा.अध्यक्ष महोदय यांना संबंधितांशी चर्चा करुन पुढील निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले.** |

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.३८** **मौजे निमगाव-कोऱ्हाळे परिसरातील रस्त्यांची उर्वरीत लांबी संस्थानचे निधीतून विकसीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी त्यांचेकडील दि.११.०६.२००७ रोजीचे पत्रान्वये खाली नमूद केलेल्या ०३ रस्त्यांची उर्वरित पूर्ण लांबी विकसित करणेसाठी खालीलप्रमाणे अंदाजित खर्च येईल, असे कळविले होते.

| अ.नं. | रस्त्यांचे नाव | उर्वरित लांबी | अपेक्षित खर्च रु. (लाखात) |
|---|---|---|---|
| १ | शिर्डी-कनकुरी ते चर रस्ता (गट नंबर १९८,१९९, २०० व २०१ लगत) | ७०० मीटर | १७.९१ |
| २ | शिर्डी निमगाव शीव रस्ता- नगर मनमाड रस्ता ते गट नंबर ८७-८८ | २०० मीटर | ०४.७५ |
| ३ | नगर-मनमाड ते गोदावरी उजवा कालवा गट नंबर २२१ व २४५ लगतचा चर रस्ता | ४०० मीटर | ०९.०० |
| | | एकूण रुपये- | ३१.६६ |

वर नमूद केल्यानुसार मौजे निमगाव कोऱ्हाळे हद्दीतील ०३ रस्त्यांची लांबी विकसित करणेसाठी अंदाजित रु.३१.६६ लाख मात्र इतका जादा खर्च येईल असे मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी कळविले होते. सदर रस्त्यांच्या वाढीव लांबीच्या विकासासाठी वरीलप्रमाणे निधी उपलब्ध करावयाचा झाल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार शासनाची मान्यता घ्यावी लगेल. तसेच याकामी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सविस्तर बांधकाम आराखडे व अंदाजपत्रके मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी दि.२८.०७.२००७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर केला हाता, त्यास सदरहू सभेतील निर्णय क्र.६४४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयास अनुसरुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सविस्तर बांधकाम आराखडे व अंदाजपत्रके मागविण्यात आले असता, मा.कार्यकारी अभियता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी त्यांचेकडील दि.१४.१०.२००८ चे पत्राद्वारे सविस्तर अंदाजपत्रक व नकाशे पाठविलेलेआहेत. त्यानुसार या रस्त्यांची उर्वरीत लांबी विकसित करणेसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| **अ.नं.** | **कामांचे नाव** | **उर्वरित लांबी कि.मी.** | **अंदाजीत रक्कम** |
|---|---|---|---|
| १ | शिर्डी-कनकुरी ते चर रस्ता (गट नंबर १९८,१९९, २०० व २०१ लगतचा) उर्वरीत लांबी १/३५० ते २/५५० ता.राहाता | १.२०० | ४५,०८,४७०.०० |
| २ | शिर्डी निमगाव शीव रस्ता (नगर मनमाड रस्ता ते गट नंबर ८७-८८) उर्वरीत लांबी ०/३५० ते ०/५५० ता.राहाता | ०.२०० | ८,५१,७२६.०० |
| ३ | नगर-मनमाड ते गोदावरी उजवा कालवा गट नंबर २२१ व २४५ लगतचा चर रस्ता, ता.राहाता उर्वरीत लांबी १/७०० ते १/९५० | ०.२५० | ९,४०,३०७.०० |
| | | एकूण खर्च रु. | ६३,००,५०३.०० |

उपरोक्त रस्ते विकसीत करण्यासाठी संस्थानतर्फे निधी उपलब्ध करुन द्यावयाचा झाल्यास, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम २१ पोटकलम (२) अन्वये शासनाची पूर्व मंजूरी घेणे आवश्यक आहे. सदरील रस्ते पूर्ण लांबीचे विकसीत केल्यास परिसराचे विकासास हातभार लागेल व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या प्रस्तावीत विकास प्रकल्पांसाठी त्याचा उपयोग होणार आहे. तरी वरीलप्रमाणे रस्त्यांची उर्वरित लांबी विकसीत करणेसाठी रक्कम रु.६३,००,५०३.०० मात्र इतका निधी संस्थानतर्फे उपलब्ध करुन देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४१६** | **प्रस्तावास मान्यता देण्यात आली. उपरोक्तकामी मा.स्थानिक विश्वस्तांना समक्ष दाखवून नंतर महाराष्ट्र शासनाचे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवावा, असे ठरले.** |

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.३९** **शिर्डी विकास आराखडा-आरक्षण क्र.३४-दवाखाना विस्तारीकरण (स.नं.१२४ पै.१२५ पै.व १२६ पै. मधील क्षेत्र ०६ हे ०० आर) या आरक्षण प्रयोजनाऐवजी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे विविध उपक्रमांसाठी असा आरक्षण प्रयोजन बदल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) शिर्डी विकास आराखडयांत आरक्षण क्रमांक ३४ बाबत खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे :

| आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | सर्व्हे नंबर / सिटी सर्व्हे नंबर | भूसंपादन करावयाचे क्षेत्र | भूसंपादन मंडळ |
|---|---|---|---|---|
| ३४ | दवाखाना विस्तारीकरण | सर्व्हे नंबर १२४ पै., १२५ पै., १२६ पै. | ०६ हे ०० आर | श्री साईबाबा संस्थान, शिर्डी |

वर नमुद केलेल्या आरक्षणांप्रमाणे मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस इकडील प्रस्ताव क्रमांक एसएसएस/वशी-०२/४५७/२००१, दिनांक ८ मे, २००१ अन्वये सर्व्हे नंबर १२५ व सर्व्हे नंबर १२६ याप्रमाणे ०३ हेक्टर ९४ आर ८७ चौमी चा भूसंपादन प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यात वेळोवेळी झालेल्या संयुक्त मोजणी पत्रकाप्रमाणे भूसंपादन करावयाचे क्षेत्रात बदल होत गेला.

त्यानंतर, मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडील दिनांक २० जून, २००५ रोजीचे पत्रानुसार भूसंपादनात येणाऱ्या खाली नमूद केलेल्या खातेदारांच्या जमिनी संस्थानने थेट खरेदी केलेल्या आहेत.

| अ.नं. | खातेदाराचे नांव | खरेदीचा दिनांक | जुना सर्व्हे नंबर | नवीन सर्व्हे नंबर | ७/१२ प्रमाणे क्षेत्र हे-आर-चौमी | खरेदी घेतलेले क्षेत्र हे-आर-चौमी | भूसंपादन प्रकरणात सदर खातेदाराचे असलेले क्षेत्र हे-आर-चौमी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | लोढा जसराज अमोलकचंद | २९/०४/०६ | १२५/अ+२ब/२ पै | १२५/७ | ०१-१६-०० | ०१-१६-०० | ०१-१२-०० |
| ०२ | लोढा सुवालाल अमोलकचंद | २९/०४/०६ | १२५/अ+२ब/३ पै | १२५/८ | ०१-२१-०० | ०१-२१-०० | ०१-१७-०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०३ | लोढा पृथ्वीराज अमोलकचंद | २९/०४/०६ | १२५/अ+२ब/१ पै | १२५/६ | ०१-२०-०० | ०१-२०-०० | ०१-०८-०० |
| ०४ | श्रीमती शिदोडकर उषा सुभाष | ०५/०७/०६ | १२५/अ+२ब/२ पै | १२५/७ | ००-०१-०० | ००-०१-०० | ००-०१-०० |
| ०५ | चौधरी नवनाथ बहिरु | ०५/०७/०६ | १२५/अ+२ब/२ पै | १२५/७ | ००-०१-०० | ००-०१-०० | ००-०१-०० |
| ०६ | सोनवणे रामदास शंकर | ०५/०७/०६ | १२५/अ+२ब/२ पै | १२५/७ | ००-०१-०० | ००-०१-०० | ००-०१-०० |
| | **एकुण -** | | | | **०३-६०-००** | **०३-६०-००** | **०३-४०-००** |

उपरोक्त क्षेत्र संस्थानने थेट खरेदी केल्यामुळे, उर्वरित क्षेत्र ०० हे ४८ आर २७ चौमी भूसंपादनाचा प्रस्ताव मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडेस दिनांक २५ जुलै, २००६ रोजी पाठविणेत आलेला आहे. त्यानंतर फेरमोजणी झाल्याने दिनांक २७ जुलै, २००८ रोजी ०० हे ५६ आर ५२.५९ चौमी क्षेत्राचा दुरुस्त भूसंपादनाचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदरहू भूसंपादन प्रस्तावावर मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेमार्फत कार्यवाही सुरु असून, त्याबाबत पाठपुरावा करणेत आहे.

(ब) दरम्यानचे कालावधीत, मौजे नांदुर्खी बुद्रूक येथील खाली नमुद केलेल्या जमिनी संस्थानला मिळाव्यात म्हणून मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदरहू प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी मा.तहसिलदार, राहाता यांचेकडेस चौकशीकामी पाठविलेले असून, त्याबाबत त्यांचेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

| अ.नं. | गांवाचे नांव | गट नंबर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| ०१ | नांदुर्खी बुद्रूक | ३३१ | १३ हे ७६ आर<br>०० हे ६० आर पोख<br>**१४ हे ३६ आर** |
| ०२ | नांदुर्खी बुद्रूक | ४४६ | ०२ हे ७२ आर<br>०० हे ७९ आर पोख<br>**०३ हे ५१ आर** |

मा. व्यवस्थापन समितीच्या निर्णयांनुसार, मौजे नांदुर्खी बुद्रूक येथील उपरोक्त मिळणाऱ्या जमिनींमध्ये अद्यायवत रुग्णालय व त्याअनुषंगिक सेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने बांधकामाचे नियोजन आहे.

त्यामुळे आता, शिर्डी शहरातील आरक्षण क्रमांक ३४ चे दवाखाना विस्तारीकरणासाठी असणारे प्रयोजन बदलून, ते श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे विविध उपक्रमांसाठी असा बदल करणे उचित राहील. आरक्षण क्रमांक ३४ च्या आरक्षणाच्या प्रयोजनात बदल करणेसाठी मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडेस प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील.

(क) उपरोक्त परिच्छेदांत नमूद केलेल्या विवेचनास अनुसरुन, शिर्डी विकास आराखडयातील आरक्षण क्रमांक ३४ - सर्व्हे नंबर १२४ पैकी, १२५ पैकी व १२६ पैकी क्षेत्र ०६ हेक्टर ०० आर चे प्रयोजन दवाखाना विस्तारीकरण असे आहे त्याऐवजी आरक्षण क्रमांक ३४ - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे विविध उपक्रमांसाठी असा आरक्षणाचे प्रयोजनात बदल करुन त्याप्रमाणे मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी व शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेकामी व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४१७** | **प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे शिर्डी विकास आराखडयातील आरक्षण क्रमांक ३४ - सर्व्हे नंबर १२४ पैकी,१२५ पैकी व १२६ पैकी क्षेत्र ०६ हेक्टर ०० आर चे प्रयोजन दवाखाना विस्तारीकरण असे आहे त्याऐवजी आरक्षण क्रमांक ३४ - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे विविध उपक्रमांसाठी असा आरक्षणाचे प्रयोजनात बदल करणेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख )

**विषय नं.४०** **मंदीर परिसर व जुने प्रसादालय परिसर विकसीत करणेसाठी वास्तुविशारद स्पर्धेकरिता व्यवसायिक सल्लागार यांची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** (अ)मा.व्यवस्थापन समितीचे सभेत वेळोवेळी झालेल्या चर्चेनुसार व निर्णयांनुसार, शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांच्या वाढत्या गर्दीचे नियोजनासाठी व भक्तांना दर्शन सुलभ, सोयीस्कर व्हावे, दर्शन रांगेत भक्तांना सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्यात यादृष्टीने मंदिर व जुने प्रसादालय परिसराचे पुर्न:नियोजन करणेत यावे. याकामी देशातील निवडक नामांकित वास्तुविशारदांकडून संकल्पना चित्रे व बांधकाम अंदाजपत्रक तयार करुन घेणेत यावे, असे ठरलेले आहे.

अशाप्रकारे मंदिर व जुने प्रसादालय परिसराचे पुर्न:नियोजन करणेकामी तसेच निवडक नामांकित वास्तुविशारदांकडून संकल्पना चित्रे तयार करुन घेणेकामी योजनापूर्वक कामकाज करावे लागणार आहे, तसेच यासाठी व्यावसायिक सल्लागार नेमणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने, यापूर्वी मंदिर व मंदिर परिसराचे नुतनीकरण व सुशोभिकरण करणेकामी अशाच प्रकारची योजना राबविणेत आलेली होती. त्यावेळेस मुंबई येथील नामांकित वास्तुविशारद संस्थान अनिल नागरथ ॲण्ड असोसिएटस् यांचे प्रतिनिधी श्री. अनिल नागरथ यांनी संस्थानतर्फे कामकाज पाहिलेले होते.

(ब) उपरोक्त परिच्छेदात नमुद केल्यानुसार, श्री. अनिल नागरथ, मुंबई यांनी मा.अध्यक्षसाो. यांची मुंबई कार्यालयात भेट घेऊन, त्यांची सर्वसाधारण माहिती दिली होती. तसेच विषयांकित कामी कराव्या लागणाऱ्या कार्यवाहीबाबत त्रोटक व संक्षिप्त विवेचन केलेले होते.

त्यानुसार, श्री. अनिल नागरथ यांनी आज दिनांक १७ एप्रिल, २००९ रोजी शिर्डी येथे समक्ष भेट देऊन विषयांकित कामी कराव्या लागणाऱ्या कामाबाबत व त्याचे रुपरेषेबाबत वरिष्ठ मुख्य अभियंता व त्यांचे सहकारी शाखा अभियंता यांचेसह चर्चा केलेली आहे. सदरहू कामी त्यांनी मा. कार्यकारी अधिकारी यांना अग्रेषित केलेल्या दिनांक १७ एप्रिल, २००९ रोजीचे पत्रात खालील प्रमाणे नमुद केलेले आहे :

.. .. विषयांकित कामी लवकरच सविस्तर प्रस्ताव पाठवित आहे. आर्किटेक्ट कौन्सिलने निर्देशीत केलेल्या कामांसाठी व्यावसायिक शुल्क रक्कम रुपये ०३ लाख अधिक सेवाकर आणि सदरहू कामी करावे लागणारे प्रवास व इतर कामी प्रत्यक्ष झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती मिळावी, ही विनंती.

श्री. नागरथ यांचे कामांमध्ये सर्वसाधारणपणे विषयांकित कामी वास्तुविशारदांना सादर करावयाचे टिपण / सविस्तर माहिती तयार करणे, स्पर्धेचे नियम व अटी तयार करणे, त्यासंबंधीत शंका व त्रुटींचे निराकरण करणे, स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या संस्थेचा अभ्यास करुन अहवाल देणे आदि कामांचा समावेश होईल. सदरहू बाबींबाबत श्री. नागरथ हे त्यांच्या पत्रात नमुद केलेल्या कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर या संस्थेने निर्देशीत केलेल्या कामांचा सविस्तर तपशील नंतर पाठविणार आहेत.

(क) श्री. अनिल नागरथ, मुंबई यांनी दिनांक १७ एप्रिल, २००९ रोजीचे चर्चेत, विषयांकित कामी वास्तुविशारदांकडून जी संकल्पना चित्रे मागवावयाची आहेत, त्याबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करावी लागेल, असे चर्चेत सुचविलेले आहे :

०१. विषयांकित कामी निवडक वास्तुविशारदांनाकडून स्पर्धात्मक संकल्पना चित्रे मागविली जातील.
०२. विषयांकित कामी कमीत कमी ०५ वास्तुविशारदांची निवड करण्यात येईल.
०३. विषयांकित स्पर्धेसाठी कौन्सिल ऑफ आर्किटेक्टचर, नवी दिल्ली या संस्थेची मान्यता घेण्यात येईल.
०४.प्राप्त होणाऱ्या संकल्पना चित्रांचे / प्रकल्पांचे पर्यवेक्षण करणेसाठी कमीत कमी ०३ व्यक्तींची समिती तयार करण्यात येईल, या ०३ व्यक्तींपैकी ०२ व्यक्ती वास्तुविशारद किंवा त्या क्षेत्रातील असतील. उर्वरित एक सदस्य सर्वसाधारण असेल.
०५. विषयांकित कामी एक सर्वंकष टिपण तयार करुन निवडक वास्तुविशारदांना पाठवून त्यांचेकडून याकामी इंटरेस्ट ऑफ लेटर मागविले जाईल. त्यांचेकडून प्राप्त होणारे प्रतिसादांतून सदरहू कामी व्यापक अनुभव असणाऱ्या निवडक ०५ वास्तुविशारदांकडून स्पर्धात्मक संकल्पना चित्रे व त्याबाबतची अनुषंगिक प्रकल्प अहवाल मागविला जाईल. याकामी निवड होणाऱ्या ०५ वास्तुविशारदांना योग्य ते मानधन देण्यात येईल.
०६. निवडक ०५ वास्तुविशारदांकडून प्राप्त होणारे संकल्पना चित्रे व त्यांचे प्रकल्प अहवालाचे मुल्यमापन / पर्यवेक्षण नेमण्यात आलेल्या समितीकडून करण्यात येईल. सदरहू समितीच्या निर्णयानुसार, निवडण्यात आलेल्या वास्तुविशारदांस विषयांकित काम देण्यात येईल.

(ड) उपरोक्त परिच्छेदांत केलेल्या विवेचनास अनुसरुन, विषयांकित कामी व्यावसायिक सल्लागार म्हणून, मे.अनिल नागरथ ॲण्ड असोसिएटस्, मुंबई यांची नेमणूक करणेस, त्याकामी त्यांनी नमूद केलेले व्यावसायिक शुल्क अधिक सेवाकर व इतर प्रत्यक्ष खर्चाची प्रतिपूर्ती करणेस तसेच, विषयांकित कामी श्री. नागरथ यांनी सुचविल्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४१८** | **प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे व्यावसायिक सल्लागार म्हणून, मे.अनिल नागरथ ॲण्ड असोसिएटस्, मुंबई यांची नेमणूक करणेस, त्याकामी त्यांनी नमूद केलेले व्यावसायिक शुल्क रुपये ३.०० लक्ष मात्र अधिक सेवाकर,प्रवास व इतर प्रत्यक्ष खर्चाची प्रतिपूर्ती करणेस तसेच, विषयांकित कामी श्री. नागरथ यांनी सुचविल्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख )

**विषय नं.४१** **नविन श्री साईप्रसादालय येथे कर्मचाऱ्यांकीरता वाहन पार्किंगची व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालय हे दि. ०८/०१/२००९ पासून भक्तांसाठी प्रसाद भोजनाकरीता खुले करण्यात आले आहे. प्रसादालय विभागाने दि. ०७.०२.२००९ रोजीचे टिपणी अन्वये प्रसादालयाचे कर्मचाऱ्यांकरीता वाहन पार्किंगची जागा निश्चित करणे व प्रसादालयास शोभेल असे शेड तयार करुन मिळणेबाबत कळविले. श्री

साईप्रसादालयात काम करणारे कर्मचारी स्वतःचे दुचाकी वाहन घेऊन कामावर येतात. श्री साई प्रसादालयाचे पूर्वेस अन्नदान कक्षाजवळ व इतरत्र उपलब्ध जागेत वाहने उभी करतात. प्रसादालयाचे उत्तरेकडील रस्ता व कंपाउंड भिंतीमधील जागेत अथवा पूर्व बाजुकडील रस्ता व कंपाउंड भिंतीमधील जागेत दुचाकी वाहनाकरीता शेड उभारणी केल्यास योग्य रितीने दुचाकी वाहने उभी करता येतील.

सदरकामी २५७० चौ. फुटाचे कलर कोटेड जी.आय. शीटचे शेड उभारणीकरणेकामी अंदाजे रुपये ०८,३९,०००.०० मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

तरी सदरचे खर्चास व वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

| निर्णय क्र. ४१९ | **प्रस्तावत नमूद केलेप्रमाणे दुचाकी वाहनासाठी २५७० चौ. फुटाचे कलर कोटेड जी.आय. शीटचे शेड उभारणीकरणेकामी अंदाजे रुपये ८,३९,०००.०० चे खर्चास व वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख )

**विषय नं.४२ श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी ड्रॉ शिट खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.०५.२००८ मधील निर्णय क्र.१५ नुसार श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी आवश्यक असणारे गाऊन, ड्रॉ शिट, व होलशीट खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.३,६१,७५०/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार संस्थान जा. क्र.८४५१ दि१०.०६.२००८ अन्वये मागविणेत आलेली दरपत्रके मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०९.२००८ मध्ये उघडणेत येऊन कोटेशनमधील न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देण्यात यावे असे ठरले होते. त्याप्रमाणे मे.बांठीया एंटरप्राईजेस, पुणे यांना जा.नं.१३३२८ दि.१२.०९.२००८ अन्वये रु.२,१३,६१६/- व मे.बंसल ट्रेडींग कंपनी, भोपाळ यांना रु.१,०७,२५०/- असा एकुण रु.३,२०,८६६/- रकमेचा पुरवठा आदेश देणेत आलेला होता. तथापि पुरवठा आदेश दिलेनंतर श्री साईबाबा हॉस्पिटलचे लिनन विभागाने दि.२५.१०.२००८ चे डिपीने मूळ प्रस्तावात ड्रॉ शिटचे माप २.५x३.५ फुट ऐवजी ६.२५ फुट x३.५ फुटाचे आवश्यक असल्याचे कळवून मे.बांठीया एन्टरप्राईजेस, पुणे यांना दूरध्वनीवरुन ड्रॉ शिटचा पुरवठा रद्द करणेस सांगीतलेले होते. याबाबत लिनन विभागास विचारणा केली असता, नजरचुकीने कमी साईजच्या ड्रॉ शिटची मागणी करणेत आलेली असल्याचे सांगितले.

लिनन विभागासाठी आवश्यक असलेल्या ८०० नग ड्रॉ शिटसाठी मे.बांठीया एन्टरप्राईजेस, पुणे यांना रु.३८/-प्रती नग दराने पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. मात्र पुरवठा होणारे ड्रॉ शिटची साईज कमी असल्याने व त्याचा उपयोग होणार नसल्याने लिनन विभागाने ६.२५ फुट x३.५ फुटाचे ड्रॉ शिटसाठी फेरदरपत्रके मागविलेली होती. प्राप्त दरपत्रकात मे.बांठीया एन्टरप्राईजेस, पुणे यांचे दर रु.८३/- न्युनतम आल्याने त्यांना ८०० नगासाठी रक्कम रु.६६,४००/- चा पुरवठा आदेश देणेत आलेला असून त्यांनी मागणीप्रमाणे सर्व साहित्याचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. याकामी सर्व साहित्यासाठी रद्द झालेल्या साहित्याचा पुरवठा वजा जाता रु.३,५६,८६६/- खर्च झालेला असल्याने मुळ मंजूरीचे तत्वतः मान्यतेपेक्षा कमी खर्च आलेला आहे.

तरी लिनन विभागाचे मागणीप्रमाणे साईजमध्ये बदल करणेत आलेल्या ड्रॉ शिटचे खरेदीस व त्याकामी आलेल्या रक्कम रु.६६,४००/- चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

| निर्णय क्र. ४२० | **प्रस्तावात नमूद केलेनुसार लिनन विभागाचे मागणीप्रमाणे साईजमध्ये बदल करणेत आलेल्या ड्रॉ शिटचे खरेदीस व त्याकामी आलेल्या रक्कम रु.६६,४००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

**विषय नं.४३ सन २००८-०९ विद्युत, ध्वनीक्षेपन व पाणीपुरवठा वार्षिक साहित्य खरेदीचे मान्यतेबाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.०५.२००८ मधील निर्णय क्र.४४६ नुसार विदयुत, ध्वनीक्षेपण व पाणीपुरवठा विभागासाठी सन २००८-०९ करीता आवश्यक असणारे इलेक्ट्रिकल व एम.एस.हार्डवेअर तसेच प्लंबींग साहित्य वर्तमानपत्रात निविदा मागवून खरेदीस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.७६,०९,७४४/- चे खर्चास तत्वतः मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मागविणेत आलेल्या निविदा मा.व्यवस्थापन उपसमिती सभा दि.१७.०८.२००८ मध्ये उघडणेत आलेल्या होत्या. तसेच संबंधितांना मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०९.२००८ मध्ये आमंत्रित करणेत येऊन निविदेतील दरावर सुट/दरवाढीबाबत लेखी पत्र देण्यास सांगणेत आलेले होते. त्यावर निर्णय नं.७३२ अन्वये निविदाधारकांनी दिलेल्या सूट/दरवाढीचा विचार करुन येणारे न्युनतम दराने पुरवठा आदेश देणेत यावा, ज्या साहित्याचे दर आलेले नाही अथवा एकच दरपत्रक प्राप्त झालेले असल्यास फेरकोटेशन मागणी करण्यात यावी असा निर्णय झालेला आहे.

निविदेतील प्राप्त दरावर सुट वजा जाता येणाऱ्या न्युनतम दराने पुरवठाधारकांना खालील रकमेचे पुरवठा आदेश देणेत आलेले आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव | विदयुत | ध्वनीक्षेपण | पाणीपुरवठा | एकुण |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | काशिको ट्रेडींग प्रा.लि., कोपरगांव | २१६४६४.४४ | १९००७.५० | २१७२३४.७८ | ४५२७०६.७२ |
| ०२. | इंटरनॅशनल इलेक्ट्रिकल्स, अ.नगर | ८१७१८२.०० | ८७३६९.०० | ३५८५९.३९ | ९४०४१०.३९ |
| ०३. | स्वदर्शन इलेक्ट्रिकल्स, नाशिक | १३२३९९१.६८ | १२०६८१.४० | १६६१८८.०० | १६१०८६१.०८ |
| ०४. | सोहम ट्रेडींग कार्पोरेशन, नाशिक | ३४२४२१.२५ | २४००.०० | १७३६६४६.२४ | २०८१४६७.४९ |
| ०५. | अनुराधा ॲग्रो सर्व्हीसेस, लोणी | २४७१३०.२५ | -- | १९५४४३.७५ | ४४२५७४.०० |
| ०६. | हिंदुस्थान टुल्स ॲण्ड इंजि.,मुंबई | १२७२४०.०० | -- | ९८९३६.०० | २२६१७६.०० |
| ०७. | वराह लक्ष्मी सेल्स एजन्सी,मुंबई | ३१५०४०.०० | -- | ४३८९१.०० | ३५८९३१.०० |
| ०८. | संजीवनी एंटरप्राईजेस, कोपरगांव | ३९६९२७.६५ | -- | ८५०४.९९ | ४०५४३२.६४ |
| ०९. | मार्क इंडस्ट्रीज,मुंबई | १९४०२०.४० | २४०१०.०० | २३४८४२.३० | ४५२८७२.७० |
| १०. | श्रीजी इंटरनॅशनल,मुंबई | १०३१९८.८२ | -- | १३६१.३० | १०४५६०.१२ |
| ११. | दगडुराम पिरचंद,श्रीरामपूर | १०१४५२.०० | -- | -- | १०१४५२.०० |
| १२. | साई इंडस्ट्रीज, लातुर | १२८८६८७.५० | -- | -- | १२८८६८७.५० |
| | एकुण रक्कम | ५४७३७५५.९९ | २५३४६७.९ | २७३८९०७.७५ | ८४,६६,१३१.६४ |

तसेच ज्या साहित्याचे दर आलेले नाही अशा साहित्यासाठी संस्थान जा.नं.२७२२ दि.१२.०३.२००९ अन्वये दरपत्रके मागणी करणेत आलेली असून प्राप्त दरपत्रके मा.व्यवस्थापन समितीचे दि.५.०४.२००९ चे सभेत उघडणेत आलेली आहेत. कोटेशनमधील न्युनतम दराने खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देणेत आलेले आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव | विदयुत | ध्वनीक्षेपण | पाणीपुरवठा | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | हिंदुस्थान टुल्स ॲण्ड इंजि.,मुंबई | ३७८१९८.०० | -- | २३७९३.७५ | ४०१९९१.७५ |
| ०२. | स्विटी एंटरप्राईजेस, मुंबई | २९१३९.७५ | -- | १२६८१.०० | ४१८२०.७५ |
| | एकुण रक्कम रुपये | ४०७३३७.७५ | -- | ३६४७४.७५ | ४४३८१२.५० |

त्यानुसार सन २००८-०९ सालाकरीता विदयुत, ध्वनीक्षेपण व पाणीपुरवठा विभागाचे इलेक्ट्रिकल व एम.एस.हार्डवेअर तसेच प्लंबींग साहित्यासाठी एकुण रक्कम रु.८९,०९,९४४.१४ चे पुरवठा आदेश देणेत आलेले असल्याने मुळ मंजूरीपेक्षा रु.१३,००,२००/- जादा खर्च येणार आहे. तथापि उपरोक्त साहित्य हे वार्षिक स्वरुपाचे असल्याने मागणीप्रमाणे व आवश्यकतेनुसार पुरवठा चालू आहे. तरी सदरील जादा खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

तरी सन २००८-०९ करीता विदयुत, ध्वनीक्षेपण व पाणीपुरवठा विभागासाठी आवश्यक असणारे इलेक्ट्रिकल व एम.एस.हार्डवेअर तसेच प्लंबींग वार्षिक साहित्याचे खरेदीसाठी मूळ मंजूरीपेक्षा जादा येणाऱ्या रक्कम रु.१३,००,२००/- चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४२१** | **प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे सन २००८-०९ करीता विदयुत, ध्वनीक्षेपण व पाणीपुरवठा विभागासाठी आवश्यक असणारे इलेक्ट्रिकल व एम.एस.हार्डवेअर तसेच प्लंबींग वार्षिक साहित्याचे खरेदीसाठी मूळ मंजूरीपेक्षा जादा येणाऱ्या रक्कम रु.१३,००,२००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.४४** **पाणीपुरवठा विभागाकरीता आवश्यक मटेरिअल खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** संस्थान परिसराकरीता पाणी पुरवठा करण्यासाठी ओहरहेड टँकपासून १२" पाईपलाईन टाकून पाणी आणलेले आहे. जूने प्रसादालयाचे गेटसमोर सदरची पाईपलाईन ही नगर मनमाड रोडचे खालून आलेली आहे. सदरची पाईपलाईन टाकून बराच कालावधी झाल्यामुळे ती लिकेज झालेली होती. तेथे सदरच्या पाईपलाईनचे लिकेज काढणे कठीण झालेले होते. त्यावेळी रोड जे.सी.बी. मशिनच्या साहय्याने खोदून पाईपलाईनला वेल्डींग करून लिकेज काढलेले आहे. परंतू सदरचा पाईप जूना झाल्यामुळे पुन्हा-पुन्हा लिकेज होतो.

याकरीता तेथे पर्याय म्हणून सदरच्या पाईपलाईन शेजारी नविन पाईप टाकून (रोड क्रॉसिंग पुरता) पाण्याची व्यवस्था करावी लागणार आहे. तसेच पाणी पुरवठा विभागाचे दैनंदिन कामांकरीता तसेच कर्मचा-यांचे सुरक्षिततेकरीता इतर मटेरियची आवश्यकता आहे.

तरी खालीलप्रमाणे मटेरियल खरेदी करावे लागणार आहे. सदरच्या मटेरियलचे अंदाजे दर हे नाशिक येथील अधिकृत विक्रेते मेसॉन ट्रेडर्स यांचेकडून घेतलेल्या आहेत. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | मटेरियल तपशिल | साईज | कंपनी | नग/मिटर/ किलो | दर रुपये | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | सी.आय.डी.जॉईंट. नटबोल्ट, रबर जॉईटसह. | ६" | | ०६ नग. | ५५०/-प्रती नग. | ३३००.०० |
| | | ८" | | ०६ नग. | ८५०/-प्रती नग. | ५१००.०० |
| | | १०" | | ०६ नग. | १०००/-प्रती नग. | ६०००.०० |
| | | १२" | | ०६ नग. | १३००/-प्रती नग. | ७८००.०० |
| ०२ | सी.आय.डी.जॉईंट रबर रिंग. | ६" | | १२ नग. | २४/-प्रती नग. | २८८.०० |
| | | ८" | | १२ नग. | ३२/-प्रती नग. | ३८४.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १०" | | १२ नग. | ४०/-प्रती नग. | ४८०.०० |
| | | १२" | | १२ नग. | ४८/-प्रती नग. | ५७६.०० |
| ०३ | सी.आय.पाईप. | १०" | | ०६ मिटर | ३२६०/-प्र. मिटर | १९५६०.०० |
| | | १२" | | ०६ मिटर. | ४२००/-प्र.मिटर | २५२००.०० |
| ०४ | सी.आय.पाईप टेल पीस (एका बाजुस फ्लँज) | ८" | | ०२ नग. | २३४०/-प्रती नग. | ४६८०.०० |
| | | १०" | | ०२ नग. | ३१८०/-प्रती नग. | ६३६०.०० |
| | | १२" | | ०२ नग. | ४०८०/-प्रती नग. | ८१६०.०० |
| ०५ | रबर शिट | ५ mm | | ५० किलो. | ५०/- प्रती किलो. | २५००.०० |
| ०६ | कटर पाते. | ४" | | २४ नग. | ३५/- प्रती नग. | ८४०.०० |
| | | १२" | | १२ नग. | १२९/- प्रती नग. | १५४८.०० |
| ०७ | ग्राईंडर पाते. | ४" | | १२ नग. | १०३/- प्रती नग. | १२३६.०० |
| | | १२" | | १२ नग. | ७०७/- प्रती नग. | ८४८४.०० |
| ०८ | एम.एस. नटबोल्ट. | १२ mm x ६" | | २० किलो. | ७०/- प्रती किलो. | १४००.०० |
| | | १२ mm x ४" | | २० किलो. | ७०/- प्रती किलो. | १४००.०० |
| | | १२ mm x ३" | | २० किलो. | ७०/- प्रती किलो. | १४००.०० |
| | | १२ mm x २.१/२" | | २० किलो. | ७०/- प्रती किलो. | १४००.०० |
| ०९ | वॉशर. | १२ mm. | | १० किलो | ७५/- प्रती किलो. | ७५०.०० |
| १० | गमबुट जोड | १० नं. | | १२ जोडी. | १७०/- प्रती जोड. | २०४०.०० |
| ११ | हँडग्लोज जोड | ११ KW करीता | | १२ जोडी. | २५०/- प्रती जोड. | ३०००.०० |
| १२. | हँडग्लोज जोड | वर्कशॉप करीता. | | ०६ जोडी. | ३०/- प्रती जोड. | १८०.०० |
| १३. | सेफ्टी गॉगल. | | | ०६ नग. | २५/- प्रती नग. | १५०.०० |
| १४. | रेनकोट | | | १२ नग. | ४५०/- प्रती नग. | ५४००.०० |
| १५. | पाईप व्हाईस | १.१/२" | | ०१ नग. | ६००/- प्रती नग. | ६००.०० |
| | | २" | | ०१ नग. | ७५०/- प्रती नग. | ७५०.०० |
| | | ३.१/२" | | ०१ नग. | १९००/- प्रती नग. | १९००.०० |
| | | ४" | | ०१ नग. | २७००/- प्रती नग. | २७००.०० |
| १६. | रॅचेट डाय सेट | १/२" - १" | | ०२ नग. | १८००/- प्रती नग. | ३६००.०० |
| | | १.१/४" - २" | | ०२ नग. | ३६००/- प्रती नग. | ७२००.०० |
| १७. | ड्रील मशिन. | DW/५६३ | डिवॅल्ट कं. | ०१ नग. | ७५००/- प्रती नग. | ७५००.०० |
| १८ | ड्रील बीट | | | १२ नग. | ६५/- प्रती नग. | ७८०.०० |
| १९ | पाईपरेंज पान्हा. | १२" | टपारिया. | १२ नग. | २००/- प्रती नग. | २४००.०० |
| | | १८" | टपारिया. | १२ नग. | ३७५/- प्रती नग. | ४५००.०० |
| | | २४" | टपारिया. | ०६ नग. | २२००/- प्रती नग. | १३२००.०० |
| | | ३६" | टपारिया. | ०३ नग. | ३५००/- प्रती नग. | १०५००.०० |
| | | | | | **एकुण -** | **१७५२४६.००** |

तरी वरील प्रमाणे मटेरियल कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे **रु. १,७५,२४६/-** मात्रचे खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४२२** | **प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे पाणीपुरवठा विभागाकरीता आवश्यक मटेरिअल कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु.१,७५,२४६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

**विषय नं.४५** **जी.आय पाईप व प्लंबींग मटेरिअल खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** पिंपळवाडी रोडच्या उत्तर बाजुस व विद्युत विभागाच्या पुर्व बाजुस जनरल संडास बाथरुम करीता शांतिनिवास टेरेसवरुन पुर्वीपासून पाणी देण्यात येत होते. दि. १३/०४/२००९ पासून जनरल बाथरुमला व विद्युत विभागाला पुर्ण दाबाने पाणी मिळत नाही. असे श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को. ऑप. सोसायटी लि. संस्थेने पत्राने कळविलेले आहे. त्यानुसार पाईप लाईन ३० ते ३५ वर्षा पासून जुनी झालेली असुन चोकअप काढयाचा प्रयत्न केला परंतू चोकअप निघाले नाही. साई भक्तांच्या सेवेसाठी पाणी पुरविणे आहे. त्याकरीता साईप्रसाद नं.१ टेरेसवरील टाकीवरुन दुसरी स्वतंत्र पाईप लाईन टाकून पाणी पुरविता येईल त्याकरीता खालील प्रमाणे मटेरीयलची आवश्यकता आहे.

| अ.नं. | तपशिल | साईज | मागणी | अंदाजे दर | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | जी. आय. पाईप<br>प्रकाश सुर्या कंपनी सी- क्लास | १.१/२" | ७०० फूट | ७५ /- प्रती फूट | ५२,५००/- |
| ०२ | जी. आय. सॉकेट | १.१/२" | २५ नग | ५५ /- प्रती नग | १,३७५/- |
| ०३ | जी. आय. एल्बो | १.१/२" | १५ नग | ७५/- प्रती नग | १,१२५/- |
| ०४ | जी. आय. टि | १.१/२" | ०६ नग | ९०/- प्रती नग | ५४०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०५ | गेट व्हॉल - लिडर कंपनी | १.१/२" | ०६ नग | १५००/- प्रती नग | ९,०००/- |
| ०६ | युनियन | १.१/२" | ०२ नग | १२५ /- प्रती नग | २५०/- |
| | | | | एकूण- | ६४,७९०/- |
| | | | | + वॅट १२.५ % | ८०९९/- |
| | | | | **एकुण -** | **७२,८८९/-** |

वरील प्रमाणे मटेरीयल खरेदी विभागामार्फत विहित नमून्यात खरेदी करण्यास व त्यासाठी अंदाजे येणा-या रुपये ७२,८८९/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४२३** | **प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे जी.आय पाईप व प्लंबींग मटेरिअल कोटेशन मागवून विहित पद्धतीने खरेदी करण्यास व त्यासाठी अंदाजे येणा-या रुपये ७२,८८९/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

**विषय नं.४६ धर्मशाळा येथील गार्डनमध्ये बसविणेसाठी खेळणी खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** धर्मशाळा येथील रिकाम्या जागेत सन २००० मध्ये प्रशस्त बगीचा तयार करण्यात आलेला आहे. या बागेत विविध प्रकारची लॉन,झाडे,रोपे लावण्यात आलेली आहेत. सदरची बाग ही शहराच्या मध्यवती ठिकाणी असल्याने साईभक्त व स्थानिक रहिवाशी व लहान मुले संध्याकाळच्या वेळेच या बागेत आपला वेळ घालवतात. या बागेत बालोद्यान तयार करण्यात आलेले आहेत.या बालोद्यान मधील खेळणी खराब झालेले असल्याने या ठिकाणी दुरुस्त करुन खेळणी बसविता येतील. खालील प्रकारची खेळणी खरेदी करता येईल.

| अ.न. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| ०१ | Large slide Chute of F.R.P Hi 6 Ft. | रु.१७०५६.०० |
| ०२ | Platform M.G.R. | रु. २९६४०.०० |
| ०३ | Multi Activity Play System MAPS .17 | रु. ४८८८०.०० |
| | **एकुण** | **रु. ९५५७६.००** |

सदर बगीचा मध्ये ०३ खेळणी बसविणेसाठी अंदाजे रु.९५५७६/-(रु.पंच्याण्णव हजार पाचशे शहात्तर ) मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४२४** | **प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तीन खेळणी विहित पद्धतीने कोटेशन मागवून खेळणी खरेदी करणेस मान्यता देण्यात आली. तसेच आवश्यकतेनुसार अधिक नवीन खेळण्या खरेदी करण्यात याव्यात असे ठरले.** |

(कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

**विषय नं.४७ मंदिर परिसरात व लेंडीबागेसाठी बाकडे खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर परिसरात दाट सावली देणारे सावलीचे झाडे लावण्यात आलेली आहेत. या झाडांच्या सावलीत साईभक्त बसतात.शिवाय मंदिर परिसरात सभामंडप येथे बसण्याची सोय केलेली आहेत.परंतु जनसंपर्क कार्यालय कडुन मंदिराकडे व गेट नं ३ कडे जाणा-या रस्त्यावर साईभक्त सावलीत बसलेले असतात. या मुळे तेथे कायमच गर्दी असते.

लेंडीबागेचे नुतनीकरण करतेवेळी बागेत सावलीची झाडे व लॉन लावण्यात आलेली आहेत.या बागेत चालणेसाठी पेव्हीग ब्लॉकचे रस्ते करण्यात आलेले आहेत. बागेत पुर्वीचे कॅन्टीन कार्यालयाच्या पाठीमागील भागात बरीच जागा लॉन व झाडे न लावता ठेवलेली आहे. या जागेत साईभक्तांना बसण्याची व्यवस्था करण्यात येईल.यासाठी तेथे अधुनिक पध्दतीचे बाकडे बसवता येतील जेणेकरुन रस्त्यावर बसणारे साईभक्त या ठिकाणी येवुन बसतील.

मा. अध्यक्ष सो. यांनी भक्त निवास व व्दारावती इमारत परिसरास भेट दिली असता त्यांनी भक्त निवास इमारतीचे आतील गार्डन व व्दारावती इमारतीचे समोरील गार्डन मध्ये भक्तांना बसणेसाठी बाकडे बसविणे बाबत सूचना केली आहे. खालील प्रमाणे संस्थान परिसरात बाकडे बसविता येतील.

| क्र | परिसर | बाकडे संख्या | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | लेंडीबाग | २० नग | ११२५० | रु.२२५०००.०० |
| २. | भक्त निवास गार्डन | ३५ नग | ११२५० | रु. ३९३७५०.०० |
| ३. | धर्मशाळा परिसर गार्डन | ३५ नग | ११२५० | रु. ३९३७५०.०० |
| | एकुण | ९० नग | | रु.१०,१२,५००.०० |

वरील प्रमाणे ९० नग बाकडे खरेदी करणेस रु.१०,१२,५००/- मात्र इतक्या खर्चास अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४२५** | **प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मंदिर परिसरात व लेंडीबागेसाठी ९० नग बाकडे खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रु.१०,१२,५००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

**विषय नं.४८** **श्री तेजांशू न्याती (Nyati Infosys, Pune) यांना माहिती तंत्रज्ञान विभागासाठी संगणक सिस्टिम ॲटोमेशन (computer System Automation) तंत्रज्ञ यांचे मानधनाबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २४ मे, २००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४६३ नुसार श्री तेजांश न्याती (Nyati Infosys, Pune) यांची माहिती तंत्रज्ञान विभागाकडे च्संगणक सिस्टिम ॲटोमेशन तंत्रज्ञछ म्हणून एक वर्षाचे कालावधीसाठी नेमणूक करणेस व त्यांचे प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, प्रत्यक्ष प्रकल्प खर्चाच्या ३%+ टॅक्स इतकी रक्कम त्यांचेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या तंत्रज्ञानापोटी देणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, सदर मानधनाबाबत श्री न्याती यांचेशी पुन्हा चर्चा केली असता, त्यांनी प्रकल्पाचे प्रत्यक्ष खर्चाचे १% + टॅक्स रक्कम व २५,०००/- प्रति महिना मानधन स्विकारणेस सहमती दर्शविली आहे.

तरी, श्री तेजांशू न्याती (Nyati Infosys, Pune) यांना माहिती तंत्रज्ञान विभागाकडे संगणक सिस्टिम ॲटोमेशन तंत्रज्ञ म्हणून आस्थापना विभागामार्फत एक वर्षाचे कालावधीसाठी ( ०१ मे, २००९ ते दिनांक ३० एप्रिल, २०१०) नेमणूक आदेश देणेस व श्री न्याती यांना त्यांचेमार्फत करण्यात येणारे प्रकल्पाचे प्रत्यक्ष खर्चाच्या १% + टॅक्स रक्कम व प्रति महिना रुपये २५,०००/-+ टॅक्स इतके मानधन देणेबाबत झालेल्या बदलाची नोंद घेणेसाठी सविनय सादर.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४२६** | **श्री तेजांशू न्याती (Nyati Infosys, Pune) यांना माहिती तंत्रज्ञान विभागाकडे संगणक सिस्टिम ॲटोमेशन तंत्रज्ञ म्हणून ६ महिने कालावधीसाठी नेमणूक आदेश देणेस व त्यांचेमार्फत करण्यात येणारे प्रकल्पाचे प्रत्यक्ष खर्चाच्या १% + टॅक्स रक्कम व प्रति महिना रुपये २५,०००/-+ टॅक्स इतके मानधन देणेस मान्यता देणेत आली.** |

(कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं.४९** **वाहन क्र.एमएच-१७-व्ही-८४८३ (महिंद्रा झायलो) चे ए.सी.बाबत.**

**प्रस्ताव-** दि.१७/०१/२००९ रोजी महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता एक महिंद्रा झायलो वाहन देणगी दिलेले आहे. सदर वाहनाचा वापर कार्यालयीन कामाकरीता होत आहे.

देणगी देण्यात आलेले महिंद्रा झायलो वाहन E२ मॉडेलचे असलेने सदर वाहनात सिंगल रो ए.सी. दिलेला आहे. तथापि आसन व्यवस्था थ्री रो पध्दतीची असलेने ए.सी. लावलेनंतर वाहन कुलींग होत नाही. याबाबत मा. सदस्य / अधिकारी यांनी तक्रारी केलेल्या आहेत.

ए.सी. संदर्भात महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीकडे चौकशी केली असता सदर वाहनाचे ए.सी.मध्ये महिंद्रा झायलो E८ मॉडेल प्रमाणे (थ्री रो ए.सी.) बदल करता येईल, व सदरची कामे कंपनीचे अधिकृत डिलर जितेंद्र मोटर्स, नाशिक यांचेकडून करून मिळेल असे सुचविले आहे.

त्यानुसार, जितेंद्र मोटर्स यांचेकडे विचारणा केली असता, त्यांनी दि.११/०४/२००९ चे ई-मेल कोटेशनद्वारे सदरचे कामाकरीता रू.५२,१४०/- मात्र (लेबर सर्व्हिस टॅक्ससह) खर्च अपेक्षीत असल्याचे कळविले आहे.

तरी वरील प्रमाणे महिंद्रा झायलो वाहनात जितेंद्र मोटर्स, नाशिक यांचेकडून E८ मॉडेल प्रमाणे ए.सी. बदल करून घेणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रू.५२,१४०/- मात्रचे खर्चास मान्यतेचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.४२७** | **प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे महिंद्रा झायलो वाहनात जितेंद्र मोटर्स, नाशिक यांचेकडून E८ मॉडेल प्रमाणे ए.सी. बदल करून घेणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रू.५२,१४०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**विषय न.५०** **वाहन विभागाकरीता जागा निश्चित करणेबाबत**

**प्रस्ताव-** सन-१९९८ मध्ये कामात सु-सुत्रता यावी म्हणून संस्थानकडे असलेली सर्व वाहने एकत्रित करून आय.टी.आय. शेजारील अंदाजे २२८' X २०९' फुट जागेत वाहने उभी करणे करीता पत्र्याचे शेड व तात्पुरते कार्यालय, वर्कशॉप, कारवॉशर बांधुन वाहन विभाग स्वतंत्र्यपने सुरू करण्यात आलेले आहे. त्यावेळी अंदाजे १५ वाहने व १७ कर्मचारी होते.

अ) दिवसेंदिवस संस्थानची वाढती भौगोलिक परिस्थिती व कामाचा विस्तार होऊन आज मितीला वाहन विभागाकडे कायम कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी असे एकुण ९१ कर्मचारी आहेत. तसेच कार्यालयीन वाहने, रूग्णवाहिका, बसेस तसेच मालवाहतुक वाहने अशी एकुण ४५ वाहने आहेत. सदर वाहनांना पार्किंग करणे करीता वाहन विभागातील जागा अपुरी पडत आहे.

ब) सध्या वाहन विभागाची असलेली जागा ही साई आश्रम इमारतीचे प्रकल्पात असल्यामुळे वाहन विभाग इतरत्र स्थालांतरीत करावे लागेल.

नवीन वाहन विभागाकरीता बांधकाम विभागामार्फत नवीन जागेत खालील प्रमाणे नवीन बांधकाम करावे लागेल.

०१. कार्यालयाकरीता नवीन आर.सी.सी. बांधकाम असलेली डबल मजली इमारत त्यात स्टोअर, कार्यालय, रेकॉर्ड रूम, वाहन चालक विश्रांती रूम तयार करणे.

०२. वाहनांची पार्किंग करणे करीता पत्र्याचे / आर.सी.सी. शेड तयार करणे.

०३. वर्कशॉप तयार करणे.

०४. वाहन दुरूस्ती करीता वर्कशॉप मध्ये नवीन अंडरग्राउंड रॅम्प तयार करणे.

०५. कार वॉशर हायड्रोलिक रॅम्प तयार करणे.

०६. कॉक्रीटीकरण केलेले ग्राउंड तयार करणे.

तरी वाहन विभागाकरीता बांधकाम विभागामार्फत निश्चित करून वरील प्रमाणे कामे करून मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

| | |
|---|---|
| निर्णय क्र.४२८ | **याकामी सर्वश्री मा.विश्वस्त सुरेश गोरक्षनाथ वाबळे, डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी शेती महामंडळाचे जागेची समक्ष पहाणी करुन जागा निश्चितीबाबत अंतिम निर्णय घेण्यात यावा,असें ठरले.** |

(कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख/बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.५१** **श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे सहकार्याने सिटी ॲण्ड गिल्डस,लंडन व कॉन्फिडरेशन इंडस्ट्रीज यांचे वतीने चालविले जाणारे कोर्सेस शिर्डी परिसरातील शैक्षणिक संस्थामध्ये सन २००८-०९ व २००९-१० या आर्थिक वर्षात चालविणेसाठी व अनुदान वितरीत करणेकामी कार्योत्तर मंजूरीबाबत.**

**प्रस्ताव -** सन २००७-०८ हया अर्थिक वर्षात सिटी ॲण्ड गिल्डस, लंडन संस्थेचे अभ्यासक्रम शिर्डी परिसरातील १७ शैक्षणिक संस्थामध्ये सुरु करण्यासाठीचा निर्णय झालेला आहे. त्यानुरुप शासनाला दि. ०९/०८/२००७ रोजी मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात आला. दरम्यान शासनाचा निर्णय दि.१७/०७/२००८ रोजी होऊन हा निर्णय सन २००८-०९ हया अर्थिक वर्षासाठी न होता सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षाकरीता निधी मंजुर करण्यात आलेला आहे असे नमुद केलेले आहे. शासन निर्णयाला उशीर झाल्यामुळे सदरचे अभ्यासक्रम हे २००७-०८ मध्ये सुरु करता आले नाहीत.

शासन निर्णय क्र.सासवि २००५/६९८/(१०९)का सोळा,मंत्रालय,मुंबई,दि.१८जुलै,२००८ अन्वये सदरचा अभ्यासक्रम चालू करणेकामी दि. ०७/०१/२००९ रोजी संबंधीत सर्व संस्थेच्या प्रतिनिधी सह बैठक आयोजित करुन सदरचा अभ्यासक्रम दि ०७/०२/२००९ ते दि.०७/०६/२००९ अखेर या कालावधित मा.व्यवस्थापन समितीच्या कार्यात्तर मान्यतेच्या अधिन राहुन पुर्ण करावयाचे ठरले. त्या निर्णयाप्रमाणे सदरचे अभ्यासक्रम विविध संस्थेत चालू करण्यात आलेले आहेत. दरम्यान अनुदान देणेकामी अर्थिक वर्षाच्या कालावधीची अडचण येईल त्या अनुषंगाने शासनास जा.नं. आयटीआय/संकिर्णे/७८१/२७/०८ दि.०१/०१/२००९ ने शासन निर्णयामध्ये सन २००७-०८ ऐवजी सन २००८-०९ अशी दुरुस्ती होऊन निर्णय शुध्दीपत्र होणेस विनंती केली आहे. परंतु अजुन पर्यंत तसे शुध्दीपत्र न आल्यामुळे स्मरण पत्र पाठवुन विनंती करित आहोत.

शासन मान्यतेनुसार सदरचा रु.२०,००,०००/- (रु. वीस लाखाचा) निधी हा सन २००८-०९ व २००९-१० या कालावधीत वितरित करावा लागेल तरी अभ्यासक्रम चालविण्यास व निधीच्या खर्चास कार्यात्तर मंजुरी मिळण्यास मान्यतेसाठी सादर.

| | |
|---|---|
| निर्णय क्र. ४२९ | **प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सन २००८-०९ व २००९-१० या कालावधीत अभ्यासक्रम चालविण्यास व शासन मान्यतेनुसार सदरचा रु.२०,००,०००/- (रु. वीस लाख) निधीच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय.)

**विषय न.५२** **औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सत्र ऑगस्ट -२००९ चे प्रशिक्षणार्थी प्रवेशाबाबत**

**प्रस्ताव -** औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ऑगष्ट २००९ चे सत्रापासून सुरू होणारे शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया माहे जुन २००९ पासून सुरू करावी लागणार आहे. त्याची पुर्वतयारी करणेसाठी प्रवेश प्रणालीच्या धोरणात्मक बाबींवर आवश्यक तो निर्णय मा. व्यवस्थापन समिती यांचेकडून होणे आवश्यक आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सत्र-ऑगष्ट २००९ चे प्रशिक्षणार्थी प्रवेश...

मागील वर्षी मा. व्यवस्थापन समितीने दिनांक-०७/०७/२००८ रोजी झालेल्या सभेत विषय नं. ०२ निर्णय क्रमांक ५६० अन्वये उमेदवारांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत निर्णय घेण्यात आला.

१९९६ पासून शिर्डीसह शिर्डी परिसरातील १५ कि. मी. त्रिज्येत येणा-या खालील गांवातील उमेदवारांना प्रवेशासाठी उपलब्ध जागांच्या ८० % जागा राखीव ठेवून उर्वरीत २० % जागा सर्व उमेदवारांना खुल्या ठेवण्यात येतात. शिर्डीसह शिर्डी पासून १५ कि.मी. परिसरात कायम वास्तव्य असणारा उमेदवार हा त्या गांवातील मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेतच इयत्ता ८ वी, ९ वी, १० वी शिक्षण घेवून व वार्षिक परिक्षेत बसून उत्तीर्ण झालेला असावा.

<u>शिर्डीसह शिर्डी परिसरातील १५ कि.मी.त्रिज्येत येणा-या गावांची नांवे खालीलप्रमाणे (तक्ता क्र.१)</u>

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | राहाता | २५ | बहादराबाद | ४९ | रांजणगांव-देशमुख |
| २ | साकुरी | २६ | शहापुर | ५० | अंजनापूर |
| ३ | दहिगांव-को-हाळे | २७ | पोहेगांव खु | ५१ | बहादरपुर |
| ४ | पिंपळस | २८ | पोहेगांव बु | ५२ | मढी बु |
| ५ | को-हाळे | २९ | चांदेकसारे | ५३ | मढी खु |
| ६ | नांदुर्खी बु | ३० | घारी | ५४ | देर्डे-को-हाळे |
| ७ | नांदुखी खु | ३१ | डाउच खु | ५५ | देर्डे-चांदवड |
| ८ | डो-हाळे | ३२ | रास्तापुर | ५६ | चांदगव्हाण |
| ९ | कनकुरी | ३३ | नाथुपाटलांची वाडी | ५७ | डाउच बु |
| १० | निमगांव-को-हाळे | ३४ | एकरूखे | ५८ | हिंगणी |
| ११ | निघोज | ३५ | गणेशनगर | ५९ | मुर्शतपुर |
| १२ | सावळीविहीर खु | ३६ | रांजणगांव | ६० | कोपरगांव |
| १३ | सावळीविहीर बु | ३७ | अस्तगांव | ६१ | धारणगांव |
| १४ | सोनेवाडी | ३८ | कालेवाडी | ६२ | जेउर पाटोदा |
| १५ | पिंपळवाडी | ३९ | संवत्सर | ६३ | जेउर कुंभारी |
| १६ | रूई | ४० | कोकमठाण | ६४ | शिंगणापूर |
| १७ | केलवड | ४१ | लक्ष्मणवाडी | ६५ | रामपूर |
| १८ | खडके-वाके | ४२ | कान्हेगांव | ६६ | आदमाने वस्ती |
| १९ | काकडी | ४३ | वारी | ६७ | आडगांव |
| २० | डांगेवाडी | ४४ | देवगांव | ६८ | पिंपरी - निर्मळ |
| २१ | डांगेवाडी-कोपरगांव | ४५ | पुणतांबा | ६९ | धनगरवाडी |
| २२ | सोयेगांव | ४६ | रामपुरवाडी | ७० | शिंगवे |
| २३ | वेस | ४७ | वाकडी | ७१ | सडे |
| २४ | जवळके | ४८ | मनेगांव | ७२ | शिर्डी |

संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यासाठी विशेषबाब म्हणून विहीत केलेल्या परिक्षेत त्याना मिळालेल्या एकूण गुणात २ % वाढ करून गुणवत्ता यादी तयार करण्यात येते मात्र ही सवलत मुलगा किंवा मुलगी यांचेसाठी, एखाद्या कर्मचा-यास त्याच्या सेवाकाळात एकदाच मिळते.

शासनाने विहीत केलेल्या आरक्षण पध्दती प्रमाणेही मागासवर्गीयांसाठीचे जागांचे आरक्षण ठेवण्यात येते. ते खालीलप्रमाणे

अ - मागासवर्गीयासाठी राखीव जागा (तक्ता क्र. २)

| | | |
|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती व बौध्द धर्म स्विकारलेल्या व्यक्ती | १३ % |
| २ | अनुसचित जमाती (विशिष्ट भागा बाहेरील जमाती धरून) | ७% |
| ३ | विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती ) | ३% |
| ४ | भटक्या जमाती (एन टी-१)( जुलै-१९९० पुर्वीच्या २८ व तत्सम ) | २.५ % |
| ५ | भटक्या जमाती (एनटी-२ ) ( धनगर व तत्सम जमाती ) | ३.५ % |
| ६ | भटक्य जमाती ( एनटी-३ ) (वंजारी व तत्सम जमाती ) | २ % |
| ७ | इतर मागास वर्गीयांकरीता | १९ % |

एकूण- ५० %

ब. अपंग उमेदवारांसाठी ३ % आरक्षण.

क. महिलांसाठी व्यवसाय निहाय २५ % आरक्षण.

ड. तांत्रिक विषयासह परीक्षा पास उमेदवारांना व्यवसाय निहाय २५ % आरक्षण

इ. संरक्षण सेवेतील व्यक्तीसाठी १ % जागा राखीव.

फ. सर्टिफाईड ( बोल्स्टर ) स्कुलमधील व्यक्ती १% जागा राखीव.

महिलांसाठी असलेल्या व्यवसाय निहाय २५% आरक्षणामध्ये बदल होऊन ते ३०% झालेले आहे.

श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये २००८ च्या सत्रामध्ये प्रवेशासाठी व्यवसाय, तसेच क्षेत्र निहाय जागांची विभागणी खालीलप्रमाणे केली होती.

(तक्ता क्र. ३)

| अ. नं. | अभ्यासक्रम | आवश्यक शैक्षणिक अर्हता | कालावधी | प्रवेश क्षमता | सुपर न्युमररी जागा २० % | सुपर न्युमररी जागा ३० % | एकूण जागांची प्रवेशासाठी क्षेत्र निहाय विभागणी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | शिर्डी प शिर्डी पासून १५ कि.मी. परीसरात कायम वास्तव्य असणारे उमेदवार | उर्वरीत सर्व उमेदवार |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | टूल अँड डाय मेकर | इ. १० वी उत्तीर्ण | ०३ वर्षे | १६ | ०३ | ०५ | १५ | ०४ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | टर्नर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०२ | ०४ | ११ | ०३ |
| ३ | मशिनष्ट ग्राईंण्डर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०२ | ०४ | ११ | ०३ |
| ४ | फिटर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | ०५ | १५ | ०४ |
| ५ | इलेक्ट्रीशियन | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | ०५ | १५ | ०४ |
| ६ | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेन्टेनन्स | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | ०५ | १५ | ०४ |
| ७ | रेफ्रिजरेशन, ॲण्ड एअर कन्डीशनिंग मेकॅनिक | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | ०५ | १५ | ०४ |
| ८ | मोटार मेकॅनिक व्हेईकल | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | ०५ | १५ | ०४ |
| ९ | वेल्डर | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | २४ | ०४ | ०७ | २२ | ०६ |
| १० | ट्रॅक्टर मकॅनिक | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ३२ | ०६ | १० | ३० | ०८ |
| ११ | कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामर ॲसिस्टंट (कोपा) | इ. १२ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ४० | ०४ | १२ | ३५ | ०९ |
| १२ | क्राफ्टस्मन फुड प्रॉडक्शन (व्हेज) | इ. १० वी उत्तीर्ण् | १ वर्ष | १६ | ०३ | ०५ | १६ | ०३ |
| | | | | २३२ | ३९ | ७२ | २१३ | ५६ |

टूल ॲंड डाय मेकर हा व्यवसाय तीन वर्षे कालावधीचा असून संस्था दोन सत्रांमध्ये चालत असल्याने ऑगस्ट २००९ पासूनच्या सत्रामध्ये या व्यवसायात प्रवेश देता येणार नाही. मागील वर्षी वर दर्शविलेल्या रकाना क्र. ६ मध्ये एकूण मंजूर जागांच्या २०% सुपरन्युमररी (जादा) भरावयाच्या होत्या. तथापी या जादा जागा २०% ऐवजी ३०% भरण्यास शासनानी मान्यता दिल्यामुळे ३०% प्रमाणे भरल्या आहेत. या पुढेही जादा जागा शासनाकडून मान्यता मिळेल त्याप्रमाणे भरता येतील.

१ ऑगस्ट २००९ पासून सुरु होणा-या सत्रामध्ये खालील व्यवसायांमध्ये प्रवेश द्यावयाचा आहे.

(तक्ता क्र. **४**)

| अ.नं. | अभ्यासक्रम | आवश्यक शैक्षणिक अर्हता | कालावधी | प्रवेश क्षमता | सुपर न्युमररी जागा २० % | सुपर न्युमररी जागा ३० % | एकूण जागांची प्रवेशासाठी क्षेत्र निहाय विभागणी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | शिर्डी प शिर्डी पासून १५ कि.मी. परीसरात कायम वास्तव्य असणारे उमेदवार | उर्वरीत सर्व उमेदवार |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | टर्नर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०२ | ०४ | ११ | ०३ |
| २ | मशिनष्ट ग्राईंण्डर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०२ | ०४ | ११ | ०३ |
| ३ | फिटर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | ०५ | १५ | ०४ |
| ४ | इलेक्ट्रीशियन | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | ०५ | १५ | ०४ |
| ५ | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेन्टेनन्स | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | ०५ | १५ | ०४ |
| ६ | रेफ्रिजरेशन, ॲण्ड एअर कन्डीशनिंग मेकॅनिक | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | ०५ | १५ | ०४ |
| ७ | मोटार मेकॅनिक व्हेईकल | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | ०५ | १५ | ०४ |
| ८ | वेल्डर | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | २४ | ०४ | ०७ | २२ | ०६ |
| ९ | ट्रॅक्टर मकॅनिक | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ३२ | ०६ | १० | ३० | ०८ |
| १० | कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामर ॲसिस्टंट (कोपा) | इ. १२ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ४० | ०४ | १२ | ३५ | ०९ |
| ११ | क्राफ्टस्मन फुड प्रॉडक्शन (व्हेज) | इ. १० वी उत्तीर्ण | १ वर्ष | १६ | ०३ | ०५ | १५ | ०४ |
| | | | | २१६ | ३६ | ६७ | १९९ | ५३ |

गतवर्षी वरीलपैकी अ.नं. १० कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामर ॲसिस्टंट (COPA) या व्यवसायाची दुसरी तुकडी दुस-या पाळीमध्ये व अ.नं. ११ क्राप्टसमन फुड प्रॉडक्शन ( व्हेजेटेरीयन ) या व्यवसायाच्या दोन तुकडया नव्याने सुरु करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविले होते. तथापी त्यांना केंद्र शासनाची कायम संलग्नता प्राप्त झाली नव्हती. तीची प्रक्रिया चालू होती. या दोन व्यवसायाच्या दोन तुकडयांना आता पत्र क्र. डीजीईॲंडटी-१२/१/२००८-टिसी दि. ३०/१२/२००८ नुसार केंद्र शासनाच्या डी.जी.ई. ॲण्ड टी. ची संलग्नता प्राप्त झाली आहे. तसेच वरील पैकी अ.नं. १ ते १० च्या सर्व व्यवसायांना तसेच अ.नं. ११ वरील व्यवसायाच्या एका तुकडीला केंद्र, शासनाची कायमची मान्यता (संलग्नता) पुर्वीच मिळालेली आहे.

तक्ता क्र. ४ मध्ये दर्शविलेल्या सुपरन्युमररीच्या अतिरीक्त जागा भरणेसाठी मागील दोन वर्षात प्रशिक्षण सोडून गेलेल्या उमेदवारांचे प्रमाणास अनुसरून शासनाकडे विहीत नमुन्यात प्रस्ताव सादर करावा लागतो. शासनाकडून मंजूरी मिळाले नंतर या अतिरीक्त जागा भरणेबाबत कार्यवाही करण्यात येते. या जागा भरण्यासाठी शासनाकडून मान्यता मिळेलच असे नाही. तसा बदल झाल्यास संबंधीत प्रवर्गामध्ये त्याची विभागणी करुन त्यावर प्रवेश देता येईल. मागील वर्षी पासून सुपरन्युमररी जागेवर शासनाच्या मान्यतेनंतर मा. व्यवस्थापन समितीच्या निर्देशनानुसार प्रवेश देण्याचे ठरले. त्याबाबतची माहिती माहिती पुस्तकात देण्यात आली.त्या जागांना गुणानुक्रम व आरक्षण यांचे बंधन पाळता येत नाही. त्यामुळे आता या

जागांसाठी गुणानुक्रम व आरक्षण याचे बंधन असणार नाही असे माहीती पूस्तकात नमुद केले आहे. तसे या पुढेही करता येईल.

उमेदवारांना निवडपत्र व संधीपत्र पाठविणात येणार नाहीत, त्याऐवजी अर्ज स्विकतीचे वेळी प्रवेश प्रक्रियेबाबतचे वेळापत्रक देण्यात येते. त्यानुसार त्या त्या प्रवेश फेरीनुसार प्रवेश देण्यात येतात.

उमेदवाराने अर्जात व्यवसायाचे नांव लिहू नये, आलेल्या अर्जांची शैक्षणिक अर्हतेनुसार गुणवत्ता यादी तयार करून, या यादीस अनुसरून व आरक्षण पध्दतीची अमंलबजावणी करून उमेदवारांच्या पसंतीनुसार व्यवसायास प्रवेश देवून प्रवेश प्रक्रिया पुर्ण करण्यात येते.

शैक्षणिक शुल्क व अनामत रक्कम :-

ऑगष्ट २००७ च्या सत्रा पर्यंत प्रत्येक उमेदवारास प्रत्येक वर्षाकरीता शैक्षणिक शुल्क रू.१५०० व अनामत रक्कम रू. ५०००/- एवढी आकारण्यात येत असे. ती ऑगष्ट २००८ पासून शासन निर्णय क्र. आयटीआय-२००८/ रिट/(२७/०८)/व्यशि-२ मंत्रालय विस्तर भवन, मुंबई ३२ दि. ३१ मार्च,२००८. व मा.उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांचे पत्र क्र. प्राकाना/प्रशि/क-१/२००८/४६०५ दि.१२/०५/२००८ आणि दि. ०७/०७/२००८ च्या मा व्यवस्थापन समितीच्या सभेतील विषय नं.०२ निर्णय क्र. ५६० नुसार खालीलप्रमाणे आकारण्यात येते. त्यामध्ये संस्थेच्या दर्जानुसार व व्यवसायांच्या (ट्रेडच्या) प्रकार गटानुसार वेगवेगळी प्रशिक्षण शुल्क निश्चित करण्यात आलेली आहे.

प्रपत्र-अ (तक्ता क्र. ५)

| व्यवसाय अभ्यासक्रम | पुर्वीचे प्रशिक्षण शुल्काचे दर प्रति विद्यार्थी प्रति वर्ष | निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क प्रति विद्यार्थी प्रति वर्ष |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| शिल्प कारागीर प्रशिक्षणांतर्गत खाजगी कायम विनाअनुदानित औ.प्र.केंद्रातील व्यवसाय अभ्यास क्रमाचे प्रशिक्षण शुल्क | रु. १,५००/-<br>व<br>रु. २,१००/-इलेक्ट्रॉनिक्स व संगणक व्यवसायासाठी | “अ” दर्जा प्राप्त केंद्र रु. १२,०००/-<br>“ब” दर्जा प्राप्त केंद्र रु. ११,०००/-<br>“क” दर्जा प्राप्त केंद्र रु. १०,०००/-<br>“ड” दर्जा प्राप्त केंद्र रु. ८,०००/- |

वरिल प्रपत्र “अ” मधील स्तंभ क्र. ३ मध्ये नमुद केलेल्या दर्जानिहाय औ.प्र.केंद्रांमधिल खालील व्यवसाय गटांकरीता प्रतिविद्यार्थी प्रतिवर्ष प्रशिक्षण शुल्क लागु राहील.

प्रपत्र-ब (तक्ता क्र. ६)

| अ) मशिन व्यवसायासाठी (उदा. मशिनिष्ट, टर्नर, टुल ॲण्ड डायमेकर, मशिन टुल मेन्टे. इ.) | ब)इतर अभियांत्रिकी व्यवसाय गटासाठी(उदा.इलेक्ट्रीकल, यांत्रिकी, आय.टी., ऑटो मोबाईल सेक्टर इ.) | क) बिगर अभियांत्रिकी व्यवसाय गटांकरीता (उदा. ॲपरेल, रिटेल, हॉस्पिटॅलिटी सेक्टर इ.) |
|---|---|---|
| “अ” दर्जा प्राप्त केंद्र १००%<br>“ब” दर्जा प्राप्त केंद्र ९०%<br>“क”र्जा प्राप्त केंद्र ८०%<br>“ड” दर्जा प्राप्त केंद्र ६०% | “अ” दर्जा प्राप्त केंद्र ७०%<br>“ब” दर्जा प्राप्त केंद्र ६०%<br>“क”दर्जा प्राप्त केंद्र ५०%<br>“ड”दर्जा प्राप्त केंद्र ४०% | “अ” दर्जा प्राप्त केंद्र ५०%<br>“ब” दर्जा प्राप्त केंद्र ४०%<br>“क” दर्जा प्राप्त केंद्र ३०%<br>“ड” दर्जा प्राप्त केंद्र २०% |

आपले औ.प्र. केंद्राला शासनाचा “अ” दर्जा प्राप्त झालेला आहे. त्यानुसार आपल्या संस्थेतील व्यवसायांना खालीलप्रमाणे प्रशिक्षण शुल्क प्रतिविद्यार्थी प्रति वर्षी घेण्यात येते.

तक्ता क्र. ७

| अ. नं. | अभ्यासक्रम | आवश्यक शैक्षणिक अर्हता | कालावधी | प्रवेश क्षमता | सुपर न्युमररी जाग | एकूण जागा | प्रति वर्ष प्रती प्रशिक्षणार्थी सुधारीत प्रशिक्षण शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | टूल अँड डाय मेकर | इ. १० वी उत्तीर्ण | ०३ वर्षे | १६ | ०३ | १९ | रु. १२,०००/- |
| २ | टर्नर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०२ | १४ | रु. १२,०००/- |
| ३ | मशिनष्ट ग्राईंण्डर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०२ | १४ | रु. १२,०००/- |
| ४ | फिटर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १९ | रु. ०८,४००/- |
| ५ | इलेक्ट्रीशियन | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १९ | रु. ०८,४००/- |
| ६ | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेन्टेनन्स | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १९ | रु. ०८,४००/- |
| ७ | रेफ्रिजरेशन, ॲण्ड एअर कन्डीशनिंग मेकॅनिक | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १९ | रु. ०८,४००/- |
| ८ | मोटार मेकॅनिक व्हेईकल | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १९ | रु. ०८,४००/- |
| ९ | वेल्डर | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | २४ | ०४ | २८ | रु. ०८,४००/- |
| १० | ट्रॅक्टर मकॅनिक | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ३२ | ०६ | ३८ | रु. ०८,४००/- |
| ११ | कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामर ॲसिस्टंट (कोपा) | इ. १२ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ४० | ०४ | ४४ | रु. ०८,४००/- |
| १२ | क्राफ्टस्मन फुड प्रॉडक्शन (व्हेज) | इ. १० वी उत्तीर्ण् | १ वर्ष | १६ | ०३ | १९ | रु. ०६,०००/- |
| | | | | २३२ | ३९ | २७१ | |

उपरोक्त शुल्क आकारतांना खालील अटींचे पालन करणे संबंधित औ.प्र.केंद्रांच्या व्यवस्थापनास बंधनकारक राहील.

०१. वरिलप्रमाणे सुधारित प्रशिक्षण शुल्क खाजगी औ.प्र.केंद्रांमधील प्रशिक्षणार्थ्यांना सन ऑगस्ट,२००८ पासून सुरु होणा-या शैक्षणिक सत्रापासून लागू राहील.

०२. खाजगी औ.प्र. केंद्रातील शिक्षकीय पदांनाच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिक्षकीय पदांच्या वेतनाच्या किमान २/३ एवढे वेतन देणे आवश्यक राहील.

०३. खाजगी औ.प्र.केंद्रांतील शिक्षकीय पदांना वेतन देताना औ.प्र.केंद्र व्यवस्थापनाने संबंधित शिक्षकांच्या नांवे बँकेत खाते उघडून धनादेश / धनाकर्षाव्दारे वेतन अदा करणे आवश्यक राहील.

०४. शासनाने निश्चित केलेल्या वरिल प्रशिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क आकारण्यात येणार नाही याची खाजगी औ.प्र.केंद्र व्यवस्थापनाने दक्षता घ्यावी. वरिलप्रमाणे आकारण्यात येणारे प्रशिक्षण शुल्क व त्याचा होणारा विनीयोग योग्यरित्या करण्यात येत आहे की नाही याबाबतची तपासणी संबंधित प्रादेशिक उपसंचालक कार्यालयामार्फत करण्यात येईल.

०५. खाजगी औ.प्र. केंद्रांनी प्रशिक्षणाच्या गुणवत्तेला प्राधान्य द्यावे व औ.प्र. केंद्रांची गुणवत्ता कशी वाढेल व केंद्रांचा दर्जा कसा उंचावेल या करीता सतत प्रयत्नशील रहावे.

०६. खाजगी औ.प्र.केंद्रांनी केंद्रास अधिकचा महसूल मिळणेकरीता उत्पादनाभिमुख प्रशिक्षण योजना व लोकसेवा केंद्रातर्गत योजना व इतर छोटे / मोठे उपक्रम राबवावे व दरवर्षी एकूण आवर्ती खर्चाच्या २५% रक्कम केंद्राकरीता मिळवुन द्यावी व त्याचा काही भाग केंद्र व्यवस्थापनाने केंद्रातील कर्मचा-यांना प्रोत्साहन म्हणून द्यावा.

०७. खाजगी औ.प्र.केंद्रांनी प्रशिक्षणाच्या गुणवत्तेला अधिक प्राधान्य द्यावेत.निकालाची टक्केवारी वाढविणे, शिकाऊ उमेदवारी, रोजगार व स्वयंरोजगार विद्यार्थ्यांना मिळवुन देणे इत्यादी बाबींकरीता खाजगी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र व्यवस्थापनाने पुढाकार घ्यावा.

शुल्क आकारणीबाबत वर नमुद अट क्र. १ नुसार ऑगस्ट २००७ सत्रामध्ये प्रवेश दिलेल्या ३ वर्षे कालावधीच्या व्यवसायातील प्रशिक्षणार्थ्यांना त्यांचे प्रशिक्षण पुर्ण होई पर्यंतच्या कालावधीमध्ये मागील दराने (प्रति प्रशिक्षणार्थी प्रति वर्ष रु.१५००/-) आकारावे लागतील.

औ.प्र.संस्थेची प्रवेश प्रक्रिया मा. व्यवस्थापन समितीने संमत केलेल्या निर्णयानुसार तसेच शासनाने जारी केलेल्या प्रवेश नियमावलीनुसार पुर्ण करण्यात येते. शासनाने प्रवेश पध्दतीत काही बदल केल्यास त्यानुसार माहिती पुस्तिकेत बदल करण्यात येतो. तसेच संस्थेमध्ये नियमित अभ्यासक्रमांबरोबरच MS-CIT, City & Guild, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ यांचेही अभ्यासक्रम चालतात. तसेच केंद्र शासनाच्या मॉडयुलर एम्प्लॉएबल स्किम (MES) या योजनेतील अभ्यासक्रमही चालविणे प्रस्तावित आहे. यांची तसेच संस्थानच्या निरनिराळया कार्यक्रमात औ.प्र.संस्थेचा सहभाग असतो. त्या दृष्टीने व शिस्तीच्या दृष्टीने प्राचार्य यांना आवश्यक वाटतील त्या विदयार्थी व पालक यांच्यासाठीच्या सूचना माहिती पुस्तकात समाविष्ठ करता येतील. तसेच सुधारित शुल्काबाबत जो निर्णय होईल त्याचीही माहिती त्यामध्ये नमुद करावी लागेल. चालू वर्षी पासून प्रवेशाबाबत होणा-या निर्णयानंतर त्यानूसारचे आवश्यक तेवढे फेरबदल माहिती पुस्तीकेमध्ये नमुद करता येतील.

तरी वरीलप्रमाणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सत्र-ऑगष्ट २००९ चे प्रशिक्षणार्थी प्रवेश देणेकामी मा. व्यवस्थापन समितीमध्ये निर्णय होणेसाठी सविनय सादर.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४३०** | **उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय.)

**विषय नं.५३** **शैक्षणिक वर्ष २००९-१० सालामध्ये ज्युनिअर के.जी.या वर्गात विद्यार्थ्यांना प्रवेश देणे व स्कुलबस सुविधा बाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.०५.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४१५ (१२) नुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलसाठी नियमावली पारीत झालेली आहे. त्यातील अ.नं. १) दरवर्षी ज्यु.के.जी.साठी फक्त ८० विद्यार्थी/ विद्यार्थीनींना प्रवेश देण्यात येईल व अ.नं. ८) ज्यु.के.जी. या वर्गात प्रवेश घेणाऱ्या पाल्यांचे जे पालक ने-आण करण्याची जबाबदारी स्विकारतील अशाच पाल्यांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात येईल. असा ठराव झालेला आहे.

त्यास अनुसरुन श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये ज्यु.केजी या वर्गातील विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रीया चालू करण्यात आली आहे. दि.०९ ते २१ मार्च २००९ कालावधीत ज्यु.केजीचे प्रवेशाचे फार्म विक्री करण्यात आलेले असून दि.२३ मार्च ते ०२ एप्रिल २००९ दरम्यान भरुन आलेले फॉर्म स्विकारण्यात आलेले आहेत. वरील कालावधीत एकुण २५४ फॉर्म विक्री झाली तर मुदतीनंतर मा.विश्वस्त यांनी शिफारस केलेले ३० असे एकुण २५४ (२२४+३०) फॉर्म वाटप झाले असून त्यातील मुदतीत २०५ व नंतर ११ असे एकूण २१६ अर्ज आजपर्यंत शाळा कार्यालयात जमा झालेले आहेत.

मा.कार्यकारी अधिकारी व मा.विश्वस्त यांचे मान्यतेने वय वर्षे ४ ते ५ या वयोगटातील शिर्डी व शिर्डी बाहेरील असे एकूण ७१ विद्यार्थ्यांची यादी दि.११.०४.२००९ रोजी बोर्डवर लावण्यात आलेली होती. मात्र पालकांनी ४ वर्षाचे आतील विद्यार्थ्यांनाही प्रवेश देणेबाबत तसेच ज्यु.केजी पासून स्कूलबसची मागणी केल्याने दि. २०.०४.२००९ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयात मा. उप कार्यकारी अधिकारी व प्रशासकिय अधिकारी यांचे समवेत ज्यु.केजी या वर्गातील नवीन प्रवेशाबाबत तसेच स्कूलबस बाबत चर्चा झाली. यावेळी शिर्डी गावातील ८१ व शिर्डी बाहेरील ४१ अशा एकुण १२२ विद्यार्थ्यांच्या दोन याद्या (वय वर्ष ३.९ ते ५ वर्षे वयोगटातील) तयार झाल्या. त्यात सध्या शिर्डी गांवातील ८१ विद्यार्थ्यांचे प्रवेश सुरुवातीस पुर्ण करणेबाबत सुचविण्यात आले. त्यानुसार दि. २५.०४.२००९ पासून प्रवेश देणे सुरु करण्यात आलेले आहेत.

सन २००८-०९ करीता ज्यु.केजीसाठी स्कुलबस उपलब्ध झाल्या नाही. तथापी सन २००९-१० करीता बस सुरु करणेबाबत दि. २७.०४.२००९ रोजी शाळेत पालक जमा झाले व त्यांनी बसेसची मागणी केली. सन २००८-०९ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या ४ स्कूलबसपैकी २ स्कूलबस ह्या सि.केजी ते इ. ८ वी साठी कमी पडत असल्याने वापरण्यात येवून पुर्वीच्या पाच व आताच्या दोन अशा एकुण ७ स्कूलबस सध्या वापरात आहेत व दोन स्कूलबस वाहन विभागाकडे उपलब्ध आहेत. सध्या शाळेकडे वर्ग खोल्यांची कमतरता आहे तथापी ज्यु.केजी साठी तीन तुकडया उपलब्ध होऊ शकतात. तसेच पालकांची विनंती व वाढीव दोन बसचा विचार करता पुर्वीप्रमाणेच ज्यु.केजी ते इ.८ वी पर्यंत बस पुराविणे शक्य होईल.

तरी सन २००९-१० मध्ये ज्यु.केजीच्या किती तुकडया ठेवाव्यात व कोणत्या वर्गांना बस सुविधा उपलब्ध करुन द्यावी या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४३१** | **ज्यु.के.जी. ते इयत्ता ८ वी पर्यंत मागणी करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना स्कुलबस सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी, त्यामध्ये के.जी. विभागाचे मुले लहान असल्याने त्यांना प्राधान्याने बस सुविधा देण्यात यावी. विद्यार्थी पालकांची ज्यु.के.जी. प्रवेशाची जास्त मागणी असल्याने तिसरी तुकडी सुरु करणेबाबत व त्यासाठी आवश्यकतेनुसार शिक्षकांची तात्पुरती नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-प्राचार्या,इंग्लिश मिडीयम स्कूल)

**विषय नं.५४ व्दारावती इमारतीमध्ये भक्तांचे वापरासाठी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप सोसायटी यांचे मार्फत गरम पाणी सुविधा पुरविणे बाबत.**

**प्रस्ताव** धर्मशाळा विभागात सोलर सिस्टिमने भक्तांना गरम पाणी देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे सदर बाबतीत मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार प्रत्येक बादलीस रुपये ३/- दराप्रमाणे भक्तांकडुन आकार घेण्यात येतो, त्यात रुपये १.५०/- श्री साई संस्थान एम्प्लाईज क्रेडिट को. ऑप. सोसायटीस देऊन उर्वरीत रुपये १.५०/- संस्थानकडे जमा होतात.

द्वारावती निवासस्थानात गरम पाण्यासाठी श्री साई संस्थान एम्प्लाईज क्रेडिटको.ऑप.सोसायटी मार्फत बॉयलर बसविण्यात आलेला असुन द्वारावती इमारतीत रुम सेवाआकार प्रतिदिनी रुपये ५००/- व वातानुकूलित रुमसाठी सेवाआकार रुपये १०००/- घेतला जातो त्यामुळे भक्तांकडुन गरम पाण्याचे स्वतंत्र पैसे घेता येणार नाही कारण मुळातच रुम भाडे पुरेशा प्रमाणात आकारलेले आहे.

तरी द्वारावती इमारतीत खोलीचे भक्तांकडुन येणाऱ्या दैनंदिन आकारातुन दि. ०५/०३/२००९ पासुन प्रत्येक महिन्यात श्री साई संस्थान एम्प्लाईज क्रेडिटको.ऑप.सोसायटीस एकुण दिलेल्या गरम पाण्याची भक्त नोंदणीनुसार प्रति बादली रुपये १.५०/- प्रमाणे (गरमपाण्याचे १० लिटर क्षमतेचे प्रति बादलीस ) अदा होणेस मान्यता असावी.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४३२** | **उपरोक्त प्रस्तावानुसार श्रीसाई संस्थान एम्प्लाईज क्रेडिट को. ऑप. सोसायटीस एकुण दिलेल्या गरम पाण्याची भक्त नोंदणीनुसार प्रति बादली रुपये १.५०/- प्रमाणे (गरमपाण्याचे १० लिटर क्षमतेचे प्रति बादलीस) आदा करण्यात यावे, असें ठरले.** |

(कार्यवाही-प्रशासकीय अधिकारी,निवासस्थाने)

**विषय नं.५५ व्दारावतील इमारतीतील खोल्यांकरीता ब्लँकेट व पायपुसणी खरेदीकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** व्दारावती इमारतीतील खोल्या भक्तांना निवासासाठी लवकरात लवकर उपलब्ध करुन देणेसाठी खोल्याकरीता बेडशिट, ब्लँकेट, पायपुसणी इ.खरेदी करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३.०१.२००९ रोजीचे सभेमध्ये आयत्या वेळेचा विषय क्र.१० निर्णय क्र. ६९ .व्दारावती इमारतीसाठी आवश्यक असणारे साहित्य खरेदीकामी मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांचे समितीने मुंबई - नाशिक येथून समक्ष पहाणी करुन मालाचा नमूना पसंत करुन प्रचलित पध्दतीने खरेदी करणे बाबत अंतिम निर्णय घ्यावा असा झालेला आहे. त्या नुसार कोटेशन मागितले आहे. आलेले कोटेशन मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांचे समक्ष उघडणेत आलेले आहे.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.न. | तपशिल | लक्ष्मीदास एन्टरप्राईजेस, मुंबई रुपये ४वॅट सह रुपये | | बिछावत,मुंबई रुपये ४वॅट सह रुपये | जलाराम ट्रेडर्स,मुंबई रुपये ४वॅट सह रुपये | उमंग , नाशिक रुपये | मागणी नग | न्युनतम दर रुपये-पैसे | न्युनतम एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | ब्लँकेट उलन (सौदी) (६०"X९०" | २६५.०० | २७५.६० | ३२६-०० ३३९-०४ | ३००-०० ३१२-०० | --- | ५५० | २६५.०० | १,४५,७५०.०० |
| ०२ | ब्लँकेट उलन (सिडने) (६०"X९०") | ४००.०० | ४१६.०० | ५०३-०० ५२३-१२ | ४२०-०० ४३६-८० | -- | ३०० | ४००.०० | १,२०,०००.०० |
| ०३ | बाथ मॅट (१६"X२१") (पायपुसनी चिंधी) | ०४३-.० | ०४४.७२ | ०५२-०० ०५४-०८ | ०५०-०० ०५२-०० | १०५.०० | ४०० | ४३.०० | १७,२००.०० |
| | एकुण रुपये | | | | | | | | २,८२,९५०.०० |

(अक्षरी रुपये दोन लाख ब्याएंशी हजार नऊशे पन्नास मात्र )

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यात मे.लक्ष्मीदास एन्टरप्राईजेस,जुहू,मुंबई यांचा माल चांगला प्रतीचा असून त्यांनी दूरध्वनीव्दारे ४%सूट देवू असे कबूल केल्याने व त्यांचे दर सर्वात कमी असल्याने त्यांना जा.न.एसएसएस-वशी-व्दारावती-३४५५-२००९ दिनांक २७.०३.२००९ अन्वये उपरोक्त मालाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.याकामी रुपये २,८२,९५०-०० (अक्षरी रुपये दोन लाख ब्याएंशी हजार नऊशे पन्नास मात्र ) खर्च आलेला आहे. तरी सदर खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता मिळावी ही विनंती.

| **निर्णय क्र. ४३३** | **प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

(कार्यवाही-प्रशासकीय अधिकारी,निवासस्थाने)

**विषय नं.५६** **व्दारावतील इमारतीतील खोल्यांकरीता बॉम्बे डाईंग बेडशिट व उशी कव्हर खरेदीकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्ताव -** व्दारावती इमारतीतील खोल्या भक्तांना निवासासाठी लवकरात लवकर उपलब्ध करुन देणेसाठी खोल्याकरीता बेडशिट,ब्लँकेट,पायपुसणी इ.खरेदी करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३.०१.२००९ रोजीचे सभेमध्ये आयत्या वेळेचा विषय क्र.१० निर्णय क्र. ६९ व्दारावती इमारतीसाठी आवश्यक असणारे साहित्य खरेदीकामी मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांचे समितीने मुंबई - नाशिक येथून समक्ष पहाणी करुन मालाचा नमूना पसंत करुन प्रचलित पध्दतीने खरेदी करणे बाबत अंतिम निर्णय घ्यावा असा झालेला आहे.

त्या नुसार कोटेशन मागितले आहे. आलेले कोटेशन मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांचे समक्ष उघडणेत आलेले आहे.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.न. | तपशिल /वस्तूचे नांव | गोपालशेठ, सारडा,अ.नगर दर प्रति नग वॅटसह रुपये- पैसे | हर्षल बांठीया, पुणे दर प्रति नग वॅटसह रुपये-पैसे | लक्ष्मीदास एन्टरप्राईजेस मुंबई, दर प्रति नग वॅटसह रुपये-पैसे | मागणी नग |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | बेडशिट ( बॉम्बे डाईंग ) (नं. ८८८५ ) | | | | |
| अ) | (६० "x९० ") काऊंट ४०x४० मिक्स कलर | २२२-०० | १६४-५२ | ---- | ३,००० |
| ब) | (६०"x९० " ) काऊंट २०x २० कलर | १८५-०० | १४९-५५ | ---- | |
| क) | (६० "x९० ") काऊंट २०x २० मिक्स कलर | १८०-०० | १४९-५५ | | |
| ०२ | बेडशिट ( बॉम्बे डाईंग ) (६० "x१०० ") काऊंट ४०x४० (६० "x१०० " ) काऊंट २०x २० फक्त पांढरा /कलर | ----<br>२०५-०० | २०५-९२<br>१६१-२० | १८५-००<br>१४५-०० | |
| ०३ | उशा कव्हर बेडशिट (बॉम्बे डाईंग) (१८ "x २७ ") काऊंट ४०x४० (१८ "x २७ " ) काऊंट २०x २० (१८ "x २७ " ) काऊंट २०x २० | ०७५-००<br>०६०-००<br>०६५-०० | ०४८-८८<br>०३९-८३ | ०४०-००<br>०३६-०० | ३,००० |

याबाबत उपरोक्त पुरवठाधारक यांना गुरुवार दिनांक ०२.०४.२००९ रोजी दुपारी ०४-०० वाजता साईनिवास येथील मिटींग हॉलमध्ये समक्ष चर्चेसाठी बोलविले होते . त्यावेळी मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर ,मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर मा.श्री.के.सी .पांडे हे उपस्थित होते. कोटेशन धारक (१.)श्री गोपालसेठ सारडा यांचे प्रतिनिधी (२.)श्री हर्षल बांठीया ,पुणे (३.) श्री पंकजभाई,लक्ष्मीदास एन्टरप्राईजेस,मुंबई हे उपस्थित होते.त्यावेळी वाटाघाटीमध्ये खालील प्रमाणे चर्चा झाली.

मा.विश्वस्त यांनी बॉम्बे डाईंग बेडशिट कलर (६० "x१०० ") काऊंट ४०x ४० व काऊंट २० x २० या नमुन्याची व धुतलेल्या नमुन्याची प्रथम पाहणी केली .त्यांवेळी पुरवठाधारक यांनी बॉम्बे डाईंग बेडशिट (कॅन्डी रेनबो-१५०) ६०"x१००" (काऊंट २०x २०) नमुना दाखविला, सदर चर्चेच्या वेळी सदर नमुना योग्य असलेचे एकमत झालेने पुरवठा धारकांना सदर बेडशिटचे दर विचारण्यात आले.त्यांनी मा.व्यवस्थापन समितीचे उपस्थित सदश्यांना तोडी दर समक्ष सांगितले .त्यांचा तुलनात्मक तक्ता व वाटाघाटीचा तक्ता पुढील प्रमाणे आहे.

| अ.न. | तपशिल /वस्तूचे नांव | गोपालशेठ, सारडा,अ.नगर दर प्रति नग वॅटसह रुपये- पैसे | हर्षल बांठीया पुणे प्रति दर रुपये-पैसे वॅटसह रुपये-पैसे | लक्ष्मीदास एन्टरप्राईजेस, मुंबई प्रति दर वॅटसह रुपये-पैसे | मागणी नग | न्यूनतम दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१.अ. | बेडशिट (बॉम्बे डाईंग ) कॅन्डी-रेनबो-१५० (६० "x१०० ") काऊंट २०x २० | १९५-०० बेडशिट व उशी कव्हरसह | १५५-०० | १५०-०० | ३००० | १५०-०० | ४,५०,०००-०० |
| | उशी कव्हर बॉम्बे डाईंग कॅन्डी रेनबो-१५० (१८ "x २७ ") काऊंट २०x २० | | ०३८-०० | ०३६-०० | ३००० | ०३६-०० | १,०८,०००-०० |
| | एकुण | १९५-०० | १९३-०० | १८६-०० | | १८६-०० | ५,५८,०००-०० |

( अक्षरी रुपये पाच लाख आठ्ठावन्न हजार मात्र )

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यात मे.लक्ष्मीदास एन्टरप्राईजेस,जुहू,मुंबई यांचे बेडशिटचे दर सर्वात कमी असल्याने त्यांना जा.न.एसएसएस-वशी-व्दारावती- ४१३० -२००९ दिनांक १३.०४.२००९ अन्वये उपरोक्त मालाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.याकामी रुपये ५,५८,०००-०० (अक्षरी रुपये पाच लाख आठ्ठावन्न हजार मात्र ) खर्च आलेला आहे. तरी सदर खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता मिळावी ही विनंती.

| **निर्णय क्र.४३४** | **प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

(कार्यवाही-प्रशासकीय अधिकारी,निवासस्थाने)

**विषय नं.५७** **छोट्या आकारात श्री साईसच्चरित ग्रंथ प्रकाशनाबाबत**

**प्रस्ताव -** श्री गणेश पोपटराव शिंदे, नाशिकरोड यांनी दि.०५.०३.२००९ चे पत्राने संस्थान प्रकाशित कै.गोविंद रघुनाथ दाभोलकर लिखीत, श्री साईसच्चरित मराठी (पोथी) ही मोठ्या आणि वजनी स्वरुपात असल्याने त्याचे पुनः निर्माण छोट्या आकारात करुन प्रकाशित करण्याचा विचार करीत असलेबाबत व तसेच त्यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या नियमावलीचे पालन करु असे कळविले आहे.

श्री साईसच्चरित मराठी (पोथी) चे पुनः निर्माण छोट्या आकारात करुन प्रकाशित करणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

श्री साईसच्चरित मराठी (पोथी) ही ५३ अध्यायाची असून, प्रस्तावनेसह पेजेस ७९६ आहे, पारायणासाठी साईभक्त उपयोग करतात.

श्री साईसच्चरित हे मोठ्या आकाराचे प्रवासात/इतरत्र नेणे अडचणीचे होते, म्हणून छोट्या आकाराचे/पॉकेटसाईज छपाई करणेबाबत श्री गणेश पोपटराव शिंदे, नाशिकरोड यांनी समक्ष चर्चा केलेली आहे.

संस्थान प्रकाशनाची खाजगी व्यावसायिकास परवानगी देता येणार नाही. तथापी योग्य वाटल्यास संस्थान मार्फत छपाई करुन घेता येईल.

श्री साईसच्चरित् मराठी छोट्या आकाराचे/पॉकेटसाईज मध्ये संस्थान मार्फत छपाई करुन घेणेस मान्यतेसाठी सादर.

| **निर्णय क्र. ४३५** | **सदरहू प्रस्ताव अमान्य करण्यात आला.** |
|---|---|

(कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी/अधिक्षक,प्रकाशने विभाग)

**विषय नं.५८** **गोवा येथे पुस्तके/फोटो,व्हिडीओ ,सी.डी. व दैनंदिनी / दिनदर्शिका २००९ चे २०% सवलतीचे दराने विक्रीबाबत.**

**प्रस्ताव** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी तर्फे गोवा (पणजी) या ठिकाणी श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रचार- प्रसार होणेसाठी दि. २२.०२.२००९ रोजी साई भक्त संमेलन पार पडले, साई संमेलनात साईभक्तांसाठी मा. अध्यक्ष साहेब व विश्वस्त यांचे सुचनेनुसार पतंजली योगपीठ गोवा यांचे प्रतिनिधी मार्फत संस्थान प्रकाशित सर्व पुस्तके, दैनंदिनी/दिनदर्शिका, ऑडीओ/व्हीडीओ सी.डी.या साहित्यांचे विक्री किंमतीवर २०% डिस्काऊंट देणेबाबत मा. अध्यक्ष साहेब यांनी समक्ष निर्देश दिले होते. परंतु संस्थान प्रकाशित विक्री किंमत रु. १०/- चे आतील पुस्तकांवर व श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका तसेच

संस्थान निर्मित ऑडीओ/व्हीडीओ सी.डी.वर डिस्काऊंट देणेबाबतची तरतुद नाही. परंतु विशेष बाब म्हणून मा. अध्यक्ष साहेब यांचे निर्देशाप्रमाणे खालील पुस्तकांचे विक्री किंमतीवर २०% सवलतीचे दराने विक्री करण्यात आली आहे.

**अ) पुस्तके/फोटो, दैनंदिनी/दिनदर्शिकांचा तपशिल..**

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | विक्री नग | मुळ किंमत रु. | एकूण रक्कम | २०% सवलतीचा दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री सदगुरु साईनाथ सगुणो. मराठी आरती | ९०० | ३/- | २,७००/- | | |
| ०२ | श्री साईनाथ स्तवन मंजरी मराठी | ७०० | २/- | १,४००/- | | |
| ०३ | मुलांचे बाबा मराठी | २०० | ५/- | १,०००/- | | |
| ०४ | दगडावर बसलेले बाबा काळा/पांढरा १४ x २० | २०० | २/- | ४००/- | | |
| ०५ | दगडावर बसलेले बाबा रंगीत १४ x २० | २०० | ३/- | ६००/- | | |
| ०६ | द्वारकामाई रंगीत १४ X २० | ५०० | ३/- | १,५,००/- | | |
| ०७ | श्री साईबाबा मुर्ती फोटो रंगीत १० X १४ | २०० | २/- | ४००/- | | |
| ०८ | श्री साई दैनंदिनी | ११८ | ५५/- | ६,४९०/- | | |
| ०९ | श्री साई दिनदर्शिका | ४४९ | ३०/- | १३,४७०/- | | |
| | | | एकूण रु. | २७,९६०/- | ५,५९२/- | **२२,३६८/-** |

**ब ) ऑडीओ सी.डी./व्हीडीओ व्हीसीडी**

| अ.नं. | नाव | विक्री नग | मुळ किंमत रु. | एकूण रक्कम | २०% सवलतीचा दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व्हीसीडी | ३३८ | ७५/- | २५,३५०/- | | |
| ०२ | श्री साईचरित्र मराठी ऑडीओ सी.डी० | ८० | १००/- | ८,०००/- | | |
| ०३ | श्री साईबाबा की आरतीयाँ - लता दीदी | ८५ | २२५/- | १९,१२५/- | | |
| | | | एकूण रु. | ५२,४७५/- | १०,४९५/- | ४१,९८०/- |

उपरोक्त **अ** व **ब** तक्त्यातील पुस्तकांवर व श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका तसेच संस्थान निर्मित ऑडीओ/व्हीडीओ सी.डी.या साहित्यांचे विक्री किंमतीवर २०% डिस्काउन्ट प्रमाणे रु.१६,०८७/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता असावी.

| निर्णय क्र. ४३६ | प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साहित्यांचे विक्री किंमतीवर २०% डिस्काउन्ट प्रमाणे रु.१६,०८७/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
|---|---|

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

**विषय नं.५९ श्री अष्टोत्तरशत नामस्तोत्र विवरण तेलगू व हिंदी भाषेत प्रकाशित करणे बाबत.**

**प्रस्ताव -** श्री.चिरुवोलु विजय नरसिंहाराव यांनी दि.२३.०३.२००९ चे पत्रान्वये त्यांनी स्वतः लिहीलेले श्री अष्टोत्तरशत नाम स्तोत्र विवरण तेलगू व हिंदी भाषेत संस्थानमार्फत प्रकाशित करणेसाठी पाठविलेली आहे. त्यांनी स्वतः पुस्तके भक्तांना मोफत वाटण्यासाठी छपाई करुन घेतले आहे.

संस्थानला पुस्तके समाधानकारक वाटल्यास संस्थानने प्रकाशित करावे व संस्थानला प्रकाशित करणेसाठी हक्क देणेस तयार आहेत.

तेलगू व हिंदी भाषेमध्ये अष्टोत्तर शतनामावली स्वतंत्र प्रकाशन नाही, इंग्रजी भाषेत रु.४/- किंमतीचे स्वतंत्र पुस्तक आहे. तेलगू पुजाविधी रु १०/- किंमतीच्या पुस्तकात अजष्टोत्तरशतनामावली समाविष्ट आहे. तथापी स्वतंत्र पुस्तक नसल्याने प्रकाशन करण्यास हरकत नाही असे वाटते.

| निर्णय क्र. ४३७ | सदरहू प्रस्ताव अमान्य करण्यात आला. |
|---|---|

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

**विषय नं.६० श्री साईबाबा मुर्ती फोटो मोफत वाटप करणेबाबत.**

**प्रस्ताव -** संस्थान प्रकाशित श्री साईबाबा मुर्ती फोटो साईज १०" X १४"चे १,००,००० नग मंजूर दर रु. १.२० पैसे प्रमाणे एप्रिल २००६ मध्ये छपाई करुन घेण्यात आले होते. सदर फोटो चांदीच्या सिंहासनाचे असून, सध्याची फोटोची मासिक सरासरी विक्री ही १८३३ नगाची आहे, परंतु सोन्याचे सिंहासन बनविल्यानंतर चांदीच्या सिहासनाच्या फोटोची विक्री खप कमी होत आहे. एकूण ८४,०७९ नग फोटो शिल्लक आहेत त्याची एकूण किंमत रु. १,००,८९५/- असून विक्रीसाठी अंदाजे ४६ महिने (३ वर्षे १० महिने ) लागतील.

सोन्याचे सिंहासनाचे फोटो उपलब्ध झाल्याने चांदीच्या सिंहासनाच्या फोटोस फारच अल्प मागणी असल्याने, वरीलप्रमाणे १०" x१४" साईजचे ८४,०७९ नग चांदीच्या सिंहासनाचे फोटो देणगी काऊंटरवर मोफत वाटप करावेत असे मत आहे.

| निर्णय क्र. ४३८ | प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे वरीलप्रमाणे १०"x१४" साईजचे ८४,०७९ नग चांदीच्या सिंहासनाचे फोटो देणगी काऊंटरवर मोफत वाटप करण्यास मान्यता देण्यात आली. |
|---|---|

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

**विषय नं.६१** **रिट पिटीशन नं.१७०५/२००९ सैय्यद रतनभाई सैय्यद व इतर विरुध्द श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व रिट पिटीशन नं.१७०४/२००९ जयकुमार लोकचंदानी विरुध्द दि स्टेट ऑफ महाराष्ट, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी**

**प्रस्ताव -** कोपरगांव येथील मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात खालील प्रमाणे २ दरखास्तीचे कामकाज चालू होते.

**०१)** श्री साईबाबा संस्थान विरुध्द सैय्यद रतनभाई सैय्यद वगैरे दरखास्त नं.०१/९०,

**०२)** सैय्यद रतनभाई सैय्यद विरुध्द दि स्टेट ऑफ महाराष्ट्र, व श्री साईबाबा संस्थान दरखास्त नं.०१/९०.

शिरडी येथील मोफत सर्व्हे नंबर १/१ पैकी ३० आर जागेबाबत मा.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन अ.नगर यांचे कोर्टात रे.मु.नं.६००/७६ वाद चालू होता. दि.२०/०८/१९७९ रोजी प्रस्तुत प्रकरणी जागेवरील दुकानदार, संस्थान व शासनाचे दरम्यान सुलेनामा झाला.परंतू त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. करीता सुलेनाम्याची अंमलबजावणी व्हावी,यासाठी संस्थानने सुरुवातीला रे.द.नं.१/६० मा.कोपरगांव कोर्टात दाखल केली. त्यानंतर संबंधीत दुकानदारानेही रे.मु.नं.०५/९० दरखास्त दाखल केली. शिरडी येथे त्यानंतर नगरपंचायतीची स्थापना झाली.विकास आराखडा मंजूर होऊन प्रस्तुतची जागा बगीचासाठी आरक्षित झाली. रस्त्याची रुंदी वाढली, रथ पालखी रस्त्याचे नियोजन झाले. भक्तांची गर्दी वाढणे, दुकानदांरासाठी संस्थानने बांधलेले गाळे दुकानदारांचे नाहरकतीमुळे काढुन टाकणेत आले. बदलेल्या परिस्थितीनुरुप दरखास्तीचे मागणी प्रमाणे कार्यवाही करता येणार नाही. दरखास्त निष्फळ झाली. अशी भुमिका संस्थानने घेतली. नगरपंचायत व शासनाने देखिल याप्रमाणेच भूमिका घेतली व त्याप्रमाणे मा.कोर्टात संस्थानतर्फे ॲड. श्री एस.डी.कुलकर्णी, शासनातर्फे अॅड. श्री आर.जी.चिने व नगरपंचायत तर्फे ॲड.श्री आर.एस.जपे,कोपरगांव यांनी बाजु मांडली. प्रकरणी दि.०९/०३/२००९ रोजी निकाल झाला असून संस्थान, शासन व नगरपंचायतीचे म्हणणे ग्राहय धरुन दुकानदारांची दरखास्त अर्ज फेटाळणेत आला आहे.

उपरोक्त निकालाचे नाराजीने संबंधीत दुकानदारांनी मा.उच्च न्यायालयांत विषयांकित रिट पिटीशन नं.१७०४/२००९ व १७०५/२००९ दाखल केलेले आहे. कोपरगांव कोर्टाचे निकालांस स्थगनादेश मिळावा. संस्थान, शासन व नगरपंचायतीने दुकानदारांचे दुकाने काढून टाकु नयेत.सुलेनाम्याची अंमलबजावणी होणार नाही, असा कोणताही बदल झालेला नाही,असे दुकानदारांचे म्हणणे आहे.साक्षीदारांनी दिलेला जबाब मा.कोर्टाने विचारांत घेतलेला नाही, असे दुकानदांराचे म्हणणे आहे.

उपरोक्त रिट पिटीशनमध्ये दि.२४/०३/२००९ रोजी पावेतो दुकान काढून टाकणेबाबत कोणतीही कार्यवाही होऊ नये, असे कोपरगांव मा.कोर्टाने सुचित केले होते. दरम्यान संबंधीत दुकानदारांनी मा. उच्च न्यायालयातील प्रकरणी दि.२४/०३/२००९ दि.३१/०३/२००९ व दि.०८/०४/२००९ अशा तारखा नेमण्यात आल्या. रिट पिटीशनबाबत मा.उप कार्यकारी अधिकारी डॉ. यशवंतराव माने यांचे शपथपत्र दिनांक २४/०३/२००९ रोजी दाखल करणेत आलेले आहे.

सर्व्हे नंबर १/१अ-१ब ही जागा शासनाची आहे. सदरची जागा संस्थानला मंजूर झालेली आहे. रे.मु.नं.६००/७६ दाखल होता.त्यामध्ये दि.२०/०८/१९७९ रोजी सुलेनामा झालेला आहे. सदर सुलेनाम्याप्रमाणे दुकाने इतर भागामध्ये स्थलांतरीत करावयाची होती. पंरतु सन १९९० पावेतो कोणीही दुकानदाराने स्थलांतर केले नाही, जागा सोडली नाही. संस्थानने अखेर रे.मु.नं.०१/९० दाखल केली आहे. त्याबाबतची माहिती मिळाल्या नंतर दुकानदारांकडुन रे.मु.नं.०५/९० दाखल करण्यात आला. या जागेवरील ५६ दुकानदार सर्व्हे नंबर १७० मध्ये संस्थानने स्वखर्चाने बांधलेल्या गाळयात गेले नाही. शेवटी नगरपंचायतीने सदर गाळे पाडुन टाकले. प्रस्तुतचे ५६ दुकानदार या गाळयामध्ये गेले नाही, उलट गाळे पाडण्यासाठी ना-हरकत दिली.त्यानंतर प्रस्तुतचे पिटीशनरचे मा.उच्च न्यायालयात रे.मु.नं.३८१३/२००४ चे पिटीशन दाखल केले. पंरतू मा.कोर्टाने त्यांचे पिटीशन फेटाळले . त्यानंतर प्रकरण मा.सर्वाच्च न्यायालयात Apex court गेले व तिथेही त्यांचे विरुध्द निकाल लागला. पिटीशनरचे मागणीचा विचार होऊ नये, अशा अशयाचे सदरचे शपथपत्र मा.कोर्टात दाखल करण्यात आले आहे.शपथपत्र संस्थानचे वकील श्री आर.एन.धोर्डे,औरंगाबाद यांचेकडून तयार केलेले आहे.

दि.१०/०१/१९९० रोजी नगरपंचायत स्थापन झाली, दि.१५/०२/१९९२ रोजी शिरडी विकास आराखडा प्रसिध्द झाला, शिरडी नगरपंचायतीने सर्व्हे नंबर १ मध्ये बगीचाबाबत आरक्षण झाले. दि. २७/१२/२००३ रोजी सर्व्हे नबंर १ पैकी १५ गुंठे जागा बगीचासाठी व १५ गुंठे जागा दुकानासाठी अशी विकास आराखडयातील दुरुस्ती प्राप्त झाली, दि.०९/०३/२००१ रोजी नगर-मनमाड रोड प्रकल्पास मान्यता मिळाली. राज्य महामार्गाचे ३७ मीटरचे हद्दीत प्रस्तुतची जागा आली. दि.२७/०३/२००३ रोजी शासनाकडून जागेची कंट्रोल लाईन व बिल्डींग लाईन ठरविण्यात आली व त्यामुळे प्रस्तुत सर्व्हे नंबरमध्ये शॉपिंग कॉम्प्लेक्ससाठी जागा उपलब्ध होत नाही, तसे दि.२९/०७/२००५ व दि.०१/०९/२००५ रोजी डेप्युटी डायरेक्टर टी.पी. ऑफीसकडून तहसिलदार यांना कळविण्यात आले, दि.०६/१२/२००७ रोजी मा.जिल्हाधिकारी,अ.नगर यांचे बैठकीत झालेल्या चर्चेत सदरची डिक्रीही निष्फळ झाल्याचे सांगितले.

दुकानदारांनी प्रकरणामध्ये कोणत्याही हलचाली केल्या नाही. शिरडी येथे लाखो भक्त येतात. रस्त्याचे रुंदीकरण करण्यात आलेले आहे. त्याबाबतचे जागेच्या संपादनासाठी कांही व्यक्तीकडून रिट पिटीशन २१८३/२००३ असे रिट दाखल आहे. रस्त्याचे कामासाठी संस्थानने रक्कम रुपये-१,२३,४२,२६५/- इतकी नुकसान भरपाई दिलेली आहे. वादग्रस्त जागा मोकळी ठेवणेची आवश्यकता आहे. अन्यथा मांढरा देवी सारखी दुर्घटना होऊ शकते. बऱ्याच दुकानदारांनी त्यांच्या जागा इतरांस हस्तांतर केल्या आहेत. त्यांचे रिट पिटीशन मधील मजकुरात काही अर्थ नाही.त्यांचे रिट पिटीशन फेटाळण्यात यावे,अशा अर्थाचे हे शपथपत्र संस्थानचे वतीने मा.उप कार्यकारी अधिकारी डॉ.श्री यशवंतराव माने साहेब यांचे दाखल करणेत आले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे माहितीसाठी सादर करता येईल.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४३९** | **उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.** |

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.६२ स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा शिरडी यांना संस्थान परिसरात साईनाथ छाया इमारतीत लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर दिलेल्या हॉलच्या जागेस मुदतवाढ मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी येथे सिटी सर्व्हे नंबर ३२ ( ग्रामपंचायत मिळकत नं.८०२ मध्ये ) जुनी साईनाथ छाया इमारतीचे जागेवर नव्या इमारतीचे बांधकाम केलेले आहे.

उपरोक्त इमारतीमध्ये शिरडी येथे येणाऱ्या देशी, विदेशी साईभक्तांच्या सोईसाठी व जनतेच्या सोईसाठी स्टेट बँक ऑफ इंडिया,शाखा शिरडी यांना या ठिकाणी सदर इमारतीमधील पहिला मजला लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर १२ महिने कालावधीसाठी देण्यात आलेला आहे.

| अ.नं. | इमारतीचे नांव | जागा/गाळाधारकांचे नांव | वापरासाठी घेण्यात येणारी फी | वापर | मागील कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईनाथ छाया इमारत मधील पहिला मजला + तळमजल्यावरील जिना ( १६२.८८ स्के.मीटर ) | स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा शिरडी | रु.२५,०००/- | साईभक्त व संस्थानला सेवा व सुविधेसाठी | ०१) दि.११/११/२००६ ते दि.१०/११/२००७<br>०२) दि.११/११/२००७ ते दि.१०/११/२००८ |

उपरोक्त प्रमाणे स्टेट बँक ऑफ इंडिया,शाखा शिरडी यांना दिलेल्या हॉलची मुदत दि.१०/११/२००८ रोजी संपुष्टात आलेली असल्याने पुढील १२ महिने कालावधी करीता मुदतवाढ मिळणेबाबतचा प्रस्ताव दि.०७/११/२००८ व दि.३०/०३/२००९ रोजीचा दि.३०/०३/२००९ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे.त्यांत त्यांनी "साईनाथ छाया हॉलची मुदत १२ महिनेची असून त्याची मुदत दि.१०/११/२००८ रोजी संपुष्टात आलेली असल्याने दि.११/११/२००८ ते दि.१०/११/२००९ अखेर पुढील १२ महिने कालावधीसाठी मुदतवाढ मिळावी ", अशी विनंती केलेली आहे.

साईभक्तांना व संस्थानला सदर सुविधेचा होणारा उपयोग लक्षात घेता स्टेट बँक ऑफ इंडिया,शाखा शिरडी यांना लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर पुढील मुदतीसाठी म्हणजेच दि.११/११/२००८ पासून दि.१०/११/२००९ अखेर १२ महिने मुदतवाढ देता येईल.

प्रस्तुत क्षेत्राबाबत सन -२००५ पासून बँकेकडे वापरांस असून परवाना फी रु.२५,०००/- आकारणेत येतो. आता नुतनीकरण करतांना पी.डब्ल्यु. डी. रेट प्रमाणे परवाना फी आकारणी करता येईल. मात्र याच इमारतीमधील तळ मजल्यावर युनियन बँकेसाठी ( ३३.८७ स्वके.मी.) क्षेत्र वापरांस दिलेले आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/११/२००८ चे ठरावाप्रमाणे युनियन बँक ऑफ इंडिया,शाखा शिरडी यांना साईनाथ छाया इमारतीमध्ये ( ३३.८७ स्वके.मी.) वापरांस दिलेल्या जागेसाठी रक्कम रुपये-७,५००/- ऐवजी आता त्यामध्ये वाढ करुन रु.११,२००/- मासिक भाडे घेणेचे ठरलेले आहे. त्याबाबतचा विचार करुन स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा शिरडी यांना याच इमारतीमध्ये असलेल्या प्रस्तुतचे जागेसाठी लेखाशाखेशी झालेले चर्चेप्रमाणे मासिक / परवाना भाडे रुपये- ५५,०००/- मात्र व ( विद्युत बील मीटर रिडींग प्रमाणे वेगळे आकारुन ) पूर्वीचेच इतर अटी व शर्तीस अनुसरुन लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर जागेस बँकेस मुदतवाढ देणेबाबतचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४४०** | **प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा शिरडी यांना याच इमारतीमध्ये असलेल्या प्रस्तुतचे जागेसाठी लेखाशाखेशी झालेले चर्चेप्रमाणे मासिक / परवाना भाडे रुपये- ५५,०००/- मात्र व ( विद्युत बील मीटर रिडींग प्रमाणे वेगळे आकारुन ) पूर्वीचेच इतर अटी व शर्तीस अनुसरुन लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर जागेस बँकेस प्रस्तावित केल्याप्रमाणे मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.६३ श्री साई संस्थान एम्लॉईज क्रेडीट को- ऑप सोसायटी लि. शिरडी, यांना स्नानगृहे/मोबाईल / क्लोकरुम चालविणेस मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्तांचे सोयीसाठी श्री साई संस्थान एम्प्लाईज क्रेडिट को-ऑप सोसायटी लि.शिरडी यांना संस्थानचे इमारतीत खालील प्रमाणे स्नानगृहे तसेच साईनाथ छाया इमारतीत क्लोकरुम/ मोबाईल/ कॅमेरे ठेवणेसाठी

जागा वापरासाठी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार लिव्ह अॅन्ड लायसेन्स तत्वावर चालविण्यास देण्यात आलेले आहे.

| अ.नं. | इमारतीचे नांव | गाळयांचा वापर | वापरासाठी घेण्यात येणारी डिपॉझिट फी व दरमहा मासिक भाडे | भक्तांकडुन आकारण्यात येणारे चार्जेस |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०१) साईप्रसाद नं.१,<br>०२) साईप्रसाद नं.२,<br>०३) साईउद्यान,<br>०४) सेवाधाम व<br>०५) जनरल स्नानगृहे<br>(पिंपळवाडी रोड लगत ) | भक्तांना गरम पाणी पुरवठा करणे. | रु.४,८४०/-<br>( एकत्रित ) | प्रति बादली रु.३/- भक्तांकडून आकारणी करणेचा दर पैकी रु.१/- सस्थानला पाणी पट्टी देत आहे. (नविन भक्तनिवास, प्रसादालय व साईनिवास येथील इमारतीसाठी फक्त ) |
| ०२ | साईनाथ छाया इमारत<br>क्षेत्र ३६२.८९ चौ.फुट<br>क्षेत्र २९४.३२ चौ.फुट<br>**एकुण क्षेत्र-६५७.२१ चौ. फुट** | भक्तांचे मोबाईल / कॅमेरे /क्लोकरुम ठेवणेसाठी.<br>(एकुण ५ गाळे ) | रु.५,०००/-<br>(एकत्रित )<br>+ विद्युत आकार. | मोबाईल /कॅमेरा रु.-२/-<br>सुटकेस /पिशवी रु.१/- |

मागिल वर्षी म्हणजे दि. ०१/०४/२००८ ते दि. ३१/०३/२००९ अखेर एक वर्षाचे कालावधीकरीता लिव्ह अॅन्ड लायसेन्स तत्वावर श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सो.लि.शिरडी यांना दरमहा मासिक लायसेन्सी रक्कम रुपये- ४,८४०/- ( अक्षरी रुपये- चार हजार, आठशे चाळीस ) मात्र (एकत्रित ) प्रमाणे आकारुन स्नानगृह ठेक्यास मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

आता श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को.ऑप सो.लि.शिरडी यांनी त्यांचे दि.१८/०३/२००९ रोजीचे पत्र इकडेस प्राप्त झालेले असून त्यात त्यांनी संस्था संस्थानचे मान्यतेने संस्थान परिसरात चालवित असलेल्या साईप्रसाद नं.१, व २ ,साईउद्यान, सेवाधाम व जनरल स्नानगृहे ( पिंपळवाडी रोड लगत ) या व्यवसायाची एक वर्षाची मुदत दि. ३१/०३/२००९ रोजी संपुष्टात येत आहे. तरी सदर व्यवसाय संस्थेस पुढील पाच वर्षाकरीता लिव्ह अॅन्ड लायसेन्स तत्वावर चालविणेस परवानगी मिळावी, अशी विनंती केलेली आहे.

साईभक्तांचा सदर सुविधेचा होणारा उपयोग लक्षात घेता, श्री साई संस्थान एम्प्लॉईज को.ऑप. सोसायटी शिरडी यांचे पूर्वी आकारणेत येणारे दरमहा लायसेन्सी फी रक्कम रुपये- ४,८४०/- ( एकत्रित ) यामध्ये १०% वाढ करुन म्हणजे दरमहा मासिक लायसेन्सी रक्कम रु.-५,३२४/-मात्र (एकत्रित ) (अक्षरी रु.- पाच हजार, तिनशे चोवीस ) प्रमाणे आकारुन लिव्ह अॅन्ड लायसेन्स तत्वावर गाळयास पुढील दि.०१/०४/२००९ ते दि.३१/०३/२०१० अखेर एक वर्षाचे कालावधीकरीता मुदतवाढ देता येईल.

तसेच श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को.ऑप.सो.लि.शिरडी यांना साईनाथ छाया इमारतीत क्लोकरुम / मोबाईल /कॅमेरे ठेवणेकामी दिलेल्या एकुण ०५ गाळयाचे एकत्रित क्षेत्रफळ ६५७.२१ चौ.फुट आहे. सदरचे गाळे संस्थानचे चौकशी व निवासस्थान विभागाकडून साईभक्तांचे सोई व सेवेसाठी दि. १७/१२/२००७ रोजी साईभक्तांची होणारी मोठया प्रमाणावरील गर्दी विचारात घेता,त्यांना ११ महिने लिव्ह अॅन्ड लायसेन्स तत्वावर साईनाथ छाया इमारतीतील ५ गाळे मोबाईल व सामान ठेवणेकामी दिलेली असून त्याची मुदत दि.१६/११/२००८ रोजी संपलेली आहे. त्यानंतर पुढील मुदतवाढीचा प्रस्ताव त्यांचेकडून प्राप्त झालेला आहे.

सध्या त्याठिकाणी साईभक्तांचे मोबाईल व सामान ठेवणेकामी क्लोकरुमची व्यवस्था सोसायटी मार्फत करण्यात आलेली आहे व सदर व्यवस्था चांगली चालू असून संस्थानचे परिसरात विविध ठिकाणी दिलेल्या क्लोकरुमची मासिक परवाना फी विचारात घेता व प्रस्तुत संस्था ही सहकारी संस्था असलेने त्यांचेकडून क्लोकरुम व मोबाईल ठेवणेकामी वापरात दिलेल्या गाळयाची एकत्रित मासिक परवाना फी रुपये-५,०००/- यामध्ये १०% वाढ करुन म्हणजे दरमहा मासिक लायसेन्सी रक्कम रु- ५,५००/- (एकत्रित ) (अक्षरी रुपये- पाच हजार, पाचशे ) मात्र याप्रमाणे आकारुन लिव्ह अॅन्ड लायसेन्सी तत्वावर क्लोकरुम व मोबाईल / कॅमेरे ठेवणेकामी चालविणेस दि. १७/१२/२००८ ते दि.१६/११/२००९ अखेर ११ महिन्याचे कालावधीकरीता पुन्हा मुदतवाढ देता येईल.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को.ऑप सो.लि.शिरडी यांचे विनंतीवरुन एकत्रित ५ वर्षाकरीता तत्वतः मान्यता देऊन प्रती ११ महिन्याचा ( परवाना फी मध्ये १०% प्रतिवर्षी वाढ करुन ) करार करता येईल. तरी मान्यता देणेबाबत विचार व्हावा.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४४१** | **प्रस्तावात नमुद केलेनुसार श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को.ऑप सो.लि.शिरडी यांचे विनंतीवरुन एकत्रित ५ वर्षाकरीता तत्वतः मान्यता देऊन प्रती ११ महिन्याचा ( परवाना फी** |

| | मध्ये १०% प्रतिवर्षी वाढ करुन ) करार करण्यात यावा,असें ठरलें. |
|---|---|

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.६४** **शिर्डी महोत्सव -२००८ खर्चाबाबत**

**प्रस्ताव -** दिनांक १५/११/२००८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.८७४ अन्वये शिर्डी महोत्सव २००८ साठी रु. ७,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. सदर महोत्सवासाठी लेखाशाखेने खालीलप्रमाणे खर्च आल्याचे कळविले आहे.

| अ.नं. | तपशील | तीन दिवस खर्च रक्कम | प्रत्यक्ष झालेला खर्च |
|---|---|---|---|
| ०१. | स्टेज, ड्रेसींग रुम व ५०० खुर्च्यांसह बैठक व्यवस्था | रु. ००,५५,०००.०० | रु. ५,१०,०१६.०० |
| ०२. | जाहिरात, कापडी बॅनर्स व बोर्ड | रु. ००,२५,०००.०० | १,९८०.०० |
| ०३. | कलाकार मानधन व प्रवास खर्च (अंदाजे तीन दिवसाकरीता कलाकार ) | रु. ०६,००,०००.०० | --- |
| ०४. | व्हि.डी.ओ.शुटींग व फोटोग्राफी | रु. ००,१०,०००.०० | --- |
| ०५. | इतर किरकोळ खर्च (मंदिर सजावट व पार्किंग करीता खर्च) | रु. ००,१०,०००.०० | १६,४७५.०० |
| ०६. | जादा कर्मचारी खर्च | --- | १,८२,४५४.०० |
| | **एकूण खर्च** | **रु. ०७,००,०००.००** | **७,१०,९२५.००** |

**अ.नं. ०१** मधील स्टेज, ड्रेसींग रुम व इतर व्यवस्थेसाठी मा.व्यवस्थापनाने **रु. ५५,०००/-** मात्र खर्च मंजूर करण्यात आलेला आहे. प्रत्यक्षात मात्र **रु. ५,१०,०१६/-** इतका खर्च झालेला आहे. प्रत्यक्षात शिर्डी महोत्सवासाठी फक्त रु. १९,४५०/- इतकाच खर्च स्टेज, ड्रेसींग रुम, खुर्च्या, मॅटीन व स्वागत कमानीसाठी झालेला आहे. उर्वरीत खर्च रु.४,९०,५६६/- मात्रचा खर्च हा चौ.का., धर्मशाळा, व न.भ.निवासस्थान येथे नाताळ गर्दीसाठी दि.२४/१२/२००८ ते दि.०२/०१/२००९ अखेर टाकण्यात आलेला मंडप, गाद्या, चादरी इ.साठी झालेला आहे.

**अ.नं. ०५** मधील इतर किरकोळ खर्चासाठी (मंदिर सजावट व पार्कींगकरीता खर्च) **रु. १०,०००/-** इतका खर्च मा.व्यवस्थापनाने मंजूर केलेला होता. प्रत्यक्षात मात्र **रु.१६,४७५/-** मात्र खर्च झ ाालेला आहे. यात मंदिर सजावटीसाठी फुलाचे डेकोरेशन करण्यात आले होते, त्यास रु. १५,०००/- इतका खर्च आलेला असून उर्वरीत रक्कम रु. १,४७५/- मात्र हा पार्कींगकरीता करण्यात आलेला आहे. फुलांचे डेकोरेशन व पार्कींगकरीता मंजूर रकमेपेक्षा **रु. ६,४७५/-** मात्र इतका खर्च जादा झालेला आहे.

**अ.नं. ०६** मधील जादा कर्मचारी वर्गाकरीता काहीच बजेट तरतुद केलेली नव्हती. प्रत्यक्षात मात्र **रु. १,८२,४५४/-** मात्र इतका खर्च जादा कंत्राटी कामगारांवर झालेला आहे. सदरचा खर्च हा दि.२४/१२/२००८ ते दि.०२/०१/२००९ अखेर नाताळच्या गर्दीसाठी म्हणून विविध विभागात लावलेल्या जादा कंत्राटी कामगारांवर खर्च करण्यात आलेला आहे.

शिर्डी महोत्सव २००८ साठी मा.व्यवस्थापन समितीने **रु. ७,००,०००/-** मात्र खर्च मंजूर केलेला असून प्रत्यक्षात मात्र **रु. ७,१०,९२५/-** इतका खर्च झालेला आहे. यात प्रत्यक्षात शिर्डी महोत्सवासाठी स्टेज, ड्रेसींग रुम व इतर व्यवस्थेसाठी, फुलाचे डेकोरेशन, व डिजीटल बोर्ड इ.साठी म्हणून फक्त रु. ३६,४३०/- मात्र इतका खर्च झालेला असून उर्वरीत खर्च रु. ६,७४,४९५/- मात्र दि.२४/१२/२००८ ते दि.०२/०१/२००९ अखेर झालेल्या नाताळच्या गर्दीचे व्यवस्थेसाठी करण्यात आलेला आहे.

नाताळचे बजेट मंजूर नसलेने उपरोक्त सर्व खर्च शिर्डी महोत्सवाचे खर्चात दर्शविलेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे माहितीस्तव सविनय सादर.

| निर्णय क्र. ४४२ | सदरहू प्रस्तावास मान्यता देण्यात आली. |
|---|---|

(कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

**विषय नं.६५** **श्री पुण्यतिथी उत्सव -२००८.**

**प्रस्ताव -** श्री पुण्यतिथी उत्सव २००८ मध्ये खालीलप्रमाणे खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते व त्यास मा.व्यवस्थापन समितीत मान्यताही मिळालेली होती. प्रत्यक्षात मात्र अंदाजीत खर्चापेक्षाही जादा खर्च झालेला आहे. त्याचा अहवाल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | तपशील | मा.व्य.समितीने मंजूर केलेली रक्कम | प्रत्यक्ष खर्च | शेरा (जादा खर्च) |
|---|---|---|---|---|
| ०१. | मंडप,कमानी स्टेज, उन्हाळी मंडपासह व पाणपोई इ. | ०५,००,०००.०० | ११,२०,७६७.०० | ०६,२०,७६७.०० |
| ०२. | कलाकार बिदागी, | ०२,००,०००.०० | ००,५४,७९१.०० | --- |
| ०३. | भक्तांना मिष्टान्न मजूरीसह | ०७,२५,०००.०० | ०६,३५,६७८.०० | --- |
| ०४. | विद्युत रोषणाई | ०६,००,०००.०० | ०५,४०,०६४.०० | --- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०५. | निमंत्रणपत्रिका, जाहिरात, पोष्टेज, उदीप्रसादासह. | १५,००,०००.०० | १३,२६,९३०.०० | --- |
| ०६. | जादा कामगार | ०३,००,०००.०० | ०२,९०,०१५.०० | --- |
| ०७. | इतर खर्च - मंदिर रंगकाम, कुस्त्या, मंदिर प्रसाद, कावडी, जादा फर्निचर, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ.शुटींग, पेंटर बिले, पोलीस स्टेशन इंधन बीलासह. | ०१,००,०००.०० | ००,२३,३०९.०० | --- |
| ०८. | पालख्या, पिण्याचे पाणी इ. | | ००.०० | --- |
| | एकूण खर्च | ३९,२५,०००.०० | ३९,९१,५५४.०० | --- |

अ.नं.०१ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत - श्री पुण्यतिथी उत्सव २००८ मध्ये मंडप, कमानी व स्टेजवर रु. ०५,००,०००/- इतका खर्च मा.व्यवस्थापन समितीने मंजूर केला होता व श्री पुण्यतिथी उत्सव २००८ मध्ये मंडप, कमानी व स्टेजवर प्रत्यक्षात रु.११,२०,७६७/- इतका खर्च आलेला आहे. बांधकाम विभाग यांनी दि.०६/०९/२००८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत अंदाजीत रु.२० लाख मात्रचे खर्चास यापुर्वीच मान्यता घेतलेली आहे.

अ.नं. ०१ वगळता इतर कोठल्याही बाबीमध्ये खर्च जादा झालेला नाही. श्री पुण्यतिथी उत्सवात अंदाजीत खर्च रु. ३९,२५,०००.०० इतका अपेक्षीत होता, मात्र प्रत्यक्षात खर्च रु. ३९,९१,५५४.०० इतका झालेला आहे. उपरोक्तनुसार एकुण खर्चामध्ये मंडप,कमानी स्टेज इ. वर रु.६६,५५४.०० (अक्षरी रु. सहासष्ठ हजार पाचशे चौपन्न मात्र) इतका जादा खर्च झालेला दिसत आहे. प्रत्यक्षात मात्र उत्सवासाठी एकूण मंजूर तरतुदीपेक्षा जादा खर्च झालेला दिसत नाही. श्री पुण्यतिथी उत्सवात झालेल्या खर्चाची माहिती मा.व्यवस्थापन समितीचे सभेत माहितीस्तव सविनय सादर.

| **निर्णय क्र. ४४३** | **सदरहू प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.** |
|---|---|

(प्रशासनशाखा वशी-०५)

**विषय नं.६६** **उत्सवासाठी येणाऱ्या अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत**

**प्रस्ताव -** महाराष्ट्र शासन सन २००४ च्या अधिनियम क्र.१४ च्या कलम नं. १७(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

" राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संथान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे. ही समितीची कर्तव्ये असतील. "

(२) विशेषकरुन आणि पोट-कलम(१) मधील तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता. समिती-

(क) विश्वस्तव्यवस्थेच्या जमाखर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठविल.

(ख) विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेचा व जमाखर्चाचा योग्य लेखा व अभिलेख ठेवील.

त्याप्रमाणे रुढी परंपरेनुसार धार्मिक पूजा विधी, उत्सव साजरे केले जातात.

दरवर्षी मा.व्यवस्थापन समितीची वार्षीक खर्चास / अंदाजपत्रकास तत्वतः मान्यता घेण्यात येते. सदर अंदाजपत्रकात संबंधीत विभागाचे इतर खर्चाबरोबर उत्सव खर्चाचाही समावेश असतो. प्रत्येक उत्सवासाठी पुन्हा अंदाजे खर्चास मान्यता घेण्यात येते, उत्सवानंतर प्रत्यक्ष झालेल्या खर्चाची मा.व्यवस्थापन समितीत मान्यता घेतली जाते. म्हणजेच उत्सवाचे खर्चासाठी २-३ वेळा मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता घेण्यात येते.

मागीलवर्षी तपशीलवार आकडेवारीची माहीती सादर करुन श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२००८ मध्ये उत्सवासाठी रु.३०,२५,०००.०० (अक्षरी रु. तीस लाख पंचवीस हजार मात्र) चे अंदाजे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आली होती. त्या उत्सवासाठी प्रत्यक्षात रु.३५,९०,०८०.०० (अक्षरी रु. पस्तीस लाख नव्वद हजार ऐंशी मात्र) खर्च झाला होता. सदर प्रत्यक्ष झालेल्या खर्चाची तपशीलवार माहीती मा.व्यवस्थापन समितीसमोर मान्यतेसाठी सादर करण्यात आली होती.

श्री गुरुपौर्णिमा उत्सव यावर्षी सोमवार दि.०६/०७/२००९ ते बुधवार दि.०८/०७/२००९ (आषाढ शुक्ल-१४ शके १९३१ ते आषाढ कृष्ण ०१ शके १९३१) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

यावर्षी सन २००९ चे गुरुपौर्णिमा उत्सवासाठी खालीलप्रमाणे रक्कम रु.४२,७५,०००.०० (अक्षरी रु. बेचाळीस लाख पंच्याहत्तर हजार मात्र)अंदाजे खर्च अपेक्षीत आहे. याची तरतुद संबंधीत त्या त्या विभागाचे वार्षीक अंदाजपत्रकात केलेली आहे.

| अ.नं. | तपशील | श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००८ | श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००९ |
|---|---|---|---|

| | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | अंदाजे खर्च(१०% टक्के जादा) |
|---|---|---|---|---|
| ०१) | मंडप कमानी स्टेज (बांधकाम) | ५,००,०००/- | १५,३२,५१६/- | १७,००,०००/- |
| ०२) | कलाकार बिदागी कीर्तनकार व ३ निमंत्रीत कलाकार कार्यक्रम (मंदिर) | ५,००,०००/- | १,०२,७१९/- | २,००,०००/- |
| ०३) | भक्तांना मिष्टान्न अन्नदान कक्ष, व श्रमपरिहार - मजूरीसह (प्रसादालय) | २,७५,०००/- | ३,१८,२५०/- | ३,५०,०००/- |
| ०४) | विद्युत रोषणाई (विद्युत) | ००.०० | ३,६००/- | ५,०००/- |
| ०५) | निमंत्रण पत्रिका, जाहिरात, पोष्टेज, उदी-प्रसादासह १ लाख ४० हजार तहहयात, आश्रयदाते - विदेशी भक्तांसह. (प्र.शा.वशी-०५, जावक) | १५,२०,०००/- | १२,७५,५१०/- | १५,००,०००/- |
| ०६) | जादा कंत्राटी कर्मचारी (संबंधीत विभाग) | १,२५,०००/- | २,८९,१७५/- | ०३,४५,०००/- |
| ०७) | इतर खर्च - मंदिर रंगकाम मंदिर प्रसाद, प्रसादाल्य फर्निचरभाडे, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ. शुटींग, फोटोग्राफी ,पेंटर बीले (मंदिर,बांधकाम,ज.का.) | १,००,०००/- | ६०,४४६/- | ०१,००,०००/- |
| ०८) | पालखी सोबत येणा-या पदयात्रींचे पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थेसाठी होणारा खर्च (पाणिपुरवठा) | ५,०००/- | ७,८६४/- | १०,०००/- |
| ०९) | उत्सवात येणारे भक्तांसाठी रांगेत वाटण्यात येणा-या पाऊचचा खर्च(चौकशी कार्यालय) | --- | --- | ६५,०००/- |
| | | ३०,२५,०००/- | ३५,९०,०८०/- | ४२,७५,०००/- |

श्री गुरुपौर्णिमा सन २००९ चे उत्सवासाठी उपरोक्त अंदाजे खर्चास मान्यता मिळावी.

श्री गुरुपौर्णिमेसाठी संबंधीत विभागामार्फत प्रत्यक्ष होणा-या खर्चाची आकडेवारी उत्सवानंतर माहीतीसाठी व मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

तसेच संबंधीत विभागाचे वार्षीक अंदाजपत्रकात या खर्चास मा.व्यवस्थापन समितीची तत्वत: मान्यता असलेने पुढील उत्सवापासून फक्त उत्सवात झालेल्या प्रत्यक्ष खर्चाची माहीती मा. व्यवस्थापन समितीत मान्यतेसाठी सादर करणेस मान्यता असावी, ही विनंती.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४४४** | **उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला. संस्थानतर्फे साजरे होणारे उत्सवासाठी येणाऱ्या खर्चास पूर्वीप्रमाणेच वेळोवेळी व्यवस्थापन समितीची मंजूरी घेण्यात यावी,असें ठरलें.** |

(प्रशासनशाखा वशी-०५)

**विषय नं.६७ उत्सवाचे पूर्वतयारीस कायमस्वरुपी मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव -** महाराष्ट्र शासन सन २००४ च्या अधिनियम क्र.१४ च्या कलम नं. १७(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

" राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संथान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे. ही समितीची कर्तव्ये असतील. "

(२) विशेषकरुन आणि पोट-कलम(१) मधील तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता. समिती-

(क) विश्वस्तव्यवस्थेच्या जमाखर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठविल.

(ख) विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेचा व जमाखर्चाचा योग्य लेखा व अभिलेख ठेवील.

त्याप्रमाणे रुढी परंपरेनुसार धार्मिक पूजा विधी, उत्सव साजरे केले जातात.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी)मार्फत दरवर्षी श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी उत्सव साजरा करण्यात येत आहेत.

नेहमीच्या प्रथेप्रमाणे श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी उत्सवासाठी पुढीलप्रमाणे तयारी करावी लागणार आहे.

| अ.नं. | विभागाचे नांव | उत्सवात तयारी करावयाची कामे |
|---|---|---|
| ०१. | मंदिर विभाग | ०१) निमंत्रीत कलाकार कार्यक्रम :- दर उत्सवात तीन/चार दिवसाचे निमंत्रीत कलाकारांचे कार्यक्रम निश्चित करणे आहेत. किर्तन व कलाकार कार्यक्रम समाधी मंदिराशेजारील/साईनगर स्टेजवर घेणे. श्री रामनवमी उत्सवात ह.भ.प.दासगणू महाराज प्रतिष्ठाण, गोरटे, नांदेड हे किर्तनकाराची व्यवस्था करीत असतात. उत्सवाचे तीन/चार दिवस किर्तन कार्यक्रम होतील. इच्छुक किर्तनकार किर्तन कार्यक्रम मिळणेकरीता पत्र पाठवित असतात, इच्छुक किर्तनकारातून किर्तनकाराचे नांव निश्चित केले जाते. तसेच कलाकार कार्यक्रमाबाबतही वरिलप्रमाणे कार्यवाही केली जाते.त्याबाबत अलाहीदा मान्यता घेण्यात येईल.<br>०२) श्री साईसत्यव्रत(सत्यनारायण)पूजा व अभिषेक पूजा:- उत्सव काळात श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण)पूजा व अभिषेक पूजा चालू ठेवणे.<br>०३) अखंड पारायण व्यवस्था:- उत्सव काळात प्रथम दिवशी सकाळी श्री द्वारकामाई मंदिरात श्री साईचरित्राचे अखंड |

| अ.नं. | विभागाचे नांव | उत्सवात तयारी करावयाची कामे |
|---|---|---|
| | | पारायणास सुरुवात होईल. दुसरे दिवशी सकाळी त्याची समाप्ती होईल. मा.व्यवस्थापन समितीचे पाच सदस्य पहिले पाच अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ साईभक्त वाचतील. इच्छूक भक्तांची नांवे उत्सवाचे आदले दिवशी समाधि मंदिरासमोरील स्टेजवर नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्या काढून (ड्रॉ पध्दतीने) पारायणाकरीता नांवे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल.<br>०४) पालखी व रथ मिरवणूकः- उत्सवाचे पहिले दिवशी श्रींचे पालखीची गांवातून मिरवणूक होईल, दुसरे दिवशी रात्रौ ०९.१५ वाजता रथाची गांवातून मिरवणूक होईल. श्री रामनवमी उत्सवात दुसरे दिवशी दु.५.०० वा. रथाची गांवातून मिरवणूक होईल.<br>०५) कावडीची पुजा व निशाणाची मिरवणूकः- श्री रामनवमी उत्सवाचे मुख्य दिवशी पहाटे ५.३० वा. कावडीची पूजा व दुपारी ४.०० निशाणाची मिरवणूक होईल.<br>०६) श्री पुण्यतिथी उत्सवाचे मुख्य दिवशी सकाळी ९.०० वा.भिक्षा झोळी कार्यक्रम, दुपारी १२.३० वा. आराधना विधी कार्यक्रम व सायं.५.०० वा. खंडोबा मंदिर येथे सिमोल्लंघन व नंतर मिरवणूक कार्यक्रम होईल.<br>०७) कार्यक्रमाची सांगताः- गोपाळ काल्याचे किर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रीत किर्तनकार करतील. |
| ०२. | विद्युत विभाग | विद्युत रोषणाईः- समाधी मंदिर, श्री द्वारकामाई, श्री चावडी, श्री गुरुस्थान व मंदिर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री रामनवमी उत्सवात द्वारकामाई मंडळ, मुंबई, व श्री गुरुपौर्णिमा उत्सवात श्री साईराज डेकोरेटर्स,मुंबई विनामुल्य रोषणाई करीत असतात. मात्र ट्रक भाडे व येण्या-जाण्याचा खर्च त्यांना द्यावा लागेल. तसेच त्यांची निवास,चहा,नाष्टा, भोजनादि व्यवस्था विनामुल्य करणेत येईल. विद्युत विभागामार्फत त्यांना पत्र देण्यात येत आहे. ते न आल्यास संस्थानमार्फत विद्युत रोषणाई करता येईल. तसेच महावितरण संस्थेला विजपुरवठा विनाखंडीत रहाणेबाबत विनंती पत्र पाठविण्यात येईल. लेंडीबागेत कोणत्याही प्रकारचा देखावा करु नये. |
| ०३. | संरक्षण विभाग | संरक्षण व्यवस्थाः- उत्सव काळात मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमणे. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचेवेळी ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा.पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती पत्र संरक्षण विभागांमार्फत पाठविणे. |
| ०४. | बांधकाम विभाग | मंडप व कमानीः- श्री रामनवमी उत्सवात नाशिक ते शिर्डी, श्री गुरुपौर्णिमा उत्सवात नगर ते शिर्डी या मार्गावर आवश्यक त्या पालख्यांच्या थांब्याच्या ठिकाणी मंडप व विद्युत व्यवस्था करणे व आवश्यकतेनुसार उत्सवात टाकावयाचे मंडप व स्टेज हे बांधकाम विभागामार्फत टाकणे. |
| ०५. | प्रसादालय विभाग | प्रसाद-भोजन व्यवस्थाः- उत्सव काळात प्रसादालयात मिष्टांन्नासह भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते. मा.व्यवस्थापन समितीतील सदस्यांचे कुटुंबीय व नातेवाईक तसेच इतर सन्माननीय व्यक्तींना व कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था केली जाते. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणा-या व्यक्तींची प्रसाद भोजन व्यवस्था स्वतंत्र मंडप टाकून केली जाते. साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी , दुध व बिस्कीटे इ.कॅटीनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टान्न प्रसाद नेहमीचे दराने देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री दोन ते तीन ठिकाणी चालू करावी लागेल. दर उत्सवात येणा-या पालखीधारकांना एकवेळचे जेवण संस्थानमार्फत कुपन्स वाटुन मोफत द्यावयाचे आहे. तशी व्यवस्था प्रसादालय विभागामार्फत करणे. |
| ०६. | पाणिपुरवठा विभाग | पाणीपुरवठाः- पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉल चालू ठेवणेबाबतचे विनंती पत्र पाणीपुरवठा विभागांमार्फत नेहमीप्रमाणे पाठविण्यात येईल. नियमीत पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात येईल. कडक उन्हाळा असल्याने पायी येणा-या भक्तांची पिण्याचे पाण्याची व्यवस्था करणे. श्री रामनवमी उत्सवात सिन्नर ते शिर्डी या दोन्ही मार्गावर तसेच श्री गुरुपौर्णिमा उत्सवात आवश्यकतेनुसार शिंगवे, गुहापाट, पिंप्री निर्मळ येथे संस्थानतर्फे टँकरने पाणी पुरविण्याची व्यवस्था पाणीपुरवठा विभागामार्फत करणे. |
| ०७. | चौकशी /<br>न.भ.निवास /<br>द्वारावती-धर्मशाळा | पालखी व्यवस्थाः- तिन्ही उत्सवात मुंबई, पुणे, नागपूर, इंदौर व इतर ठिकाणांहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था स्वतंत्र मंडप टाकून साईनगरच्या परिसरात करण्यात येईल व पालखी सोबत येणा-या भक्तांची व्यवस्था मंगल कार्यालय, साईउद्यान, धर्मशाळा इमारतीत करण्यात येते. यावर्षीही ती व्यवस्था मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार करण्यात येईल.<br>भक्तांची निवास व्यवस्थाः-संस्थानचे साईप्रसाद नं.१ व नं.२, साईउद्यान, धर्मशाळा नं.२, द्वारावती, भक्तनिवासस्थान या इमारतीमधून करणे. तसेच कलाकारांसाठी निवास व्यवस्था गरजेनुसार संस्थानचे निवासात करणे. नेहमीप्रमाणे आवश्यक त्या ठिकाणी मदत केंद्रे उभारणे. |
| ०८. | कामगार विभाग | जादा कंत्राटी कर्मचारीः- उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पडणेकरीता लागणारा जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यात नेमण्यात येईल. विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छाननी करुन योग्य ते आदेश कामगार विभागामार्फत पारीत करणे. |
| ०९. | आरोग्य विभाग | नेहमीप्रमाणे मंदिर, मंदिर परिसर व इतर ठिकाणी रोगराई पसरणार नाही म्हणून औषध फवारणी व साफसफाई करणे. |
| १०. | साईनाथ रुग्णालय | श्री रामनवमी उत्सवात सिन्नर ते शिर्डी या मार्गावर फिरते वैद्यकीय पथक पाठविणे, तसेच तिन्ही उत्सवात नेहमीप्रमाणे आवश्यक त्याठिकाणी प्रथमोपचार केंद्र उभारणे. |
| ११. | जनसंपर्क कार्यालय | नेहमी प्रमाणे प्रेस नोट (न्यूज अॅटम) म्हणून जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमानपत्रातून प्रसिध्दी देणे. |
| १२. | लेखाशाखा | लिलावः- श्रींना अर्पण केलेली पवित्र वस्त्रें व इतर वस्तूंची प्रसाद रुपाने जाहीर लिलावाने विक्री तीन/चारही दिवस करण्यात येईल. देणगी स्वीकारणेकामी जादा काऊंटर्स उघडण्याची व्यवस्था करणे. |
| १३. | कार्यासन नं.०५ | उत्सव निमंत्रण पत्रिका :- दर उत्सवात सभासदांची वाढती संख्या लक्षात घेवुन आवश्यक तेवढ्या निमंत्रण पत्रिका तसेच मा.अध्यक्ष, मा.सर्व विश्वस्त व सन्माननीयांसाठी खास पत्रिका पाकीटासह १००० पत्रिका छपाई करणे. |
| १४. | कार्यासन नं.०८ | संस्थानचा कारभार चालविणेसाठी तयार करण्यात आलेल्या योजनेच्या तरतुदीमध्ये दुरुस्ती झाल्या प्रमाणे भक्त मंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासद व सन्माननीय मान्यवरांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका व उत्सव संपलेवर उदीप्रसाद पाठविणे. |

उपरोक्तप्रमाणे दरवर्षी तिन्ही उत्सवाची तयारी करावयाची असते त्यास कायमस्वरुपी मान्यता असावी.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४४५** | **उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला. संस्थानतर्फे साजरे होणारे उत्सवाचे पूर्व तयारीस पूर्वीप्रमाणेच वेळोवेळी व्यवस्थापन समितीची मंजूरी घेण्यात यावी,असें ठरलें.** |

(प्रशासनशाखा वशी-०५)

**विषय नं.६८ साईभक्त संमेलन -२००९ बाबत.**

**प्रस्ताव -** उपरोक्त विषयास अनुसरुन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) , मार्फत दि. ०३/०१/२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेतील निर्णयानुसार सन २००९ या सालात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत संपूर्ण भारतातील विविध शहरांमध्ये बाबांच्या शिकवणीचा प्रचार व प्रसार करण्याच्यादृष्टीने बाबांच्या चांदीच्या पादुकां दर्शन सोहळा तसेच प्रसिध्द गायक/गायिका व संस्थान कलाकार यांचा साईभजन संध्या कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरले आहे.

देशातील विविध भागातुन त्यांचेठिकाणी साईभजन संध्या कार्यक्रम आयोजित करणेबाबत व तेथील सर्व खर्च (मा.अध्यक्षसो., मा.उपाध्यक्षसो., विश्वस्त, कलाकार, सस्थान कर्मचारी इ.चे जाण्या-येण्याचे भाडे-विमान/रेल्वे, निवास, भोजन, जाहिरात, प्रसिध्दी, व त्या अनुषंगाने होणारा इतर खर्च) करणेस तयार आहेत. त्याची माहिती खालीलप्रमाणे-

| अ.नं. | संयोजकाचे नांव | ठिकाण | तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | बी.विजयकुमार, २०, उषा मन्शन, ऑफीसर कॉलनी, हैद्राबाद, मो.नं.९९५९७३९१११ | हैद्राबाद | माहे मे ०९ | संपुर्णपणे सहकार्य करणेस तयार. |
| ०२. | श्रीमती रानु दिवान, कॅलिंगपॉंग, आसाम<br>मो.नं.९४३४३५६०६५<br>मो.नं.९४३४००७०३४ | कॅलिंगपॉंग / सिलीगुडी / एन.जी.बी. | २४/०५/२००९<br>२५/०५/२००९ | सदर कार्यक्रमासाठी होणारा सर्व खर्च करणेस तयार. (मा.अध्यक्ष यांचेशी समक्ष चर्चा.) |
| ०३. | एच.एन.राजेश, #७७, पहिला माळा, ४- ए क्रॉस, शंकर नगर, बेंगलोर-९६, मो.नं.०९९४५३७३७३७<br>विनय सिंग- ०९४४८५४०८१५ | बेंगलोर | ३१/०५/२००९ | सदर कार्यक्रमासाठी होणारा सर्व खर्च करणेस तयार. |
| ०४. | श्री संजीव कुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी, आग्रा कॅटोनंट, पटना, बिहार,<br>मो.नं.०९३१९९६७३२०/०९३१९९६७३२९ | पटना-बिहार | माहे-सप्टेंबर ०९ | संपुर्णपणे सहकार्य करणेस तयार. |
| ०५. | श्री.एस.व्ही.गोपालकृष्णन्, मॅनेजींग ट्रस्टी, श्री साई मंदिरम, १२६५, ८-बी क्रॉस, १ ला ई मेन, गिरीनगर, बेंगलोर-५६० ०८५<br>फोन नं.२६७२०८६३/मो.नं.०९४४८५६१५७४ | बेंगलोर | ५/११/२००९<br>१२/११/२००९<br>१९/११/२००९<br>२६/११/२००९ | सदर कार्यक्रमासाठी होणारा सर्व खर्च करणेस तयार. |
| ०६. | हर्ष रोहटगी, सेक्रेटरी, श्री साईकृपा सेवा समिती, साई-छाया, ८, शिवपूरी, इव्हीईएस जवळ, सिंडीकेट बॅक बिल्डींग, हापूर रोड, मेरठ-२५०००१(उ.प्र.)<br>मो.नं.९७६००४११०१<br>फो.नं.०१२१-२६४२७२०/११०१, ३२४१८५८, | मेरठ | | सदर कार्यक्रमासाठी होणारा सर्व खर्च करणेस तयार. |
| ०७. | अनिल खुराना, उपाध्यक्ष, शिर्डी साई समाज, प्लॉट नं.६,सेक्टर-२९-ए,चंदिगड,फो.नं.०१७२-२६५९२९६ | चंदिगड | | सदर कार्यक्रमासाठी होणारा खर्च करणेस तयार. |
| ०८ | प्रेसिडेंट, शिरडी साई राम ट्रस्ट, फगवाडा, द्वारा-राजन शर्मा, श्री साई प्रॉपर्टीज् अॅडव्हायजर, बंगा रोड चौक, गली नं.१, बासरा पॅलेस जवळ, फगवाडा-१४४ ४०१<br>मो.नं.९८१४२२२३४५/९४१७६२९३२१ | फगवाडा, पंजाब | | संपुर्णपणे सहकार्य करणेस तयार. |
| ०९. | सुरेंद्र पाठक, संस्थापक एवं न्यासी, श्री केन्द्रीय साई सेवा समिति धार्मिक एवं पारमार्थिक न्यास, इन्दौर, १५९, फडणीस कॉम्पलेक्स, ८८ एम.जी.रोड, इन्दौर, फोन नं.२४५२९६०<br>मो.नं.९३०२१०७१७५/९३०२१०६२३४ | इंदौर | | सदर कार्यक्रमासाठी होणारा सर्व खर्च करणेस तयार. |

उपरोक्तप्रमाणे ठिकाणाहुन पादुका दर्शन सोहळा व साईभक्त संमेलनाचे आयोजन करणेस तयार असून त्यासाठी लागणारा सर्व खर्च करणेस संबंधीत संस्था तयार आहेत. मागील संमेलनाचा विचार करता कोणत्याही एका व्यक्तीचे मागणीवर साईभक्त संमेलन आयोजित करु नये, त्याऐवजी तेथील विविध संस्थांची एक समिती तयार करणेस सांगून त्यांच्यामार्फत साईभक्त संमेलन आयोजित करावे असे संबंधितांना कळवून नंतर तारखा निश्चित कराव्यात, असे नम्र मत आहे.

तसेच कार्यक्रम आयोजित करणेपुर्वी त्या त्या ठिकाणी मा.विश्वस्तांनी जाऊन संबंधीतांशी चर्चा करुन, जागा निश्चिती, त्याठिकाणची परिस्थिती याबाबत निरिक्षण करता येईल, तद्नंतर एक प्रशासकीय अधिकारी, एक अधिक्षक व संबंधीत लिपीक-टंकलेखक यांनी जाऊन त्याठिकाणचा सर्व्हे करुन त्याठिकाणी जाणेसाठी असलेल्या रेल्वे, विमान इ.बाबत तसेच निवास, भोजन, वाहतुक खर्च, जाहिराती-प्रसिध्दी इ.बाबत संबंधीतांशी चर्चा करुन त्याप्रमाणे अहवाल तयार करणे उचित ठरेल जेणेकरुन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडणेस मदत होईल. तसेच साई भजन संध्येसाठी कलाकार निश्चिती करावी लागेल. त्यासाठी विविध कलाकारांसाठी संपर्क साधुन मानधन, जाणे-येणे इ.बाबत निश्चिती करणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त दर्शविलेल्या ९ ठिकाणच्या तारखा निश्चित करणेस व त्यानुसार संबंधीतांना पत्रव्यवहार करणेबाबतचा विषय निर्णयास्तव सादर.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४४६** | **कॅलींगपाँग, आसाम येथे जून- २००९ मध्ये पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेस व त्याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. इतर ठिकाणी पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेबाबत योग्य वेळी निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.** |

(प्रशासनशाखा वशी-०५)

**विषय नं.६९ सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास आर्थिक मदत देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.डॉ.अन्बलगन, जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी दि.१३/०२/२००९ चे पत्रान्वये, मातृभुमिच्या संरक्षणाबरोबरच देशाअंतर्गत उद्‌भवणाऱ्या कायदा व सुव्यवस्था,भुकंप, महापूर, या सारख्या नैसर्गिक आपत्तीस धावुन जाणाऱ्या सैनिकांना वीरगती प्राप्त होतात, तसेच असंख्य जखमी व अपंग होतात. सैनिकांनी केलेल्या बलिदानाची पावती तसेच त्यांच्या त्यागाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी देशात डिसेंबर महिन्यात सर्वत्र ध्वजदिन साजरा केला जातो. वीरांच्या वीरमाता, वीरपीता, वीरपत्नी, अपंग सैनिक त्यांचे कुटूंबिय यांच्या कल्याणकारी योजणा राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडुन यावर्षी अहमदनगर जिल्हयासाठी रुपये ६० लाखाचे उदिष्ठ ठरवून देण्यात आलेले आहे. यासाठी शासकीय कार्यालये, विविध संस्था, महामंडळे, शैक्षणिक संस्था, शालेय विद्यार्थी यांचे मदतीने निधी जमविण्याचे प्रयत्न चालु आहे. श्री साईबाबा संस्थानकडून या कार्यास रु.११ लाख मदत मिळावी, अशी विनंती केली आहे.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ कलम क्र.१७ (२) (ण) मध्ये, " मानव जातीचे कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणाऱ्या कोणत्याही उदात्त कार्यास मदत करणे." अशी तरतुद आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ (२) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास, अशा शिल्लक रक्कमेचा, विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, "छाननी समितीच्या शिफारसीनुसार राज्य शासनाचे मान्यतेने अनुदान देण्याची तरतुद आहे."

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४४७** | **सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास संस्थानतर्फे आर्थिक मदत न देता सदर निधी संस्थानचे कायम कर्मचाऱ्यांचे मासिक वेतनातून नियमानुसार कपात करण्यात यावा,असें ठरलें.** |

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**विषय नं.७० श्री.मधूकर पंढरीनाथ बारसे, मदतनीस चौकशी व निवासस्थान विभाग (सध्या निलंबीत) यांचे तात्पूरते निलंबन आदेश रद्द करुन त्यांना पुन्हा कामावर हजर करुन घेणे बाबत**

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४४८** | **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** |

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.७१ संस्थानला अकुशल, कुशल कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन लेबर कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणे बाबत.**

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४४९** | **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** |

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.७२ सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत माजी सैनिकामधून पुरविणेत येणाऱ्या कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांचे वेतन वाढीबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला आवश्यकतेनुसार व मागणीप्रमाणे संरक्षण विभागास मंदिर व इतर परिसरासाठी (समाधी मंदिर, मंदिर परिसर, महाद्वार इत्यादी) तसेच मंदिर परिसराबाहेरील विभागांकरीता (सा.भ.नि., शैक्षणिक संकुल, श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साईनाथ रूग्णालय, द्वारावती, धर्मशाळा व इतर परिसरासाठी) दि.२१-०३-२००९ पासून ते दि.२०-०३-२०१० अखेर या एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेचे कॉन्ट्रॅक्ट मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८-०३-२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१८३ ला अनुसरून अनुक्रमे मे.टॉप्स सिक्युरिटी लिमिटेड, मुंबई व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि.,नाशिक यांना देणेत आलेले आहे. त्याप्रमाणे त्यांचेमार्फत संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी दि.२१-०३-२००९ पासून पुरविणेत येत आहेत.

मे.टॉप्स सिक्युरिटी लिमिटेड, मुंबई व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि.,नाशिक यांचेमार्फत माजी सैनिकांमधून पुरविणेत येणाऱ्या कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांना दि.२१-०३-२००९ पासून मा.व्यवस्थापन समितीचे सभेत झालेल्या चर्चा/ वाटाघाटीत ठरलेप्रमाणे वेतन दर व किमान वेतन दरास अनुसरून खालीलप्रमाणे प्रतिदिनी वेतन दर देण्यात येत आहे.

| अ.नं. | वर्गवारी | वेतनदर/ किमान वेतन दर (रुपये) प्रतिदिनी. | सर्व्हीस चार्जेस कॉ.३ चे रक्कमेवर ०.७५% | संस्थान पी.एफ़ एडीएम चार्जेससह कॉ.३चे रक्कमेवर १३.६१% | सर्व्हीस टॅक्स कॉ.३ ते ५ चे रक्कमेवर १०.३०% | एकूण वेतन दर (रुपये) प्रति दिनी |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १. | **सुरक्षा अधिकारी** (माजी सैनिक /कुशल) | १४६.२८ | १.१० | १९.९१ | १७.२३ | १८४.५२ |
| २. | **सुरक्षा सुपरवायझर** (माजी सैनिक /अर्धकुशल) | १४२.४४ | १.०७ | १९.३९ | १६.७८ | १७९.६८ |
| ३. | **सशस्त्र सुरक्षा रक्षक** (माजी सैनिक /कुशल) | १८४.५५ | १.३८ | २५.१२ | २१.७४ | २३२.७९ |
| ४. | **सुरक्षा गार्ड** (माजी सैनिक/अकुशल) | १३८.५९ | १.०४ | १८.८६ | १६.३२ | १७४.८१ |

निविदेतील व वर्क ऑर्डरमधील अटी/शर्तीस अनुसरून मंदिर परिसर, महाद्वार व इतर परिसराचे सुरक्षेकामी मे.टॉप्स सिक्युरिटी लिमिटेड, मुंबई यांनी आवश्यकतेनुसार माजी सैनिक सुरक्षा सुपरवायझर-०६, माजी सैनिक सशस्त्र सुरक्षा रक्षक-३४ व माजी सैनिक सुरक्षा गार्ड-६८ असे एकूण-१०८ कंत्राटी माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणे आवश्यक असून ते त्यांचे वर बंधनकारक आहे. असे असतांनाही दि.०५-०४-२००९ पासून उपरोक्तप्रमाणे आवश्यकता असतांना देखील एकही माजी सैनिक कंत्राटी सुरक्षा कर्मचारी मे.टॉप्स सिक्युरिटी लिमिटेड, मुंबई यांचेमार्फत पुरविणेत येत नाहीत. त्यामुळे महाद्वार डयुटी पॉईटवर चेकींगकामी एकही माजी सैनिक कंत्राटी सुरक्षा कर्मचारी त्यांचेकडून उपलब्ध होत नसल्यामुळे त्याठिकाणी सिव्हीलियन कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांकडून कामे करून घ्यावी लागत आहे. मे.टॉप्स सिक्युरिटी लिमिटेड, मुंबई यांना निविदेतील व वर्क ऑर्डरमधील अटी/शर्तीप्रमाणे आवश्यक असलेले माजी सैनिक कंत्राटी सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी अनेकवेळा कार्यालयात बोलावून समक्ष सुचना देवून देखील तसेच लेखी नोटीशी अन्वये कळवून देखील त्यांचेमार्फत अद्यापपर्यंत माजी सैनिक कंत्राटी सुरक्षा कर्मचारी पुरविणेत येत नाहीत. तसेच मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि.,नाशिक यांनी निविदेतील व वर्क ऑर्डरमधील अटी/शर्तीस अनुसरून मंदिर परिसराचे बाहेरील विभागातील सुरक्षेकामी आवश्यकतेप्रमाणे माजी सैनिक सुरक्षा सुपरवायझर-०६, माजी सैनिक सशस्त्र सुरक्षा रक्षक-०५ असे एकूण-११ कंत्राटी माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणे बंधनकारक असतांना देखील त्यांचेकडून पुरेसे संख्येने कंत्राटी पध्दतीने माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविले जात नाहीत. त्यामुळे सुरक्षा व्यवस्थेत अडचणी निर्माण होत आहेत.

उपरोक्तप्रमाणे दोन्हीही एजन्सीमार्फत कंत्राटी पध्दतीने माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी न पुरविणेमागे, वेतनदर कमी असल्यामुळे माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी उपलब्ध होवू शकत नसल्याचे कारण संबंधीत दोन्हीही एजन्सीचे प्रतिनिधी देत आहे. तथापि, उपरोक्तप्रमाणे वेतन दर हे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८-०३-२००९ रोजीचे सभेमध्ये चर्चा/वाटाघाटीचे वेळी सदर एजन्सीने दिलेले असून, त्याप्रमाणे त्यांचे वेतनदर मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये मान्य करण्यात आलेले आहे. त्यास अनुसरून त्यांनी माजी सैनिक कंत्राटी सुरक्षा कर्मचारी संस्थानचे आवश्यकतेनुसार व मागणीप्रमाणे पुरविणे आवश्यक असतांनाही, त्याप्रमाणे माजी सैनिक कंत्राटी सुरक्षा कर्मचारी त्यांचेकडून पुरविले जात नाही.

आता मे.टॉप्स सिक्युरिटी लि.,मुंबई व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि.,नाशिक (सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स) यांनी माजी सैनिक कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांचे वेतन वाढीबाबत दि.२७-०४-२००९ रोजीचे पत्र सादर केले असून, त्यात त्यांनी च्यापुर्वीची सुरक्षा एजन्सी मे.ईगल आय एन्टरप्राईज, वापी (गुजरात) यांचेमार्फत संस्थानला पुरविणेत येणाऱ्या माजी सैनिक कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांचे वेतन दरापेक्षा, सध्याचे माजी सैनिक कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांचे वेतनदर कमी आहेत. त्यामुळे माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी डयुटीवर येत नाहीत असे म्हटले आहे. तरी यापुर्वीची सुरक्षा एजन्सी मे.ईगल आय एन्टरप्राईज, वापी (गुजरात) यांचेमार्फत पुरविणेत येणाऱ्या माजी सैनिक कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांना देणेत येत होते. त्या वेतन दराप्रमाणे सध्याचे माजी सैनिक कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांचे वेतनदरात वाढ करून, खालीलप्रमाणे सुधारीत वेतन दर मिळावे. असे म्हटलेले आहे.

| अ. नं. | वर्गवारी | सुधारीत वेतनदर (प्रतिदिनी) रुपये/पैसे | सर्व्हिस चार्जेस कॉ.नं.३ चे रक्कमेवर ०.७५% | संस्थान पी.एफ. ए.डी.एम. चार्जेससह कॉ.नं.३ चे रक्कमेवर १३.६१% | सर्व्हिस टॅक्स कॉ.३ ते ५ चे रक्कमेवर १०.३०% | एकुण वेतनदर (प्रतिदिनी) रुपये/पैसे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| **१** | **सुरक्षा अधिकारी** (माजी सैनिक) | ३६०.०० | २.७० | ४८.९९ | ४२.४० | ४५४.०९ |
| **२** | **सुरक्षा सुपरवायझर** (माजी सैनिक) | २६७.९० | २.०० | ३६.४६ | ३१.५६ | ३३७.९२ |
| **३** | **सशस्त्र सुरक्षा रक्षक** (माजी सैनिक) | २२१.३५ | १.६६ | ३०.१२ | २६.०७ | २७९.२० |
| **४** | **सुरक्षा गार्ड** (माजी सैनिक) | २००.१० | १.५० | २७.२३ | २३.५७ | २५२.४० |

सबब, मे टॉप्स सिक्युरिटी लि., मुंबई व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि.,नाशिक (सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स) यांचेमार्फत माजी सैनिकांमधून संस्थानचे श्री साई मंदिर, महाद्वार व इतर परिसराचे सुरक्षेकामी पुरविणेत येणाऱ्या कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांना सध्या देण्यात येणाऱ्या वेतन दरात अनुक्रमे सुरक्षा अधिकारी- रूपये २१३.७२, सुरक्षा सुपरवायझर रूपये १२५.४६, सशस्त्र सुरक्षा रक्षक-रूपये ३६.८० व सुरक्षा गार्ड-रूपये ६१.५१ इतकी प्रतिदिनी वाढ करून, माजी सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर मे.ईगल आय एन्टरप्राईज, वापी (गुजरात)यांचेकडील माजी सैनिक सुरक्षा कर्मचाऱ्यांना यापुर्वी देणेत आलेल्या उपरोक्त वेतन दराप्रमाणे प्रतिदिनी सुधारीत वेतन दर दि.०१-०५-२००९ पासून दयावयाचे किंवा कसे? याबाबत निणर्य होणेस विनंती.

उपरोक्तप्रमाणे माजी सैनिक कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांना सुधारीत वेतनदर दयावयाचे झाल्यास संस्थानवर प्रतिमहिना रूपये २, ३२, ९३७/- व प्रतिवर्षी २७, ९५, २४२/- इतका आर्थिक भार पडेल. याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ४५०**

**यावर सविस्तर चर्चा होऊन,**

**अ) मे.टॉप्स सिक्युरिटी लि.गोरेगांव (पुर्व) मुंबई यांना महाव्दार सिक्युरिटी व्यतिरिक्त मंदिर व मंदिर परिसरासाठी (समाधी मंदिर, मंदिर परिसर व इतर परिसर इत्यादीसाठी) दिनांक २५.५.२००९ पासून ते दिनांक २०.०३.२०१० अखेर या कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविण्याचे कॉन्ट्रॅक्ट देण्यात यावे. तसेच मे.टॉप्स सिक्युरिटी लि,मुंबई व मे.बॉम्बे इंटेलिजेन्स सिक्युरिटी (इं) लि.नाशिक यांचे मार्फत पुरविण्यात येणाऱ्या माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी व इतर सुरक्षा कामगार यांना खालीलप्रमाणे प्रतिदिनी वेतनदर दिनांक ०१.०६.२००९ पासून देण्यात यावा.**

**१) सुरक्षा अधिकारी ( माजी सैनिक ) रुपये ३६०.०० प्रति दिनी**
**२) सुरक्षा सुपरवायझर ( माजी सैनिंक ) रुपये २६७.९० प्रति दिनी**
**३ ) सशस्त्र सुरक्षा रक्षक (माजी सैनिक व सिव्हीलियन) रुपये २२१.३५ प्रति दिनी**
**४) सुरक्षा रक्षक (सिव्हीलियन ) रुपये १३८.५९ प्रति दिनी (प्रचलीत दराने)**
**५) सुरक्षा गार्ड (सिव्हीलियन) मुंबई, झोन नं.०१ प्रमाणे रुपये १५३.९७ (प्रचलीत दराने)**

**उपरोक्त ठेकेदार यांना मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ८.३.२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १८३ (अ) प्रमाणेच सर्व्हिस चार्ज, सर्व्हिस टॅक्स, प्रा.फंड (मालकाचा हिस्सा) प्रशासकीय चार्जेससह अधिक कामगार नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रुप इन्शुरन्स पॉलिसी प्रिमियम (अंशदान ) रक्कम देण्यात यावी, असे ठरले.**

**ब) त्याचप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ८.३.२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१८३ (अ) नुसार मे.टॉप्स सिक्युरिटी लि.,गोरेगांव (पूर्व) मुंबई यांना मंदिर व इतर परिसर (समाधी मंदिर, मंदिर परिसर, महाव्दार सिक्युरिटी व इतर परिसर) याप्रमाणे सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्ट देण्यात आलेले आहेत. त्यांचेकडील महाव्दार सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्ट काढून घेऊन त्याऐवजी मे.ईगल आय एंटरप्राईज,दमण (युटी) यांना मागील सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टप्रमाणेच मंदिर परिसर,महाव्दार सुरक्षेकामी खालील दर्शविल्याप्रमाणे सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक कंत्राटी पध्दतीने पुरविण्याचे कॉन्ट्रॅक्ट दिनांक २५.५.२००९ पासून ते दिनांक २४.०५.२०१० अखेरपर्यन्त या कालावधीकरीता देण्यात यावे.**

| **अ.नं.** | **तपशिल** | **संख्या** |
|---|---|---|
| **०१** | **सुरक्षा अधिकारी (माजी सैनिक /कुशल)** | **०१** |
| **०२** | **सुरक्षा सुपरवायझर (माजी सैनिक /अर्धकुशल)** | **०३** |
| **०३.** | **सशस्त्र सुरक्षा रक्षक (माजी सैनिक व सिव्हीलियन/कुशल)** | **३९** |

| | | |
|---|---|---|
| ०४. | सुरक्षा गार्ड (माजी सैनिक/अकुशल ) | ७३ |
| ०५ | स्त्री सुरक्षा गार्ड (सिव्हीलियन /अकुशल ) | ३० |
| | एकूण | १४६ |

**उपरोक्तप्रमाणे सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी यांना शॉप ॲण्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.०३ ला किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय असणारे किमान वेतनदर /वेतनदर अधिक प्रा.फंड प्रशासकीय चार्जेससह (मालकाचा हिस्सा १३.६१ टक्के अधिक सुरक्षा कर्मचाऱ्याच्या एकूण वेतनाच्या रकमेवर ०.७५ टक्के सर्व्हीस चार्ज,अधिक संपूर्ण बिलाचे रकमेवर १०.३० टक्के इतका सर्व्हीस टॅक्स,अधिक कामगार नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रुप इन्शुरन्स प्रिमीयम (अंशदान ) या अनुसरुन खालीलप्रमाणे रक्कम कॉन्ट्रॅक्टरला आदा करण्यात यावी.**

| अ. नं. | वर्गवारी | सुधारीत वेतनदर (प्रतिदिनी) रुपये/पैसे | सर्व्हिस चार्जेस कॉ.नं.३ चे रक्कमेवर ०.७५% | संस्थान पी.एफ. ए.डी.एम. चार्जेससह कॉ.नं.३ चे रक्कमेवर १३.६१% | सर्व्हिस टॅक्स कॉ.३ ते ५ चे रक्कमेवर १०.३०% | एकुण वेतनदर (प्रतिदिनी) रुपये/पैसे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १) | **सुरक्षा अधिकारी** (माजी सैनिक/ कुशल) | ३६०.०० | २.७० | ४८.९९ | ४२.४० | ४५४.०९ |
| २) | **सुरक्षा सुपरवायझर** (माजी सैनिक/अर्धकुशल) | २६७.९० | २.०० | ३६.४६ | ३१.५६ | ३३७.९२ |
| ३) | **सशस्त्र सुरक्षा रक्षक** (माजी सैनिक/सिव्हीलियन) | २२१.३५ | १.६६ | ३०.१२ | २६.०७ | २७९.२० |
| ४) | **सुरक्षा गार्ड** (माजी सैनिक/ पुरुष) | २००.१० | १.५० | २७.२३ | २३.५७ | २५२.४० |
| ५) | **सुरक्षा गार्ड** (सिव्हीलियन/स्त्री) | १३८.५९ | १.०४ | १८.८६ | १६.३२ | १७४.८१ |

**उपरोक्त दर हे सध्या लागू असलेले किमान वेतनदर, भविष्यनिर्वाह निधी यास अधिन राहून आहेत. केवळ किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतूदी अंतर्गत शॉप ॲण्ड कमर्शिअल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.०३ प्रमाणे शासनाकडून वेळोवेळी जाहिर होणारे व अनूज्ञेय असणारे किमान वेतनदर, प्रा.फंड अंशदानदर व सर्व्हिस टॅक्स दर यातच वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार सुधारित दर लागू करण्याचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले.**

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.७३** **श्री चंद्रकान्त जयवंत रणशुर कंत्राटी सल्लागार यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री चंद्रकान्त जयवंत रणशूर यांनी दि. ०२/०४/२००९ रोजी अर्ज करुन, मी सध्या श्री सध्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीच्या बांधकाम विभागात कंत्राटी पध्दतीने सल्लागार म्हणून दि. १२/०५/२००५ पासून रु.७०००/- एकत्रित मानधनावर काम करत आहे. मला जा.नं.एसएसएस/वशी-०१/२४१७/२००८ दि.२५/०८/२००८ दि. १२/०५/२००८ पासून मुदतवाढ देण्यात आलेली असून सदरची मुदतवाढ दि.११/०५/२००९ रोजी संपत आहे. तसेच दरमहा रु.७५००/- ऐवजी रु.८०००/- मानधन वाढवून मिळावे अशी विनंती केलेली आहे. सदर अर्जावर वरिष्ठ उपमुख्य अभियंता यांनी "श्री रणशूर यांचे काम समाधानकारक असून भू-संपादन कक्षाकडील त्यांचे कामकाजाचे स्वरुप पाहतां, तुर्त एक वर्ष मुदतवाढ देणेस हरकत नाही." असे अभिप्राय दिलेले आहे.

श्री.चंद्रकान्त रणशूर यांची प्रथम उपरोक्त संदर्भ क्र.०१ अन्वये संस्थानचे बांधकाम विभागाकडे कंत्राटी मोजणीदार म्हणून मासिक रु.७०००/- एकत्रित मानधनावर एक वर्ष (दि.१२/०५/२००५ ते दि.११/०५/२००६अखेर) कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली होती. सदरची मुदतवाढ संपुष्ठात आल्यानंतर त्यांची वेळोवेळी मुदतवाढ करण्यात आलेली असून सदरची मुदतवाढ दि.११/०५/२००९ रोजी संपुष्ठात येत आहे.

तरी

अ) वरिष्ठ उपमुख्य अभियंता यांची शिफारस विचारात घेता पूर्वीच्याच अटी-शर्तीवर दि.१२/०५/२००९ ते दि.११/०५/२०१० अखेर एक वर्ष मुदतवाढ देणेबाबत आदेश होणेस विनंती.

ब) मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०७/०७/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४२८ नुसार श्री रणशूर यांना त्यांचे दि.१२/०५/२००८ रोजीचे नेमणूकीपासून दरमहा रु. ७५००/- एकत्रित मानधन देण्यात येत आहे. ते सरकारी सेवानिवृत्त कर्मचारी आहेत.

उपरोक्त परिस्थीती विचारात घेता मुदतवाढ तसेच मानधनात वाढ द्यावी अगर कसे याबाबत निर्णय होणेस विनंती.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४५१** | **उपरोक्त प्रस्तावानुसार श्री.चंद्रकांत जयवंत रणशुर,कंत्राटी सल्लागार यांना पूर्वीचेच अटी-शर्तीवर एक वर्ष कालावधीसाठी दरमहा रुपये ८,५००/- एकत्रित मानधनावर मुदतवाढ देण्यात यावी,असें ठरलें.** |

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.७४ श्रीरामपूर भू-संपादन कक्षास मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयान्वये संस्थान करीता भू-संपादन करणेकामी दि.१५-१६-१७ जुलै २००० रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय क्र.२३८ नुसार मा. उपविभागीय अधिकारी महसूल श्रीरामपूर यांचे पर्यवेक्षणाखाली दि.०२/०८/२००० पासून एक कक्ष सुरु करण्यात आलेला आहे. या कक्षाकडे कंत्राटी पद्धतीने खालील कर्मचारी देण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे पद | हुद्दा | संख्या | मासिक एकत्रीत वेतन / मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | नायब तहसीलदार | कंन्सल्टंट | ०१ | रु.७०००/- |
| ०२ | अव्वल कारकुन संवर्गातील | अव्वल कारकुन | ०१ | रु.४५००/- |
| ०३ | लिपीकाचे कामासाठी | कंत्राटी कुशल कामगार | ०४ | रु.४०००/- |
| ०४ | कार्यालयीन कामकाजासाठी शिपाई | कंत्राटी अकुशल कामगार | ०१ | किमान वेतनानुसार हजेरी |
| | | एकूण | ०७ | |

जा.नं.एसएसएस वशी ०१/८८९२/२००८ दि. १८/०६/२००८ अन्वये सदर भू-संपादन कक्ष व कक्षात काम करीत असलेले कर्मचारी यांना देण्यात आलेली एक वर्ष मुदतवाढ दि.३०/०४/२००९ रोजी संपुष्ठात येत आहे. दि. २६/०३/२००९ रोजी मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी मुदतवाढ प्रस्ताव सादर करुन भू-संपादनाची ७ प्रकरणे तसेच नगरपालिकेसाठी चालू असलेली १४ प्रकरणे आणि बाहयवळण रस्त्यांसाठी चालू असलेले १७ प्रकरणांचा सद्यःस्थिती दर्शविणारी माहिती कळविली आहे. या सर्व प्रकरणांत भू-संपादनाची प्रक्रिया सत्वर पूर्ण करणेस आणखी कमीत कमी ०१ वर्षाचा कालावधी आवश्यक आहे. सबब ही भू-संपादन प्रकरणे सत्वर निर्गत करणेकामी या कक्षास तसेच या कक्षात वर नमूद केलेले व सध्या कार्यरत असलेले कर्मचारी यांना दि. ०१/०५/२००९ ते दि.३०/०४/२०१० अखेर एक वर्ष मुदतवाढ मिळावी अशी विनंती केलेली आहे.

सदर बाबत वरिष्ठ उपमुख्य अभियंता बांधकाम विभाग यांनी " मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचे कार्यालयातील भू-संपादन कक्षास व सदरहू कक्षातील ०७ कर्मचाऱ्यांना उपरोक्त ३८ प्रकरणांचा निपटारा लवकरात लवकर होणे गरजेचे असल्याने ०१ वर्ष मुदतवाढ देणेस हरकत नाही. " असे अभिप्राय दिलेले आहेत.

उपरोक्त कक्षाकडे चालू असलेली कामे मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांची विनंती व वरिष्ठ उपमुख्य अभियंता बांधकाम विभाग यांचे अभिप्राय विचारात घेता सदर कक्षास मुदतवाढ देणे बाबतच्या प्रस्तवावर निर्णय होणेस विनंती.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४५२** | **प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कक्षाकडे चालू असलेली कामे मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांची विनंती व वरिष्ठ उपमुख्य अभियंता बांधकाम विभाग यांचे अभिप्राय विचारात घेता सदर भूसंपादन कक्षास एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेत यावी.** |

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.७५ श्री शाहूल भगवान अडांगळे यांना अनुकंपा कारणास्तव संस्थान सेवेत घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री भगवान शाहू अडांगळे हे संस्थानचे बगीचा विभागाकडे वर्ग-०४ या पदावर सेवेत होते त्यांचे दि.११/०४/२००९ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :- श्री भगवान शाहू अडांगळे

०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- मदतनीस,बगीचा विभाग

०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि.०१/०९/१९७९ ते दि.१०/०४/२००९

एकूण सेवा २९ वर्षे ०६ महिने

०४.मृत्यु दिनांक :- ११/०४/२००९

श्री भगवान शाहू अडांगळे यांचे दि.११/०४/२००९ रोजी निधन झाल्याने त्यांचे वारसदार त्यांचा मुलगा नामे श्री शाहुल भगवान अडांगळे यांनी संस्थानमध्ये वडीलांचे जागी अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत अर्ज केला असून त्यांचे बाबत माहिती खालील प्रमाणे

०१. अर्जदाराचे नांव :- श्री. शाहुल भगवान अडांगळे

०२. मयत कर्मचाऱ्याशी नाते :- मुलगा
०३. वारसदार अर्जदाराची जन्मतारीख व वय :- ०२/०९/१९८९ , वय १९ वर्ष ०६ महिने
०४. शैक्षणिक व शारीरीक पात्रता :- ०८ वी पास ,

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे.त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे. त्यानुसार श्री शाहुल भगवान अडांगळे यांनी अर्ज सादर केलेला आहे.

दिवंगत श्री भगवान शाहू अडांगळे यांचा मुलगा नामे श्री.शाहुल भगवान अडांगळे हे शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर नेमणूक देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४५३** | **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे दिवंगत श्री भगवान शाहू अडांगळे यांचा मुलगा नामे श्री.शाहुल भगवान अडांगळे हे शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर नेमणूक देण्यात यावी असे ठरले.** |

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.७६ दिपक भाऊसाहेब धुमसे यांना अनुकंपा कारणास्तव संस्थान सेवेत घेणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री भाऊसाहेब सखाराम धुमसे हे संस्थानचे कॅन्टीन विभागाकडे वर्ग-०४ या पदावर सेवेत होते त्यांचे दि.०१/०७/२००६ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :- श्री भाऊसाहेब सखाराम धुमसे
०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- मदतनीस,कॅन्टीन विभाग
०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि.०६/०३/१९८९ ते दि.३०/०६/२००६
एकूण सेवा १७ वर्षे ०३ महिने
०४) मृत्यु दिनांक :- ०१/०७/२००६

श्री भाऊसाहेब सखाराम धुमसे **यांचे दि.०१/०७/२००६** रोजी निधन झाल्याने त्यांचे वारसदार त्यांचा मुलगा नामे श्री दिपक भाऊसाहेब धुमसे यांनी संस्थानमध्ये वडीलांचे जागी अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत अर्ज केला असून त्यांचे बाबत माहिती खालील प्रमाणे

**०१. अर्जदाराचे नांव :- श्री. दिपक भाऊसाहेब धुमसे**
०२. मयत कर्मचाऱ्याशी नाते :- मुलगा
०३. वारसदार अर्जदाराची जन्मतारीख व वय :- ०५/०३/१९९१ , वय १८ वर्ष.
०४. शैक्षणिक व शारीरीक पात्रता :- ११ वी पास , एम.एस.सी.आय.टी. पास

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे.त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे. शासन निर्णय अकंपा १०९५/प्र.क्र.३४/आठ मंत्रालय, दि.११/०९/१९९६ नुसार " सेवेत असतांना दिवेगत झालेल्या किंवा दुर्धर व्याधीमुळे अकाली सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटूंबातील अज्ञान वारसदाराच्या बाबतीत एकाने सज्ञान म्हणजे १८ वर्षाचा झाल्यावर एक वर्षाचे आत या योजनेखाली नोकरीसाठी अर्ज करावा " असे नमूद केलेले आहे. त्यानुसार श्री दिपक भाऊसाहेब धुमसे यांची जन्मतारीख ०५/०३/१९९१ असल्याने त्यांना दि.०४/०३/२००९ रोजी १८ वर्ष पूर्ण झालेले आहे व त्यांनी अनुकंपा तत्वावर संस्थान सेवेत घेणेकामी दि.२५/०३/२००९ रोजी म्हणजे ०१ वर्षाचे आत नोकरीसाठी विनंती अर्ज सादर केलेला आहे.

दिवंगत श्री भाऊसाहेब सखाराम धुमसे यांचा मुलगा नामे श्री दिपक भाऊसाहेब धुमसे हे शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग - ४ चे पदावर नेमणूक देणेबाबत निर्णयार्थ सादर.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४५४** | **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे दिवंगत श्री भाऊसाहेब सखाराम धुमसे यांचा मुलगा नामे श्री दिपक भाऊसाहेब धुमसे हे शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग - ४ चे पदावर नेमणूक देण्यात यावी असे ठरले.** |

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.७७ हॉस्पिटलकडे नेमणूका करण्यात आलेले वैद्यकिय अधिकारी/ स्टाफ नर्स यांचे नेमणूकीबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटल वैद्यकिय अधिकारी तसेच आर.एम.ओ. तसेच मेल स्टाफनर्स या पदावर नोकरी मिळणेबाबत अर्ज केलेल्या उमेदवारांच्या मा.विश्वस्त तसचे वैद्यकिय संचालक व वैद्यकिय उपसंचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी मुलाखती घेऊन पात्र उमेदवारांना खाली त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे नेमणूक पत्र देण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | वैद्यकीय अधिकारी नांव | शैक्षणिक पात्रता | नेमणूक आदेश नंबर व हॉस्पीटलचे नांव | दिलेले पदनांम व एकत्रीत मानधन /वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ. अमोल काशिनाथ डांगे मु.पो. दहेगांव (को) राहाता | एमएस (आर्थो) | जा.नं.एसएसएस/वशी-१/३८५२/२००९ दि.०२/०४/२००९ श्री साईनाथ हॉस्पीटल, | डॉ.पठारे (आर्थो सर्जन) यांचे रजेच्या बदली दि.२०/०८/२००९ अखेर जनरल सर्जन एकत्रित वेतन प्रतिमहा रु. २१,०००/- |
| ०२. | डॉ. बसवराज एम.कोळी हावेरी ( कर्नाटका ) | एम.एस. (ओ.बी.जी.)' | जा.नं.एसएसएस/वशी-०१/३८९३/२००९ दि.०३/०४/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | स्त्रीरोग व प्रसूती तज्ञ एकत्रित वेतन रु.३०,०००/- (प्रत्यक्ष काम श्री साईनाथ हॉस्पीटल) |
| ०३. | डॉ.संदिप रामचंद्र नळे मु.पो.कोल्हार, राहाता | एम.डी. ॲनेस्थेशिया . | जा.नं.एसएसएस/वशी-१/३५२७/२००९ दि.२८/०३/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | ॲनेस्थेशियालॉजिस्ट एकत्रित वेतन प्रतिमहा रु.३०,०००/- (प्रत्यक्ष काम श्री साईनाथ हॉस्पीटल ) |
| ०४. | डॉ. दिपमाला भा. महेंद्रकर मु.पो. कोल्हार, राहाता. | एम.बी.बी.एस. (डि.ए.) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/४३९०/२००९ दि.२०/०४/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | ज्यु. ॲनेस्थेशियालॉजिस्ट एकत्रित वेतन प्रतिमहा रु.२५,०००/- (प्रत्यक्ष काम श्री साईनाथ हॉस्पीटल) |
| ०५. | डॉ.किरण शिरीश झांबरे, भुसावळ, जळगांव | एम.बी.बी.एस. डी. आर्थो | जा.नं.एसएसएस/वशी-०१/३८२०/२००९ दि.०२/०४/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | सी.एम.ओ प्रतिमहा एकत्रित वेतन रु.१८०००/- |
| ०६ | डॉ. संतोष भगवानराव उनवणे मु.पो. आष्टी, ता.परतूर | आर.एम.ओ. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/३६३८/२००९ दि.३१/०३/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/- |
| ०७. | डॉ. सुदाम लक्ष्मण आरोटे अकोले जिल्हा-अ.नगर | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/३५२६/२००९ दि.२८/०३/२००९ श्री साईनाथ हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/- |
| ०८. | श्री. विद्यातील लिजो जोस मु.पो.शिरडी ता.राहाता | बी.एस्सी नर्सिंग | जा.नं.एसएसएस/वशी-१/३४८९/२००९ दि.२७/०३/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल | स्टाफ नर्स एकत्रित वेतन प्रतिमहा रु.८,०००/- |

उपरोक्त ०१ ते ०८ वरील उमेद्‌वारांच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे वैद्यकिय अधिकारी/आर.एम.ओ तसेच मेल स्टाफनर्स या पदावर करण्यात आलेल्या नेमणूकीस मान्यता मिळणेस विनंती .

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४५५** | **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे उपरोक्त ०१ ते ०८ वरील उमेद्‌वारांच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे वैद्यकिय अधिकारी/आर.एम.ओ तसेच मेल स्टाफनर्स या पदावर करण्यात आलेल्या नेमणूकीस मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.७८** **श्री मिनीनाथ भाऊसाहेब कोते,प्रयोगशाळा सहाय्यक श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर यांचा वाढीव वेतन मिळणेबाबतचा अर्ज**

**प्रस्ताव-** श्री. मिनिनाथ भाऊसाहेब कोते, प्रयोगशाळा सहाय्यक श्री साईबाबा कन्याविद्यामंदिर विभाग यांनी दि.०८/०१/२००१ व दि.३१/०३/२००१ रोजी अर्ज करुन त्यात " माझी श्री साईबाबा कन्याविद्यामंदिर विभागाकडे प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर रु.२५००/- एकत्रित वेतनावर नेमणूक केलेली आहे. यापूर्वी दि.०४/१२/२००६ रोजी मला रु.२०००/- या एकत्रित मानधन/वेतनावर संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे. शासन निर्णयानुसार ०१/०८/२००८ पासून रु.५५००/- एकत्रित वेतन देण्यात आले. पूर्वीप्रमाणेच मला रु.५५००/- (प्रयोगशाळा सहाय्यक ) कुशलचे वेतन मिळणेस विनंती आहे.सदर अर्जावर मा.अध्यक्ष महोदय यांनी "व्यवस्थापन समितीचे पाच तारखेच्या मिटींगपुढे ठेवणे " असे अभिप्राय दिले आहेत. श्री. मिनीनाथ भाऊसाहेब कोते, हे सन-१९९८ पासून कंत्राटदारामार्फत वर्ग-०४ चे कर्मचारी म्हणून काम करत होते. सन-२००४ पासून ते श्री साईबाबा कन्यामंदिर विभागाकडे प्रयोगशाळा सहाय्यक या रिक्त पदावर कंत्राटी पध्दतीने काम करत होते. मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार संस्थानकडे कंत्राटदारामार्फत काम करत (सन-२००० पर्यंत) असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना डिसेंबर-२००६ मध्ये रु.२०००/- या एकत्रित मानधन/वेतनावर संस्थान आस्थापनेवर नेमणूका देण्यात आल्या. त्यानंतर शासनाची मान्यता व मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार सदर कर्मचा-यांना दि.०१/०८/२००८ पासून अकुशल वर्ग-०४ कर्मचा-यांना रु.४५००/- व कुशल वर्ग-०४ कर्मचा-यांना रु.५५००/- एकत्रित वेतन देण्यात येत आहे. त्यात श्री.मिनीनाथ कोते हे श्री साईबाबा कन्याविद्यामंदिराकडे (प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर ) कुशल कर्मचारी म्हणून काम करीत असल्याने त्यांनाही इतर कुशल कर्मचा-यांचेप्रमाणे रु.५५००/- (कुशल कर्मचा-यांचे वेतन) देण्यात आलेले होते.

दरम्यान श्री साईबाबा कन्याविद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडे रिक्त असलेल्या पदांसाठी जाहीरातीनुसार मुलाखतीद्वारे श्री. मिनीनाथ भाऊसाहेब कोते यांची निवड करण्यात येऊन जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०३६/२००८ दि.०४/०९/२००८ अन्वये त्यांची श्री साईबाबा कनिष्ठ

महाविद्यालयाकडे "प्रयोगशाळा सहाय्यक (रसायन शास्त्र)"या रिक्त पदावर हजर झालेच्या तारखेपासून दि.३०/०४/२०११ या तीन शैक्षणिक वर्ष कालावधीसाठी प्रति महा रु.२५००/- या एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आली आहे व ते दि.०४/०९/२००९ रोजी कामावर हजर झालेले आहेत.

श्री. मिनीनाथ भाऊसाहेब कोते, यांचेप्रमाणेच रु.२०००/- मानधनावर नेमणूक केलेले श्री. विजय पठारे, व श्री. कैलास शेळके यांचीही अनुक्रमे इंग्लिश मिडीयम स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाकडे एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आलेली असून ते हजर झालेले आहेत. श्री. कोते यांचे मागणीप्रमाणे त्यांना रु.५५००/-इतके एकत्रित वेतन द्यावयाचे झाल्यास श्री. पठारे व श्री शेळके यांनाही द्यावे लागेल.

| | |
|---|---|
| निर्णय क्र. ४५६ | **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री. मिनीनाथ भाऊसाहेब कोते, यांचेप्रमाणेच रु.२०००/- मानधनावर नेमणूक केलेले श्री. विजय पठारे, व श्री. कैलास शेळके यांचीही अनुक्रमे इंग्लिश मिडीयम स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाकडे एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आलेली आहे. तरी श्री. कोते, श्री.पठारे व श्री.शेळके यांनाही रु.५५००/-इतके एकत्रित वेतन देण्यात यावे, असे ठरले.** |

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.७९** **श्री दिलीप शंकरराव शेळके, सहाय्यक शिक्षक यांचा कनिष्ठ महाविद्यालयीन वेतनश्रेणी मिळणेबाबतचा अर्ज**

**प्रस्ताव-** श्री. दिलीप शंकरराव शेळके, सहाय्यक शिक्षक (इंग्रजी) कनिष्ठ महाविद्यालय,शिरडी यांनी दि.३१/०३/२००९ रोजी अर्ज करुन त्यात-" मी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी संचलीत श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे शैक्षणिक वर्ष २००५ पासून तासिका तत्वावर त्यानंतर अर्धवेळ व त्यानंतर पूर्णवेळ सहाय्यक शिक्षक (इंग्रजी) या पदावर कार्यरत आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त मंडळाने जून-२००८ पासून मला वेतनश्रेणीवर (रु.७२२५-११०५०) सेवेत घेण्यात आले. परंतु मला एम.ए.इंग्रजी पदव्युत्तर पदवीला तृतीय श्रेणी असल्याने प्रशासन विभागाने मला (रु.५५००-१७५-९०००) माध्यमिकची वेतनश्रेणी दिली.

कनिष्ठ महाविद्यालयाच्या नियमावलीनुसार एम.ए.पदव्युत्तर पदवीला तृतीय श्रेणी असल्यास संबंधीत शिक्षकाने किमान ८ ते १० वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असणे आवश्यक असते तो अनुभव माझ्याकडे आहे. म्हणून मला उच्च वेतनश्रेणी मिळावी "अशी विनंती केली आहे. सदर अर्जावर मा.अध्यक्ष महोदय यांनी " येत्या पाच तारखेला मिटींगमध्ये ठेवणे" असे आदेश दिले आहेत.

श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे शिक्षण सेवक (सर्व पदांसाठी ) पदाच्या जागा भरणे कामी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. जाहीरातीमध्ये **शिक्षण सेवक** (इंग्रजी ) या पदासाठी सबधीत विषयात **एमए (द्वितीय श्रेणी ) अधिक बीएड** अशी पात्रता नमूद करण्यात आलेली होती.

श्री. दिलीप शेळके यांनी संबंधीत जाहीरातीस अनुसरुन शिक्षणसेवक इंग्रजी या पदावर नोकरी मिळणेबाबत अर्ज केलेला होता. त्यांची शैक्षणिक पात्रता एम.ए.(इंग्रजी ) तृतीय श्रेणी बीएड अशी होती. संस्थान मार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे श्री. शेळके यांची शैक्षणिक पात्रता नसतांनाही विशेष बाब म्हणून त्यांना मुलाखत पत्र देण्यात आले होते.

मा.व्यवस्थापन समितीचे समोर मुलाखत घेऊन श्री. शेळके यांना प्रथम तासिका तत्वावर श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे शिक्षण सेवक इंग्रजी या पदावर नेमणूक देण्यात आली. त्यानंतर त्यांचे पदाचा कार्यभार वाढल्यानंतर त्यांना अर्धवेळ शिक्षणसेवक या पदावर नेमणूक देण्यात आली. व पूर्णवेळ कार्यभार उपलब्ध झाल्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार प्रतिमहा **रु.१०,०००/-** या एकत्रित वेतनावर नेमणूक करण्यात आली त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाप्रमाणे दि.१६/०६/२००८ पासून वेतनश्रेणीवर नेमणूक करण्यात आलेली आहे. श्री. शेळके यांचेकडे अपूर्ण पात्रता असल्याने त्यांना रु.५५००-१७५-९००० ही वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे.

कनिष्ठ महाविद्यालयाकडील शिक्षकाचे अर्हतेबाबत माहिती खालीलप्रमाणे :-

**१८. <u>कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या अहर्ता.</u> <u>पूर्ण कालीक शिक्षक</u>**

**<u>(सहा) ( अ) सांविधिक विद्यापीठाची पदवी</u>**

(एक) पदवी द्वितीय वर्गातील असल्यास इयत्ता ०८ वी ते १० वी अगर ११ वीला शिकविण्याचा किमान ०७ वर्षाचा अनुभव किंवा (दोन) पदवी तृतीय वर्गातील (पास क्लास) असल्यास, इयत्ता ०८ वी, इयत्ता १० वी अगर ११ वीला शिकविण्याचा किमान १० वर्षाचा अनुभव.

ब) सांविधिक विद्यापीठाची शिक्षणशास्त्रातील स्नातक पदवी आणि क) १९७५-७६ सालामध्ये नेमणूक अशी आहे.

श्री. शेळके यांची अपूर्ण पात्रता असतांनाही त्यांचे अनुभवाचे आधारे, त्यांचे मागणी प्रमाणे वरिष्ठ वेतनश्रेणी देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

| | |
|---|---|
| निर्णय क्र. ४५७ | **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री. शेळके यांची अपूर्ण पात्रता असली तरी त्यांचा अनुभव विचारात घेऊन, त्यांना रु.७२२५-११०५० वेतनश्रेणी देण्यात यावी असे ठरले.** |

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.८०** **कनिष्ठ महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २००८-२००९ या वर्षाकरीता नियुक्त असलेल्या प्रयोगशाळा सहाय्यक तसेच अर्धवेळ व तासिका तत्वावरील शिक्षणसेवक यांना सन २००९-१० मध्ये फेर नेमणूका देणे बाबत.**

**प्रस्ताव-** सन २००८-०९ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयात इ.११वी व इ.१२वी च्या कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखांच्या प्रत्येकी दोन वर्ग तुकडया अशा एकूण १२ वर्गतुकडया सुरु आहेत. या १२ वर्गतुकडयांमध्ये ९०१ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

या वर्गाच्या अध्यापनासाठी मागास प्रवर्गानुसार नियुक्त करावयाच्या स्टाफ करीता ऑगष्ट-२००८ मध्ये मा.व्यवस्थापन समितीने मुलाखती घेऊन प्रवर्गनिहाय आरक्षण विचारात घेऊन, त्यानुसार या मुलाखतीमध्ये निवड झालेल्या खालील संबंधित कर्मचाऱ्यांना सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षाकरीता (माहे एप्रिल- २००९ अखेर) नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.

| अ. नं. | नाव | सन- २००८-०९ मधील पदनाम | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | | | सन- २००८-०९ मधील मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सौ.वैशाली प्रशांत देवरे (NT) | प्रयोगशाळा सहाय्यक (जीवशास्त्र) | बी.एस्सी. | प्राणीशास्त्र | बी.एड. | रु.२५००/- प्रति माह |
| २ | श्री दत्तू अशोक लांडे (NT) | अर्धवेळ शिक्षणसेवक | एम.ए. | अर्थशास्त्र | बी.एड. | रु.२५००/- प्रति माह |
| ३ | श्रीमती संगिता रंगनाथ बनसोडे (SC) | CHB शिक्षणसेवक | एम.एस्सी. | वनस्पतीशास्त्र | बी.एड. | रु.७२/- प्रति घ.तास |
| ४ | श्रीमती उषा कोंडाजी गायके (OPEN) | CHB शिक्षणसेवक | एम.सी.एस. | | | रु.७२/- प्रति घ.तास |
| ५ | श्री अरुण लक्ष्मण शिंदे (OBC) | CHB शिक्षणसेवक | एम.एस्सी. | रसायनशास्त्र | बी.एड. | रु.७२/- प्रति घ.तास |

अ.नं.१ यांचे पद SC/ST करीता राखीव असल्याने त्यांना वार्षिक नेमणूक देण्यात आलेली आहे. सन २००८-०९ मध्ये पूर्णवेळ पदासाठी कार्यभार उपलब्ध नसल्याने अ.नं.२ ते ४ यांना वार्षिक नेमणुका देण्यात आलेल्या आहेत. मा.शिक्षण उपसंचालक, पुणे यांनी दि.२९ एप्रिल २००९ रोजी प्रवरानगर येथे घेतलेल्या प्राचार्यांच्या सहविचार सभेत यांनी सांगितले की, शिक्षण उपसंचालक, पुणे यांचे कार्यालयाच्या ना हरकत दाखल्याशिवाय (N.O.C.) या वर्षी कोणत्याही शिक्षकपदाचे भरतीसाठी जाहिरात प्रसिध्द करुन नये.

सन २००९-१० या शैक्षणिक वर्षामध्ये सन २००८-०९ प्रमाणेच कार्यभार उपलब्ध होणार असल्याने तसेच वरील तक्त्यामधील अ.नं.१ ते ५ यांची मा.व्यवस्थापन समितीने मुलाखतीद्वारे निवड केलेली असल्याने त्यांना दि.१५ जून २००९ पासून दि.३० एप्रिल २०१० अखेर पर्यंत, सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षासाठी, वरील तक्त्यात दर्शविल्यानुसार सध्याच्याच मानधनावर नेमणूका देता येतील.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४५८** | **प्रस्तावात नमूद केल्यानुसार उपरोक्त ०१ ते ०५ कनिष्ठ महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २००८-२००९ या वर्षाकरीता नियुक्त असलेल्या प्रयोगशाळा सहाय्यक तसेच अर्धवेळ व तासिका तत्वावरील शिक्षणसेवक यांना सन २००९-१० मध्ये सध्याचेच मानधनावर फेर नेमणूका देण्यात याव्यात असे ठरले.** |

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.८१** **सिस्टर इनचार्ज पदावर पदोन्नतीबाबत.**

**प्रस्ताव-** दि.**१७/०१/२००९** रोजी आस्थापना उपसमितीचे सभेत "श्री साईनाथ रुग्णालयात काम करत असलेल्या नर्सेसना सिस्टर इनचार्ज या पदावर पदानेन्नती देणेकामी कार्यकारी अधिकारी, वैद्यकिय संचालक, उपवैद्यकिय संचालक यांनी मुलाखती घेऊन आपला अहवाल व्यवस्थापन समितीस सादर करावा" असा निर्णय झाला. त्यानंतर संबंधीतांच्या मुलाखती घेऊन नियमानुसार नेमणूका देण्यात याव्यात व अहवाल सादर करावा असे आदेश समक्ष देण्यात आलेले होते.

त्यानुसार **दि.२२/०१/२००९** रोजी श्री साईनाथ रुग्णालयातील तसेच श्री साईबाबा हॉस्पीटलकडील सेवाजेष्ठ परिचारीका/ परिचारक यांना कार्यकारी अधिकारी, वैद्यकिय संचालक, उपवैद्यकिय संचालक यांचे समोर मुलाखतीसाठी बोलाविण्यात आले होते. संबंधीतांच्या मुलाखती घेऊन खालील प्रमाणे उमेदवारांची सिस्टर इनचार्ज या पदावर पदोन्नतीसाठी शासनाचे पदोन्नती व आरक्षणाबाबतचे नियमास अनुसरुन निवड करण्यात आलेली आहे.

| अ.नं. | उमेद्वाराचे नांव | अ.नं. | उमेद्वाराचे नांव |
|---|---|---|---|
| ०१. | सौ. शोभा किरण चोपडे | ०२ | कु. नजमा नुरमहम्मद सय्यद |
| ०३ | कु. सुचिता चंद्रकात कुलकर्णी | ०४ | सौ. कल्पना प्रकाश बोधक |
| ०५ | सौ. जयश्री नागनाथ प्रयाग | ०६ | सौ. उषाक्रांती दशरथ कांडेकर |
| ०७ | कु. सिमा प्रकाश पाटील | ०८ | सौ. कांचन बाळासाहेब जाधव |
| ०९ | कु. असुंता नानासाहेब वाघमारे | १०. | सौ. पूजा सुनिल देव |
| ११. | सौ. निशा मधुकर बारसे | १२. | सौ. संगिता संजय थोरात |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | सौ. विद्या विजय कदम | १४. | सौ. सविता ज्योतीलाल जाधव |
| १५ | सौ. गीता आप्पासाहेब शिंदे | १६. | सौ. आशा तुळसीराम रोकडे |
| १७ | सौ. निर्मला दिगंबर सलगरकर | १८. | सौ. वैशाली मिलींद कराडे |
| १९. | सौ. संजया सतिष वाणी | २० | श्री. रामदास शंकर देवकर |
| २१ | सौ. रेखा किरण पाटोळे | २२ | सौ. उषा विजयानंद पाडळे |
| २३ | सौ. कल्पना जगन्नाथ मुसमाडे | २४ | श्री. दिगंबर अनंत सलगरकर |
| २५ | सौ. किरण सुधीर धोटे | २६ | सौ. सुवर्णा अंबादास व्हनमाने |

श्री साईनाथ व साईबाबा हॉस्पीटलकडील उपलब्ध एकूण २६ जागांवर आरक्षण नियमानुसार पदोन्नती देणेत आलेली आहे. आरक्षणाचे नियमानुसार प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्याने वरीलपैकी अ.नं. ०२,०६,०७,०९,१४, व १७ यांना तात्पुरती पदोन्नती देणेत आलेली असून त्या- त्या प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध झालनंतर संबंधीतांना पदावनत करणेत येईल असे आदेशात स्पष्ट नमूद करणेत आलेले आहे. कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४५९** | **उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.८२** **प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नतीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडी चे कायम आस्थापनेवर प्रशासकिय अधिकारी या हुद्दाची एकूण ०५ पदे असून पैकी श्री. प्रकाश तुकारामपंत जोशी, प्रशासकिय अधिकारी यांचे दि.३०/०४/२००९ रोजी सेविनिवृत्तीचे विहीत वयोमान (६० वर्षे ) पूर्ण झाल्याने त्यांना दि.३०/०४ २००९ रोजी संस्थान सेवेतून सेवानिवृत्त करण्यात आलेले आहे.त्यामुळे प्रशासीकय अधिकारी हे ०१ पद रिक्त झालेले आहे.

प्रशासकीय अधिकारी पदावर सेवाजेष्ठ व पात्रताधारक संस्थान आस्थापनेवरील कायम कर्मचाऱ्यांनी पदोन्नतीसाठी अर्ज केलेले आहेत त्यांची वैयक्तीक माहिती व संस्थानमधील सेवेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.नं | कर्मचाऱ्यांचे नाव व पदनांम | जन्मतारीख | शैक्षणिक अर्हता | सेवेत दाखल तारीख | झालेली एकूण सेवा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री प्रभाकर भिकोबा बोरावके, अधिक्षक, खरेदी विभाग | ०६/०१/१९५१ | बी.ए. | २२/०३/१९७८ | ३१ वर्षे |
| ०२. | श्री सुभाष नारायण गर्कल, विधी अधिकारी | ०६/१२/१९५५ | बी.ए.एल.एल.बी. | १५/०७/१९८२ | २६ वर्षे ०९ महिने |
| ०३ | श्री अशोक मुरलीधर काळे, लेखाधिकारी, लेखाशाखा | १६/१०/१९५२ | बी.कॉम | ०४/१२/१९८५ | २३ वर्षे ०४ महिने |
| ०४ | श्री. रामराव रंभाजी शेळके, अधिक्षक, मंदिर विभाग | ०१/०६/१९५५ | बी.ए. (पॉलीटीक्स ) | ०१/११/१९७५ | ३३ वर्षे ०५ महिने |
| ०५ | श्री सुभाष नारायण चित्रे विभाग प्रमुख श्री साईनाथ रुग्णालय | ०५/०९/१९५५ | बी.ए.,एल.एल.बी डी.बी.ए. | ११/०५/२००५ | प्र.अ. पदावरील सेवा खंडीत |
| ०६. | श्री. प्रकाश रामचंद्र रत्नपारखी अधिक्षक, धर्मशाळा विभाग | १५/०६/१९५० | बी.ए. | २०/०३/१९७८ | ३१ वर्षे |

यापूर्वी श्री. सुभाष किसन जगताप, हे प्रशासकिय अधिकारी यांचे ३०/०६/२००७ रोजी सेविनिवृत्तीचे विहीत वयोमान (६० वर्षे ) पूर्ण झाल्याने त्यांना ३०/०६/२००७ रोजी संस्थान सेवेतून सेवानिवृत्त करण्यात आलेले आहे. त्यावेळी श्री. प्रभाकर भिकोबा बोरावके, अधिक्षक खरेदी विभाग यांनी रिक्त झालेल्या प्रशासकिय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक मिळणेकरीता ०१) दि.स्टेट ऑफ महाराष्ट्र, ०२) दि एक्झीक्युटीव्ह ऑफिसर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडी ०३) दि.चेअरमन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडी यांचे विरुध्द मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.४५७२/२००७ कोर्ट केस दाखल केली होती त्यात त्यांनी खालील प्रमाणे मागणी केली होती.

i) Issue writ of mandamus and/or direction in the nature of mandamus, direction the respondent no.१ and २ to consider the case of the petitioner for promotion / appointment on the post of administrative officer considering his seniority, long standing service period. ii) Issue writ of

mandamus and / or direction, directing the respondent no.१ and २ to follows the preinciples of seniority while making appointment/selection on the post of administrative officer. iii) Pending hearing and final disposal of this writ petition, the respondents may kindly be prevented by order of injunction not to promote/appoint any other person on the post of Administrative Officer by way of and order of interim relief. iv) Pending hearing and fibal disposal of this srit petition, the respondents

may please be directed to temporarily promote the petitioner as Administrative Officer of Respondent No. Sansthan by way of and order of interim relief.

त्यावर संस्थानचे वतीने मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दि.०७.०३.२००८ रोजी श्री जगताप यांना १ वर्षासाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूक दिलेली असल्याने पद रिक्त नसलेबाबत तसेच इतर प्रशासकीय आवश्यकता विचारात घेवून सदर पद रिक्त झाल्यानंतर अर्जदारांचा विचार करण्यात येईल असे प्रतिज्ञा पत्र सादर करण्यात आलेले होते.

त्यावर मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.२६/०८/२००८ रोजी खालीलप्रमाणे आदेश देऊन प्रकरण निकाली काढले आहे.

01.In view of the averments made in paragraph 06 of the counter affidavit, Writ Petition is disposed of. Respondents would consider case of the petitioner in accordance with rules and bye lawas.

02We make it clear that this direction would, no way, be treated as precedence for the purposes that writ petition under Article 226 of the Constitution of India would ba maintainable. No order as to cost.

त्याच दरम्यान श्री. भाऊसाहेब दा. साबळे, अधिक्षक आस्थापना विभाग यांनी संस्थान व इतर ०३ विरुध्द आरक्षण नियमानुसार प्रशासकिय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्यात यावी. या करीता मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.१५१७/२००८ दाखल केले होते. सदर रिट पिटीशन मध्ये मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.०२/०६/२००८ रोजी कॉम्पीटंट ॲथॉरिटी यांनी श्री साबळे व संस्थान कर्मचारी यांचे अर्जाबाबत तीन महिन्याचे आंत निर्णय घ्यावा असे आदेश दिले होते. तसेच दि रिव्हीव सिव्हील ॲप्लीकेशन क्र.१७८१३/२००८ इन रिट पिटीशन क्र.१५१७/२००८ मध्ये दि.३०/०९/२००८ राजी मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी रेस्पॉंन्डट नं. ०४ डिव्हीजनल कमिशनर नाशिक डिव्हीजन नाशिक यांनी कॉम्पीटंट ॲथॉरिटी म्हणून पिटीशनर व संस्थान कर्मचारी यांचे अर्जाबाबत तीन महिन्याचे आत निर्णय घ्यावा असे फेर आदेश दिले होते.

दरम्यानचे कालावधीमध्ये श्री. सुभाष किसन जगताप कंत्राटी प्रशासकिय अधिकारी यांचे सेवामुक्त करण्याचे विनंती नुसार त्यांना दि.३०/०४/२००८ पासून पदमुक्त करण्यात आले. त्याच वेळी श्री. भाऊसाहेब दाजीबा साबळे अधिक्षक आस्थापना यांना त्यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार आरक्षण नियमानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/१०/२००८ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार दि.२४.१०.२००८ पासून प्रशासकिय अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे.

आता, श्री. प्रकाश तुकारामपंत जोशी, प्रशासकिय अधिकारी यांचे दि.३०/०४/२००९ रोजी सेविनिवृत्तीचे विहीत वयोमान (६० वर्षे ) पूर्ण झाल्याने त्यांना दि.३०/०४ २००९ रोजी संस्थान सेवेतून सेवानिवृत्त करण्यात आलेले आहे.त्यामुळे उपरोक्त एकूण-०५ पदापैकी ०१ पद रिक्त झालेले आहे. सदर रिक्त झालेल्या प्रशासकिय अधिकारी या पदावर रिट पिटीशन क्र.४५७२/२००७ मधील मा. उच्च न्यायालयाचे दि.२६/०८/२००८ रोजीच्या आदेशानुसार सेवाजेष्ठतेनुसार माझी नेमणूक करावी अशी विनंती श्री. प्रभाकर भिकोबा बोरावके, अधिक्षक खरेदी विभाग यांनी केली आहे.

यापूर्वी वेळोवेळी प्रशासकीय अधिकारी पदासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवून अर्ज मागणी करतांना सदर पदाची अर्हता मान्यताप्राप्त विदयापिठाचा कोणत्याही शाखेतील पदवीधर, शासकीय /निमशासकीय कार्यालयातील प्रशासकीय कामाचा किमान १५ वर्षाचा अनुभव आवश्यक पैकी कक्ष अधिकारी अथवा पर्यवेक्षकीय (सुपरवायझरी ) तत्सम प्रशासकीय पदावर किमान ५ वर्षे काम केल्याचा अनुभव आवश्यक, वयोमर्यादा ४० ते ५० वर्षे , विधी पदवीधर अथवा व्यवस्थापन / प्रशासनातील पदवी/पदविकाधारक उमेव्दारास प्राधान्य देवू असे नमूद करण्यात आलेले होते.

वरीलप्रमाणे प्रशासकीय अधिकारी पदासाठी अर्जदारांची संस्थान सेवेतील दाखल तारीख , पद व त्यानंतर वेळोवळी दिलेल्या पदोन्नती बाबत माहिती खालीलप्रमाणे.-

| अ.नं | कर्मचाऱ्यांचे नाव व पदनाम | सेवेत दाखल तारीख व पद | पदोन्नतीबाबतचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री प्रभाकर भिकोबा बोरावके अधिक्षक, खरेदी विभाग | २२/०३/१९७८ लिपीक टंकलेखक | ०१.०३.१९८३ व.लिपीक | ०१.०८.१९९१ खरेदी अधिकारी | ०२.०८.२००४ अधिक्षक | --------- |
| ०२. | श्री सुभाष नारायण गर्कल विधी अधिकारी | १५/०७/१९८२ अव्वल कारकुन ( व. लिपीक ) | १५.०९.१९९८ विधी अधिकारी | -------- | -------- | --------- |
| ०३ | श्री अशोक मुरलीधर काळे लेखाधिकारी, लेखाशाखा | ०१/१२/१९८५ व.लेखापाल | ०७.१०.१९९५ लेखाधिकारी | -------- | --------- | --------- |
| ०४ | श्री. रामराव रंभाजी शेळके, अधिक्षक, मंदिर विभाग | ०१/११/१९७५ मदतनीस | ०१.०१.१९७९ लिपीक टंकलेखक | ०१.०९.१९८४ खरेदी सहाय्यक | ०१.०८.१९९९ पर्यवेक्षक | १८.१०.०८ अधिक्षक |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०५ | श्री सुभाष नारायण चित्रे विभाग प्रमुख श्री साईनाथ रुग्णालय | ०१.०५.१९९७ प्रशासकीय अधिकारी | ०१.०४.१९९९ सेवाखंडीत | १०/०८/२००५ पुनर्नेमणूक अधिक्षक | --------- | --------- |
| ०६. | श्री.प्रकाश रामचंद्र रत्नपारखी अधिक्षक, धर्मशाळा विभाग | २०/०३/१९७८ लिपीक टंकलेखक | ०१.०३.१९८३ व.लिपीक | ०१.०८.१९९९ पर्यवेक्षक | १७.०१.२००९ अधिक्षक | --------- |

वरीलपैकी श्री काळे यांचा फक्त लेखाशाखेतील अनुभव आहे, तर श्री गर्कल यांना विधी विभागाचा अनुभव आहे. उर्वरीतपैकी श्री चित्रे यांना प्रशासकीय अधिकारी पदावर नेमणूक देण्यात आलेली होती. तथापि सन १९९९ मध्ये त्यांची सेवा खंडीत करण्यात आलेली होती. व त्यानंतर एप्रिल २००५ मध्ये व्यवस्थापन समिती सभेत झालेल्या तडजोडीनुसार त्यांना अधिक्षक / विभागप्रमुख पदावर पुनर्नेमणूक देण्यात आलेली आहे.

तसेच श्री बोरावके , श्री शेळके व श्री रत्नपारखी यांचे पैकी श्री बोरावके यांना अधिक्षक पदावर सर्वात अगोदर दि.०२.०८.२००४ रोजी पदोन्नती देण्यात आलेली आहे.

प्रशासकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीबाबत डेप्युटी डायरेक्टर हेल्थ,नासिक यांचे मुख्य प्रशासकीय अधिकारी यांचेकडे चर्चा केली असता , अधिक्षक संवर्गातून यापदावर पदोन्नती दिली जाते .यापूर्वी श्री बी.डी.साबळे यांना आरक्षण नियमानुसार अनुसूचित जाती प्रवर्गातून पदोन्नती देणेत आलेली असल्याने सध्याचे प्रशासकीय अधिकारी रिक्त पदावर खुल्या प्रवर्गातून श्री बोरावके यांचा विचार करता येईल.

तरी रिट पिटीशन क्र.४५७२/२००७ वरील मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार श्री. प्रभाकर भिकोबा बोरावके, अधिक्षक खरेदी विभाग यांची नेमणूक करणेबाबतचा विषय धोरणात्मक असल्याने मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४६०** | **रिट पिटीशन क्र.४५७२/२००७ वरील मा. उच्च न्यायालयाचे आदेश तसेच श्री. प्रभाकर भिकोबा बोरावके, अधिक्षक खरेदी विभाग यांची सेवाजेष्ठता विचारात घेऊन त्यांना प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यात यावी असे ठरले.** |

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.८३** **आयुर्वेद विभागाकरीता आयुर्वेद पंचकर्म तज्ञ यांचे नव्याने पद निर्माण करुन भरणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालय यांनी त्यांचे दि.१४/०३/२००९ रोजीचे टिपणीमध्ये श्री साईनाथ रुग्णालयाकडे आयुर्वेद विभाग सुरु असून सध्या सदर विभागाचे विस्तारीकरणाचे काम चालू असून त्या विभागात लवकरच पंचकर्म विभाग सुरु करावयाचा आहे. त्याकरिता रुग्णालयास ०१ आयुर्वेद पंचकर्म तज्ञाची तातडीने आवश्यकता भासणार आहे.

सध्या आयुर्वेद विभागात डॉ.एस.बी.गोंदकर, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी हे आयुर्वेद तज्ञ म्हणून काम पहात आहेत. त्याशिवाय त्यांना प्रभारी वैद्यकीय अधिक्षकाचे काम पहावे लागते. त्यांचे बरोबर डॉ.संदिप शेळके हे गेले दीड वर्षे विनामोबदला सेवा देत आहेत. डॉ.संदिप शेळके हे B.A.M.S. असून त्यांनी पंचकर्म तज्ञाचा कोर्स पुर्ण केलेला आहे. आयुर्वेद विभागात डॉ.गोंदकर यांच्याव्यतिरिक्त एक डॉक्टरांची पंचकर्म कामासाठी आवश्यकता आहे.

तरी श्री साईनाथ रुग्णालयाकडील पंचकर्म विभागातील काम पहाणे कामी ०१ पंचकर्म तज्ञाचे पद नव्याने निर्माण करुन भरणेस मंजूरी असावी तसेच याकामी डॉ.संदिप शेळके यांचा प्राधान्याने विचार करावा अशी विनंती केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८/०७/२००७ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेत श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये आयुर्वेद विभागात पंचकर्म हा विभाग नसल्याने रुग्णाची गैरसोय होत आहे. याकरिता पंचकर्म विभाग सुरु करण्यात यावा. या विभागात डॉ.संदीप ज्ञानेश्वर शेळके यांची कंत्राटी पध्दतीने रु.१०,०००/- मानधनावर एक वर्षासाठी नियुक्ती करण्यात यावी. असा निर्णय झालेला आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाचे आकृतीबंधात पंचकर्म तज्ञ या पदाचा समावेश नसल्यामुळे त्यांना यापुर्वी नेमणूक देण्यात आलेली नव्हती. तथापि मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने श्री साईनाथ रुग्णालयाचे सुधारीत कर्मचारी आकृतीबंधात आयुर्वेद पंचकर्म तज्ञ या पदाचा समावेश करुन सदर आकृतीबंधास शासन मान्यतेचे अधिन राहून डॉ.शेळके यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०७/२००७ चे सभेतील निर्णयानुसार पंचकर्म तज्ञ या पदावर प्रतिमहा रु.१०,०००/- एकत्रित मानधनावर सुरुवातीस एक वर्षे कालावधीसाठी नेमणूक देणेबाबत निर्णयार्थ सादर.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४६१** | **प्रस्तावात नमूद केल्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने श्री साईनाथ रुग्णालयाचे सुधारीत कर्मचारी आकृतीबंधात आयुर्वेद पंचकर्म तज्ञ या पदाचा समावेश करुन सदर आकृतीबंधास शासन मान्यतेचे अधिन राहून डॉ.शेळके यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०७/२००७ चे सभेतील निर्णयानुसार पंचकर्म तज्ञ या पदावर प्रतिमहा रु.१०,०००/- एकत्रित मानधनावर सुरुवातीस एक वर्षे कालावधीसाठी नेमणूक करण्यात यावी असे ठरले.** |

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.८४ लघुलेखक पदाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांचे दर्शनासाठी भक्तांची वाढती संख्या व त्यांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधा याकामी मा.व्यवस्थापन मंडळाच्या मासिक व उपसमिती यांच्या सभा होतात.सभेमध्ये विविध विषयावर चर्चा होऊन निर्णय घेतले जातात त्यावेळी झालेल्या चर्चेचे निर्णयाचे शॉर्ट नोट घेऊन त्याचे मराठी व इंग्रजी इतिवृत्त तयार करुन मान्यतेनंतर त्याची प्रत संबंधीत विभागांना पुढील कार्यवाहीसाठी देण्यात येते तसेच संस्थानचे २७ विभाग कार्यरत असून दैनंदिन कामात सुसूत्रता येण्यासाठी दरमहा मा.कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात खातेप्रमुखांची सभाही घेण्यात येते. सभेत होणाऱ्या चर्चेचे,निर्णयाचे शॉर्टनोट घेऊन त्याचे इतिवृत्त तयार करुन संबंधीत विभागांना पाठविण्यात येतात.उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता संस्थानचे प्रशासकीय कामाचा ताबडतोब निपटारा व्हावा व कामात सुसूत्रता तत्परता येण्यासाठी लघुलेखक हे पद भरणे अत्यंत गरजेचे आहे.शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या आकृतीबंधात एक लघुलेखक हे पद दर्शविलेले आहे.आकृतीबंधास शासनाची मान्यता मिळणेचे अटीस अधीन राहून व कामाची निकट लक्षात घेता लघुलेखक या पदाची वर्तमान पत्रात जाहीरात देवून हे पद समक्ष मुलाखतीद्वारे (Walk in Interview) भरणेत यावे असे ठरले होते त्यावर संस्थान सेवेत कायम व एकत्रित मानधनावर / रोजंदारीवर काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांमधून ज्या कर्मचाऱ्याकडे लघुलेखक या पदाची शैक्षणिक पात्रता असेल अशा कर्मचाऱ्यांकरीता संस्थानचे नोटीस बोर्डवर माहितीपत्रक लावण्यात येऊन त्यांचेकडून या पदासाठी अर्ज मागविण्यात येऊन त्या कर्मचाऱ्यांची लेखी / तोंडी परिक्षा घेऊन लघुलेखक या पदावर निवड करण्यात यावी असा निर्णय झालेला आहे.

सदर निर्णयानुसार " कोणत्याही शाखेचा पदवीधर,शॉर्टहॅन्ड मराठी १०० श.प्र.मि.,शॉर्टहॅन्ड इंग्रजी १०० श.प्र.मि.,टायपिंग मराठी ४० श.प्र.मि.,टायपिंग इंग्रजी ४० श.प्र.मि.,D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा "O" स्तर किंवा "A" स्तर किंवा "B" स्तर किंवा "C" स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा (ब) महाराष्ट्रराज्य, तंत्रशिक्षण परिक्षा मंडळ,मुंबई यांचे कडील अधिकृत MSC-IT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.,अनुभव किमान ३ वर्ष "या प्रमाणे शैक्षणिक पात्रता असलेल्या कर्मचाऱ्यांकडून दि.२८/०३/२००९ अखेर जा.नं.एसएसएस वशी ०१/ १००९/ २००९ दि.२६/०३/२००९ च्या परिपत्रकानुसार अर्ज मागविण्यात आले होते.तथापी इकडील कार्यालयास दि.०३/०४/२००९ अखेर पर्यंत सदर शैक्षणिक पात्रता असलेल्या एकाही कायम / कंत्राटी कर्मचाऱ्यांने अर्ज केलेला नाही.

सबब उपरोक्तप्रमाणे जाहीरात देऊन सदर पद भरणेबाबत निर्णय होणेस विनंती.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४६२** | **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे लघुलेखक या पदावर नेमणूक होणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन पद भरण्यात यावे असे ठरले.** |

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.८५ श्री साईनाथ रुग्णालयाधील समुपदेशक पदाबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयान्वये वैद्यकीय अधिक्षीका,श्री साईनाथ रुग्णालय यांनी रुग्णालयात समुपदेशक पद भरणेबाबतचा प्रस्ताव सादर करुन त्यात श्री साईनाथ रुग्णालयात प्रयोगशाळा विभागात दररोज जवळ जवळ सरासरी ५० ते ६० रुग्णांची एच.आय.व्ही. तपासणी केली जाते. ही तपासणी आतापर्यंत रुग्णाला न सांगता किंवा रुग्णाच्या परवानगीने केली जात आहे. परंतू मिनीस्टरी ऑफ हेल्थ ॲन्ड फॅमिली वेलफेअर, नॅशनल एड्स कंन्ट्रोल ऑर्गनायझेशन २००७ ची नियमावली व भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्वानुसार सदर तपासणी करण्यापूर्वी तपासणीबाबत रुग्णांला पूर्वकल्पना (समुपदेशन) देणे आवश्यक आहे. परंतू आपल्याकडे सदरील पद नसल्याने विना कौन्सिलींग ही तपासणी केली जात आहे. जागतिक एड्स निर्मुलन संघटना, आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार याच्या नियमावली नुसार हे गैरकृत्य आहे. एड्स तपासणीपूर्वी व नंतर रुग्णांना माहिती देण्यासाठी व रुग्णांकडून लेखी परवानगी घेण्यासाठी कौन्सिलरची आवश्यकता आहे. यासाठी साईनाथ रुग्णालयात ०२ समुपदेशक नेमणे गरजेचे आहे. यासाठी त्यांची शैक्षणिक पात्रता कोणत्याही शाखेचा पदवीधर, व मान्यता प्राप्त संस्थेतील एम.एस.डब्ल्यू / एम.ए.मानसशास्त्र झालेला असावा किंवा बारावी व मान्यता प्राप्त संस्थेतील एच.आय.व्ही. कौन्सिलिंगचा प्रमाणपत्र कोर्स असणे आवश्यक आहे.तसेच सदर कामाचा नामांकीत रुग्णालयातील कमीत कमी ०२ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे, असे कळविलेले आहे.

समुपदेशक पदास ५ व्या वेतनआयोगानुसार ५५००-९००० वेतनश्रेणी आहे. शासनाचे नियम तसेच साईनाथ रुग्णालयाकडील मागणीनुसार "समुपदेशक" ही ०२ पदे साईनाथ रुग्णालयाचे आकृतीबंधात समावेश करणेस मान्यतेसाठी सादर.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४६३** | **प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.८६ संस्थान कायम कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी लागु करणेबाबत.**

**प्रस्ताव -** महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र. वेपूर- १२०९/ प्र.क्र.२०/ सेवा-९ मंत्रालय, मुंबई दि.२७.०२.२००९ नुसार महाराष्ट्र शासनाच्या कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे.

यापूर्वी महाराष्ट्र शासनाच्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले बडकस आयोग, भोळे आयोग, ४ था वेतन आयोग, ५ वा वेतन आयोग वेळोवेळी संस्थान कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येऊन त्याप्रमाणे वेतन देणेत आलेले आहे. तसेच संस्थान कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासनाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे वेळोवेळी महागाई भत्त्यातही वाढ देण्यात येत आहे. मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२७.१०.१९९८ च्या सभेतील निर्णय क्र.२४९ नुसार संस्थान कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासनाच्या ५ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी व महागाई भत्त्याचे दरानुसार सध्या वेतन देण्यात आहे.

सन- २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ चे कलम १६ मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

"नियत दिवसाच्या लगतपूर्वी जी व्यक्ती पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या सेवेत असेल आणि त्याच्या कामकाजासंबंधात काम करीत असेल अशी कोणतीही व्यक्ती ही, नियत दिवसाच्या लगतपूर्वी तिला जे वेतन लागू होते त्याच वेतनावर व सेवेच्या त्याच इतर अटी व शर्तीवर, नियत दिवसापासून, समितीच्या नियंत्रणाखाली, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कामकाजांशी संबंधित अशा सेवेसाठी नेमून देण्यात आल्याचे व नियुक्त केल्याचे मानण्यात येईल, आणि सेवेच्या अशा शर्तीमध्ये राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज त्या व्यक्तीचे अहित होईल अशा रितीने समितीकडून कोणताही बदल करण्यात येणार नाही किंवा अशा व्यक्तीला सेवेतून काढून टाकण्यात येणार नाही. परंतु, या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या तरतुदीनुसार अशा कोणत्याही व्यक्तीची सेवा समाप्त करण्याच्या समितीच्या अधिकारावर, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होणार नाही. "

संस्थान कर्मचाऱ्यांना राज्य शासनाचे कर्मचाऱ्यांप्रमाणे ६ वा वेतन आयोग व भत्त्यातील सुधारणा जानेवारी २००६ पासून लागू होणेबाबत श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी दि.२३.०१.२००९ व दि.०७.०२.२००९ चे पत्रान्वये विनंती केलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे संघटनेची मागणी विचारात घेता संस्थान कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी लागू करणेबाबत मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र. ४६४** | **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे संस्थान आस्थापनेवरील कायम कर्मचाऱ्यांना ६ वा वेतन आयोग लागू करण्यात यावा. माहे जुन,२००९ पासुन संस्थान कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन आदा करण्यात यावे, असे ठरले.** |

**मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **श्री मोहन एकनाथ उपासनी ,वरिष्ठ लिपिक, प्रशासनशाखा (सध्या सेवा निलंबीत) यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत**

**प्रस्ताव-** श्री.मोहन एकनाथ उपासनी हे दि.१४-०६-१९८९ पासून संस्थान सेवेत आहे. श्री.उपासनी हे दि.०२-०५-२००३ पासून प्रशासन शाखा विभागात वरिष्ठ लिपीक म्हणून कार्यरत असतांना दि.१३-११-२००७ रोजी त्यांचेकडून खालीलप्रमाणे गैरशिस्त वर्तन घडलेले आहे.

प्रशासन शाखा, वशी-७ए दि.१२-११-२००७ रोजीचे परिपत्राकान्वये इतर कर्मचाऱ्यांप्रमाणेच श्री.उपासनी यांची डयुटी दि.१३-११-२००७ रोजी सकाळी ७.३० वाजता श्रींचे समाधी मंदिर व मंदिर परिसरातील दक्षिणा पेटीतील कॅश, वस्तु, सोने, चांदी वगैरे मोजणेकामी नेमण्यात आली होती त्यानुसार श्री.मोहन एकनाथ उपासनी हे दि.१३-११-२००७ रोजी कॅश काऊंटींग हॉल येथे कॅश काऊंटींग कामी कामावर हजर होते. सदर दिवशी सकाळी ८.४५ वाजेच्या दरम्यान श्री.उपासनी हे बाथरूमचे कारणासाठी कॅश काऊंटींग हॉलमधुन बाहेर जात असतांना तेथील सुरक्षा पहारेकरी श्री.सुभाष गोरक्षनाथ शेळके यांनी श्री.उपासनी यांची तपासणी केली. तपासणीचे वेळी पॅन्टचे खिसे चेक करीत असतांना श्री.उपासनी यांनी त्यास मज्जाव करण्याचा प्रयत्न केला. तसेच त्या वेळी श्री.उपासनी यांचे हातात असलेल्या रूमालाची घडी ते स्वतःच्या नाकाला वारंवार लावत असल्याचे सुरक्षा निरिक्षक श्री.संजय मिठुलाल पाटणी यांचे लक्षात आले. श्री.पाटणी यांनी श्री.उपासनी यांचेकडे विचारणा केली की, तुम्हाला जास्त सर्दी झालेली आहे काय? त्यावर श्री.उपासनी यांनी होकारार्थी उत्तर दिले व रूमाल चेक करू न देताच ते घाई-घाईने बाहेर जाऊ लागले.

म्हणून श्री.पाटणी यांनी श्री.उपासनी यांना मोठया आवाजात दरडावून सांगितले की, तुमच्या हातातील रूमाल दाखवा. श्री.उपासनी यांनी त्यांचे हातातील रूमाल दाखविल्या बरोबर त्यांचे रूमालातुन प्रथम एक हजाराची एक नोट खाली पडली. त्यानंतर रूमाल पुर्ण झटकण्यास सांगितले. श्री.उपासनी यांनी त्यांचा रूमाल झटकल्यानंतर त्यातुन एक हजाराच्या १९ नोटा खाली पडल्या. त्यानंतर सुरक्षा निरिक्षक श्री.पाटणी यांनी श्री.उपासनी यांना सदर खाली पडलेल्या सर्व नोटा गोळा करून, आनण्यास सांगितले. श्री.उपासनी यांनी खाली पडलेल्या रूपये एक हजाराच्या २० नोटा उचलून श्री.पाटणी, सुरक्षा निरिक्षक यांच्या ताब्यात दिल्या. त्यानंतर श्री.पाटणी यांनी श्री.उपासनी यांना कॅश काऊंटींग हॉलच्या बाहेर जाणेस

मज्जाव करून, त्यावेळी कॅश काऊंटींग हॉलमध्ये उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांना सदर घटणेची माहिती दिली.

त्यानंतर श्री.पाटणी यांनी श्री.उपासनी यांचे रूमालात सापडलेल्या रूपये एक हजाराच्या २० नोटा प्रभारी सुरक्षा अधिकारी श्री.रमेश गोपाळा भालेराव यांचे ताब्यात दिल्या. सदर रूपये एक हजारच्या २० नोटांचा रितसर पंचनामा श्री.उपासनी यांचे समक्ष घटनास्थळी करून, सदर नोटा मुख्यलेखाधिकारी यांचे ताब्यात देण्यात आल्या. तसेच श्री.उपासनी यांचा सदर घटणेबाबत लेखी जबाब नोंदविणेत आला.

त्यानंतर प्रशासकीय अधिकारी श्री.पी.पी.देशपांडे यांनी संस्थानचे वतीने सदर घटनेबाबत मा.पोलीस निरिक्षक, शिरडी पोलीस स्टेशन, शिरडी यांचेकडे लेखी तक्रार जा.नं.१८२३८/२००७ दि.१३-११-२००७ अन्वये दाखल केली. शिरडी पोलीस ठाणे यांचे प्र.अधिकारी यांनी सदरची तक्रार दि.१३-११-२००७ रोजी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५४ अन्वये खबर क्र.११६/२००७ अन्वये नोंदवून घेतली. तसेच श्री.उपासनी यांचे रूमालात सापडलेल्या रूपये १ हजाराच्या २० नोटा पोलीस स्टेशमध्ये पंचनामा करून, जमा करणेत आल्या. श्री.उपासनी यांना शिरडी पोलीसांनी सदर गुन्हयाखाली अटक करून त्यांना दि.१८-११-२००७ पर्यंत पोलीस कोठडीत ठेवणेत आले. त्यानंतर त्यांची जामीनवर सुटका करण्यात आली.

उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.मोहन एकनाथ उपासनी यांना खाते चौकशीकामी जा.नं. एसएसएस/वशी-७ए/३०८७/२००७ दि.१३-११-२००७ चे आदेशान्वये तात्काळ संस्थान सेवेतुन तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले. सदर घटनेबाबत दुसऱ्या दिवशी म्हणजे दि.१४-११-२००७ रोजी विविध वर्तमान पत्रात बातम्या प्रसिध्द झाल्या. त्यामुळे संस्थान कर्मचारी, प्रशासन यांचे नावलौकिकास व इभ्रतीस बाधा पोहचली. सदर गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.मोहन एकनाथ उपासनी यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३४२१/२००७ दि.२०-१२-२००७ अन्वये आरोप पत्र देवून, त्यांचेवर **दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टॅडींग ऑर्डर्स) ॲक्ट १९४६ चे कलम नंबर २२ (डी) प्रमाणे मालकाचा धंदा किंवा मालमत्ता यांचेबाबत चोरी, फसवणूक किंवा अप्रामाणिकपणा करणे किंवा आस्थापनेच्या जागेत दुसऱ्या कामगाराच्या मालमत्तेची चोरी करणे तसेच कलम नंबर २२ (एल) प्रमाणे आस्थापनेच्या जागेत शिस्तीला व सद्वर्तनाला बाधक ठरेल असे कोणेतेही कृत्य करणे.** असे आरोप ठेवणेत आले आहे.

श्री.उपासनी यांचे विरूध्द दि.२०-१२-२००७ रोजी ठेवण्यात आलेल्या आरोप पत्रातील आरोपांची खाते चौकशी ॲडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे, कोपरगांव, चौकशी अधिकारी यांनी पुर्ण करून, त्यांचा दि.११-०५-२००९ रोजीचा खाते चौकशी निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केला आहे. त्यात त्यांनी खालील प्रमाणे निष्कर्ष काढलेला आहे.

**आदेश (निष्कर्ष)**

**श्री.मोहन एकनाथ उपासनी हे त्यांचेवर ठेवलेले आरोप शाबीत झालेले असल्याने ते दोषी आहेत. श्री.मो.ए.उपासनी यांनी स्थायी आदेश क्र.२२ (डी) व २२ (एल) चा भंग केला आहे.**

श्री.मोहन एकनाथ उपासनी यांनी यापुर्वी सेवा निवृत्त पुजारी कै.श्री.दिगंबर लक्ष्मण जाखडी यांचे शिल्लक अर्जित रजेच्या पगाराच्या टिपणी नमूद केलेल्या रक्कमेत अनाधिकाराने फेरफार दुरूस्ती व बदल केले. तसेच श्री.मोहन एकनाथ कोते हे बदलीचे ठिकाणी कामावर हजर झालेले नसतांना देखील त्यांचे मासिक पगार बिल तयार केले. या गैरशिस्त वर्तनांबाबत त्यांना अनुक्रमे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२५५१६/ १९९० दि.१७-१०-१९९० अन्वये रूपये ३१.३७/- दंड व सक्त ताकीद तसेच जा.नं. एसएसएस / वशी-७ए/ ३०८३/२००७ दि.१२-११-२००७ अन्वये लेखी समज अशा दोन वेळेस शिक्षा झालेल्या आहेत.

आरोप पत्रातील आरोप शाबीत झालेल्या अथवा दोषी आढळून आलेल्या कर्मचाऱ्यास गैरशिस्त वर्तनाबाबत दि बॉम्बे इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टॅडींग ऑर्डर्स) रूल्स १९५९ चे कलम २३ (१) अन्वये खालील प्रमाणे शिक्षा करणेची तरतुद आहे.

अ) **ताकीद** दयावी किंवा ठपका दयावा.

ब) पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट, १९३६ हयाच्या तरतुदींच्या मर्यादेत राहून आणि त्यानुसार **दंड** करावा **(एकूण वेतनाचे ३% इतका)**

क) **चार दिवसां**पेक्षा जास्त नाही इतका काळ त्याला व्यवस्थापकाच्या सहीच्या लेखी आदेशाने **सस्पेंड** करावे.

ड) नोटीशी शिवाय **बडतर्फ (डिसमिस)** करावे.

सबब, श्री.मोहन एकनाथ उपासनी, वरिष्ठ लिपीक, प्रशासन शाखा (सध्या सेवा निलंबीत) यांचे विरूध्द ठेवणेत आलेल्या आरोप पत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने व ते खाते चौकशीत दोषी आढळून आलेले असल्याने त्यांना आरोप पत्रात नमूद केलेल्या गंभीर गैरशिस्त वर्तनाबाबत उपरोक्त नमूद केलेल्या चार शिक्षेपैकी **" ड "** प्रमाणे संस्थान सेवेतुन नोटीशी शिवाय **बडतर्फ (डिसमिस)** करता येईल, असे मत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.४६५** | **श्री.मोहन एकनाथ उपासनी, वरिष्ठ लिपीक, प्रशासन शाखा (सध्या सेवा निलंबीत) यांना** |

| | |
|---|---|
| | **गैरशिस्त वर्तनाबाबत नियमाप्रमाणे "त्यांचेविरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोपांचे गांभीर्य पहाता, त्यांना संस्थानचे " सेवेतून बडतर्फ (डिसमिस ) का करण्यात येऊ नये ? याबाबतचा लेखी खुलासा दोन दिवसांचे आत व्यवस्थापनाकडे सादर करावा अन्यथा एकतर्फा निर्णय घेतला जाईल असे अशी सेकंड शोकॉज नोटीस देण्यात यावी. त्यानंतर श्री उपासनी यांनी सदर नोटीसीस मुदतीत लेखी खुलासा सादर न केल्यास अथवा श्री उपासनी यांनी दिलेला लेखी खुलासा असमाधानकारक आढळून आल्यास त्यांना उपरोक्त "ड" प्रमाणे संस्थान सेवेतून नोटीसीशिवाय बडतर्फ (डिसमिस ) करण्यात यावे असे ठरले.** |

(कार्यवाही-कामगार अधिकारी )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२ संस्थान कर्मचारी आकृतीबंधाबाबत**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठी दररोज देशाच्या कानाकोप-यातून तसेच विदेशातून लाखोंच्या संख्येने साईभक्त शिरडीत येत असतात. आलेल्या साईभक्तांना दर्शनाबरोबरच आवश्यकतेनुसार निवास प्रसादभोजन, चहा कॉफी, औषधोपचार, संरक्षण इत्यादी मूलभूत सेवा पुरविण्यात येतात. सदर सेवा उपलब्ध करणेकामी संस्थानमध्ये प्रशासन, मंदिर,निवासस्थान, प्रसादालय,संरक्षण,रुग्णालय,बांधकाम बगीचा, विद्युत पाणीपुरवठा,स्वच्छता,लेखाशाखा, खरेदी,भांडार,ध्वनीक्षेपन इत्यादी आवश्यक असे विविध विभाग कार्यरत आहेत.त्यामध्ये आवश्यक ते कर्मचारी वेळोवेळी नेमण्यात आलेले आहेत.

श्री साईबाबांच्या दर्शनासाठी येणा-या भक्तांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने संस्थानचे विविध विभागांसाठी ( श्री साईबाबा हॉस्पीटल सोडून) आवश्यक कर्मचा-यांचा आकृतीबंध मा.डॉ.ई.बी.गोंदकर मा.कार्यकारी व प्रशासकिय अधिकारी तसेच संबंधीत विभागांचे विभागप्रमुखा समवेत चर्चा करुन माहे जून-२००६ अखेर संस्थान आस्थापनेवरील कायम कर्मचारी १०३९ व रिक्त पदे -१९८९ अशा एकूण-३०२८ कर्मचा-यांचा आकृतीबंध मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. सदर आकृतीबंधास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/०५/२००७ रोजी सभेत मान्यता घेऊन जा.नं.एसएसएस/वशी-०१/९८०७/२००७ दि२९/०६/२००७ अन्वये मा. प्रधान सचिव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र मंत्रालय, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता.

०१) श्री च्या भक्तांची गर्दी विचारात घेऊन संस्थान मार्फत जमीनी खरेदी करण्यात येऊन त्यावर आता नव्याने **प्रसादालय इमारत** बांधण्यात आलेली असून त्यामध्ये अत्याधुनिक यंत्रसामुगी बसविण्यात आलेली असून श्री साईभक्तांसाठी त्यामध्ये प्रसादालय चालू करण्यात आलेले असून श्री साईभक्त त्याचा लाभ घेत आहेत. सदर प्रसादालयामध्ये दररोज हजारो साईभक्त प्रसादालय लाभ घेत आहेत.

०२) संस्थान मार्फत भक्तांच्या निवासासाठी नव्याने **द्वारावती** ४५० खोल्यांची भव्य इमारती चे बांधकाम पूर्ण झालेले असून सदर इमारत भक्तांच्या निवासासाठी चालू करण्यात आलेली आहे.

०३) संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवास चे शेजारी **१५०० खोल्यांचे** बांधकाम चालू आहे. सदरचे काम चालू असून साधारण ०१ वर्षामध्ये पूर्ण होईल असे वाटते.

०४) श्री साईबाबा संस्थान मार्फत औद्योगिक प्रशिक्षण संस्था, श्री साईबाबा कन्याविद्यामंदिर, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल, चालू असून आता श्री साईबाबा **कनिष्ठ महाविद्यालयही** शैक्षणिक सुविधा पुरविणेकामी सुरु करण्यात आलेले आहे.

०५) श्री साईबाबा सुपर स्पेशालीटी हॉस्पीटलमध्ये नव्याने **न्युरो सर्जरी ऑपरेशन थियेटर** बांधण्यात आले असून **कार्डीयाक ओ.टी ही** वाढविण्यात येत आहे. तसेच श्री साईनाथ रुग्णालयाकडे पूर्वीच्या २०० बेड ऐवजी **२४० बेड** पर्यंत संख्या वाढविण्यात आलेली आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन मा.कार्यकारी अधिकारी , मा.उपकार्यकारी अधिकारी प्रशासकिय अधिकारी, संस्थान कडे कार्यरत असलेले सर्व विभागांचे विभाग प्रमुख व त्याविभागामध्ये कार्यरत असलेले पर्यवेक्षक, वरिष्ठ-लिपीक, लिपीक-टंकलेखक तसेच इतर हुद्देवारीतील ( तांत्रिक कर्मचा-यांसह) कर्मचा-यांना विभागवाईज समक्ष बोलावून प्रत्येक विभागासाठी आवश्यक कर्मचा-यांचा सुधारित आकृतीबंध तयार करण्यात आलेला आहे.त्यात नव्याने मेकॅनिकल व फायर ॲण्ड सेफ्टी विभाग प्रस्तावीत केलेले आहेत .

नव्याने आकृतीबंध तयार करतांना सध्या वेतनश्रेणीवर असलेले कर्मचारी, रु.४५००/५५०० एकत्रित वेतन नेमणूंकीवरील कर्मचारी विचारात घेऊन आस्थापनेवर घ्यावयाचे उर्वरित पदे निश्चित करण्यात आलेली आहेत. तसेच विभागवार मागणी करण्यात आलेले वर्ग-०४ च्या पदावरील कर्मचारी आऊटसोर्स करणेबाबत प्रस्तावीत करण्यात आलेले आहेत. त्याची माहिती खालील प्रमाणे-

**<u>पूर्वीचा आकृतीबंध :-</u>**

| | | |
|---|---|---|
| अ) | १०३९ | ३०/०६/२००६ अखेर आस्थापनेवरील स्थायी कर्मचारी |
| ब) | १०५२ | ०४/१२/२००६ रोजी रु. ४५००/५५०० एकत्रित वेतनावर नेमलेले कर्मचारी |
| क) | ९३७ | रिक्त पद संख्या |

--------
३०२८ आकृतीबंधानुसार एकूण कर्मचारी **( अ+ ब+ क )**

ड) ७४५ श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी मान्य आकृतीबंध

---------
**३७७३** एकूण पदे **( अ+ ब+ क+ड)**

**<u>सुधारीत आकृतीबंध :-</u>**

**४८२६ एकूण प्रस्तावीत पदे -** यामध्ये संस्थानचे सर्व विभाग , शैक्षणिक संकुल, व साईबाबा व साईनाथ हॉस्पीटल कर्मचारी यांचा समावेश आहे.

अ) १३४२ आस्थापनेवरील स्थायी कर्मचारी (दि.३१/०३/२००९ अखेर ) श्री साईबाबा हॉस्पीटलसह

ब ) १०२६ एकत्रित वेतनावरील कर्मचारी ( रु.४५००/५५००)

क) ९४० रिक्त पैकी आस्थापनेवर भरणेची पदे

--------
३३०८ आस्थापनेवरील एकूण कर्मचारी **( अ+ ब +क )**

१६६६ कंत्राटी पध्दतीने आऊटसोर्स करावयाचे कर्मचारी

वरील आकृतीबंधातील ९४० आस्थापनेवर नेमावयाच्या आकृतीबंधापैकी काही पदे सध्याचे स्थायी संस्थान कर्मचा-यामधून पात्रतेनुसार पदोन्नतीने भरता येतील. सर्व विभागासाठी आवश्यक वर्ग-०४ ची पदे, सध्याचे वर्ग-०४ चे कर्मचारी वगळून आऊटसोर्सींगने कंत्राटी पध्दतीने भरणेत येतील असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| **निर्णय क्र.४६६** | **सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यात आली व शासनास मान्यतेसाठी सादर करावा असे ठरले.** |
|---|---|

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **श्री साईनाथ रुग्णालयाकरीता एक्स-रे-फिल्म ऑटो प्रोसेसर खरेदीकामी पुरेशा निविदा प्राप्त न झाल्याने कोटेशन मागविणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील क्ष-किरण विभागाने दि. ०९/०२/२००९ चे मागणीपत्रकान्वये सध्याचे जुने X-Ray Film Auto Processor मशिन बदली (Buyback) करुन नविन मशिन घेण्याबाबत मागणी केलेली आहे. सदरचे मशिन खरेदीकामी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०८.०३.२००९ चे सभेमध्ये रु. ६,५०,०००/- चे खर्चास व विहित पध्दतीने खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

त्यास अनुसरुन उपरोक्त खरेदीकामी दि टाईम्स ऑफ इंडीया- पुणे व मुंबई या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.०६/०४/२००९ ते दि.२५/०४/२००९ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ३ निविदा व मुंबई कार्यालयात ७ निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.२७/०४/२००९ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच सदरचे जाहिरातीबाबत अवगत करणेसाठी एकुण ६ पुरवठा धारकांना इकडील पत्र क्र. ३९०० दि. ०४/०४/२००९ अन्वये कळविण्यात आले होते. सदर खरेदीकामी शिर्डी व मुंबई कार्यालयात एकुण २ निविदांची विक्री झालेली होती त्यापैकी फक्त मे. चोक्सी इमॅजिनिंग, ठाणे यांची एकमेव सिलबंद निविदा प्राप्त झालेली आहे.

खरेदीकामी कमीतकमी तीन निविदांची आवश्यकता असते. तेंव्हा ज्या ५ कंपन्या / अधिकृत विक्रेते यांनी निविदा भरलेली नाही त्याच उर्वरीत ५ कंपन्या / अधिकृत विक्रेते यांना फेर पत्र पाठवून त्यांचेकडून कोटेशन मागविण्यास मान्यता असावी.

| **निर्णय क्र. ४६७** | **प्रस्तावाप्रमाणे फेर पत्र पाठवून कोटेशन्स मागविण्यास मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता कॅथलॅब मशिन खरेदीकामी पूरेशा निविदा प्राप्त न झाल्याने कोटेशन मागविणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात कार्डीयाक पेशन्टची संख्या जास्त प्रमाणात वाढती असल्यामुळे सध्याच्या कॅथलॅब मशिनवर जास्त काम पडत आहे, त्यामुळे सदरची मशिन देखील वारंवार बंद पडते, त्यामुळे रुग्णांची गैरसोय होऊ नये, त्यामुळे सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये असलेला Opthal O.T. हा विभाग श्री साईनाथ रुग्णालयात स्थलांतरीत करुन त्या जागेत अजून एक नविन कॅथलॅब विभाग सुरु करण्यास मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०८.०३.२००९ चे सभेमध्ये रु. ३,२५,००,०००/- चे खर्चास व विहित पध्दतीने खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

त्यास अनुसरुन उपरोक्त खरेदीकामी दि टाईम्स ऑफ इंडीया- पुणे व मुंबई या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.०६/०४/२००९ ते दि.२५/०४/२००९ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ३ निविदा व मुंबई कार्यालयात ७ निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम

मुदत दि.२७/०४/२००९ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच सदरचे जाहिरातीबाबत अवगत करणेसाठी एकुण ६ पुरवठा धारकांना इकडील पत्र क्र. ३८९७ दि. ०४/०४/२००९ अन्वये कळविण्यात आले होते. सदर खरेदीकामी शिर्डी व मुंबई कार्यालयात एकुण २ निविदांची विक्री झालेली आहे. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे दोन सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

१. मे. सिमेन्स इं.लि., मुंबई.

२. मे. शिमाडझू इं.प्रा.लि., मुंबई.

खरेदीकामी कमीतकमी तीन निविदांची आवश्यकता आहे. तेंव्हा ज्या ४ कंपन्या/अधिकृत विक्रेते यांना आपण निविदा भरणे बाबत कळविले होते त्याच उर्वरीत ४ कंपन्या/अधिकृत विक्रेते यांना फेर पत्र पाठवून त्यांचेकडून कोटेशन मागविण्यास मान्यता असावी.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.४६८** | **प्रस्तावाप्रमाणे फेर पत्र पाठवून कोटेशन्स मागविण्यास मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **संस्थान कर्मचाऱ्यांचा जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देणे बाबत**

**प्रस्ताव** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर होतो व ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतीम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व सदस्य मा. डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.मधुकर भिवाजी डोखे | के.ई.एम.हॉस्पिटल,मुंबई | १८०००.०० | १८०००.०० |
| २ | श्री.मच्छिंद्र कांशिनाथ थोरात | के.ई.एम.हॉस्पिटल,पुणे | ७८७६२.०० | -१२३८.०० |
| | | ॲडव्हॉन्स वजा रक्कम रु. | ८००००.०० | |
| | | ॲड. वजा जाता शिल्लक येणे रक्कम | -१२३८.०० | |
| ३ | सौ.सुलोचना सुनिल ताबटकर | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | १२४२.०० | १२४२.०० |
| ४ | श्री.अनिल चंद्रभान तांबे | प्रवरा हॉस्पिटल,लोणी | २५०००.०० | ००.०० |
| | | ॲडव्हॉन्स वजा रक्कम रु. | २५०००.०० | |
| | | ॲड. वजा जाता शिल्लक येणे रक्कम | ००.०० | |
| ५ | श्री.डिसोजा बासिल ॲनथनी | रुबी हॉल क्लिनिक,पुणे | १४१६२२.०० | १४१६२२.०० |
| ६ | श्री.लक्ष्मण सदाशिव चव्हाण | टाटा मेमोरियल हॉस्पिटल,मुंबई | २४५०००.०० | **-१३११९.००** |
| | | ॲडव्हॉन्स वजा रक्कम रु. | २३१८८१.०० | |
| | | ॲड. वजा जाता शिल्लक येणे रक्कम | -१३११९.०० | |
| ७ | डॉ.सौ.प्रणोती रुपेश जडगे | टाटा मेमोरियल हॉस्पिटल,मुंबई व रुबी हॉल क्लिनिक,पुणे | ३२१५८.०० | ३२१५८.०० |
| ८ | श्री.गुरुप्रसाद अरुण कापरे | बॉम्बे हॉस्पिटलला ,मुंबई | ६१८०२.०० | ६१८०२.०० |
| ९ | श्री. संजय बाबुराव कुलकर्णी | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर, पुणे | १४१००.०० | १४१००.०० |
| १० | कु. कमल भिमराज तांबे | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | ६६९६.०० | ६६९६.०० |
| ११ | श्री. इ.एन.वाघ | लाईफ लाईन हॉस्पिटल,नाशिक , (सह्याद्री स्पेशॅलिटी हॉस्पिटल) | ३२५१९.०० | २४९४४.०० |
| | | **एकुण रक्कम रु.-** | **८१३१३९.००** | **३००५६४.००** |

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.४६९ अ** | **उपरोक्त जादा वैद्यकीय बीलास मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **आय.पी.डी व ओ.पी.डी फाईल छपाईबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या रुग्णाचे ॲडमिशन करतेवेळी आय.पी.डी व तपासणी करणे करिता केसपेपर सोबत ओ.पी.डी फाईल्स दिली जाते. ॲडमिशन झालेल्या पेशंटचे रेकॉर्ड एम.आर.डी विभागामध्ये सुस्थितीत जतन करुन ठेवणेकामी फाईल छपाई करुन घेण्यात आल्या होत्या. आता खाली दर्शविल्याप्रमाणे फाईल्स छपाई करणे आहे.

| अ.नं. | फाईल्सचा प्रकार | रंग | वजन | साईज | शिल्लक साठा | आवश्यक साठा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | आय.पी.डी. फाईल | हिरवा | ११.५ | १४"x २२" | ६४८५ नग | १०,००० नग |
| ०२ | ओ.पी.डी.फाईल | निळा | ९.७ | ११-१/२ " x २० " | ४९०० नग | १५,००० नग |

उपरोक्तप्रमाणे आय.पी.डी व ओ.पी.डी च्या फाईल्स छपाईकामी अंदाजे रु. १,२५,००० /- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त आवश्यक साठ्याप्रमाणे छपाई खरेदी विभागामार्फत करुन मिळणेस तथा याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये १,२५,०००/- खर्चास मान्यता मिळणेकामी चर्चा होऊन,निर्णय होणेस्तव सविनय सादर.

| निर्णय क्र.४६९ ब | उपरोक्तप्रमाणे रुपये १,२५,०००/- खर्चास मान्यता देण्यात आली. |
|---|---|

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **सन २००९-१० वार्षिक विद्युत, पाणीपुरवठा,ध्वनीक्षेपन बांधकाम आरोग्य व बगीचा विभागासाठी साहित्य व कार्यालयीन स्टेशनरी खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** सन २००९-१० सालामध्ये संस्थानचे विदयुत, पाणीपुरवठा, ध्वनीक्षेपण, बांधकाम,बगीचा व आरोग्य विभागाचे दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक साहित्य तसेच कार्यालयीन व संगणक स्टेशनरी खरेदी करावयाची आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१. | विदयुत, पाणीपुरवठा व ध्वनीक्षेपण विभाग | रु. ९९,३१,३०२.०० |
| ०२. | आरोग्य व बगीचा विभाग | रु. १०,१६,९४०.०० |
| ०३. | बांधकाम विभाग | रु. ९,८६,७२०.०० |
| ०४. | कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरी साहित्य | रु. १७,५०,०००.०० |
| | एकुण | रु.१,३६,८४,९६२.०० |

उपरोक्तप्रमाणे सदर खरेदीस अंदाजे रु.१,३६,८४,९६२/-पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ कलम १७ मध्ये समितीचे कर्तव्ये व अधिकार दिलेले असून त्यातील पोटकलम २ (झ) तरतुदीनुसार सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद केलेले आहे. त्यानुसार वरीलप्रमाणे साहित्य खरेदीकामी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत येईल.

०१. विदयुत, पाणीपुरवठा व ध्वनीक्षेपण विभागासाठी आवश्यक असणारे इलेक्ट्रिकल, हार्डवेअर साहित्य, प्लंबींग व मेंटेनन्स साहित्यासाठी एकत्रित निविदा मागणी करणेत येईल.

०२. आरोग्य व बगीचा विभागासाठी आवश्यक असणारे साहित्य, खते, औषधे व किटकनाशके साहित्यासाठी एकत्रित निविदा मागणी करणेत येईल.

०३. बांधकाम विभागाचे खरेदीसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी असे वाटते.

अ) सन २००९-१० मध्ये मे.अल्ट्रा टेक सिमेंट लिमीटेड, पुणे कंपनीशी संपर्क साधून अस्तित्वात असलेल्या दराने किंवा आवश्यकता भासल्यास अल्ट्रा टेक, ए.सी.सी., राजश्री बिर्ला व अंबुजा सिमेंटच्या डिलरकडून कोटेशन मागवून बांधकाम विभागामार्फत खरेदी करता येईल.

ब) बांधकाम विभागासाठी आवश्यक असणारे खडी, वाळू, विटा, मुरुम इ. साहित्याचे दर सतत बदलत असल्याने वार्षिक दर कोणीही देत नाही. सबब परिसरातील पुरवठादारांकडून दर मागणी करुन किंवा अडचणीच्या वेळी अस्तित्वात असलेल्या दराने बांधकाम विभागामार्फत खरेदी करणेस तसेच इतर साहित्य खरेदी विभागामार्फत कोटेशन मागवून खरेदी करणेत येईल.

०४. कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरी साहित्य तसेच झेरॉक्स मशीनसाठी आवश्यक असणारे टोनर इंक, ओपीडी डम व डेव्हलपर हे निविदेत समाविष्ट करुन एकत्रित निविदा मागणी करणेत येईल. स्टेनशरीमध्ये श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी विभागासाठी आवश्यक असणारी कार्यालयीन व संगणक स्टेशनरीचा समावेश केलेला आहे.

उपरोक्त प्रमाणे सन २००९-१० साठी आवश्यक असणारे वार्षिक साहित्याचे खरेदीसाठी तत्वतः मान्यतेनंतर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागणी करणेत येईल. त्यानंतर संबंधितांशी मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये चर्चा तथा वाटाघाटी करुन खरेदीबाबत निर्णय घेता येईल. तसेच बांधकाम साहित्य खरेदीसाठी क्र.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करणेत येईल.

तरी वरीलप्रमाणे वार्षिक खरेदीस तत्वतः मान्यतेसाठी सादर

| निर्णय क्र.४७० | उपरोक्त प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी स्थानिक विश्वस्त समितीने पहाणी करुन खरेदीबाबत निर्णय घ्यावा, असे ठरले. |
|---|---|

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **संस्थानतर्फे सध्या चालू असलेल्या विविध बांधकामाकरीता मुदतवाढ देणे बाबत**

**प्रस्ताव-** **अ)श्री साई प्रसादालयाकरीता थर्मिक फ्ल्युईड हिटींग रुमचे बांधकाम ठेकेदार श्री. एस.पी. बोरा, कोपरगांव यांचे मूदतवाढ मागणीबाबत ...**

श्री साई प्रसादालय येथिल थर्मिक फ्ल्युईड हिटींगसाठी यंत्रणा बसविणेकामी आवश्यक रुमचे बांधकाम ठेकेदार एस.पी.बोरा, कोपरगांव यांचे मार्फत चालू आहे. सदरहू बांधकामाची मूदत दि. ०१ जानेवारी २००९ ते दि. ३१/०३/२००९ इतकी आहे. आता ठेकेदार यांनी दि. ३१/०३/२००९ चे पत्रान्वये खालील कारणांमुळे बांधकाम पूर्ण करणेसाठी विलंब झालेला आहे. त्यासाठी अडीच महिने मूदतवाढ मिळणेस विनंती केली आहे.

०१) नविन प्रसादालय येथील भांडी धुण्याची पाईपलाईन ही नियोजीत कॉलम मध्ये येत असल्यामुळे पाईपलाईन बदलून दुसऱ्या मार्गाने ठेकेदार यांचेमार्फत टाकण्यात आलेली आहे.

०२) सदर रुमचे उत्तर बाजूस बॉयलर रुमचा स्लोपींग स्लॅब तोडण्याचे काम ठेकेदार यांचे निविदेत नाही. त्यासाठी आवश्यक ब्रेकर लवकर उपलब्ध झाला नाही.

०३) विषयांकित कामासाठी आवश्यक २५ एम एम, २० एम एम स्टील बाजारात सहजरित्या उपलब्ध झालेले नाही.

०४) सदरचा स्लॅबची उंची २४ फुट इतकी आहे. तसेच यासाठी आश्यक स्टीलचे काम करणारे कुशल कामगार उपलब्ध झालेले नाही.

०५) सदरच्या स्लॅबची उंची २४ फुट इतकी असल्यामुळे स्लॅबच्या बिमचे कॉंक्रीट भरल्यानंतर सदरचे शटरींग किमान २१ दिवस ठेवणे आवश्यक आहे.

वर नमूद केलेपैकी क्र. १ ते ३ ची कारणे संयुक्तिक असून त्यामुळे कामास सुमारे ५० दिवस इतका विलंब झालेला आहे. तरी त्यापोटी ठेकेदार यांना दि. २०/०५/२००९ अखेर ५० दिवसांची मूदतवाढ देता येईल.

**ब) श्री साईनाथ रुग्णालयासाठी शेड उभारणे कामाचे ठेकेदार मे. एस.एन. गुंजेगावकर यांचे मूदतवाढ मागणीबाबत ...**

श्री साईनाथ रुग्णालयासमोर पेशंटचे नातेवाईकांना बसणेसाठी तसेच गोळ्या औषध घेणेसाठी रुग्णालयाच्या बाहेरील बाजुने शेड बनविण्याचे काम ठेकेदार मे.एस.एन. गुंजेगांवकर यांचे मार्फत प्रगतीपथावर आहे. इकडील जा.क्र. १३४५०/०८ दि. १३/०९/२००८ नुसार ठेकेदार यांना कार्यादेश देणेत आला होता. त्यानुसार ठेकेदार यांनी प्लिंथचे पेव्हींग ब्लॉक बसवणे तसेच फॅब्रीकेशन व छतासाठी पत्रे बसविण्याचे काम पूर्ण केले आहे. करारनाम्यानुसार ठेकेदार यांना सदरचे काम पूर्ण करणेसाठी दि. २८/०२/२००९ पर्यंत पाच महिन्यांची मूदत देणेत आलेली होती. ठेकेदार यांनी त्यांचे दि. २४/०४/२००९ रोजीचे पत्रान्वये सदरचे कामासाठी दि. ३० मे २००९ पर्यंत मूदतवाढ मिळणेस विनंती केली आहे.

स्ट्रक्चरल डिझाईननुसार टाटा कंपनीचे २० एम एम आणी २५ एम एम व्यासाचे एम.एस. पाईप शेडचे स्ट्रक्चर उभे करणेसाठी आवश्यक होते. सदर पाईपची मागणी कमी असल्याने ते पुरवठाधारकांकडे उपलब्ध नसतात म्हणून ते स्पेशल ऑर्डर देवून मागवावे लागले तसेच गोलानी बिल्डर्स यांचे मार्फत धर्मशाळा परिसरात रोडचे काम करण्यात येत होते. काम चालू असतांना काही दिवस मटेरीअलची ने आण करणेस अडचण झाली. तसेच निविदेतील शर्तीनुसार आवश्यक ०.६ एम एम जाडीचा पत्रा बाजारात उपलब्ध नसल्याने पत्रा मिळणेस विलंब लागला.

सदर कामापैकी ठेकेदार यांचे छतावरील पाणी काढणेसाठी गटर बसविणेचे काम बाकी आहे. तरी वरील अडचणी लक्षात घेता ठेकेदार यांना मूदतवाढ देणेस हरकत नाही.

तरी साईनाथ रुग्णालयासाठी शेड उभारणेचे कामाचे ठेकेदार मे. एस.एन. गुंजेगावकर यांना दि. १५/०५/२००९ अखेर मूदतवाढ देता येईल.

**क) श्री साई प्रसादालय येथील गॅस मॅनिफोल्ड शेडचे बांधकाम ठेकेदार रविंद्र रबर प्रॉडक्टस् ॲण्ड फॅब्रीकेशन श्रीरामपुर यांचे मूदतवाढ मागणीबाबत**

श्री साई प्रसादालयाकरीता एल.पी.जी. सिलेंडर्ससाठी मॅनिफोल्ड शेड उभारण्याचे काम इकडील कार्यादेश जा.क्र. १७४५२/०८ दि. २५/११/२००८ अन्वये रविंद्र रबर प्रॉडक्टस् ॲण्ड फॅब्रीकेशन श्रीरामपुर यांना बहाल करण्यात आले आहे. करारनाम्यानुसार ठेकेदार यांची बांधकाम पूर्ण करण्याची मूदत दि. २२/१२/२००८ ते दि. २१/०३/२००९ इतकी म्हणजेच तिन महिने इतकी होती. आज पावतो ठेकेदार यांनी फुटींग, कॉलम, प्लिंथ बिम, स्ट्रक्चर स्टिलचा सांगाडा G.I. पत्रे बसविणे इ. कामे पूर्ण केली असून प्लिंथचा वर ०.९०० मीटर उंचीचे बांधकाम करणे, ग्रिल बसविणे, आतिल व बाहेरील प्लास्टर करणे, रंगकाम करणे, रॅम्पचे काम करणे, इ कामे बाकी आहेत.

आता ठेकेदार यांनी त्यांचे दि. ३०/०४/२००९ रोजीचे पत्रान्वये असे कळविले आहे की, आमचे Civil work काम करणारे ठेकेदार यांचे लेबरच्या हलगर्जीपणामुळे सदरचे काम वेळेत पूर्ण होऊ शकले नाही, संबधित काम आम्हाला २१ मार्च पर्यंत पूर्ण करावयाचे होते. तरी कृपया आम्हाला दि. ३० एप्रिल २००९ अखेर मूदतवाढ मिळावी ही विनंती .

तरी ठेकेदार यांनी दिनांक ३०.०४.२००९ अखेर केलेल्या मुदतवाढ मागणीबाबत निर्णय होणेस विनंती

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.४७१** | **उपरोक्त प्रमाणे क्र. (अ) आणि (ब) मधिल प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे संबंधित ठेकेदारांना मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. तसे (क) मधिल काम अद्याप अपूर्ण असल्याने सदर काम पूर्ण करणेसाठी दिनांक ३१.०५.२००९ अखेर मुदतवाढीस मान्यता देणेत आली.** |

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **शिर्डी विकास योजना- आरक्षण क्र. २५,२९,३८ व ३७ चे समुचित प्राधिकरण (विकसन संस्था) शिर्डी नगरपंचायत शिर्डी ऐवजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी करणे बाबत**

**प्रस्ताव-** **(अ)** मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक नपं/बांध/कावि-५/५४/२००९, दिनांक ३० एप्रिल, २००९ रोजीचे पत्रानुसार खालीलप्रमाणे कळविलेले आहे :

". .. महाराष्ट्र नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये आ.क्र. २५,२९, ३८ व ३७ चे समुचित प्राधिकरण नगरपंचायत ऐवजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था करणेबाबत फेरबदल प्रस्ताव करणे तांत्रिकदृष्टया योग्य होईल किंवा नाही याबाबत मा. सहाय्यक संचालक, नगररचना, अहमदनगर यांचेकडे पत्र क्रमांक नप/बांध/कावि-५/१६८८/२००९, दि.२१.०२.०९ अन्वये अभिप्रायाची मागणी केलेली होती. त्याबाबतचा त्यांचेकडील जा.क्र. वि.यो.शिर्डी/कलम३७/आ.क्र. २५,२९,३८,३७/ससअ/८६५, दि.०४.०४.०९ अन्वये खालीलप्रमाणे अभिप्राय प्राप्त झालेला आहे.

०१. सदर फेरबदलाबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून आवश्यक ते लेखी संमती पत्र व बंधपत्र घेण्यात यावे.

०२. सदर आरक्षणाचा विकास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना सदर आरक्षणे मंजुर विकास योजनेमध्ये ज्या कारणासाठी प्रस्तावित केलेली आहे, त्याच कारणासाठी विकसित करणे बंधनकारक राहील.

तरी याबाबत अ.क्र.०१ बाबत लेखी संमतीपत्र व बंधपत्र देण्यात यावे, तसेच अ.क्र.०२ नुसार सदर आरक्षणे त्याच कारणासाठी विकसित करण्यात येईल, याबाबत खुलासा देण्यास विनंती आहे."

वर नमुद केलेल्या शिर्डी विकास योजनेतील आरक्षणांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

**तक्ता क्रमांक ०१**

| अ.नं. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे नांव | सर्व्हे क्रमांक | क्षेत्रफळ हेक्टर-आर | समुचित प्राधिकरण (विकसन संस्था) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | २५ | खेळाचे मैदान | ५५ पै. (सि.स.नं.८५९ ते ८६५) | ३.३३ | शिर्डी नगरपंचायत,शिर्डी |
| ०२ | २९ | खेळाचे मैदान | ५६ पै. व १११ पै. (सि.स.नं.८४२ पै, ८४३ पै.,७७१ पै.) | ०.७४ | शिर्डी नगरपंचायत,शिर्डी |
| ०३ | ३८ | खेळाचे मैदान | १४१ पै. (सि.स.नं.९५१) | १.८९ | शिर्डी नगरपंचायत,शिर्डी |
| ०४ | ३७ | प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान | १२४ पै.,१२६पै., १२५ पै., (सि.स.नं.९४० ते ९४२ पै.,९५०पै.) | ०.७८ | शिर्डी नगरपंचायत,शिर्डी |

**(ब) विषयाची पुर्वपीठीका :**

**(ब-१)** मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना इकडील पत्र क्रमांक एसएसएस/बांधकाम/१०७७८/ ०५, दिनांक १५ सप्टेंबर, २००५ रोजीचे पत्रान्वये आरक्षण क्रमांक ५, ६, २३, **२५** व ४५ बाबत भूसंपादन संस्था श्री साईबाबा संस्थान, शिर्डी करणेबाबत कळविणेत आलेले होते.

मा. व्यवस्थापन व्यवस्थापन समितीच्या दिनांक ३१ मार्च, २००७ रोजीच्या सभेत आरक्षण क्रमांक २५ बाबत निर्णय क्रमांक २६७ खालीलप्रमाणे झालेला आहे :

".. .. शिर्डी विकास योजनेमध्ये मौजे शिर्डी गांवातील आरक्षण क्रमांक २५ मध्ये, सर्व्हे नंबर ५५ पैकी (सिटी सर्व्हे नंबर ८५९ ते ८६५) ०३ हेक्टर ३३ आर हे क्षेत्र क्रिडांगणासाठी आरक्षित केलेले आहे. विकास योजनेत आरक्षण क्रमांक २५ - क्रिडांगणाची विकसन यंत्रणा शिर्डी नगरपंचायत, शिर्डी अशी दर्शविण्यात आलेली आहे. उपरोक्त बहुउद्देशीय कला-क्रिडा संकुलासाठी सदरची आरक्षित क्रिडांगणाची जागा संस्थानने विकसित करणे उचित होईल. याकामी विकसन यंत्रणा म्हणून शिर्डी नगरपंचायत, शिर्डीचे ऐवजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करणेबाबत नगरपंचायतीला विनंती करता येईल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले. "

उपरोक्त निर्णयानुसार, मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना इकडील पत्र क्रमांक एसएसएस/बांधकाम/भूसंपादन/९४२१/२००७, दिनांक १८ जुलै, २००७ रोजी आरक्षण क्रमांक २५ ची विकसन संस्था (भूसंपादन मंडळ) शिर्डी नगरपंचायत, शिर्डी या ऐवजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी असा फेरबदल करणेबाबत कार्यवाही करावी म्हणून विनंती करणेत आलेली आहे.

**(ब-२)** मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक २० मे, २००७ रोजीच्या सभेत शिर्डी विकास योजनेतील काही आरक्षणांच्या विकसन संस्थेत फेरबदल करणेकामी निर्णय क्रमांक ३७५ खालीलप्रमाणे झालेला आहे :

".. .. यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त आरक्षणांपैकी साईभक्तांच्या सोयीसुविधा उपलब्ध होईल या दृष्टीने पहिल्या टप्प्यात वाहनतळ, कॅम्पिंग ग्राऊंड, उद्याने, ट्रक टर्मिनल, क्रिडांगण ही महत्वाचे आरक्षणे संस्थानतर्फे विकसित करणेसाठी या आरक्षणांची विकसन यंत्रणा म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांची नियुक्ती होण्यासाठी प्रस्ताव शिर्डी नगरपंचायत यांचेकडेस पाठविण्यात यावा असे ठरले. "

उपरोक्त निर्णयानुसार, मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना इकडील पत्र क्रमांक एसएसएस/बांधकाम/भूसंपादन/११४१६/२००७, दिनांक २३ जुलै, २००७ रोजी एकंदरीत २१ आरक्षणांच्या विकसन संस्थेत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी ऐवजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी असा फेरबदल करणेकामी कार्यवाही करणेबाबत कळविणेत आलेले आहे. सदरहू प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक ०१ नोव्हेंबर, २००७ व दिनांक ०८ जुलै, २००८ रोजी स्मरणपत्रे पाठविण्यांत आलेली होती.

**(ब-३) परिच्छेद अ** मधील **तक्ता क्रमांक ०१** मधील अ.क्र. ०३ मध्ये नमूद केलेले आरक्षण क्रमांक ३८ - क्षेत्र १ हे ८९ आर हे क्रिडांगणासाठी आरक्षित आहे. शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडील दिनांक ०६ ऑगष्ट, २००७ रोजीच्या ना हरकत पत्रानुसार सदरहू आरक्षणातील खाली दर्शविलेल्या खातेदारांचे क्षेत्र संस्थानने खरेदी केलेले आहे :

**तक्ता क्रमांक ०२**

| अ.नं. | खातेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.संजय रामराव शेळके | १२४/११ | ०० हे ६० आर ०० चौमी |
| ०२ | श्री.विलास रंगनाथ शेळके | १२४/१२ | ०० हे ६० आर ०० चौमी |
| | | **एकूण** | **०१ हे २० आर ०० चौमी** |

थोडक्यात, आरक्षण क्रमांक ३८ - क्रिडांगण क्षेत्र ०१ हे ८९ आर पैकी फक्त ६९ आर क्षेत्र खरेदी करावयाचे / भूसंपादीत करावयाचे राहिलेले आहे.

सदरहू जमीन खरेदीच्या अनुषंगाने व संस्थानच्या शैक्षणिक संकुलासाठी जमीन उपलब्ध व्हावी या दृष्टीने मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १० जानेवारी, २००८ रोजीच्या निर्णय क्रमांक ४८ नुसार, सदरहू आरक्षण क्रमांक ३७ व आरक्षण क्रमांक ३८ च्या प्रयोजनात अंशतः बदल करणेकामी खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे :

".. .. आरक्षण क्रमांक ३७ व ३८ चे आरक्षणाच्या प्रयोजनात खालीलप्रमाणे अंशतः फेरबदल होणे आवश्यक आहे तसेच वरील दोन्ही आरक्षणाबाबत विकसन संस्था / भूसंपादन संस्था श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी असे होणे आवश्यक आहे. त्याचा तपशील :

**तक्ता क्रमांक ३**

| अ.नं. | आरक्षण क्रमांक | सध्या असलेल्या आरक्षणाच्या प्रयोजनाचा तपशील | सर्व्हे नंबर | क्षेत्र | आरक्षणाच्या प्रयोजनात करावयाचा अंशतः बदल |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ३७ | प्राथमिक शाळा व क्रिडांगण | १२४ पै (सिटीएस ९५१ पै) | ०० हे ७८ आर | **क्रिडांगण** |
| ०२ | ३८ | क्रिडांगण | १२४ पै (सिटीएस ९५१ पै) | ०१ हे ८९ आर | **शैक्षणिक संकुल** |

उपरोक्तप्रमाणे आरक्षण क्रमांक ३७ व ३८ मधील आरक्षणांच्या प्रयोजनात बदल करणेकामी तसेच सदरहू आरक्षणाची विकसन संस्था श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी असे करणेबाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. "

उपरोक्त निर्णयानुसार, मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना आरक्षण क्रमांक ३७ व ३८ च्या आरक्षण प्रयोजनात अंशतः बदल करणेकामी इकडील पत्र क्रमांक एसएसएस/बांधकाम/भूसंपादन/ १९५६६/२००७, दिनांक १२ डिसेंबर, २००७ अन्वये कार्यवाही करणेबाबत कळविणेत आलेले आहे. याकामी दिनांक २० ऑगष्ट, २००८ रोजी स्मरणपत्र पाठविण्यात आलेले होते.

**(क)** उपरोक्त परिच्छेदांतील विवेचनांस अनुसरुन, **आता,** मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील दिनांक ३० एप्रिल, २००९ रोजीच्या पत्रानुसार आरक्षण क्रमांक २५,२९,३७ व ३८ च्या समुचित प्राधिकरण (विकसन संस्था) म्हणून शिर्डी नगरपंचायत, शिर्डी ऐवजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी असा बदल करणेस अनुकूलता दर्शविलेली असून, त्याबाबत मा.सहाय्यक संचालक, नगररचना, अहमदनगर यांचेकडील दिनांक ०४ एप्रिल, २००९ रोजीच्या अभिप्रायानुसार खालील अटीबाबत संस्थानचा अभिप्राय वजा खुलासा मागितलेला आहे :

“.. .. सदर आरक्षणाचा विकास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना सदर आरक्षणे मंजुर विकास योजनेमध्ये ज्या कारणासाठी प्रस्तावित केलेली आहे, त्याच कारणासाठी विकसित करणे बंधनकारक राहील. ”

सदरहू अटीनुसर, मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १० जानेवारी, २००८ रोजीच्या सभेत आरक्षण क्रमांक ३७ व ३८ बाबत आरक्षणाच्या प्रयोजनात फेरबदल करणेकामी जो निर्णय झालेला आहे व त्या निर्णयानुसार, मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना दिनांक १२ डिसेंबर, २००७ व दिनांक २० ऑगष्ट, २००८ रोजी कळविणेत आलेले आहे, ते रद्द करणे आवश्यक राहील. तसेच सदरचा निर्णय ज्यावेळेस झाला त्यावेळेस संस्थानला फक्त आरक्षण क्रमांक ३८ मधील जागा मिळालेली होती, आता आरक्षण क्रमांक ३८ बरोबरच आरक्षण क्रमांक ३७ चे समुचित प्राधिकरण (विकसन संस्था) म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ची नेमणूक होणार आहे.

तथापि, याबाबत खालील बाबींवर मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती.

०१. आरक्षण क्रमांक २५, २९, ३८ व ३७ बाबत समुचित प्राधिकरण (विकसन संस्था) म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व्हावे म्हणून मा. व्यवस्थापन समितीच्या पूर्वीच्या विविध निर्णयानुसार मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना कळविणेत आलेले आहेच, त्यास अनुसरुन आता त्याबाबतचे विहीत नमुन्यात संमतीपत्र तथा बंधपत्र करु देणेत यावे किंवा कसे ?

आरक्षण क्रमांक २५, २९, ३८ व ३७ ही आरक्षणे ज्या प्रयोजनासाठी आरक्षित आहेत त्याच प्रयोजनासाठी संस्थानमार्फत विकसित करण्यात येतील किंवा त्याच कारणासाठी विकसित करणे संस्थानवर बंधनकारक राहील, ही अट स्वीकारावी किंवा कसे ?

०२. मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १० जानेवारी, २००८ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार आरक्षण क्रमांक ३७ व ३८ मध्ये सुचविलेला अशंतः फेरबदल मागे घेण्यात यावा किंवा कसे ?

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.४७२** | **शिर्डी विकास योजना- आरक्षण क्र. २५,२९,३८ व ३७ चे समुचित प्राधिकरण (विकसन संस्था) शिर्डी नगरपंचायत शिर्डी ऐवजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी व्हावे म्हणून मा. व्यवस्थापन समितीच्या पूर्वीच्या विविध निर्णयानुसार मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना कळविणेत आलेले आहेच, त्यास अनुसरुन आता त्याबाबतचे विहीत नमुन्यात संमतीपत्र तथा बंधपत्र करु देणेत यावे.**<br>**आरक्षण क्रमांक २५, २९, ३८ व ३७ ही आरक्षणे ज्या प्रयोजनासाठी आरक्षित आहेत त्याच प्रयोजनासाठी संस्थानमार्फत विकसित करण्यात येतील किंवा त्याच कारणासाठी विकसित करणे संस्थानवर बंधनकारक राहील, ही अट स्वीकारावी.**<br>**मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १० जानेवारी, २००८ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार आरक्षण क्रमांक ३७ व ३८ मध्ये सुचविलेला अंशतः फेरबदल मागे घेण्यात यावा** |

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **मे साई सिक्युरिटी प्रा.लि. बंगलोर यांनी देणगी दिलेले ४००० नग फोटो संस्थानमार्फत विक्री करणे बाबत.**

**प्रस्ताव-** मे.साई सिक्युरिटी प्रा.लि.,बंगलोर यांनी श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील सोन्याच्या सिंहासनासह असलेले १८.५" x २६.५" या आकारातील ४००० फोटो पाठविले आहेत सदरचे फोटो प्रती नग रु.२५/- प्रमाणे संस्थानचे विक्री काऊंटरवर विक्री करावेत विक्रीची किंमत देणगी म्हणून संस्थानमध्ये जमा करावी अशी दि.०७.०४.२००९ च्या पत्राने विनंती केली आहे.

सदर फोटोत डाव्या बाजूच्या खाबांचे आर्टवर्क करतांना खांब व्यवस्थीत सेट झालेला नाही. तथापी सदर बाब प्रथम दर्शनी लक्षात येत नाही.

देणगी आलेले ४००० फोटोंची प्रती नग रु.२५/- प्रमाणे विक्री केल्यास रु.१,००,०००/- (एक लाख) संस्थान फंडात जमा होईल.

संस्थानला वस्तुरुप देणगी आलेल्या वस्तुंची कापडकोठी विभागामार्फत विक्री करुन विक्रीतून येणारी रक्कम संस्थान फंडात जमा करण्यात येत असते.

सदर देणगी आलेले ४००० नग फोटो स्विकारणेस व प्रती रु.२५/- प्रमाणे बुकस्टॉलवर विक्री करणेस मान्यतेसाठी सादर.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.४७३** | **प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे देणगी आलेले ४००० नग फोटो स्विकारणेत येऊन त्यांची प्रती रुपये २५/-ऐवजी रुपये १५/-प्रती नग याप्रमाणे विक्री करण्यात यावी असे ठरले. तसेच याचप्रकारचे आणखी १०,००० नग फोटोची रू.१०/- प्रती नगाप्रमाणे छपाई करुन घेण्यात यावी व त्याकामी येणारे रक्कम रुपये १,००,०००/- चे खर्चास व सदरचे फोटो प्रती नग रुपये १५/- प्रमाणे विक्री करण्यास मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११ श्री साईचे सत्य चरित्र या ग्रंथाला संक्षिप्त अनुवादाचे पुस्तक तयार करणे बाबत**

**प्रस्ताव-** ले. कर्नल मु.ब.निंबाळकर (निवृत्त) यानी कै.गो.र.दाभोळकर विरचित श्री साईसच्चरित या मूळ पद्यात्मक ग्रंथाचा गद्य भाष्यानुवाद तयार केलेला होता. सदर गद्य भाष्यानुवाद श्री साईबाबा संस्थानचे श्रीसाईंचे सत्य चरित्र या ग्रंथाच्या स्वरुपात प्रकाशित केलेला आहे. श्रीसाईंचे सत्य चरित्र या ग्रंथाचा संक्षिप्त गद्य भाष्यानुवाद जनसंपर्क अधिकारी श्री.मोहन यादव यांनी तयार केला होता. सदरचा संक्षिप्त भाष्यानुवाद दररोक एक अध्याय या क्रमाने दैनिक सार्वमत या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाला होता. दैनिक सार्वमतमध्ये प्रसिध्द झालेल्या संक्षिप्त गद्य भाष्यानुवादास साईभक्तांनी व वाचकांनी भरभरुन प्रतिसाद दिलेला आहे. तसेच या लेखमालेबद्दल श्री. यादव यांना सन- २००७ चा पत्र महर्षी दा.प. आपटे पत्रकारीता पुरस्कार मिळालेला आहे.

पुणे विभागाचे माहिती आयुक्त श्री.विजय कुवळेकर हे शिर्डी येथे श्रींच्या दर्शनासाठी आले असता त्यांनी जनसंपर्क अधिकारी श्री.यादव यांना दैनिक सार्वमतमध्ये प्रसिध्द झालेलया संक्षिप्त गद्य भाष्यानुवादाचे लेख मला दया. सदर लेखमालाचे पुस्तक तयार केल्यास बाबांच्या लीला, शिकवण व तत्वज्ञान सोप्या भाषेत समजण्यास सर्वसामान्य साईभक्तांना मदत होईल. मी चांगल्या प्रकाशकाकडून त्याचे पुस्तक तयार करुन प्रकाशित करतो. मात्र याकामी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे, असे सांगितलेले आहे.

तरी श्री.कुवळेकर यांनी सांगितल्याप्रमाणे श्रीसाईंचे सत्य चरित्र या ग्रंथाच्या जनसंपर्क अधिकारी श्री. यादव यांनी केलेल्या संक्षिप्त गद्य भाष्यानुवादाचे पुस्तक तयार करुन ते प्रकाशित करणेबाबत चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.४७४** | **श्री.कुवळेकर यांचे प्रस्तावानुसार श्रीसाईंचे सत्य चरित्र या ग्रंथाच्या जनसंपर्क अधिकारी श्री. यादव यांनी केलेल्या संक्षिप्त गद्य भाष्यानुवादाचे पुस्तक तयार करुन ते त्यांचेमार्फत प्रकाशित करणेस मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये रिक्त पदे भरणे बाबत**

**प्रस्ताव-** अ) आपले औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात खालील प्रमाणे २ निदेशकाची एका प्रशैक्षणिक वर्षासाठी रु. ७५००/- व १ निदेशकाची अर्ध वेळ तत्वावर रु. ४०००/- संकलित वेतनावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा सेवा कालावधी दि. ३१/०७/२००९ रोजी संपत आहे. तसेच नियमित सेवेत असलेल्या निदेशकांपैकी एक निदेशक दि.३१/०१/२०१० रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्या पदांवर रिक्त होणा-या तारखे पासून योग्य त्या अर्हता प्राप्त उमेदवारांची नियुक्ती होणे आवश्यक आहे.

| अ. नं. | सध्या कार्यरत असलेले निदेशक | पदनाम | सेवा कालावधी संपन्याची तारीख | भरावयाची पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | श्री अक्षय राजु रोकडे | निदेशक- (कोपा) कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट | ३१/०७/२००९ | ०२ |
| २. | श्री स्वप्नील शिवाजी परदेशी (सध्या अर्धवेळ पदावर) | | | |
| ३. | श्री प्रशांत प्रभाकर सोनवणे | निदेशक- क्राफ्टमन फुड प्रॉडक्शन | | ०१ |
| ४. | श्री. एस. श्रीनिवासुलु | निदेशक- (आयटी ॲण्ड ईएसएम) इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टम मेन्टनन्स | सेवा निवृत्ती ता. २८/०१/२०१० | ०१ |

❖ **किमान शैक्षणिक पात्रता :-**

अ) व्यवसायाशी संबंधित अभियांत्रिकी शाखेतील कमीत कमी मान्यता प्राप्त विद्यापीठाची व्दितीय श्रेणीतील पदवी किंवा राज्य तंत्र शिक्षण मंडळाची पदविका किंवा त्याच व्यवसायातील समकक्ष अर्हता.

ब) संबंधित क्षेत्रातील कामाचा / शिकविण्याचा अनुभव प्रशिक्षणासह ४ वर्षे.

क) केंद्र शासनाच्या ॲडव्हान्स ट्रेनिंग इन्स्टिटयुट (CTI/ATI) मधिल निदेशक प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमातील POT (Principal of Teaching) व Trade Teaching हे किमान दोन टप्पे यशस्विरीत्या पुर्ण असणे आवश्यक.

कोपा निदेशक पदाची रु. ६५००-१०५००, आयटी ॲण्ड ईएसएम निदेशक व क्राफ्टमन फुड प्रॉडक्शन निदेशक हया पदासाठी रु. ५५००-९००० वेतनश्रेणी देय आहे. केंद्र व राज्य शासनाच्या निर्णयानुसार अशासकीय औ.प्र.केंद्रातील निदेशक कर्मचा-यासाठी शासकीय कर्मचा-यांच्या किमान २/३ वेतन देणे संस्थेवर शासन निर्णय क्र. आयटीआय-२००८/रिट/(२७/०८)/व्यशि-२ दि. ३१/०३/२००८ नुसार बंधनकारक आहे. या पदावर सुरुवातीला एका प्रशैक्षणिक वर्षासाठी नियुक्ती देऊन त्यापैकी कोपा निदेशक पदावरील उमेदवारांना रु. ११०००/- व आयटी ॲण्ड ईएसएम निदेशक व क्राफ्टमन फुड प्रॉडक्शन निदेशक यांना रु. ९०००/- दरमहा संकलित वेतन द्यावे असे मत आहे. तसेच सुरुवातीला एका प्रशैक्षणिक वर्षासाठी नियुक्ती दिली जाईल. पात्र उमेदवारांसाठी ती पुढे वाढण्याचीशक्यता आहे अशी माहिती जाहिरातीत नमुद करता येईल.

अ. क्र. १ व २ चे कोपा निदेशक पदाच्या मुलाखतीसाठी एकही उमेदवार न आल्याने संबंधीताची तात्पुरती नियुक्ती करण्यात आली आहे. पुर्णवेळ उमेदवार प्राप्त न झाल्यामुळे अ.नं. २ ची अर्धवेळ निदेशक पदी नियुक्ती करुन प्रशिक्षण पुर्ण करण्यामधील अडचण दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र हे पद पुर्ण वेळ भरणे आवश्यक आहे. तसेच वरिल अ.क्र ३ चे पद जाहिरात व मुलाखत या व्दारे भरलेले आहे.

प्रशासन शाखा, आस्थापन विभाग टिपणी क्र. १५७८४ दि.२५/१२/०७ नुसार औ.प्र.संस्थेची निदेशक मागासवर्गीय आरक्षणाची तत्कालीन रोस्टर स्थिती खालील प्रमाणे होती.

| संख्या | अ.जा. १३ टक्के | अ.ज. ०७ टक्के | वि.जा./भ.ज. ११ टक्के | वि.मा.प्र. ०२ टक्के | इ.मा.व. १९ टक्के | खुला ४८ टक्के |
|---|---|---|---|---|---|---|
| एकूण जागा ३० | ०४ | ०२ | ०३ | ०१ | ०६ | १४ |
| भरलेल्या जागा २८ | ०४ | ----- | ०३ | ----- | ०५ | १६ |
| रिक्त जागा | ----- | ०२ | ----- | ०१ | ०१ | -०२ |

**सध्या उपलब्ध असलेल्या निदेशक कर्मचा-यांची मागासवर्गीय आरक्षणाची रोस्टरची स्थिती खालीलप्रमाणे.**

| संख्या | अ.जा. १३ टक्के | अ.ज. ०७ टक्के | वि.जा./भ.ज. ११ टक्के | वि.मा.प्र. ०२ टक्के | इ.मा.व. १९ टक्के | खुला ४८ टक्के |
|---|---|---|---|---|---|---|
| एकूण जागा ३० | ०४ | ०२ | ०३ | ०१ | ०६ | १४ |
| भरलेल्या जागा २७ | ०४ | ----- | ०३ | ----- | ०५ | १५ |
| रिक्त जागा ०३ | ----- | ०२ | ----- | ०१ | ०१ | -०१ |

वरिल अ.क्र ३ चे क्राफ्टमन फुड प्रॉडक्शन निदेशक हे पद मागील वर्षी जाहिरातीमध्ये अ.जा. (एस.टी.) साठी आरक्षित दर्शविले होते. तथापी अ.जा. उमेदवार प्राप्त न झाल्यामुळे नियत क्रमानुसार व उपलब्धतेनुसार वि.मा.प्र. प्रवर्गामधुन श्री प्रशांत प्रभाकर सोनवणे यांची निवड होऊन नियुक्ती दिली आहे. आता वरिल रोस्टर तक्त्यामध्ये वि.मा.प्र. प्रवर्गासाठी एक जागा रिक्त आहे. पहिल्यांदा अ.जा. साठी जाहिरात देऊन अ.जा. उमेदवाराच्या अनुपल्बधतेमुळे वि.मा.प्र. प्रवर्गातील भरलेला उमेदवार नंतर वि.मा.प्र. प्रवर्गातील जागा निर्माण झाल्यानंतर पुर्वी भरलेला सध्याच्या निदेशकाला पुढे नियमीत वेतनावर सेवासातत्य देता येत असल्यास तसा विचार करण्यास हरकत नाही. या पदावरील श्री सोनवणे यांचे काम व वर्तणूक समाधानकारक आहे. एकूण रिक्त जागा ४ राखीवमध्ये अनुक्रमे अ.जा.२ वि.मा.प्र.१ व इ.मा.व. १ भरणे आहे. अर्ज प्राप्तीनंतर उपरोक्त प्रमाणे उपलब्ध पात्र उमेदवारांमधुन वरिल वर्गिकरण क्रमानुसार नेमणूक करता येईल. एखाद्या आरक्षित पदावर त्या संवर्गात उमेदवार उपलब्ध न झाल्यास पुढील संवर्गातुन एका प्रशैक्षणिक वर्षासाठी पुर्णतः तात्पुरती नेमणूक करता येईल.

ब) या शिवाय संस्थेमध्ये कार्यालय अधिक्षक-१, वरिष्ठ लिपीक (टिपणी सहाय्यक)-१, लेखापाल-१, कनिष्ठ लिपीक-१ ही अत्यंत आवश्यक असलेली पदे रिक्त असून ती भरणे अत्यावश्यक आहे. कारण औ.प्र.संस्था कार्यालयातील ही अत्यंत महत्वाची पदे रिक्त असल्यामुळे कार्यालयीन कामकाज सुलभरित्या पार पाडणे अत्यंत अडचणीचे झालेले आहे. परिणामी प्रशिक्षण सुरळीतपणे पार पाडणे, पालक, शासकीय कार्यालय व संस्थान प्रशासन यांचेशी वेळीच संपर्कात राहणे अत्यंत अडचणीचे झालेले आहे. अपु-या कार्यालयीन कर्मचा-यांमुळे प्राचार्यांचा प्रशिक्षणसाठी, संस्थेच्या विकासासाठी व तांत्रिक कर्मचा-यांशी ठेवावयाच्या संपर्कासाठीचा व मार्गदर्शनाचा महत्वाचा वेळ कार्यालयीन कामकाजामध्ये देणे भाग पडते. यामुळे प्रशिक्षणातल्या ब-याच बाबी राहुन जातात. तांत्रिक व शिक्षक कर्मचा-यांशी संपर्कासाठी पुरेसा वेळ न मिळाल्यामुळे त्यांच्यात अनेक गैरसमज / नाराजी निर्माण होते. त्यामुळे काहीवेळा संबंधीतांकडुन निनावी पत्र प्रशासनाकडे पाठविण्याच्या घटना घडतात. याशिवाय प्रशिक्षणार्थ्यांशी व प्रशिक्षणाशी पुरेसा संपर्क ठेवता येत नाही. या अडचणी टाळण्यासाठी तसेच संस्थेतील प्रशिक्षण कार्यक्रमाला व विकास कामाला बळकटी देण्यासाठी ही पदे भरणे अत्यंत आवश्यक आहे.

वरिलप्रमाणे अ)मधिल पदे भरतीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच ब) नुसारची रिक्त पदे भरणेबाबत मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेमतध्ये सादर करता येईल.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.४७५** | **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे उपरोक्त "अ" मधील पदे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन भरण्यात यावीत तसेच "ब" मधील पदे यथावकाश भरण्यात यावी असे ठरले.** |

(कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय/अधिक्षक,आस्थापना विभाग

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३ संस्थान संचालित कायम विनाअनुदान तत्वावरील शैक्षणिक संस्थाना शासनाकडून अनुदान मागणीसाठी प्रस्ताव करणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यसस्था शिर्डी संचलित (१) श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, शिर्डी (२) श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी (०३) श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, शिर्डी (०४) श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी, या शैक्षणिक संस्था कायम विना अनुदान तत्वावर सुरु आहेत.

| अ.नं. | संस्था | स्थापना | | सद्यस्थिती | |
|---|---|---|---|---|---|
| | | वर्ष | विद्यार्थी | वर्ष | विद्यार्थी |
| १ | साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, शिर्डी | १९८४ | ६० | २००९ | ४४० |
| २ | श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी | १९९० | १५२ | २००९ | १२६२ |
| ३ | श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, शिर्डी | १९९३ | १२८ | २००९ | ६०२ |
| ४ | श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी | २००० | २५ | २००९ | ९०१ |

कायम विना अनुदान तत्वावर सुरु असलेल्या शैक्षणिक संस्थांच्या संदर्भातील कायम हा शब्द काढण्याबाबतचे धोरण शासनाचे विचाराधीन आहे. या बाबत शासननिर्णय झाल्यास, शासनाकडून टप्प्या टप्प्याने संबंधित विना अनुदान तत्वावरील संस्थांना अनुदान उपलब्ध होईल.

शासनाकडून कायम विना अनुदान तत्वावर सुरु असलेल्या संस्थांना अनुदान देण्याबाबत निर्णय झाल्यास, या निर्णयानुसार संस्थान संचलित, वरील १ ते ४ पैकी सर्व अथवा यापैकी शासन निर्णयानुसार पात्र ठरणाऱ्या, शैक्षणिक संस्थांना शासनाकडे अनुदान मागणीसाठी प्रस्ताव सादर करता येईल.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.४७६** | **उपरोक्तकामी मा.विश्वस्त श्री रमाकान्त गणेश कर्णिक यांचे अध्यक्षतेखाली मा.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांची समिती नेमण्यात येऊन त्यांनी याकामी पाठपुरावा करावा, असे ठरले.** |

(कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय/प्राचार्या,इंग्लिश मिडीयम स्कूल/प्राचार्या,कन्या विद्या मंदिर/ प्रशासकीय अधिकारी,शै.सुकुल)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४ शैक्षणिक सत्र ऑगस्ट २००९ ते जूलै २०१० साठी प्रात्यक्षिक कच्चा माल, प्रशिक्षणार्थी स्टेशनरी कर्मचारी, प्रशिक्षणार्थी गणवेष व माहिती पुस्तकाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे नविन शैक्षणिक वर्ष ऑगष्ट २००९ पासून सुरु होत आहे, त्यासाठी प्रात्यक्षिक कच्चा माल,प्रशिक्षणार्थी स्टेशनरी, कर्मचारी नियमीत गणवेष,प्रशिक्षणार्थ्यांसाठी गणवेष व कार्यशाळा गणवेष व माहिती पुस्तिका छपाई करावे लागणार आहेत. संस्थेमार्फत प्रशिक्षणार्थ्यांना स्टेशनरी व कार्यशाळा गणवेष पुरविला जातो. प्रात्यक्षिकासाठी कच्चा माल द्यावा लागतो. संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांचे नियमीत गणवेष व शुज सॉक्स हे विद्यार्थ्यांच्या खर्चाने देण्यात येतात.

संस्थेतील व्यवसाय तुकडया एकुण प्रशिक्षणार्थी संख्या यांची माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

| अ.क्र. | व्यवसायाचे नांव | युनीट | प्रथम वर्ष व्यवसाय तुकडया | व्दितीय वर्ष व्यवसाय तुकडया | एकुण प्रशिक्षणार्थ्या संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | टुल ॲण्ड डायमेकर | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०२ | इलेक्ट्रीशियन | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०३ | मोटर मेकॅनीक | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०४ | फिटर | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०५ | मेकॅनीक आर.ए.सी. | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०६ | मशिनीष्ट ग्राईंडर | ०२ | १६ | १६ | ३२ |
| ०७ | टर्नर | ०२ | १६ | १६ | ३२ |
| ०८ | आय.टी.ॲण्ड ई.एस.एम. | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०९ | कॅम्पुटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामींग ॲसिस्टंट | ०२ | ५२ | ... | ५२ |
| १० | वेल्डर | ०२ | ३२ | ... | ३२ |
| ११ | ट्रॅक्टर मेकॅनीक | ०२ | ४२ | ... | ४२ |
| १२ | क्राप्टसमन फुड प्रॉडक्शन | ०१ | २१ | ... | २१ |
| | | | ३०५ | १५८ | एकुण -४६३ |

यामध्ये प्रशिक्षणार्थीनीची संख्या १५ ते ५० पर्यंत होऊ शकेल.

अ) प्रात्यक्षिक कच्चा माल खरेदी :-

या शैक्षणिक वर्षासाठी लागणारा प्रात्यक्षिक कच्चा माल व भांडारमध्ये शिल्लक असलेला कच्चा माल यांची पडताळणी करुन खरेदीकरीता आवश्यक असलेल्या कच्या मालाची यादी सोबत प्रपत्राने जोडलेली आहे. कच्चा माल खरेदीकामी रु. ४,२५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

ब) प्रशिक्षणार्थी स्टेशनरी खरेदी:-

| अ. क्र. | स्टेशनरी तपशिल | आवश्यक | उपलब्ध | खरेदी आवश्यक | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | जॉबशिट वही १५० पानी मॅपलिथो कागद ८० जीएसएम दोन्ही बाजुंनी पुठ्ठा बायडींग ३४X२१ से.मि. (छपाई नमुन्या प्रमाणे) | ५०० नग | १२५ नग | ३७५ नग | ८५/- | ३१८७५.०० |
| ०२ | जॉबशिट वही ५० पानी मॅपलिथो कागद ८० जीएसएम दोन्ही बाजुंनी पुठ्ठा बायडींग ३४X२१ से.मि. (छपाई नमुन्या प्रमाणे) | २०० नग | नाही | २०० नग | ४०/- | ८०००.०० |
| ०३ | थेअरी पेपर्स (१०० नगाचा ०१ पॅड) मॅपलिथो कागद ८० जीएसएम,३४X२१ से.मि. (नमुन्या प्रमाणे) | १२५० नग | २५० नग | १००० पॅड | ५०/- | ५००००.०० |
| ०४ | स्केच पेपर्स (१०० नगाचा ०१ पॅड) मॅपलिथो कागद ८० जीएसएम,३४X२१ से.मि. लेदर बायडींग (नमुन्या प्रमाणे) | ६०० नग | ... | ६०० पॅड | ५०/- | ३००००.०० |
| ०५ | दैनंदिनी छापील ७० पेजेस (नमुन्या प्रमाणे) जे.के.बॉण्ड पेपर | ५०० नग | ०५ नग | ५०० नग | ५०/- | २५०००.०० |
| ०६ | ड्रॉईंग शिट हाफ इम्पेरीयल २५ नगाचा एक सेट सनशाईन कागद | १०० सेट | ५० सेट | ५० सेट | ६०/- | ३०००.०० |
| ०७ | २ क्वायर रजिष्टर ३४X२१ से.मि. (नमुन्या प्रमाणे) | ५०० नग | २० नग | ४८० नग | ४०/- | १९२००.०० |
| ०८ | ड्रॉईंग १/४ इंपेरीयल रजिष्टर ५० शिटचे एक रजिष्टर सन शाईन कागद ५६X३६ से.मि. (कागद व छपाई नमुन्या प्रमाणे ) | ५०० नग | १६५ नग | ३३५ नग | ७०/- | २३४५०.०० |
| ०९ | CFP प्रॅक्टीकल जर्नल १०० पानी लेजर पेपर ७० जीएसएम,साईज ३४ x २१ से.मि. | १०० नग | १० नग | ९० नग | ६०/- | ५४००.०० |
| १० | सेट स्क्वेअर ओमेगा कंपनी ४५ व ६० अंश | ५०० नग | ३७० नग | १३० नग | ३०/- | ३९००.०० |
| | | | | | एकुण... | १९९८२५.०० |

क) गणवेष :- संस्थान मार्फत खरेदी :-

| अ.क. | तपशिल | संख्या | आवश्यक नग | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | शिक्षक कर्मचारी नियमीत गणवेष व दोन टाय | ३५ | ७० | १२५०/- | ८७५००.०० |
| ०२ | कार्यालय अधिक्षक/लेखापाल/भांडारपाल/वरिष्ठ/ व कनिष्ठ लिपीक नियमीत गणवेष व दोन टाय | १० | २० | १०००/- | २००००.०० |
| ०३ | शिपाई/मदतनीस कर्मचारी | १० | २० | ८००/- | १६०००.०० |
| ०४ | प्रशिक्षणार्थी कार्यशाळा गणवेष (डांगरी) | ३०५ | ३०५ | ५५०/- | १६७७५०.०० |
| ०५ | CFP प्रशिक्षणार्थी कार्यशाळा गणवेष | २१ | २१ | ६००/- | १२६००.०० |
| ०६ | COPA प्रशिक्षणार्थी कार्यशाळा गणवेष | ५२ | ५२ | २००/- | १०४००.०० |
| ०७ | मुलींसाठी अ‍ॅप्रान | ५० | ५० | २००/- | १००००.०० |
| | | | | एकुण... | ३२४२५०.०० |

यामध्ये मुलींची सख्या कमी-जास्त होउ शकते त्यामुळे वरील मुलांच्या संख्येमधुन आवश्यकतेनुसार कमी-जास्त करता येईल.

ड) माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज छपाई बाबत. :-

श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची सत्र ऑगष्ट २००९ मधील प्रवेश प्रक्रिया एस.एस.सी.चा निकाल घोषीत झालेच्या दुस-या दिवसापासुन सुरु होत असते. प्रवेशाबाबतची माहिती उमेदवारांना देणेकामी संस्थेची माहिती पुस्तिका छपाई करुन घ्यावी लागते. त्यामध्ये संस्थेमध्ये चालविले जाणारे व्यवसाय, प्रवेश पध्दती, संस्थेची नियमावली व इतर माहिती उमेदवारांना माहिती पुस्तिकेतुन दिली जाते.

महाराष्ट्र शासनाकडून आपले संस्थेला मागील आठ वर्षा पासून सतत ""अ"" दर्जा प्राप्त झालेला आहे. एकवेळ राज्यात व्दितीय तर तिन वेळा महाराष्ट्रात प्रथम क्रमांकही पटकविलेला आहे. तसेच संस्थेने केंद्र शासनाचा उत्कृष्ट संस्था पुरस्कारही जिंकला आहे. संस्थेमध्ये प्रशिक्षण कार्यक्रमासोबतच इतरही उपक्रम राबवीले जातात. यामध्ये वार्षिक स्नेहसंमेलन, वार्षिक क्रिडा स्पर्धा, विभागीय,राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय पातळीवरील कौशल्य स्पर्धा परीक्षा कार्यशाळा, विविध नामांकित कंपन्यामार्फत नोकरी व शिकाउ उमेदवारीसाठी संस्थेमध्ये कॅम्पस मुलाखतीचे आयोजन केले जाते, श्री गणेशोत्सव, खंडेनवमी उत्सव, प्रशिक्षणार्थीसाठी व्यवसाय मार्गदर्शन, Aids या विषयावर व्याख्यान इत्यादी तसेच सामाजीक कार्यामध्येही कायम सहभाग असतो. अशा प्रकारे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडून समाजासाठी हा अत्यंत

उपयुक्त उपक्रम अत्यंत प्रभावीपणे राबवीला जातो. या दृष्टीने या सर्व उपक्रमांची माहिती माहिती पुस्तिकेतुन उमेदवार व समाजापर्यंत पोहचविणे आवश्यक वाटते.

याकरीता यावर्षीच्या माहिती पुस्तिकेमध्ये वरील सर्व उपक्रमांची माहिती तसेच वेळोवेळी संकलीत केलेले फोटोग्राफ्स समाविष्ठ करुन माहिती पुस्तिका चांगल्या दर्जाची छपाई करुन घ्यावी असे मत आहे.

मागील वर्षी ३७५० माहिती पुस्तिका,प्रवेश अर्ज व प्रवेश कार्यक्रम पत्रिका हे रु.६.३५ प्रती नग या दराने छपाई करुन रु.१०/- या दराने वितरीत केली. यावर्षी चांगल्या दर्जाची माहिती पुस्तिका छपाई करुन घेतलेस अंदाजे रु.१०/- ते १५/- खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार रु.१५/- या दराने ती वितरीत करता येईल. या प्रमाणे माहिती पुस्तिका व नियमावली मागील वर्षीपेक्षा वाढीव व दर्जेदार पानांसह ५००० नग पर्यंत छपाईसाठी रु.७५०००/- खर्च अपेक्षित आहे.

इ) गणवेष व शुज विद्यार्थ्यांच्या खर्चाने खरेदी :-

| अ.क्र. | तपशिल | संख्या | आवश्यक नग | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | प्रशिक्षणार्थी नियमीत गणवेष (६१० अधिक १५८) | ७६८ | ७६८ | ५००/- | ३८४०००.०० |
| ०२ | मुलींसाठी सलवार कुर्ता (१०० अधिक ०३) | १०३ | १०३ | ४००/- | ४१२००.०० |
| ०३ | प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षणार्थीनी शुज | ३०५ | ३०५ | ५००/- | १५२५००.०० |
| | | | | एकुण | ५७७७००.०० |

यामध्ये मुलींची सख्या कमी-जास्त होउ शकते त्यामुळे वरील मुलांच्या संख्येमधुन आवश्यकतेनुसार कमी-जास्त करता येईल.

अशी वरील अ, ब, क व ड नुसार एकुण रु.१०,२४,०७५/-ची खरेदी ही न्युनतम दर असलेल्या पुरवठादाराकडून करता येईल. तसेच वरील (इ) चे प्रशिक्षणार्थ्यासाठीचे नियमीत गणवेष व शुज प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने सध्या प्रथम वर्षात शिकत असलेले परंतु ऑगष्ट २००९ पासून व्दितीय वर्षात जाणा-या तसेच ऑगष्ट २००९ पासून नव्याने प्रवेश घेणा-या प्रशिक्षणार्थ्यांनाही द्यावे लागणार असुन त्यांचेकडून त्यासाठी लागणारी रक्कम अनामत जमा घेउन ती एकत्रीतपणे " प्रशिक्षणार्थी युनीफॉर्म,शुज अनामत" या शिर्षाखाली संस्थानच्या लेखाशाखेत जमा ठेवता येईल.होणारा खर्च वजा जाता उर्वरित रक्कम संबधीतांना परत करता येईल.

| **निर्णय क्र.४७७** | **उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

(कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **बालगृह व निरीक्षण गृहातील मुलामुलींना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेशासाठी प्राधान्य व सवलत मिळणेबाबत**

**प्रस्ताव-** वरिल विषयास अनुसरुन सविनय कळविणे की, डिस्ट्रीक्ट प्रोबेशन ॲण्ड ऑफ्टर केअर असोसिएशन संचलित मुला-मुलींचे निरीक्षण गृह व बालगृह (रिमांड होम) अहमदनगर यांनी त्यांचे वरिल संदर्भित पत्राने आमचे बालगृह व निरीक्षण गृहातील मुला-मुलींना आपल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेशासाठी प्राधान्य व सवलती मिळणेबाबत विनंती केली आहे.

आमचे संस्थेतील १० ते १५ प्रवेशितांना आपले आय.टी.आय.मध्ये प्रवेश मिळाल्यास त्यांना मोफत जेवणाची व राहणेची व्यवस्था करावी व सदर बालगृहातील मुलांना त्यांचे पुनर्वसनाच्या दृष्टीने मदत करावी. आमचे संस्थेतील ५०% मुले ही तांत्रिक विषय घेऊन एस.एस.सी. (१० वी) पास होतात. शासकीय नियमानुसार तांत्रिक विषय घेऊन पास होणा-या मुला-मुलींना आय.टी.आय.मध्ये २५ % राखीव जागा आहेत.

शिर्डी संस्थान लाखो भाविकांना सवलतीच्या दरात जेवण व राहणेची व्यवस्था करते. तसेच शिर्डी शहरातील जे रहिवासी सदर सवलतीचे जेवणाचा लाभ घेऊ इच्छितात त्यांना सुध्दा संस्थान मार्फत सवलतीचे जेवण दिले आहे. तरी आमचे वस्तीगृहातील मुला-मुलींचा सहानुभुतीने विचार करुन ज्या मुला-मुलींना आपले आयटीआयमध्ये प्रवेश मिळाल्यास त्यांना मोफत राहण्याची व जेवणाची व्यवस्था करुन आपले संस्थान मानवतेच्या दृष्टीकोनातुन करीत असलेल्या अनेक समाज उपयोगी कार्यामध्ये याचाही समावेश करावा अशी विनंती त्यांनी वरिल संदर्भित पत्राने केली आहे.

शासनाच्या नियमानुसार आपले संस्थतील प्रवेश पध्दतीमध्ये बाल सुधारगृहातील विद्यार्थ्यांना १% जागा राखीव ठेवलेल्या आहेत. त्यानुसार कमाल ०३ जागा भरल्या जाऊ शकतात व त्यानुसार प्रवेश प्रक्रियेची कार्यवाही केली जाते. तसेच एस.एस.सी. (१० वी) परिक्षा तांत्रिक विषय घेऊन उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांनाही शासनाचे नियमानुसार २५% जागा आरक्षित ठेवुन प्रवेश प्रक्रिया पुर्ण केली जाते. त्यानुसार ही काही विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकतात हे सर्व आरक्षित जागांवरील प्रवेश हे गुणानुक्रमे यादी तयार करुन गुणानुक्रमे प्रवेश दिले जातात.

मुला-मुलींचे निरीक्षण गृह व बालगृह (रिमांड होम) अहमदनगर यांनी त्यांचे पत्रात १० ते १५ विद्यार्थ्यांना आपले औ.प्र.संस्थेमध्ये प्रवेश देऊन त्यांना मोफत राहणेची व जेवणाची व्यवस्था करणेची विनंती केली आहे तरी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.४७८** | **सदरहू प्रस्ताव तूर्त स्थगित करण्यात आला.** |

(कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **अतिथींचे सत्कारप्रसंगी भेट देण्यात येणाऱ्या मार्बलमुर्त्या खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांच्या दर्शनासाठी देशातुन तसेच विदेशातुन अनेक सन्माननीय व्यक्ती येतात. दिवसेंदिवस साईभक्तांची गर्दी वाढत आहे. या मान्यवर अतिथींचा संस्थानचे वतीने यथोचित सत्कार करण्यात येतो. सत्कारामध्ये मा.अध्यक्ष महोदय, उपाध्यक्ष सो., विश्वस्त अथवा कार्यकारी अधिकारी सो. यांचे सुचनेनुसार शॉल, श्रीफळ व प्रसंगी मार्बलमुर्ती देण्यात येते.

माहे एप्रिल- २००८ ते मार्च- २००९ अखेर अतिथींचे सत्काराकामी सुरेशकुमार जैन ॲण्ड कंपनी, शिर्डी यांना मार्बलमूर्ती पुरविणेबाबत पुरवठा आदेश देण्यात आला होता. दि.२७.०३.२००९ अखेर एकूण ४ नं. मूर्ती ८० नग व एकूण ५ नं. मूर्ती ४० नग एवढया मार्बलमूर्ती खरेदी करण्यात आल्या होत्या. त्यासाठी एकूण रु.३६,४००/- खर्च झालेला आहे.

तरी पुढील आर्थिक वर्ष सन- २००९-१० यासाठी अंदाजे रु.१,५०,०००/- खर्च अपेक्षित आहे. सदरील मार्बलमूर्तींची खरेदी लक्षात घेता वार्षिक मागणी करुन स्थानिक पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागविण्यात आले असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

मार्बलमूर्ती पुरवठाधारकांकडून प्राप्त झालेल्या कोटेशन्सची यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | पुरवठादाराचे नांव |
|---|---|
| ०१ | साई चैतन्य स्टोअर्स ॲण्ड कलर लॅब ,शिर्डी |
| ०२ | दिपक एम्पोरियम,शिर्डी |
| ०३ | साई ट्रेडर्स,शिर्डी |
| ०४ | सुरेशकुमार जैन ॲण्ड कंपनी,शिर्डी |

तरी वरीलप्रमाणे आलेले कोटेशन्स उघडून व दर निश्चित करुन पुरवठाधारकांस दि.३१ मार्च २०१० अखेरच्या कालावधीकरीता मार्बलमूर्ती पुरवठा करणेबाबत निर्णय होणेस व त्यासाठी होणाऱ्या खर्चास मान्यता होणेस विनंती.

**निर्णय क्र.४७९** **प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडणेत आले असता पुरवठादारांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले**

| अ.नं. | पुरवठादाराचे नांव | देऊ केलेले दर रुपये | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २ नं. मुर्ती | ३ नं. मुर्ती | ४ नं. मुर्ती | ५ नं. मुर्ती |
| ०१ | साई चैतन्य स्टोअर्स ॲण्ड कलर लॅब ,शिर्डी | ७० | ७० | १७० | ५५० |
| ०२ | दिपक एम्पोरियम,शिर्डी | १०० | १०३ | २४० | ६५० |
| ०३ | साई ट्रेडर्स,शिर्डी | ८० | ११० | १९० | ६०० |
| ०४ | सुरेशकुमार जैन ॲण्ड कंपनी,शिर्डी | ९० | १६० | २५० | -- |

**उपरोक्त तक्त्यातील साई चैतन्य स्टोअर्स ॲण्ड कलर लॅब ,शिर्डी यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना मार्बल मुर्ती पुरविणेकामी आदेश देण्यात यावा,असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,मंदिर विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **आंध्रप्रदेश पर्यटन विकास महामंडळाच्या हेलिकॉप्टर सेवेबाबत**

**प्रस्ताव-** श्री.बी.व्यंकटेशम्, व्यवस्थापकीय संचालक आंध्रप्रदेश, पर्यटन विकास महामंडळ, हैद्राबाद यांनी त्यांचे दिनांक १३.०४.२००९ रोजीच्या पत्राने, "आंध्रप्रदेश, पर्यटन विकास महामंडळ यात्रेकरुंच्या दळणवळण सोयीसाठी हैद्राबाद ते शिर्डी अशी हेलिकॉप्टर सेवा सुरु करण्याची योजना करत आहे. दररोज या सुविधेचा पंचविस यात्रेकरुना लाभ होईल अशी अपेक्षा बाळगलेली आहे. या हवाई सुविधेव्दारे येणाऱ्या २५ यात्रेकरुंना संस्थानच्या वतीने खालील प्रमाणे सुविधा उपलब्ध व्हाव्यात अशी विनंती आहे.

०१) संस्थानच्या निवास व्यवस्थेतील वातानुकुलीत खोल्या निवासासाठी मिळाव्यात.

०२) आरती-दर्शनाची व्यवस्था व्हावी.

०३) प्रसाद भोजनाची प्राधान्य क्रमाने व्यवस्था होवून प्रसाद व उदीची व्यवस्था व्हावी.

तरी या योजनेला मान्यता मिळावी हि विनंती." असे कळविलेले आहे.

या संदर्भात चौकशी विभाग, संरक्षण विभाग, मंदिर विभाग यांचे अभिप्राय मागविले असता ते खालील प्रमाणे असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१) चौकशी व निवासस्थान कार्यालयामार्फत साधारणता २५ यात्रेकरुंसाठी १२ वातानुकूलीत रुम दरारोज आंध्रप्रदेश पर्यटन विकास महामंडळाला दिल्यास संस्थानचे व्हिआयपी पाहुणे, मा.विश्वस्त यांचे पाहुणे, सरकारी अधिकारी यांना त्यांच्या मागणी प्रमाणे पुर्तता करणे शक्य होणार नाही.

०२) या हेलिकॉप्टर सेवेव्दारे येणाऱ्या यात्रेकरुनां थेट दर्शन, उदीप्रसाद देणे आदि बाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल.

०३) सदरची हेलिकॉप्टर सेवा सुरु झाल्यानंतर संस्थानच्या हेलिपॅडवर सुरक्षीतेच्या दृष्टीकोनातून व शिर्डी पोलिस स्टेशनकडुन संरक्षण विभागास प्राप्त झालेल्या पत्रानुसार तिन पाळयामध्ये सुरक्षा कर्मचारी तैनात ठेवावे लागतील. याकामी जादा सुरक्षा कर्मचारी नेमणे क्रमप्राप्त राहील. गर्दीच्या काळात, उत्सवाच्या काळात या सेवेव्दारे येणाऱ्या व्यक्तींची दर्शन व्यवस्था करणे गैरसोयीचे राहिल.

तरी याबाबत सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.४८०** | **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री बी.व्यंकटेशम्, व्यवस्थापकीय संचालक आंध्रप्रदेश, पर्यटन विकास महामंडळ, हैद्राबाद यांना हैद्राबाद ते शिर्डी अशी हेलिकॉप्टर सेवा सुरु करण्यास व त्यांनी मागणी केल्यानुसार संस्थानच्या त्या त्या वेळी प्रचलित पद्धतीनुसार गुरुवार,शनिवार, रविवार, उत्सव व गर्दीच्या दिवसा व्यतिरिक्त सुविधा शक्यतो पुरविण्यात याव्यात असे ठरले.** |

(कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **आंध्रप्रदेश पर्यटन विकास महामंडळाच्या पॅकेज टूर्सने येणाऱ्या प्रवाशांना संस्थानमार्फत सोयी सुविधा पुरविणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री बी.व्यंकटेश्वम्, व्यवस्थापकीय संचालक, आंध्रप्रदेश पर्यटन विकास महामंडळ, हैद्राबाद यांनी त्यांचे दिनांक १३.०४.२००९ रोजीच्या पत्राने, "आंध्रप्रदेश पर्यटन विकास महामंडळाकडून दररोज व साप्ताहिक पध्दतीने हैद्राबाद व इतर ठिकाणांहून ३५ बसेसव्दारे शिर्डीसाठी पॅकेज टुर्स सुरु आहे. आंध्रप्रदेश पर्यटन विकास महामंडळाकडून चालविण्यात येणा-या पॅकेज टुर्सला खाजगी बसेसपेक्षा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आंध्रप्रदेश पर्यटन विकास महामंडळ त्यांच्या बसव्दारे येणा-या यात्रेकरुंसाठी निवास, दर्शन, प्रसाद आणि भोजन व्यवस्थेची सुविधा उपलब्ध देण्याविषयी संस्थानशी करार करु इच्छित आहे. जर संस्थानने या महामंडळाशी अशा प्रकारचा व्यवहार केला तर महामंडळाच्या वतीने आंध्रप्रदेशातील सर्व माहिती व आरक्षण केंद्र आणि हॉटेल्स्‌मध्ये बाबांवर आधारीत वाड्मय ठेवण्याची सुविधा उपलब्ध करणार आहेत. महामंडळाच्या बसेसने येणा-या यात्रेकरुंसाठी खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध होणेस विनंती.

१) संस्थानच्या निवास व्यवस्थेतील २/३ कॉटच्या ३०० खोल्या देण्यात याव्यात.

२) संस्थानच्या निवासस्थानमध्ये आंध्रप्रदेश पर्यटन विकास महामंडळाच्या बसेसला वाहनतळ सुविधा पुरवावी.

३) आंध्रप्रदेश पर्यटन विकास महामंडळाचे माहिती केंद्र व आरक्षण कार्यालय यांच्यासाठी निवासस्थान विभागामध्ये जागा उपलब्ध करुन देण्यात यावी तसेच पर्यवेक्षकांची राहण्याची सुविधा करावी.

४) आंध्रप्रदेश पर्यटन विकास महामंडळाच्या बसेसच्या चालकांना विश्रांती कक्षाची सुविधा पुरविण्यात यावी.

५) आंध्रप्रदेश पर्यटन विकास महामंडळाच्या दररोज येणा-या प्रवाशांना विशेष दर्शनाची प्राधान्याने व्यवस्था व्हावी.

६) प्रवाशांसाठी प्रसाद, उदी व भोजनाची व्यवस्था व्हावी.

उपरोक्त सुविधांच्या बदल्यात आंध्रप्रदेश पर्यटन विकास महामंडळातर्फे साईबाबा संस्थानला खालीलप्रमाणे सुविधा पुरविण्यात येतील.

१) महामंडळाच्या वतीने आंध्रप्रदेशातील ३७ हॉटेल्स् व रिसोर्टस्, महामंडळाच्या १४ माहिती व आरक्षण कार्यालयामध्ये श्री साईबाबांचे वाड्मय, सीडी कॅसेट इ.ठेवणेची व्यवस्था करण्यात येईल.

०२) शिर्डीकडे येणा-या सर्व बसेसमध्ये, काऊंटर्स, ब्राऊचर्स, महामंडळातर्फे प्रकाशित करण्यात येणारे वाड्मय आदिमध्ये साईबाबा संस्थान व आंध्रप्रदेश विकास महामंडळ यांच्यामधील भागीदारीची वस्तुस्थिती दाखविण्यात येईल.

३) यासाठी साईबाबा संस्थानने प्रकाशित केलेले आवश्यक ते वाड्मय, सीडीज्, संस्थानने उपलब्ध करुन दयावे.

तरी आपणास विनंती करण्यात येते की आंध्रप्रदेश पर्यटन विकास महामंडळ आणि साईबाबा संस्थान यांच्यात हा समझोता झाला तर आंध्रप्रदेश राज्यातील विविध ठिकाणांहून शिर्डीला येणा-या यात्रेकरुंना नक्कीच फायदेशीर ठरणार आहे. तरी या प्रस्तावाचा विचार करुन याबाबतचा निर्णय कळवा," असे कळविलेले आहे.

आंध्रप्रदेश प्रमाणे गुजरात, मध्यप्रदेश आदी राज्यांच्या पर्यटन महामंडळाच्या बसेसही शिरडीत दररोज येत असतात. यासर्व महामंडळाच्या पॅकेज टुर्सना शिरडीत सध्या निवासव्यवस्थेची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे. साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेची सध्याची निवास व्यवस्था अत्यंत कमी आहे. शिरडी साई ट्रस्टच्या माध्यमातून उभारण्यात आलेला "साईआश्रम" हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अशाप्रकारच्या पॅकेज टुर्समधील प्रवाशांना रुम देणे शक्य होईल. तथापि अशा पॅकेज टुर्समार्फत येणा-या

यात्रेकरुंना प्राधान्याने दर्शन,उदीप्रसाद व भोजन व्यवस्था आदी सुविधा देणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे. तरी सदरबाबत चर्चा होवून निर्णय होणेस विनंती.

| निर्णय क्र.४८१ | **प्रस्तावात श्री बी.व्यंकटेशम्, व्यवस्थापकीय संचालक आंध्रप्रदेश, पर्यटन विकास महामंडळ, हैद्राबाद यांनी मागणी केल्यानुसार महामंडळाच्या बसेसने येणा-या यात्रेकरुंसाठी सुविधा संस्थानच्या त्या त्या वेळी प्रचलित पद्धतीनुसार गुरुवार,शनिवार, रविवार, उत्सव व गर्दीच्या दिवसा व्यतिरिक्त शक्यतो पुरविण्यात याव्यात असे ठरले.उपलब्ध करुन देण्यात याव्यात असे ठरले.** |
|---|---|

(कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सो.लि शिर्डी यांचेमार्फत चालविण्यात येणारे व्यवसायास व याकामी देण्यात आलेले गाळे व स्टॉलला मुदतवाढ देणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सो.लि.शिरडी यांचे मार्फत ११ महिन्याचे कराराने लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे ५ व्यवसाय चालविले जात आहेत. सदरचे विविध व्यवसाय समाधी मंदीर परिसर, साईप्रसाद परिसर, नविन भक्तनिवासस्थान परिसर, स्वागत कक्ष परिसर, धर्मशाळा ( २०० रुम ) परिसर, साईउद्यान व हॉस्पिटल परिसर याठिकाणी चालविले जात आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४/०५/२००८ रोजीच्या आयत्या वेळेचा विषय नं.१७, निर्णय क्रं.५४० चे निर्णयास अधिन राहून सदरचे व्यवसाय / गाळयाची मुदत दि. ०१/०६/२००५ पासून दि.३१/०५/२००९ अखेर चार वर्षाचे कालावधीसाठी दिलेली आहे. प्रत्येक वर्षी परवाना फी मध्ये १०% वाढ करुन मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर गाळयाची व व्यवसायाची मुदत दि.३१/०५/२००९ रोजी संपत असल्याने श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सो.लि.शिरडी यांनी दि.२९/०४/२००९ रोजीचे पत्राव्दारे विनंती केली की, संस्थानचे मान्यतेने संस्थानचे परिसरात चालवित असलेल्या क्लोकरुम, कारपार्किंग, प्रसाद नॉव्हेल्टी स्टोअर्स, एस.टी.डी.बुथ तसेच थंडपेय व दुग्धजन्य पदार्थ या व्यवसायाची मुदत दि.३१/०५/२००९ रोजी पुर्ण होत आहे. तरी सदर व्यवसाय संस्थेस चालविणेस पुढील पांच वर्षाकरीता मुदतवाढ मिळावी,अशी विनंती केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयास अधिन राहून श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सो.लि.शिरडी यांना जा.नं.एसएसएस/वशी-०२/१०६०५/२००८ दि.२१/०७/२००८ रोजीचे आदेशाने दि.०१/०६/२००८ ते दि.३१/०५/२००९ या कालावधीकरीता परवानगी देण्यात आलेली आहे. त्यांचेकडून याकामी खालील प्रमाणे मासिक परवाना फी आकारणी करण्यात येत आहे.

**दि.०१/०६/२००८ ते दि.३१/०५/२००९ या कालावधीची प्रत्येक व्यवसायाची मासिक परवाना फी :-**

| अ.नं. | व्यवसायाचे नांव | मासिक भाडे रुपये चौथे वर्षाकरीता | मागिल कालावधी | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | कार पार्किंग<br>अ) साईप्रसाद,<br>ब) नविन भक्तनिवासस्थान<br>क) धर्मशाळा ( २०० रुम ) | <br>रु.१९,४८९/-<br>रु.४२,८७३/-<br>रु.१०,७२०/- | <br>दि.०१/०६/२००८<br>ते<br>दि.३१/०५/२००९ | <br>०१) साईप्रसाद परिसर<br>०२) भक्तनिवास परिसर<br>०३) धर्मशाळा परिसर |
| ०२ | क्लोकरुम<br>अ) सुलभ क्लोकरुम,<br>ब) भक्तनिवासस्थान क्लोकरुम,<br>क) साईप्रसाद क्लोकरुम | <br>रु.२,५७४/-<br>**(एकत्रित फी )** | <br>दि.०१/०६/२००८<br>ते<br>दि.३१/०५/२००९ | <br>०१) सुलभ शौचालय इमारत<br>०२) भक्तनिवास मेन गेट जवळ<br>०३)जुने चौकशी कार्यालय शेजारी |
| ०३ | एस.टी.डी.बुथ<br>अ) एस.टी.डी.-०१,<br>ब) एस.टी.डी.-०२,<br>क) एस.टी.डी.-०३ | <br>रु.१,०७४/-<br>रु.१,०७४/-<br>रु.६४५/- | <br>दि.०१/०६/२००८<br>ते<br>दि.३१/०५/२००९ | <br>०१) साईप्रसाद पॉ.हाऊस समोर<br>०२) धर्मशाळा परिसर (२०० रुम)<br>०३) शांती निवास उत्तर गेट |
| ०४ | प्रसाद नॉव्हेल्टी<br>अ) नॉव्हेल्टी स्टोअर नं.०१,<br>ब) नॉव्हेल्टी स्टोअर नं.०२,<br>क) प्रसाद स्टोअर नं.-०१,<br>ड) नॉव्हेल्टी स्टोअर नं.-०३,<br>ई) प्रसाद स्टोअर नं.०२, | <br>रु.१,०७४/-<br>रु.१,०७४/-<br>रु.१,०७४/-<br>रु.१,०७४/-<br>रु.१,०७४/- | <br>दि.०१/०६/२००८<br>ते<br>दि.३१/०५/२००९ | <br>०१) भक्तनिवास डी ब्लॉक नं.३,<br>०२) भक्तनिवास डी ब्लॉक नं.२,<br>०३) भक्तनिवास डी ब्लॉक नं.४,<br>०४) धर्मशाळा ब्लॉक नं.१,<br>०५) धर्मशाळ ब्लॉक नं.२, |
| ०५ | दुध स्टॉल<br>अ) दुध स्टॉल नं.०१,<br>ब) दुध स्टॉल नं.२,<br>क) दुध स्टॉल नं.<br>ड) दुध स्टॉल नं.०४<br>इ) दुध स्टॉल नं.०५,<br>ई) दुध स्टॉल नं.०६, | <br>रु.१,०७४/-<br>रु.१,०७४/-<br>रु.८,८६०/-<br>रु.१,०७४/-<br>रु.१,०७४/-<br>रु.१,०७४/- | <br>दि.०१/०६/२००८<br>ते<br>दि.३१/०५/२००९ | <br>०१) कॅन्टीन शेजारी गाळा,<br>०२) साईप्रसाद परिसर स्टॉल<br>०३) उत्तर गेट पश्चिमेस गाळा<br>०४) भक्तिनिवास कॅन्टीन शेजारी गाळा<br>०५) स्वागत कक्ष स्टॉल<br>०६) उत्तर गेट पुर्वेस स्टॉल |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | उ) दुध स्टॉल नं.०७,<br>ऊ) दुध स्टॉल नं.०८ | रु.१,०७४/-<br>रु.१,०७४/- | | ०७) शांतिनिवास दर्शन लाईन गेट गाळा<br>०८) भक्तनिवास दर्शन लाईन (ओपन स्पेस.) |

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सो.लि.शिरडी यांना विविध व्यवसायाकामी दिलेल्या गाळयाची व स्टॉलची मुदत दि.३१/०५/२००९ रोजी पुर्ण होत आहे. याबाबतचा विचार करता तसेच सोसायटीकडून अशा सुविधा भक्तांना पुरविल्या जातात. याबाबी विचारात घेतासोसायटी यांना सदर व्यवसायास पुढील वर्षासाठी मुदतवाढ देणेस हरकत नाही. पुर्वीचेच अटी / शर्तीस अनुसरुन मागिल वर्षाचे परवाना फी मध्ये १०% वाढ करुन अशी मुदतवाढ देता येईल. सदर मुदतवाढ ३ वर्ष पावेतो देण्यास हरकत नाही. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सो.लि.शिरडी यांना देण्यात आलेल्या उपरोक्त व्यवसायाची मुदत दि.३१/०५/२००९ रोजी संपत असल्याने प्रथम वर्षी मुदत दि.०१/०६/२००९ ते दि.३१/०५/२०१० अखेर या मुदतीचे कालावधीकरीता मागील वर्षाचे प्रत्येक व्यवसायाचे गाळयाचे / स्टॉलचे परवाना फी मध्ये १०% वाढ करुन व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन लिव्ह अॅन्ड लायसेन्स तत्वावर देता येईल. तसेच पुढील प्रत्येक वर्षी परवाना फी मध्ये १०% वाढ करुन व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन तीन वर्षाकरीता उपरोक्त व्यवसायास चालविणेस मुदतवाढ देता येईल.

श्री साई संस्थान एम्प्लॉईल क्रेडीट को.ऑप सोसायटी लि.शिर्डी यांचे मार्फत चालविण्यात येणारे व्यवसायास व याकामी देण्यात आलेले गाळे व स्टॉलला मूदतवाढ देणेबाबतचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.४८२** | **यावर सविस्तर चर्चा होऊन,संस्थानने यापूर्वी भक्तनिवासस्थान इमारतीत असणाऱ्या दुकान गाळयांचा जाहिर लिलावाने विक्री केलेली आहे. त्यास संस्थानला दरमहा मिळालेली रक्कम व श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सो.लि.शिरडी हे संस्थानला देत असलेली दरमहा रक्कम याची तुलना करुन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सो.लि.शिरडी यांना प्रती गाळयासाठी दरमहा किती रक्कम आकारावी याबाबत सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे सादर करावा असे ठरले.** |

(कार्यवाही-विधी अधिकारी )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०** **एस.टी.चे तिकीट अॅडव्हान्स बुकींग स्टॉलकरीता मुदतवाढ मिळणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,अ.नगर विभागातर्फे आगार व्यवस्थापक कोपरगांव, ता.कोपरगांव जि.अ.नगर यांना लिव्ह अॅड लायसेन्स तत्त्वावर एस.टी.चे तिकीट अॅडव्हान्स बुकींगकामी स्टॉलसाठी जुने प्रसादालय परिसरात जागा साईभक्तांचे व संस्थानचे सोईच्या दृष्टिने ११ महिने मुदतीचे कालावधी करीता तात्पुरत्या वापरासाठी दिलेली आहे.

| अ.नं. | इमारतीचे नांव | गाळा/ जागाधारकांचे नांव | वापरासाठी घेण्यात येणारी फी | वापर | पूर्वीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईप्रसाद परिसर चहा कॅन्टीन कार्यालयजवळ स्टॉलकामी जागा | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अ.नगर विभाग आगार प्रमुख राज्य परिवहन कोपरगांव,ता.कोपरगांव जि.अ.नगर | एका स्टॉलसाठी दरमहा रु.५५०/- व दरमहा मीटर रिडींग प्रमाणे येणारे वीजचे बीलवेगळे आकारुन | एस.टी.चे तिकीट अॅडव्हान्स बुकींगसाठी | दि.०५/१०/२००८ ते दि.३१/०३/२००९ ६ महिने कालावधी साठी. |

उपरोक्त प्रमाणे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अ.नगर विभागातर्फे आगार प्रमुख राज्य परिवहन कोपरगांव, जि.अ.नगर यांना देण्यात आलेल्या स्टॉलसाठी जागेची मुदत दि. ३१/०३/२००९ रोजी संपत असल्याने पुढील मुदतवाढ प्रस्ताव इकडील कार्यालयास दि.१३/०५/२००९ रोजीचे पत्राने प्राप्त झालेला आहे. श्री साईबाबा संस्थानचे जुने भोजनगृहासमोर संस्थान मार्फत आरक्षण ऑफीससाठी जागा उपलब्ध करुन दिली आहे. सदरचे जागेची परवानगी दि.३१/०३/२००९ रोजी संपलेली आहे. दि.०१/०४/२००९ पासून आरक्षण कार्यालयासाठी येथून पुढे मुदतवाढ मिळावी, अशी त्यांची विनंती आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन कोपरगांव, ता.कोपरगांव जि.अ.नगर यांना दिलेल्या एका स्टॉलसाठी तात्पुरत्या वापरासाठी दिलेल्या जागेस दि.०१/०४/२००९ पासून ते दि. २८/०२/२०१० अखेर ११ महिने कालावधीकरीता लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर मुदतवाढ देता येईल.

मागिल लिव्ह अॅन्ड लायसेन्सी फी मध्ये १०% वाढ म्हणजे मासिक परवाना फी रुपये- ६०५/-( अक्षरी रुपये- सहाशे पांच ) मात्र तसेच माहे मीटर रिडींगप्रमाणे विद्युल बील वेगळे आकारुन पुर्वीचेचे अटी व शर्तीस अनुसरुन स्टॉलसाठी लिव्ह अॅन्ड लायसेन्सी तत्वावर दि.०१/०४/२००९ पासून ते दि.२८/०२/२०१० अखेर पावेतो एका स्टॉलसाठी दिलेल्या जागेस ११ महिने मुदतवाढ देणेबाबतचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

| निर्णय क्र.४८३ | प्रस्तावास मान्यता देण्यात आली. |
|---|---|

(कार्यवाही-विधी अधिकारी )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१** **श्री अजिंक्यदेव रामचंद्र गायकवाड यांना सहाय्यक शिक्षक पदावर नेमणूक व वेतनश्रेणी देणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री.अजिंक्यदेव रामचंद्र गायकवाड, यांची श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर प्राथमिक विभागाकडे शिक्षणसेवक या पदावर प्रथम जुलै-२००५ ते एप्रिल-२००६ या एका शैक्षणिक वर्षासाठी करण्यात आलेली होती. सदर शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार त्यांची पुन्हा जुन-२००६ पासून पुढे एप्रिल-२००९ अखेर तीन शैक्षणिक वर्षासाठी प्रतिमहा रु.३०००/- एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आलेली असून दि.३०/०४/२००९ अखेर सदर कालावधी संपुष्ठात आलेला आहे.

सदर पद भरतांना श्री साईबाबा कन्याविद्यामंदिर विभागाचे आकृतीबंधाचा तसेच शिक्षण सेवक नेमणूकीबाबत महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक एसएसएन १०९९/(३४०/९९) माशि-२ मंत्रालय मुंबई दि.१३ ऑक्टोबर ,२००० मधील तरतूदीं विचारात घेण्यात आलेल्या आहेत.

श्री. गायकवाड यांना शिक्षणसेवक या पदावर नेमणूक देतांना देण्यात आलेल्या अटी-शर्ती क्र.०१ नुसार तीन वर्ष पुर्ण झालेली असून त्यांना सन-२००९-१० या शैक्षणिक वर्षात सहाय्यक शिक्षक (प्राथमिक) हे पदनाम व सदर पदाची वेतनश्रेणी रु.४५००-१२५-७५०० देय होत आहे. त्यांचे काम समाधानकारक असून ते वेतनश्रेणी देण्यास पात्र आहेत. असे अभिप्राय मुख्याध्यापिका, श्री साईबाबा कन्याविद्यामंदिर यांनी दिले आहेत.

शिक्षण सेवक नेमणूंकीबाबत शासन निर्णयातील तरतूदी तसेच मुख्याध्यापिका, श्री साईबाबा कन्याविद्यामंदिर यांचे वरील अभिप्राय विचारात घेऊन श्री. अजिंक्यदेव रामचंद्र गायकवाड यांना स्कुल कोडनुसार **रु.४५००-१२५-७५००** या वेतनश्रेणी **सहाय्यक शिक्षक ( प्राथमिक )** या पदावर नेमणूक करणेस मान्यता देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

| निर्णय क्र.४८४ | प्रस्तावास मान्यता देण्यात आली. |
|---|---|

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२** **श्री अतूल एकनाथ वाघ, कंत्राटी कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) वाहन विभाग यांचे मुदतवाढीबाबत**

**प्रस्ताव-** श्री. अतुल एकनाथ वाघ, यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४८०/२००७ दि.०९/०६/२००७ अन्वये संस्थानचे वाहन विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंता( मशिनरी दुरुस्ती व देखभाल) या पदावर प्रथम एक वर्षे कालावधीसाठी प्रतिमहा रु. ७०००/-(रु. सात हजार मात्र ) एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आलेली होती. त्यानुसार ते दि.०९/०६/२००७ रोजी कामावर हजर झाले होते.

सदर एक वर्षाची नेमणूकीची मुदत संपुष्ठात आल्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०५/२००८ रोजीचे सभेतील निर्णयानुसार श्री. अतुल वाघ कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) यांची त्यांना नेमणूंकी संदर्भात देण्यात आलेल्या अटी-शर्तीस अनुसरुन जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८५८/२००८ दि.२७/०६/२००८ अन्वये दि.०९/०६/२००८ पासून पुढे एक वर्ष मुदतवाढ व प्रतिमहा एकत्रित मानधन रु.७०००/- ऐवजी रु.९०००/- असे वाढविण्यात आलेले असून त्यांची एक वर्ष मुदतवाढ दि.०८/०६/२००९ अखेर सपुष्ठात येत आहे.

श्री. अतुल एकनाथ वाघ, कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) वाहन विभाग यांनी दि.२५/०४/२००९ रोजी अर्ज करुन माझ्या कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) या पदाची मुदत दि.०८/०६/२००९ अखेर संपुष्ठात येत असून संस्थानचे बांधकाम विभाग तसेच प्रसादालय विभागाकडे माझ्याप्रमाणेच कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंता यांच्या नेमणूंका करण्यात आलेल्या असून त्यांना दरमहा एकत्रित मानधनात रु.९०००/- ऐवजी रु.११,०००/-असे वाढवून देऊन त्यांना एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढी देण्यात आलेल्या आहेत. त्यांचेप्रमाणेच मलाही एक वर्ष मुदतवाढ मिळावी तसेच एकत्रित मानधन रु.९०००/- ऐवजी रु.११,०००/- मिळावे अशी विनंती केली आहे.

श्री. अतुल एकनाथ वाघ, यांना देण्यात आलेल्या मुदतवाढीच्या कालावधी मध्ये त्यांची वर्तणूक चांगली असून ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करत आहेत. त्यांचे बाबत काहीही प्रकरणे प्रस्तावीत अथवा चालू नाहीत. तरी त्यांना संस्थान नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही. असे अभिप्राय वाहन विभाग प्रमुख व संबंधीत प्रशासकिय अधिकारी यांनी दिले आहेत.

श्री. अतुल एकनाथ वाघ, कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंता ( मशिनरी दुरुस्ती व देखभाल) वाहन विभाग यांचे अर्जातील विनंती व त्यांचे बाबत वाहन विभाग प्रमुख व प्रशासकिय अधिकारी (संबंधीत विभाग ) यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेऊन त्यांना बांधकाम विभाग व प्रसादालय विभागाकडील कंत्राटी कनिष्ठ अभियंत्याप्रमाणेच दि.०९/०६/२००९ पासून पुढे एक वर्ष मुदतवाढ व दरमहा एकत्रित मानधन रु.९०००/- ऐवजी रु.११०००/- देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

| निर्णय क्र.४८५ | प्रस्तावास मान्यता देण्यात आली. |
|---|---|

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३** **हॉस्पिटल वैद्यकीय अधिकारी/आर.एम.ओ. यांचे मुदतवाढीबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटल कडे वैद्यकिय अधिकारी व आर.एम.ओ च्या तात्पुरत्या एक वर्ष कालावधीसाठी एकत्रित मानधनावर नेमणूका करण्यात आलेल्या असून खालील त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे तारखेस एक वर्ष मुदत संपुष्टात येत आहेत.

| अ.नं. | वैद्यकिय अधिकारी नांव | नेमणूक दिनांक | एक वर्ष कलावधी संपुष्ठात आलेची तारीख | एकूण झालेली सेवा |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| ०१ | डॉ. चैतन्य गोपाल शेटे,<br>कार्डीयाक सर्जन<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | १३/०५/२००८ | १२/०५/२००९ | ०१ वर्षे |
| ०२. | डॉ. चंद्रकान्त दत्तात्रय अंदुरे<br>वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ)<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | २२/०४/२००८ | २१/०४/२००९ | ०१ वर्षे |
| ०३. | डॉ. संजीव हरीलाल वर्मा<br>वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ.)<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | २२/०४/२००८ | २१/०४/२००९ | ०१ वर्ष |
| ०४. | डॉ. दिपाली दत्तात्रय गांधले<br>वैद्यकिय अधिकारी ( स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ)<br>श्री साईनाथ हॉस्पीटल,शिरडी | २६/०५/२००८ | २५/०५/२००९ | ०१ वर्ष |
| ०५. | डॉ. मंजूशा उत्तमराव काळे<br>(आर.एम.ओ.)<br>श्री साईनाथ हॉस्पीटल शिरडी | ०७/०४/२००८ | ०६/०४/२००९ | ०१ वर्षे |

उपरोक्त अ.नं. ०१ ,०२, ०४ व ०५ वरील वैद्यकिय अधिकारी / आर.एम.ओ यांचे एक वर्षाचे कालावधीमध्ये काम व वर्तणूक समाधानकारक आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने काम करतात. त्यांचे बाबत काहीही प्रकरण प्रस्तावीत अथवा चालू नाहीत. त्यामुळे त्यांना ०१ वर्ष मुदत वाढ देण्यास हरकत नाही. तसेच अ.नं. ०३ वरील वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ) यांचेही काम समाधान कारक आहे. परंतु त्यांनी राजीनामा मंजूर होणेसाठी दि.०७/०४/२००९ रोजी एक महिनापूर्व लेखी नोटीस दिलेली आहे. असे अभिप्राय वैद्यकिय संचालक व वैद्यकिय अधिक्षीका यांनी यांनी दिले आहेत.

संबंधीतांचे बाबत वैद्यकिय संचालक व वैद्यकिय अधिक्षीका यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेऊन त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे मुदत संपुष्टात आलेल्या तारखेच्या लगतच्या तारखेपासून (कॉलम नं.०४) पुढे ०१ वर्ष मुदतवाढ देता येईल. तसेच अ.नं. ०३ वरील वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ ) यांनाही त्यांची मुदत संपुष्टात आलेल्या तारखेच्या लगतच्या तारखेपासून पुढे **दि.०६/०५/२००९** (राजीनामा मंजूरी पर्यत) अखेर पर्यंत मुदतवाढ देणेबाबतचे प्रस्तावावर विचार होणेस विनंती.

| निर्णय क्र.४८६ | प्रस्तावास मान्यता देण्यात आली. |
|---|---|

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४** **बिहार राज्यातील पुरग्रस्तांसाठी आर्थिक मदत देणेसाठी काढलेल्या डिमांड ड्राफ्टबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७३५. अन्वये ऑगस्ट २००८ मध्ये बिहार राज्यात कोसी नदीला आलेल्या प्रलयंकारी महापूरामुळे मोठयाप्रमाणावर मनुष्यहानी-प्राणहानी व वित्तहानी होऊन मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. या राष्ट्रीय आपत्तीत हानी झालेल्या, आपदग्रस्तांच्या मदतीसाठी राष्ट्रीय कर्तव्य म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या निधीतून रक्कम रुपये एक कोटी आर्थिक मदत मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, सहाय्यता निधीसाठी शासनाचे मान्यतेने देण्यात यावा असा झालेला आहे. त्यानुसार सरच्या प्रस्तावास विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. सासंवि-२००८/८९५/(८९) का.सोळा,दि.१० सप्टेंबर,२००८ अन्वये शासनाची मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा शिर्डी या बँकेचा रुपये एक कोटी रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट क्र. ०४२९३८९ दि.१५ सप्टेंबर २००८ काढलेला आहे.

मात्र सदरचा डी.डी. संबधितांना दिलेला नाही. सदरच्या डी.डी.ची मुदत (६ महीने ) दि.१४ मार्च २००९ रोजी संपणार आहे.

सदरचा डी.डी. (रुपये एक कोट) रद्द करणेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी सांगितलेले असल्यामुळे सदरचा डी.डी. रद्द करणेस मान्यता असावी ही विनंती.

| निर्णय क्र.४८७ | प्रस्तावास मान्यता देण्यात आली. |
|---|---|

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५ श्री साईनिवास अतिथीगृह रुममधील टी.व्ही.साठी टाटा डीश कनेक्शन घेणेबाबत**

**प्रस्ताव-** साईनिवास अतिथीगृह येथे उतरलेल्या साई भक्तांना टिव्हीवर बातम्या व इतर चॅनल पहाता यावे. म्हणून शिर्डी येथील साईच्छा नेटवर्क यांचे डिश कनेक्शन घेतलेले असून ते विनामुल्य आहे. परंतु पुष्कळवेळा केबलचालक हे त्यांचे प्रक्षेपण कामासाठी बंद करतात. किंवा ओव्हर हेड केबल तुटल्यास प्रक्षेपण बंद होते. याशिवाय काही वेळेस त्यांचे प्रक्षेपण पुर्ण क्षमतेने न मिळाल्याने दिसणारे चित्र हे सुस्पष्ट दिसत नाही. टिव्हीच्या स्क्रीनवर बेल्ट येतात. त्याच वेळेस भक्त टीव्ही बघत असल्यास प्रक्षेपण बंद झाल्यामुळे टीव्ही चालू नाही अगर टीव्ही खराब आहेत असा रुममधील भक्तांचा गैरसमज होतो. रुमचा चार्ज ७००/- रु. भरुन टीव्हीवर प्रक्षेपण दिसत नसल्यामुळे भक्त चिडतात, संतापून प्रसंगी वादही होतात.

अतिथीगृह रुममधील सध्या असलेले जूने नॉर्मल कॅथॅरॉड टीव्ही बदलवून त्या जागी नविन एल.सी.डी. टीव्ही बसविणार असलेने त्यावर चांगले सुस्पष्ट चित्र दिसावे यासाठी डीश कनेक्शन घेता येईल. हल्ली टाटा स्काय व एअरटेल कंपनीचे डीश कनेक्शन उपलब्ध आहे. परंतु एअरटेलवर श्री साई, सिध्दीविनायक व काशी विश्वनाथ इ.चे लाईव्ह दर्शन नसल्यामुळे तसेच डीश बसविणेचा व वायरींगचा खर्च टाटा स्कायपेक्षा जास्त येत असल्यामुळे टाटा स्काय डीश घेणे योग्य राहील. जास्तीत जास्त चायनल दिसावे तसेच चित्र सुस्पष्ट व नियमित दिसावे यासाठी टाटा स्काय डीश टीव्ही कनेक्शन घेणे आवश्यक आहे.

अतिथी गृहातील २४ रुम्स व मीटींग हॉलमध्ये १ असे एकुण २५ कनेक्शनसाठी ( इंग्रजी भाषीक नसलेले) पॅकेज घ्यावे असे मत आहे.संस्थानला डीश घेणेसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अं.नं. | डीशचे वर्णन | दर | | एकुण |
|---|---|---|---|---|
| ०१ | २५ कनेक्शनसाठी १ डीश, २५ कनेक्शनसाठी १ कंट्रोल बॉक्स, कंट्रोल ते प्रत्येक रुमपर्यंत केबल इन्सॅलेशन + इन्स्टॉलेशन वॉरंटी + सर्व्हीससह. | २५x५००/- | प्रति टीव्ही १९९९/- रु.होतात परंतु स्पेशल ऑफर म्हणुन १७९९/- रु. प्रती टीव्ही कनेक्शन देण्यास तयार आहेत. | २५x१७९९ = ४४,९७५/- |
| ०२ | शटल बॉक्स + रिमोट कंट्रोल. | २५x१४९९/- | | |
| ०३ | प्रती महिना प्रती टीव्ही साठ चायनलसाठी १२५ रु. प्रमाणे २५ रुमसाठी १ वर्षची फी | २५x१२५/-x१२ महिने | | ३७,५०० |
| | | | एकुण | ८२,४७५/- |

वरीलप्रमाणे सर्वात प्रथम ८२,४७५/- रु. टाटा स्काय कं. यांचेकडे भरावे लागतील. यात आपण २५ कनेक्शनचे एका वर्षाची फी ३७,५००/- रु. भरत आहोत. ज्या महीन्यापासून कनेक्शन चालू होईल तेव्हापासून एक वर्षापर्यंत डीश कनेक्शन चालू राहील तदनंतर कंपनीने पॅकेजचे दर वाढवीले अथवा घटवले तर त्याप्रमाणे प्रत्येक वर्षी फी भरावी लागेल. तरच कनेक्शन नियमीत चालू राहील.

तसेच डीशच्या जंक्शन बॉक्सपासून प्रत्येक रुमच्या टीव्हीपर्यंत २५ एम.एम. केसींग पट्टी संस्थानतर्फे फीट करावी लागणार आहे. त्यासाठी सुमारे ८,०००/- रुपये असे एकुण ९०,४७५/- चे पुर्णांकीत रुपये ९५,०००/- च्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

| **निर्णय क्र.४८८** | **प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

(कार्यवाही-ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२६ सैनिक आरामगृह शिर्डी यांना सीसीटीव्ही कनेक्शन देणे बाबत**

**प्रस्ताव-** शिर्डी येथील सैनीक आरामगृह प्रोजेक्टचे चेअरमन मा.श्री संजय कपूर, यांनी दि.०६एप्रील,२००९ रोजी दिलेल्या पत्रात, संस्थानचे सीसीटीव्ही कनेक्शन (चारही मंदिरांचे दर्शन व आरत्या) शिर्डी येथील सैनीक आरामगृह येथे मिळावे, अशी मागणी केलेली आहे.

संस्थानतर्फे टीव्हीव्यतीरीक्त कनेक्शन देणेकामी वायरींगसाठी ७,०००/-रू.मात्र खर्च अपेक्षीत आहे.परंतू कनेक्शन देणे ही धोरणात्मक बाब असल्याने यावर निर्णय होणेस विनंती.

| **निर्णय क्र.४८९** | **प्रस्ताव अमान्य करण्यात आला.** |
|---|---|

(कार्यवाही-ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२७ अन्नपाकीटे तयार करणेकरीता ठेकेदाराची नियुक्ती करणे बाबत**

**प्रस्ताव-** साईभक्तांना सकाळी ७.०० ते १०.०० या वेळेत अन्नपाकीटांची विक्री करणेत येत असून सदर अन्नपाकीटे तयार करणेचे काम सन २००५ पासून सौ.रोहीणी राजेंद्र कोते व्दारा श्री साईबाबा समाज विकास संस्था या बचत गटास टेंडर पध्दतीने देणेत आलेले होते. त्याची मुदत दि.३१/०३/०९ रोजी संपलेली असून सन २००९-२०१० (१ एप्रिल ०९ ते ३१ मार्च १०) या कालावधीसाठी प्रति अन्नपाकीटास ठेकेदार यांनी ००.६५+ सर्व्हीस टॅक्स याऐवजी रु.१.०० + सर्व्हीस टॅक्स मजूरी दरवाढसह मुदतवाढ मिळणेबाबत दिनांक ३१/०१/२००९ चे अर्जाव्दारे विनंती केलेली होती. त्यानूसार दरवाढसह मुदतवाढ द्यावी अगर

दि.०१/०४/२००९ पासून पुढील ०१ वर्ष कालावधीसाठी नवीन ठेकेदार नियुक्तीसाठी जाहिरात देऊन निविदा मागविणेबाबत निर्णयासाठी विषयाची टिपणी मा.व्यवस्थापन समिती दि.०८/०३/२००९ चे सभेमध्ये ठेवणेत आलेली होती. त्यावर सविस्तर चर्चा होऊन अन्नपाकीटे बनविणेकामी परिसरातील दारिद्र रेषेखालील महिला बचत गटाकडून निविदा मागविणेत येऊन निर्णय घ्यावा व निर्णय होईपर्यंत पूर्वीचे ठेकेदारास ०२ महिने मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले होते.

मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानूसार शिर्डी परिसरातील दारिद्ररेषेखालील महिला बचत गटाची माहीती घेणेकामी मा.अध्यक्षा , शिर्डी नगरपंचायत यांचे मार्गदर्शन मिळावे अशी विनंती करण्यात आलेली होती. त्यानूसार नगरपंचायत , शिर्डी यांनी दि.११/०५/२००९ चे पत्रान्वये कळविलेले आहे की , अन्नपाकीटे तयार करणेचे कामासाठी दारिद्ररेषेखालील बचत गटांची निवड करण्यासाठी सुमारे ०१ महिना जाणार आहे. त्याबाबतचा निर्णय अंदाजे ०१ महिण्यापर्यंत कळविणेत येईल.

मा.व्यवस्थापन समिती दिनांक ०८/०३/२००९ चे सभेमधील निर्णय क्रं. २१२ नूसार सध्याचे ठेकेदार यांना ०२ महिण्याची मुदतवाढ दिलेली होती. सदर मुदत दि.३१/०५/२००९ रोजी संपणार आहे. मात्र नगरपंचायत शिर्डी यांचे दि.११/०५/२००९ पत्रानूसार दि.३१/०५/२००९ नंतर लगेचच नवीन ठेकेदाराची नियुक्ती होणार नसल्यामुळे साईभक्तांना त्यापुढील कालावधीमध्ये अन्नपाकीटे विक्रीसाठी उपलब्ध करुन देणेकामी सध्याचे ठेकेदार सौ.रोहिणी राजेंद्र कोते व्दारा साईबाबा समाज विकास संस्था यांचेकडून अन्नपाकीटे तयार करुन घ्यावे लागणार आहेत.

नगरपंचायत ०१ महिन्यापर्यंत दारिद्र रेषेखालील महिला बचत गटाची नांवे कळविणार आहेत व त्यापुढे अन्नपाकीटे बनविण्याचा ठेका देणेकामी काही कालावधी जाणार आहे. त्यामुळे अन्नपाकीटे बनविणेसाठी नविन ठेकेदाराची नियुक्ती होईपर्यंत सध्याचे ठेकेदार यांनाच सध्या आहे त्याच दराने मुदतवाढ देणे क्रम प्राप्त आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे अन्नपाकीटे बनविणेसाठी नविन ठेकेदारांची नियुक्ती होईपर्यंत सध्याचे ठेकेदार सौ.रोहीणी राजेंद्र कोते द्वारा- साईबाबा समाज विकास संस्था यांना दि.०१/०६/२००९ पासून नवीन ठेकेदाराची नियुक्ती होईपर्यंत मुदतवाढ देणेबाबत निर्णय होणेस विनंती

| **निर्णय क्र.४९०** | **प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२८** **चपाती मशिनचे प्रात्यक्षिक पहाणेसाठी माऊंटअबू व नवी दिल्ली येथे जाणे बाबत**

**प्रस्ताव-** जुन्या प्रसादालयामध्ये प्रसादभोजनासाठी १००० व्यक्तींची बैठक व्यवस्था होती. याशिवाय साईबाबा भक्तनिवासस्थान व धर्मशाळा व गर्दीनूसार साईप्रसाद नं.२ पार्कींग परिसरात स्वयंसेवी भोजन व्यवस्था करणेत येत होती. त्यावेळी जुन्या प्रसादालय हॉलमध्ये चपाती व इतर ठिकाणी पु-या देण्यात येत असे. सन १९९९ पासून श्री पी.एच जोशी हे चपाती व पुरी बनविणेचे काम मनुष्यबळाकरवी करीत आहेत. नवीन श्री साई प्रसादालय सुरु होणेपूर्वी साधारणतः दर्‌रोज गर्दीनूसार सरासरी १३००० ते २२००० पर्यंत भक्त प्रसाद भोजनाचा लाभ घेत असत. जुन्या प्रसादालयामध्ये भोजन घेणारांची बैठक व्यवस्था कमी क्षमतेची असल्यामुळे चपाती ठेकेदार यांना जास्त प्रमाणात चपाती व काही प्रमाणात पुरी बनविणेस वेळ मिळत असे.

नविन श्री साई प्रसादालयामध्ये ३५०० बैठक व्यवस्थेचे नियोजन केलेले असून याशिवाय सा.भ.निवासस्थान व धर्मशाळेमध्ये स्वयंसेवी भोजन व्यवस्था केलेली आहे. बैठक व्यवस्थेच्या क्षमतेमध्ये वाढ झाल्यामुळे एका वेळेस जास्त संख्येने भक्त प्रसाद भोजन घेतात. सध्या गर्दीचे प्रमाणानूसार दर्‌रोज सरासरी ३०,००० पर्यंत भक्त प्रसादभोजनाचा लाभ घेत असतात. एका वेळी जास्त संख्येने भक्त प्रसाद भोजनासाठी बसत असल्याने त्या तुलनेत चपाती ठेकेदार यांना चपात्या बनविणेस पुरेसा वेळ मिळत नाही. चपाती बनविणारे ठराविकच कामगार आहेत. त्यामुळे चपाती ठेकेदार स्थानिक महिलाकडून पु-या तयार करुन पुरवितात. परंतू प्रसादभोजनामध्ये पुरी ऐवजी चपाती असावी अशी साईभक्त विशेषतः स्थानिक साईभक्त सुचना करतात.

गर्दीचे प्रमाणानूसार दर्‌रोज सरासरी २५ क्विंटल आटयाच्या १,२५,००० ते १,५०,००० चपात्या मनुष्यबळाकरवी करुन देणेस चपाती ठेकेदार असमर्थ ठरलेले आहे. त्यामुळे पर्यायी व्यवस्था म्हणून चांगल्या प्रकाराच्या चपात्या बनविणारे मशिन असणे गरजेचे झालेले आहे. यापूर्वी अ.नगर , बेंगलोर , हैद्राबाद येथे चपाती मशिनची पहाणी करण्यात आलेली आहे. मात्र चांगल्या दर्जाच्या चपाती तयार करणारे मशिन आढळलेले नाही. सध्या सनशाईन कं. , नोएडा यांनी एक मशिन प्रात्यक्षिक दाखविणेकामी आणलेले आहे. सदर मशिन ०८ दिवसापासून चालू आहे. दर्‌रोज सुमारे १०० ते १२५ किलो आटयाच्या चपात्या तयार करीत आहे. चपात्या ठिक आहेत. त्या मशिनची चपात्या बनविण्याची ताशी क्षमता ७००-७५० एवढीच आहे. सदर मशिन संपूर्ण स्वयंचलित नाही. गर्दीचे प्रमाणानूसार या क्षमतेचे २०-२५ मशिन्स घ्यावे लागतील मात्र तसे करणे मेन्टन्नंसचे दृष्टीने अडचणीचे ठरेल.

मा.ना.श्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी माऊंट अबू येथे प्रजापिता ब्रम्हाकुमारी आश्रमामध्ये स्वयंचलित मशिन पाहिलेले असून ते मशिन पाहुन येणेबाबत सुचना केलेली आहे. तसेच दिनांक ०४/०५/२००९ रोजी रघू मार्केटिंग , नवी दिल्ली यांचे प्रतिनिधी येऊन गेलेत त्यांनी त्यांचेकडील चपाती मशिनचे शिरडी येथे प्रात्यक्षिक दाखविणेबाबत पत्र दिलेले आहे. परंतू माऊंट अबू येथील चपाती मशिन व नवी दिल्ली येथे अपारंपारिक ऊर्जा मंत्रालय येथे निमंत्रण देणेकामी जाणेचे प्रस्तावित असल्याने त्यावेळेस मे.रघू मार्केटिंग यांचेकडील चपाती पाहुन घेणे योग्य होईल.

सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उद्घाटन सोहळा निश्चीत झालेनंतर स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य विमानाने व अधिकारी रेल्वे अथवा संस्थान वाहनाने माऊंट अबू व दिल्ली येथे चपाती मशिनचे प्रात्यक्षिक व उद्घाटन सोहळयास हजर रहाणेकामी निमंत्रण देणेसाठी व अनुदानबाबत माहीती घेणेसाठी जाणेबाबत दिनांक ०९/०५/२००९ रोजी मा.श्रीमती उर्मिला जाधव , व्यवस्थापन समिती सदस्या यांनी सुचविलेले आहे.

तरी चपाती मशिनचे प्रात्यक्षिक पहाणेसाठी माऊंट अबू व नवी दिल्ली येथे जाणेबाबत निर्णय होणेस विनंती.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.४९१** | **प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२९** **सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उद्घाटन सोहळयाचे स्वरुप व तारीख निश्चित करणे तसेच अपारंपारिक उर्जा मंत्रालय, अधिकारी नवी दिल्ली व पुणे यांना निमंत्रीत करणे बाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती दिनांक २४/०५/२००८ चे सभेतील निर्णय क्रं. ४१८ अन्वये साईभक्तांसाठी प्रसादभोजन बनविणेकामी सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उभारणीचे काम मे. गढीया सोलर एनर्जी सिस्टीम प्रा.लि., वलसाड (गुजरात) यांना देणेत आलेले होते. त्यानूसार गढीया सोलर एनर्जी सिस्टीम प्रा.लि. यांनी सोलर स्टीम कुकींग यंत्रणेचे काम नुकतेच पुर्ण केलेले आहे.

उपरोक्तप्रमाणे सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उभारणीकामी निविदा मागविणे , तांत्रिक बाबींवर चर्चा, यंत्रणेची क्षमता, दर्जा , निश्चीत करणेसाठी अपारंपारीक उर्जा मंत्रालय नवी दिल्ली व पुणे विद्यापीठातील खालील अधिका-यांनी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन व सल्ला दिलेला आहे.

०१) मा.श्री सुब्रम्हण्यम , चिफ सेक्रेटरी , नवी दिल्ली
०२) मा.श्री अजीत गुप्ता, ॲडव्हायझर , नवी दिल्ली
०३) मा.श्री टी.सी. त्रिपाठी , प्रिसींपल सायंटिस्ट , नवी दिल्ली
०४) मा.श्री दिलीप निगम , प्रिसींपल सायंटिस्ट , नवी दिल्ली
०५) मा.श्री एम.जी. ताकवले , माजी कुलगूरु शिवाजी विद्यापीठ , पुणे
०६) मा.श्रीमती ए.एम.पाठक , पुणे

सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उभारणीचे काम पुर्ण झालेले असून सोलर स्टीमचा वापर प्रसादालयातील अन्न शिजविणेकामी चालू झालेला आहे. श्री साई प्रसादालयामध्ये उभारण्यात आलेली सोलर स्टीम कुकींग यंत्रणा अशिया खंडातील सर्वात मोठी आहे. सदर यंत्रणा उभारणीमुळे श्री साईबाबा संस्थान शिर्डी कडून पर्यावरणातील कार्बनडाय ऑक्साइडचे प्रमाण कमी करणेचे मोठे कार्य झालेले आहे याशिवाय एल.पी. गॅसची सुध्दा बचत करणेचे उद्दिष्ट ठेवून सोलर स्टीम कुकींग यंत्रणेची उभारणी केलेली आहे. सदर कार्यास प्रसिध्दी मिळावी म्हणून सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उद्घाटन सोहळा आयोजीत करणे गरजेचे आहे त्यादृष्टीने उद्घाटन सोहळयाचे स्वरुप व तारीख निश्चीत होणे आवश्यक आहे. सदर उद्घाटन सोहळा निश्चीत झाल्यानंतर उभारणीकामी ज्या मान्यवरांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभलेले आहे व सरकारी अनुदान मिळणेकामी सहकार्य लाभणार आहे. अशा सर्व मान्यवरांना यंत्रणेच्या उद्घाटन सोहळयाप्रसंगी निमंत्रीत करणे योग्य ठरेल.

उपरोक्त सर्व अधिका-यांना सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उद्घाटन सोहळयासाठी निमंत्रण देणेकामी मा.व्यवस्थापन समिती स्थानिक सदस्य यांना विमानाने नवी दिल्ली येथे जावे लागणार आहे.

तरी सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उद्घाटन सोहळा नियोजन व तारीख निश्चीत करणे तसेच अपारंपारीक उर्जा मंत्रालय , नवी दिल्ली व पुणे येथील अधिका-यांना निमंत्रित करणेसाठी मा.व्यवस्थापन समिती सदस्य यांना विमानाने , नवी दिल्ली येथे जाणेबाबत निर्णय होणेस विनंती.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.४९२** | **प्रस्तावावर चर्चा होऊन, सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उद्घाटन सोहळा नियोजन व तारीख नंतर निश्चित करण्यात यावी असे ठरले.** |

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३०** **ISO-9001 मानांकन प्राप्त करणेबाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीने साईभक्तांचे सोईसाठी अनेक उत्कृष्ठ प्रकल्प उभारणीचे काम केलेले असून त्याव्दारे साईभक्तांना चांगल्या प्रतीची सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तथापि सेवा पुरवितांना त्यामध्ये सेवाभाव, कार्यतत्परता, व गुणवत्ता राखणे जरुरीचे असते. त्याचा दर्जा राखण्यासाठी कर्तव्यामध्ये सातत्य ठेवणे गरजेचे असते. सदरील कार्यतत्परता व गुणवत्ता सातत्याने राखण्यासाठी **ISO-9001** चे मानांकन घेणे गरजेचे आहे.

श्री सी. केशव मुर्ती, बेंगलोर हे नियमीतपणे श्री साईचे दर्शनासाठी येत असतात. एप्रिल २००९ मध्ये श्रीं चे दर्शनासाठी आलेले असता, नविन श्री साई प्रसादालयामध्ये प्रसादभोजनाचा लाभ घेतला व त्यांनी संपुर्ण श्री साई प्रसादालयाची पहाणी केली. प्रसादालयाची पहाणी केल्यानंतर कार्यालयात आले व त्यांनी सांगितले की, श्री साई प्रसादालयाची इमारत व देण्यात येणारी सेवा अद्ययावत पध्दतीची असून **ISO-9001** मानांकन मिळण्यास पात्र आहे. त्यानूसार त्यांनी दि.०६/०४/२००९ चे पत्रामध्ये श्री साई प्रसादालयास **ISO-9001** मानांकन मिळवून देण्याची इच्छा व्यक्त केलेली आहे. तसेच दि.०६/०५/०९ चे पत्रामध्ये संपूर्ण संस्थानला **ISO-9001** चे मानांकन मिळवून देण्याची इच्छा प्रदर्शित केलेली आहे.

श्री.सी.केशव मुर्ती,बेंगलोर यांचे दि.०६/०४/०९ चे पत्रानूसार सध्या श्री साई प्रसादालय, लेखाशाखा व श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था या विभागास प्राधान्याने **ISO-9001** चे मानांकन प्राप्त करुन घ्यावे असे वाटते. या ०३ विभागांना **ISO-9001** चे मानांकन प्राप्त झाल्यानंतर उर्वरीत विभागांचा **ISO-9001** चे मानांकन मिळणेसाठी यथावकाश विचार करता येईल.

श्री.मुर्ती व त्याचे सल्लागार उपरोक्तकामी साधारणतः दर २१ दिवसांनी शिरडी येणार आहेत. त्यावेळी त्यांना निवास, भोजन, व संस्थान परिसरात वाहनांची सोय विनामुल्य उपलब्ध करुन देणेबाबत विचार होणे गरजेचे आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री सी. केशव मुर्ती, बेंगलोर यांना प्रथम श्री साईप्रसादालय, लेखाशाखा व श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था या विभागास **ISO-9001** चे मानांकन मिळवून देणेस परवानगी देणेस तसेच श्री मुर्ती यांना निवास, भोजन व संस्थान परिसरात वाहनाची सोय उपलब्ध करुन देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.४९३** | **प्रस्तावास मान्यता देण्यात आली तसेच ISO-9001 चे मानांकन मिळविण्यासाठी प्रसादालयातील प्रत्येक कर्मचाऱ्याला (कायम व कंत्राटी) त्यांच्या वर्गवारीनुसार युनिफॉर्म, टोपी, मास्क,ग्लोज, ॲप्रन देण्यात यावेत, याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३१** **श्री साईबाबा हॉस्पिटल येथील न्युरो ओ.टी. मध्ये ॲल्यूमिनियम पार्टीशन तसेच स्लायडींग दरवाजे खिडक्या तयार करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटल येथे नविन न्युरो ओ.टी. तयार करण्यात आलेली असून सदर ओ.टी. मध्ये दोन स्लायडींग ॲल्युमिनीअम दरवाजे, दोन स्लायडींग ॲल्यु. खिडकी आणी ॲल्युमिनीअम पार्टीशन तयार करुन देणेबाबत मा. वैद्यकिय संचालक यांनी इकडेस कळविले आहे. त्यानुसार इकडील विभागामार्फत पहाणी केली असून मोजमापे घेतली आहेत. त्यानुसार याकामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | तपशिल | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ॲल्युमिनीअम स्लायडींग दरवाजे तयार करणे | ७० | चौ.फुट | २४५/- | १७,१५०.०० |
| ०२ | ॲल्युमिनीअम स्लायडींग खिडक्या तयार करणे | २७ | चौ.फुट | २१०/- | ५,६७०.०० |
| ०३ | ॲल्युमिनीअम पार्टीशन तयार करणे | ७० | चौ.फुट | २१०/- | १४,७००.०० |
| | | | | एकूण रुपये | ३७,५२०.०० |
| | | | | अधिक १२.५०% व्हॅट | ४,६९०.०० |
| | | | | एकूण रुपये | ४२,२१०.०० |

तरी उपरोक्त ॲल्युमिनीअम पार्टीशनचे काम करणेसाठी स्थानिक पुरवठाधारक यांचेकडून कोटेशन मागविणेस व याकामी रुपये ४२,३००.०० मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.४९४** | **प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३२** **श्री साईप्रसादालय इमारतीकरीता मेन्टेनन्स ब्लॉकचे बांधकाम करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालय इमारत साईभक्तांसाठी प्रसाद भोजन घेणेकरीता सुरु करणेत आली आहे. प्रसादालयाचा परिसर मोठा असल्याने परिसरातील बांधकाम, विद्युत, पाणीपुरवठा, स्वच्छता, मशिनरी, दुरुस्त इ. विभागांमार्फत दैनंदिन दुरुस्ती देखभालीची कामे करावी लागतात. याकामासाठी मंदिर परिसरातून कर्मचाऱ्यांना जावे लागते तसेच प्रत्येक वेळी मटेरीअल घेवून येणे-जाणेसाठी बरेच श्रम व वेळही वाया जातो. दुरुस्ती देखभालीसाठी कर्मचाऱ्यांना काम करणेकरीता तसेच दुरुस्ती देखभालीचे साहित्य ठेवण्यासाठी प्रसादालय परिसरात जागेची आवश्यकता आहे. याकारीता सुमारे २२५०.००

चौ.फुटाचे एक मजला असलेले स्वतंत्र्य आर.सी.सी. स्ट्रक्चर असलेले मन्टेन्स ब्लॉकचे बांधकाम करता येईल. याकामी सुमारे २०,२५,०००.०० मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावास तसेच वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

| निर्णय क्र.४९५ | प्रस्तावास मान्यता देण्यात आली. |
|---|---|

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३३** **नवीन भक्तनिवासस्थान इमारतीत कृषीमाहिती केंद्रासाठी महात्मा फूले कृषी विद्यापीठ यांना गाळा देणेबाबत**

**प्रस्ताव-** **१)** श्री साईबाबा संस्थानचे नविन भक्तनिवासस्थान पाचशे रुम इमारतीतील गाळा नं. ११ डी बाहेरील बाजुचा गाळा माहात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी माहीती केंद्र चालविणेसाठी लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर ११ महिने कालावधीसाठी दरमहा मासिक फी रु. ६०५/- आकारुन व मिटर रिडींगप्रमाणे विद्युत बिल आकारुन देणेत आला होता. सदरच्या गाळयाची मुदत दि. २४.०१.२००८ संपलेनंतर दि.२५.०१.२००८ ते पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देणेबाबत प्रस्ताव विचाराधीन होता. परंतु तत्पुर्वीच इतर गाळयांच्या समवेत कृषी विद्यापीठाच्या वापरात असलेल्या गाळयाचा लिलाव दि. १९.०३.२००९ रोजी करण्यात आला व अन्य संस्थेस सदरचा गाळा मंजुर झालेला आहे. दि. २८.०४.२००९ रोजी मा.फुले कृषी विद्यापीठाने त्यांचेकडील गाळयाचा ताबा संस्थानला नविन भक्तनिवासस्थान यांचेकडे दिला आहे.

**०२)** महात्मा फुले कषी विद्यापीठ यांचे आता जा.क्र.कुलगुरु /३०८/०९ दि. ०८.०५.२००९ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास सादर केले असून माहिती केंद्राचा उपयोग शेतकरी व भाविकांना तसेच परिसरातील गांवामध्ये शेतकरी मेळावे, माती व पाणी नमुने तपासणी व इतर कृषीविषयक सल्ला देण्यासाठी करण्यात येतो. तसेच विद्यापीठाची विविध प्रकाशने शेतकऱ्यांसाठी विक्री करीता ठेवण्यात येतात. करीता नविन भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये कृषी माहिती केंद्रासाठी लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर गाळा मिळावा, अशी विनंती करण्यात आली आहे.

**०३)** दि. १९.०३.२००९ रोजीचे संस्थानचे इतर १७ गाळयांचा डिपॉझिट रक्कम रुपये १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख) मात्र मासिक परवाना फी आकारुन व मिटर रिडींगप्रमाणे विद्युत बिल वेगळे आकारुन उच्चतम बोली बोलुन लिलाव झालेला आहे. मासिक परवाना फी कमीत कमी रु. ६०००/- फोटो स्टॉलसाठी व जास्तीत जास्त रु. ८०,०००/- प्रतिमहा उपहारगृहासाठी बोली लिलावात मंजूर झालेली आहे. मासिक परवाना फी त्याच धर्तीवर महात्मा फुले कृषी विद्यापीठ यांना नविन भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये शिल्लक असलेल्या गाळयामधील एक गाळा रक्कम रुपये- एक लाख डिपॉझिट व रु. ६७०/- मासिक फी घेऊन देता येईल. मा.फुले कृषी विद्यापीठाने माहिती केंद्रासाठी गाळयाचा वापर असल्याने कमीत कमी रु. मासिक फी आकारुन गाळा वापरास देता येईल. तसेच सदर गाळयाचा वापर शेतकऱ्यास मार्गदर्शन करण्यासाठी होणार असल्यामुळे तसेच विद्यापीठ हे शासकीय असल्यामुळे त्यांना डिपॉझिटमध्ये काही सुट देता येईल.

| निर्णय क्र.४९६ | प्रस्तावास मान्यता देण्यात आली. |
|---|---|

(कार्यवाही-विधी अधिकारी )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३४** **शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत विकसित करावयाचे रस्त्यावरील विद्युतवाहिन्या व विद्युत रोहित्रांचे स्थलांतर करणेकामी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना निधी उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** (अ)मा.अध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक नपं/बांध/ कावि-५/१३१/२००९, दिनांक १३ मे, २००९ नुसार, शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत विकसित करावयाचे नियोजित रस्त्यावरील विद्युत पोल व डीपी स्थलांतर करणेबाबत प्रस्ताव तयार करणेत आला असुन विहीत मार्गाने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, अहमदनगर कार्यालयामार्फत मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, नाशिक यांचे याबाबत झालेल्या करारनाम्यानुसार या कामासाठी अंदाजित ८० लक्ष खर्च येत असून, सदर निधी तातडीने नगरपंचायतकडे वर्ग होणे आवश्यक आहे. भुसंपादीत जागेवरील विद्युत पोल व डीपी स्थलांतर करणेकरीता लागणारा खर्च श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत त्वरीत नगरपंचायतीकडे वर्ग करणेबाबत विनंती केलेली आहे.

(ब)मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयान्वये, शिर्डी गांवातील व परिसरातील एकुण २५ रस्ते प्राधान्य क्रमाने तीन टप्प्यात विकसित करण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई/ पुणे यांचेकडून करुन घेण्यात यावे, असे ठरलेले आहे. याकामी इकडील पत्र जा.क्र. बांधकाम/८९१३/२००६, दिनांक ०७ जुलै,२००६ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सदरील प्रकल्पास

मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. सदरहू प्रस्तावास, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-२००६/८७६/(१३१)/का.सोळा, दिनांक १९ सप्टेंबर, २००८ नुसार प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्ते विकसित करणेकामी भूसंपादन व इतर अनुषंगिक खर्चासह रक्कम रुपये २८ कोटी मात्र इतका निधी उपलब्ध करुन देण्यास मान्यता मिळालेली आहे. तथापि, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, मुंबई / पुणे यांनी सदरहू प्रकल्पांतर्गत, प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्ते विकसित करणेकामी अंदाजित रक्कम रुपये ८८ कोटी खर्च अपेक्षित असल्याचे कळविल्याने, त्यानुसार मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस सुधारीत प्रस्ताव इकडील पत्र क्रमांक एसएसएस/बांधकाम/ २३३६/२००९, दिनांक २६ फेब्रुवारी, २००९ नुसार सादर करण्यात आलेला आहे. <u>सदरहू प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.</u>

(ब) तसेच मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई / पुणे यांचेशी शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनेच्या प्रकल्पासंदर्भात दिनांक १५ ऑक्टोबर, २००६ रोजी शिर्डी येथे मरारविम यांचे मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, शिर्डी नगरपंचायत, शिर्डीचे मा. मुख्याधिकारी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मा.कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीनिशी समझोता करारनामा करण्यात आलेला आहे. या करारनाम्यातील (Article -III Funds and Payment to the Corporation - (१) The Sansthan shall make provision in the budget and bear the total expenditure of the the project.) आणि ( Scope of work to be followed by the Panchayat and the Sansthan : (१) The Panchayat shall carry out, at the cost of the Sansthan, remove / relocate / install all under ground / overground utilities like, water lines, drainage lines, telephone lines of BSNL, TATA INDOCOM, Reliance, HT/LT electric lines etc. well before the Work Order to commence the work is issued by the Corporation to the agency) यामधील अटी-शर्तीनुसार शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पासाठी येणाऱ्या सर्व खर्चासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मार्फत निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याबाबत मा.व्यवस्थापन समितीची वेळोवेळी मान्यता मिळालेली आहे.

(क) उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांनुसार व समझोता करारनाम्यास अनुसरुन, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेमार्फत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, नाशिक विभाग / अहमदनगर विभाग यांनी विद्युत वाहिन्या व विद्युत रोहित्रे स्थलांतरीत करणेबाबत कार्यवाही सुरु केलेली आहे. त्यास अनुसरुन, प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांवरील विद्युत वाहिन्या, त्यांचे खांब, विद्युत रोहित्रे (डिस्ट्रीब्युशन बॉक्सेस) स्थलांतरीत करणे व त्या अनुषंगाने करावयाचे कामांसाठी रक्कम रुपये ८० लक्ष मात्रचा निधी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडेस वर्ग करणेबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.४९७** | **सदरहू प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांवरील विद्युत वाहिन्या, त्यांचे खांब, विद्युत रोहित्रे स्थलांतरीत करणे व त्या अनुषंगाने करावयाचे कामांसाठी रक्कम रुपये ८० लक्ष मात्रचा निधी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडेस लवकरात लवकर वर्ग करणेत यावा / उपलब्ध करुन देणेत यावा. तत्पूर्वी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून वीज वितरण कंपनीशी विद्युत वाहिन्या स्थलांतरीत करणेकामी करणेत आलेला करारनामा व सदरहू कामासाठी येणाऱ्या खर्चाची अंदाजपत्रके आदि कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती उपलब्ध करुन घेणेत याव्यात. तसेच सदरहू कामी होणाऱ्या खर्चाचे विवरणपत्र दर महिन्यांस शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून प्राप्त करुन घेणेत यावे, असे ठरले.** |

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३५** **मौजे निमगांव कोऱ्हाळे, तालुका राहाता येथील गट नंबर १८२/५ क्षेत्र ०२ हे ३७ आर जमीन खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) श्री.विजय तुळशीराम कोते, राहणार शिर्डी यांनी दिनांक ०९ मे, २००९ रोजी त्यांचे व नितिन उत्तमराव कोते यांचे नावावर असलेली मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नंबर १८२/५ क्षेत्र ०२ हे ३७ आर जमीन संस्थानने प्रती आर रुपये ३,५१,०००/- मात्र या दराने खरेदी करावी म्हणून अर्ज दिलेला आहे. त्यानंतर पुन्हा दिनांक ०९ मे, २००९ रोजीचे अर्जात उल्लेख असलेले अर्जदार श्री. नितिन उत्तमराव कोते यांनी दिनांक १२ मे, २००९ रोजी विषयांकित जमिनीचे अनुषंगाने सुधारीत अर्ज व त्यासोबत खालील कागदपत्रांच्या छायांकित प्रती जोडून सादर केला आहे :

०१) श्री.नितिन उत्तमराव कोते, श्री.मनिलाल शामलाल पटेल, श्री.चंद्रकांत बाबुराव टेके, श्री.सचिन भाऊसाहेब बनकर व श्री.दिपक सोपानराव वारुळे यांच्या स्वाक्षऱ्या असलेला संस्थानला जमीन देणेबाबतचा दिनांक १२ मे, २००९ रोजीचा लिखीत मूळअर्ज.

०२) मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नंबर १८२/५ चा ७/१२ उतारा.

०३) फेरफार क्रमांक ४०४५,१९७६,६६३ चे उतारे.

०४) मुखत्यार पत्र नोंदणी क्रमांक १६५३/२००८, दिनांक ०८ मे, २००८.

०५) साठेखत नोंदणी क्रमांक ४१८२/२००८, दिनांक २३ ऑक्टोबर, २००८.

०६) श्री.सतीश वसंतराव डेंगळे व इतर यांचे नांवे भरलेल्या दिनांक २६ डिसेंबर, २००८ रोजीचे मोजणी शुल्काचे चलन.

तसेच, कामगार तलाठी, मौजे निमगांव कोऱ्हाळे यांचेकडून दिनांक १२ मे, २००९ रोजी भूसंपादन कक्ष, बांधकाम विभागामार्फत विषयांकित जमिनीचा ७/१२ उतारा प्राप्त करुन घेणेत आलेला आहे.

(ब) मौजे निमगांव कोऱ्हाळे, तालुका राहाता येथील गट नंबर १८२/५ या जमिनीच्या ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता, खालीलप्रमाणे वस्तुस्थिती दिसून येत आहे :

| अ.नं. | कब्जेदार सदरी असलेली नांवे | क्षेत्र | आकार | इतर हक्कातील नोंदी |
|---|---|---|---|---|
| ०१ | अनिता ज्ञानेश्वर गोंदकर | ०१ हे २० आर | रुपये ५=६० | श्री.साई नागरी सह. पतसंस्था ग.ख.क.घे. अनिताचा हिस्सा. न.विहीर - अनिता गोंदकर यांची १३/६/९८ |
| ०२ | सचिन भाऊसाहेब बनकर<br>मनिलाल शामलाल पटेल<br>बाबासाहेब शिवाजी काटकर<br>विरेश तुकाराम चौधरी<br>रविंद्र विलास कोते<br>शिरीष सुर्यकांत गुजराथी<br>संदीप बाबासाहेब वाबळे | ०१ हे १७ आर | रुपये ५=४० | |
| | एकूण | ०२ हे ३७ आर | रुपये ११=०० | |

(ब) अर्जदार श्री.नितिन उत्तमराव कोते व इतर ४ यांनी दिनांक १२ मे, २००९ रोजी सादर केलेल्या सुधारीत अर्जासोबत, पूर्वाश्रमीचे मालक श्री. सतिश वसंतराव डेंगळे व इतर यांचे नांवावर दिनांक २६ डिसेंबर, २००८ भरलेल्या रुपये ८२५०/- मात्र रक्कमेच्या मोजणी शुल्काचे चलनाची छायांकित प्रत जोडलेली आहे. त्याचा विचार करता, ७/१२ उताऱ्यात कब्जेदार सदरी दाखल असलेल्या सर्व खातेदारांची जमिनीची हद्द निश्चित होणे व त्यानुसार मोजणी नकाशा लवकरात लवकर प्राप्त होणे आवश्यक व गरजेचे आहे.

(क) श्री. सचिन भाऊसाहेब बनकर व इतर ६ यांनी श्री. नितिन उत्तमराव कोते यांना गट नंबर १८२/५ पैकी फक्त ०१ हेक्टर १७ आर जमिनीबाबत जनरल मुखत्यारपत्र करुन दिले. त्याची छायांकित प्रत प्राप्त झालेली आहे. सदरचे जनरल मुखत्यार पत्र हे रक्कम रुपये १००/- मात्रच्या मुद्रांकांवर नोंदविलेले आहे. वास्तविक पहातां रक्ताचे नाते असल्यास, मुखत्यारपत्र करावयाचे असल्यास ते रक्कम रुपये ५००/- मात्रच्या मुद्रांकावर नोंदविणे आवश्यक आहे तसेच रक्ताचे नाते नसल्यास मिळकतीची / जमिनची किंमत ठरवुन त्याप्रमाणात मुद्रांकांवर मुखत्यार पत्र नोंदवावे लागते. तथापि याबाबत संस्थान वकिलांचा अभिप्राय घेता येईल.

(ड) अर्जदार श्री.नितिन उत्तमराव कोते व इतर ४ यांनी दिनांक १२ मे, २००९ रोजीचे सुधारीत अर्जासोबत जोडलेल्या इतर कागदपत्रांचे अवलोकन केले असता, खालील बाबीं स्पष्ट होत आहेत :

०१) मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नंबर १८२/५ क्षेत्र ०२ हे ३७ आर असून, त्यापैकी फक्त ०१ हे १७ आर क्षेत्र श्री. सचिन भाऊसाहेब बनकर व इतर ६ यांचे नांवावर आहे. सदर जमिनीशी श्री.चंद्रकांत बाबुराव टेके व श्री. दिपक सोपानराव वारुळे यांचा संबंध नाही.

०२) पूर्वाश्रमीचे मालक श्री.सतिश वसंतराव डेंगळे व इतर यांचे नांवावर भरलेल्या मोजणी शुल्कास अनुसरुन, त्याप्रमाणे जमिनीची मोजणी करुन हद्दी निश्चित करुन त्याप्रमाणे मोजणी नकाशा इकडील कार्यालयास सादर करणेबाबत अर्जदार यांना सुचविता येईल.

०३) दिनांक २३ ऑक्टोबर, २००८ रोजी (१) श्री. मनिलाल शामलाल पटेल, (२) श्री.चंद्रकांत बाबुराव टेके, (३) श्री.सचिन भाऊसाहेब बनकर व (४) श्री. दिपक सोपानराव वारुळे यांनी रक्कम रुपये ५०,००,०००/- मात्र विसार देऊन सौ. अनिता ज्ञानेश्वर गोंदकर यांचे विषयांकित गट नंबर १८२/५ क्षेत्र ०१ हे २० आर जमिनीचे नोंदणीकृत कब्जाचे साठेखत करुन घेतलेले आहे.

सदरहू खाठेखताची गावच्या रेकॉर्डला नोंद करण्याची आवश्यकता नव्हती, तथापि कामगार तलाठी, निमगांव कोऱ्हाळे यांनी फेरफार क्रमांक ४११५ अन्वये साठेखत असतांना खरेदीखत समजून नोंद केली. सदरची नोंद मंडलाधिकारी, राहाता यांनी खालीलप्रमाणे शेरा देऊन रद्द केलेली आहे, पतसंस्थेचा ना हरकत दाखला व खरेदी घेणाराचा शेतकरी असल्यास पुरावा घेऊन फेरनोंद नोंद रद्द .

वर नमूद केलेल्या खातेदारांपैकी, (१) चंद्रकांत बाबुराव टेके व (२) दिपक सोपानराव वारुळे यांचे वडील श्री. सोपान वामन वारुळे हे शेतकरी असल्याबाबत साठेखताच्या दस्तामध्ये पान क्रमांक ११ व १२ वर ७/१२ उतारे जोडलेले आहेत. तथापि (१) मनिलाल शामलाल पटेल व (२) सचिन भाऊसाहेब बनकर हे शेतकरी असल्याबाबत पुरावा हजर केलेला नाही अथवा जोडलेला नाही.

वरील विवेचनावरुन, मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नंबर १८२/५ क्षेत्र ०२ हे ३७ आर पैकी फक्त क्षेत्र ०१ हेक्टर १७ आर जमीन विकत घेता येईल. उर्वरित क्षेत्र ०१ हे २० आर हे सौ.अनिता ज्ञानेश्वर गोंदकर यांचे नांवावर आहे व त्यांनी सदरहू जमीन संस्थानला विकणेबाबत अर्ज केलेला नाही. तसेच संबंधीत अर्जदार श्री. विजय तुळशीराम कोते, श्री. नितिन उत्तमराव कोते व इतर ४ यांना सदरहू जमीन संस्थानला विकणेबाबत अर्ज करण्याचा हक्क नाही. आता, सौ. अनिता ज्ञानेश्वर गोंदकर यांनी केलेले साठेखत रद्द करुन संस्थानला जमिन विकत देणेबाबत व प्रति आर रुपये ३,५१,०००/- हा दर मिळावा म्हणून दिनांक १६ मे, २००९ अर्ज दिला आहे. अर्जदाराने अर्जात नमूद केल्यानुसार, त्यांनी श्री. मनीलाल शामलाल पटेल व इतर यांना जे साठेखत करुन दिले आहे, ते रद्द केल्यास त्यांची जमीन विकत घेणेस हरकत नाही.

(इ) जमिनीची भौगोलिक स्थिती व उपयुक्तता :

सदरहू विषयांकित जमीन प्रादेशिक विकास योजनेत हरीत पट्टयात दर्शविण्यांत आलेली आहे. मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नंबर १८२ च्या उत्तरेस लागून संस्थान मालकीचा गट नंबर १८३ आहे. पश्चिमेस रस्ता आहे. रस्त्याच्या पश्चिमेस संस्थान मालकीचे गट नंबर १९८, १९९, २०० व २०१ हे आहेत. सदरहू ठिकाणी मनोरंजनात्मक उद्यान /बगिचा उभारणे प्रस्तावित असून, त्याबाबत बांधकाम विभागामार्फत कार्यवाही

सुरु आहे. त्यामुळे सदरहू जमीन संस्थानला बगीचा विकसित करण्याच्या दृष्टीने, वाहनतळाच्या दृष्टीने अथवा इतर विकास प्रकल्प राबविणेच्या दृष्टीने उपयुक्त आहे. तथापि, सदरहू जमीन हरीत पट्टयात असल्याने याठिकाणी बांधकाम करता येणार नाही.

(ई) जमिनीची किंमत :

सन २००८ चे शासकीय मुल्यांकन तक्त्यानुसार (रेडिरेकनरनुसार) चे दर हे सन २००९ साठी निश्चित करण्यात आलेले आहेत. सदरहू मुल्यांकन तक्त्यानुसार (पान नं.११८ वर / विभाग क्रमांक ६/१), मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नंबर १८२ चा दर प्रति हेक्टर रुपये २५,००,०००/- मात्र म्हणजेच प्रति आर रुपये २५,०००/- मात्र दर्शविण्यांत आलेला आहे.

अर्जदार श्री. नितिन उत्तमराव कोते व इतर ४ यांनी दिनांक ०८ मे, २००८ रोजी गट नंबर १८२/५ क्षेत्र ०१ हे १७ ही जमीन रुपये ५८,५०,०००/- मात्र या दराने घेतलेली आहे असे फेरफार क्रमांक ४०४५ चे अवलोकन केले असता दिसून येते. म्हणजेच प्रति आर रुपये ५०,०००/- हा दर येत आहे. सदरहू खरेदीस साधारणतः ०१ वर्ष पूर्ण झालेले असल्याने, त्यावर १० टक्के वाढ गृहीत धरल्यास, प्रति आर रुपये ५५,०००/- मात्र इतका दर येत आहे.

तसेच, संस्थानने मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नंबर ११६ पैकी मधील क्षेत्र २० आर ही जमीन एकत्रित रक्कम रुपये ५६,००,०००/- मात्र इतक्या रक्कमेस दिनांक १३ जून, २००८ रोजी खरेदी घेतलेली आहे. त्याचा प्रति आर दर रुपये २,८०,०००/- मात्र येत आहे.

अर्जदार श्री.नितिन उत्तमराव कोते व इतर ४ तसेच सौ. अनिता ज्ञानेश्वर गोंदकर यांनी मागणी केलेला प्रति आर रुपये ३,५१,०००/- हा फारच अवास्तव व जादा आहे.

(ग) उपरोक्त परिच्छेदात नमूद केलेल्या विवेचनास अनुसरुन, खालील बाबतीत निर्णय होणेस विनंती

०१. श्री. सचिन भाऊसाहेब बनकर व इतर ६ यांची मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नंबर १८२/५ क्षेत्र ०१ हे १७ आर ही जमीन तसेच सौ. अनिता ज्ञानेश्वर गोंदकर यांची गट नं. १८२/५ मधील 1 हे २० आर जमिन विकत घेणे अथवा न घेणे.

०२. विषयांकित जमीन विकत घ्यावयाची ठरल्यास, अर्जदार श्री. नितिन उत्तमराव कोते व जमीनमालक यांचेबरोबर वाटाघाटी करुन जमिनीचा प्रती आर दर निश्चित करणे.

०३. विषयांकित जमीन विकत घ्यावयाची ठरल्यास, सर्वप्रथम अर्जदार व सर्व जमीनमालक यांच्या जमिनीच्या हद्दी निश्चित करुन संस्थान मोजणीदारामार्फत प्राथमिक मोजणी करुन वस्तुस्थितीदर्शक नकाशा तयार करणेस व खरेदीखत करतांना प्रत्यक्ष ताब्यात मिळणाऱ्या जमिनीच्या एकूण किंमतीच्या ८० टक्के रक्कम खरेदीखताव्दारे आदा करणे व उर्वरित २० टक्के रक्कम जमिनीस संस्थानचे नांव लागलेनंतर रितसर मोजणी अर्ज करुन सरकारी मोजणी झालेनंतर आदा करणेस मान्यता असावी.

०४. सदरहू प्रस्तावाच्या बाबतीत कायद्याच्या त्रुटी राहू नयेत म्हणून शक्यतो जमीनमालकांकडून सर्व्हे नंबर १८२/५ मधील ०१ हे. १७ आर जमीन थेट खरेदीखत करुन घेणे उचित राहील, त्यास मान्यता असावी. तसेच सौ. अनिता ज्ञानेश्वर गोंदकर यांनी श्री. मनीलाल शामलाल पटेल व इतर ३ यांना करुन

दिलेले साठेखत रद्द केल्यानंतर त्यांची सर्व्हे नंबर १८२/५ मधील १ हे. २० आर जमिन विकत घेणे उचित राहील, त्यास मान्यता असावी.

०५. सदरहू जमीन खरेदी करणेकामी संस्थान वकिलांमार्फत जमिनीचा सर्च रिपोर्ट घेणे, श्री. नितिन उत्तमराव कोते यांचे जनरल मुखत्यार पत्राबाबत अभिप्राय घेणे, खरेदी खताचा मसुदा तयार करुन घेणे, खरेदीखतासाठी आवश्यक ते मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे, सरकारी मोजणी शुल्क भरणे, वकील फी आदा करणे आदि व त्या अनुषंगाने येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणे.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.४९८** | **मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केलेल्या उपरोक्त प्रस्तावावर चर्चा करणेकामी आजचे सभेपुढे जमीनमालकांचे प्रतिनिधी श्री. विजय तुळशीराम कोते व श्री. नितिन उत्तमराव कोते हे हजर होते. सदरहू प्रतिनिधींशी जमीन संस्थानला विकणेबाबत प्रस्तावातील नमूद केलेल्या त्रुटींबाबत चर्चा करणेत आली. त्यावर सदरहू प्रतिनिधींनी असे सांगितले की, सर्व त्रुटी दूर करुन देणेस तयार आहोत. सध्या मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील जमिनींचे बाजारभाव दर प्रति आर रुपये ४ लाखांपर्यन्त गेलेले आहेत, आम्ही अर्जात मागणी केलेला जमिनींचा दर प्रति आर रुपये ३,५१,०००/- मात्र योग्य आहे. सदरहू बाबतीत त्यांचेशी वाटाघाटी करुन, जमिनीचा दर रुपये २,५१,०००/- मात्र (अक्षरी रुपये दोन लाख एकावन्न हजार मात्र) प्रति आर असा निश्चित करणेत येऊन, या दराने जमीनमालकांकडून जमीन खरेदी करण्यात यावी, असे ठरले.**<br>**तसेच सर्वप्रथम अर्जदार व सर्व जमीनमालक यांच्या जमिनीच्या हद्दी निश्चित करुन संस्थान मोजणीदारामार्फत प्राथमिक मोजणी करुन वस्तुस्थितीदर्शक नकाशा तयार करणेत यावा. खरेदीखत करतांना प्रत्यक्ष ताब्यात मिळणाऱ्या जमिनीच्या एकूण किंमतीच्या ८० टक्के रक्कम खरेदीखताव्दारे आदा करणे व उर्वरित २० टक्के रक्कम जमिनीस संस्थानचे नांव लागलेनंतर रितसर मोजणी अर्ज करुन सरकारी मोजणी झालेनंतर आदा करणेस मान्यता देण्यात आली.**<br>**सदरहू खरेदीच्या बाबतीत कायद्याच्या त्रुटी राहू नयेत म्हणून सर्व्हे नंबर १८२/५ पैकी मधील क्षेत्र ०१ हेक्टर १७ आर चे जमीनमालक श्री. सचिन भाऊसाहेब बनकर व इतर ७ यांचेकडून थेट खरेदी करणेत येऊन, त्यानुसार खरेदीखत नोंदविणेत यावे. तसेच सर्व्हे नंबर १८२/५ पैकी क्षेत्र ०१ हेक्टर २० आर च्या जमीनमालक सौ. अनिता ज्ञानेश्वर गोंदकर यांनी श्री. मनीलाल शामलाल पटेल व इतर ३ यांना करुन दिलेले साठेखत रद्द केल्यानंतर त्यांचेकडून थेट खरेदी करणेत येऊन, त्यानुसार खरेदीखत नोंदविणेत यावे.**<br>**तसेच, सदरहू जमीन खरेदी करणेकामी संस्थान वकिलांमार्फत जमिनीचा सर्च रिपोर्ट घेणे, श्री. नितिन उत्तमराव कोते यांचे जनरल मुखत्यार पत्राबाबत अभिप्राय घेणे, खरेदी खताचा मसुदा तयार करुन घेणे, खरेदीखतासाठी आवश्यक ते मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे, सरकारी मोजणी शुल्क भरणे, वकील फी आदा करणे आदि व त्या अनुषंगाने येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** |

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३६** **मोबाईल बिले अदा करणेच्या कार्यवाहीची नोंद घेणे बाबत**

**प्रस्ताव -** **अ)** संस्थानचे उपाध्यक्ष मा.श्री एस,जी कोल्हे यांचे वापरासाठी आयडीया कंपनीचा मोबाईल क्रमांक ९८८१३९३७७७ कार्यान्वीत असून सदर मोबईलचे येणाऱ्या मासिक बिलांची रक्कम ही संस्थानमार्फत अदा करण्यात येत आहे तथापि मा.उपाध्यक्ष महोदये ९८२२५४४२२२ या क्रमांकाचे नवीन सिमकार्ड माहे जून २००८ पासून घेतलेले असून सदर मोबाईलचेही येणाऱ्या मासिक बिलांची रक्कम ही संस्थानमार्फत अदा करण्यात येत आहे.

**ब)** डॉ.यशवंतराव वसंतराव माने यांची श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे उपकार्यकारी अधिकारी या पदावर प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्यात आलेली आहे. उपकार्यकारी अधिकारी साहेब यांचेशी संपर्क साधणेसाठी त्यांना संस्थानचे ग्रुपमोबईल सेवेत समाविष्ठ करुन त्यांचे वापरासाठी ९४२३७९२२०३ हा ग्रुपमोबाईल नंबर माहे मार्च -२००९ देण्यात आलेला आहे. सदर ग्रुपमोबाईलची येणारी मासिक बिले ही संस्थानमार्फत आदा करावी लागणार आहे.

उपरोक्त परिच्छेद अ,ब मध्ये नमू केलेप्रमाणे मोबाईलचे मासिक बिलांची रक्कम संस्थानमार्फत अदा करण्याचे कार्यवाहीची नोंद घेण्यात यावी असे नम्र मत आहे.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे मा.उपाध्यक्ष सो यांचे दोन्ही मोबाईलचे व उपकार्यकारी अधिकारी यांचे मोबाईलचे येणारी मासिक बिले संस्थानमार्फत अदा करण्याच्या कार्यवाहीची नोंद घेण्यासाठी सविनय सादर

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.४९९** | **उपरोक्तप्रमाणे नमुद केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

(कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३७** **संस्थान प्रकाशित गुजराथी पुस्तके छपाई कामाचे दरपत्रक उघडणे व निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव** दि.१८.१०.२००८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.८१२ नुसार संस्थान प्रकाशित पुस्तके छपाई करणे, विक्री किंमती ठरविणे वगैरे रुटीनच्या कामाची कार्यालयीन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन गुजराथी पुस्तके छपाई कामी २२ निवडक प्रेसधारकांना जा.नं.एसएसएस/ वशी/ ४७७५ दि.२५.०४.२००९ अन्वये दरपत्रकाचे विहीत फार्म पाठविण्यात येऊन ती दि.१५.०५.२००९ अखेर जमा करणेबाबत कळविण्यात आले होते.

गुजराथी पुस्तके छपाई कामाचे दरपत्रक २२ निवडक प्रेसधारकांपैकी मुदतीत खालील ०७ प्रेसधारकांची सीलबंद दरपत्रके प्राप्त झाली आहेत

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| १ | मे.निट प्रिंटर्स अ.नगर |
| २ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई |
| ३ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.,पुणे |
| ४ | मे.न्यु राधारमण प्रिटींग प्रेस, मुंबई |
| ५ | मे.इंडो एंटरप्राईजेस, लातूर |
| ६ | मे.सकाळ पेपर लि., कोल्हापूर |
| ७ | मे.विशाल ऑफसेट, बडोदा |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले प्रेसधारकांचे सिलबंद दरपत्रके आजचे सभेत उघडण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | दैनंदिन साईबोध गुजराथी १ली आवृत्ती | श्रीसाईबाबा अवतार व कार्य गुजराथी १ली आवृत्ती | श्रीसाईचे सत्य चरित्र गुजराथी १ली आवृत्ती | श्रीसाईबाबांची शिकवण व तत्वज्ञान गुजराथी १ली आवृत्ती | शिलधी गुजराथी १ली आवृत्ती |
|---|---|---|---|---|---|---|
| | छपाई संख्या | ५००० नग | ५००० नग | ५००० नग | ५००० नग | ५००० नग |
| ०१ | मे.निट प्रिन्टर्स, अहमदनगर | ६५.०० | --- | **८१.९०** | --- | --- |
| ०२ | मे.कमर्शियल बुक बायडिंग वर्क्स, मुंबई | ६०.६५ | १३.९० | ८२.०० | १३.४० | **९.५०** |
| ०३ | मे.अजय ऑपसेट,प्रा.लि.,पुणे | **६०.६०** | **१३.८०** | ९९.३३ | **१३.३३** | १५.३३ |
| ०४ | मे.न्यु राधारमण प्रिन्टींग प्रेस. मुंबई | ९९.०० | २२.०० | १३७.०० | २०.०० | १६.०० |
| ०५ | मे.इंडो एन्टप्राईजेस,लातुर | --- | १५.६६ | --- | १४.७९ | ११.१८ |
| ०६ | मे.सकाळ पेपर्स,लि, कोल्हापुर | २५३.७० | ५७.३८ | १३९.२५ | ४६.३० | ३७.४० |
| ०७ | मे.विशाल ऑफसेट,बडोदा | ८३.०० | २२.०० | १२०.०० | २१.५० | १६.०० |

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.५००** | **उपरोक्त तक्त्यातील अधोरेखीत दर मान्य करण्यात आले.** |

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३८** **संस्थान प्रकाशित पुस्तके छपाई कामाचे दरपत्रक उघडणे व निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१८.१०.२००८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.८१२ नुसार संस्थान प्रकाशित पुस्तके छपाई करणे, विक्री किंमती ठरविणे वगैरे रुटीनच्या कामाची कार्यालयीन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन पुस्तके छपाई कामी २२ निवडक प्रेसधारकांना जा.नं.एसएसएस/वशी/४८९६ दि.२७.०४.२००९ अन्वये दरपत्रकाचे विहीत फार्म पाठविण्यात येऊन ती दि.१५.०५.२००९ अखेर जमा करणेबाबत कळविण्यात आले होते.

पुस्तके छपाई कामाचे दरपत्रक २२ निवडक प्रेसधारकांपैकी मुदतीत खालील ०८ प्रेसधारकांची सीलबंद दरपत्रके प्राप्त झाली आहेत

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| १ | मे.ब्ल्यू बर्ड इंडिया लि., पुणे |
| २ | मे.निट प्रिंटर्स अ.नगर |
| ३ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई |
| ४ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.,पुणे |
| ५ | मे.न्यु राधारमण प्रिटींग प्रेस, मुंबई |
| ६ | मे.कल्याणी कार्पोरेशन, पुणे |
| ७ | मे.इंडो एंटरप्राईजेस, लातूर |

| | |
|---|---|
| ८ | मे.सकाळ पेपर लि., कोल्हापूर |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले प्रेसधारकांचे सिलबंद दरपत्रके आजचे सभेत उघडण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं | प्रेसधारकाचे नाव | श्रीसाईंचे सत्य चरित्र गद्यात्मक मराटी | श्रीसाईसत् चरित्र बंगाली | खापर्डे डायरी हिन्दी | खापर्डे डायरी तामिळ | श्रीसाईनाथ स्तवन मंजरी सुमनाजंली मराठी | सचित्र साईबाबा इंग्रजी/ मराठी | मुलांचे साईबाबा कन्नड |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | छपाई संख्या | १५००० नग | ५००० नग | १०००० नग | ५००० नग | ५०००० नग | १०००० नग | ५००० नग |
| ०१ | मे.ब्ल्यू बर्ड इंडिया लि., पुणे | ७७.१५ | ३८.७० | १३.४० | १४.५० | २.१० | २१.९० | १३.२० |
| ०२ | मे.निट प्रिंटर्स अ.नगर | **७७.००** | --- | **१२.८०** | --- | --- | ६.१० | --- |
| ०३ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | ८३.०० | ४२.२५ | १२.९० | १३.६८ | **१.६८** | **५.००** | **५.३५** |
| ०४ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.,पुणे | ७९.०६ | **३८.५०** | १३.५१ | **१३.६५** | १.९७ | ३९.०० | ५.९३ |
| ०५ | मे.न्यु राधारमण प्रिटींग प्रेस, मुंबई | ११७.०० | ६७.०० | १७.०० | २६.०० | २.०० | ९.२५ | ११.०० |
| ०६ | मे.कल्याणी कार्पोरेशन, पुणे | ८४.०० | ४२.०० | १४.५० | १५.२५ | १.९२ | ७.५० | ६.५० |
| ०७ | मे.इंडो एंटरप्राईजेस, लातूर | --- | --- | १५.५७ | १४.८२ | १.९२ | २०.७३ | ६.१८ |
| ०८ | मे.सकाळ पेपर लि., कोल्हापूर | १२५.०० | ८६.७५ | २७.२० | २७.३५ | ६.३३ | ८.५० | १७.७५ |

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त तक्त्यातील अधोरेखीत दर मान्य करण्यात यावे,असें ठरलें.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.५०१** | **उपरोक्त तक्त्यातील अधोरेखीत दर मान्य करण्यात आले.** |

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३९** **श्री.काकासाहेब लक्ष्मण कणगरे,घोगरगाव यांचे वैद्यकीय आर्थिक अनुदानाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. काकासाहेब लक्ष्मण कणगरे, रा.घोगरगाव यांनी त्यांचे शस्त्रक्रियेकरीता वैद्यकिय आर्थिक मदत मिळणेबाबत संस्थानकडे अर्ज केलेला असून सदरचा अर्ज दि.२२.०९.२००८ रोजी इकडील कार्यालयास मिळालेला आहे. अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे दिलेली नाहीत.

श्री.कणगरे हे किडणीचे विकाराने आजारी असून त्यांचेवर Grant Medical Foundation Ruby Hall Clinic, Pune या रुग्णालयात Renal Bypass ही शस्त्रक्रिया केली जाणार असून त्यासाठी रु.१,१०,०००/- खर्च येणार असल्याचे प्रमाणपत्र संबंधीत रुग्णालयाने दिलेले आहे.

संस्थानचे वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार श्री.कणगरे यांचे आजाराकरीता अनुदान देता येत नाही. असे इकडील जा.नं.एसएसएस/ एसएसएच/ अनुदान/ १४३००/ २००८. दि.२९.०९.२००८ व जा.नं.एसएसएस/ एसएसएच/ अनुदान/ १६९१५/ २००८. दि.१८.११.२००८ पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

मा.अध्यक्ष महोदय यांनी श्री.कणगरे यांना अनुदान देणेबाबत शिफारसपत्र दिलेले असून रु.२०,०००/- मंजुर करणेबाबत कळविलेले आहे. तसेच सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेबाबत दि.१५.०४.२००९ रोजी दुरध्वनीद्वारे कळविलेले आहे.

महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.०५.०५.२००६ चे पत्रान्वये संस्थानचे वैद्यकिय आर्थिक अनुदान योजणेस मान्यता दिलेली असून त्यामध्ये वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, असे आदेश दिलेले आहेत.

तसेच, मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.११.२००५ रोजी झालेल्या सभेतील विषय नं.१६, निर्णय क्र.६६५ अन्वये फक्त संस्थान वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीत बसणारे अर्ज परस्पर मा.कार्यकारी अधिकारी यांनी मान्य करावेत. नियमावलीत न बसणारे अर्ज मा.व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर करणेत येऊ नयेत, असे ठरलेले आहे.

तरी याबाबत पुढील निर्णय होणेस विनंती.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.५०२** | **श्री. काकासाहेब लक्ष्मण कणगरे, रा.घोगरगाव यांना त्यांचे किडणीचे आजारासाठी एक विशेष बाब म्हणून संस्थान नियमाप्रमाणे वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात यावे असे ठरले** |

(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४०** **निवासस्थान सेवा आकार वाढविणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.१०.२००८चे सभेतील विषय नं.६०व निर्णय क्र.८१७ (३)संस्थान निवासस्थानाचा सेवा आकार दिनांक ०१.०१.२००९ पासून वाढविणेत यावा. ज्या निवासस्थानाचा सेवा आकार रुपये १००/- आहे त्याचा सेवा आकार रुपये २००/- व ज्या निवासस्थानाचा सेवा आकार रुपये २००/- आहे त्याचा रुपये ३००/- करण्यात यावा,असा संमत झालेला आहे .श्री साईबाबा संस्थानचे खालील निवासस्थानामध्ये असलेल्या खोल्याची संख्या इमारतीचे नावासमोर दर्शविलेली आहे.

| अ.न. | इमारतीचे नांव | खोल्याची संख्या | अ.नं. | इमारतीचे नांव | खोल्याची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईप्रसाद नंबर ०१ | ८१ | ०२ | साईप्रसाद नंबर ०२ | ७८ |
| ०३ | साई उद्यान | ३६रुम, १२व्हॉल (४८) | ०४ | साईनिवास अतिथीगृह | २४ |
| ०५ | साईनाथ छाया | ०१ हॉल | ०६ | शांतीनिकेतन | १५ |
| ०७ | समर्पण | ०२ | ०८ | श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) | |

निवासस्थानाचा त्यासुविधेनुसार निरनिराळया सेवा आकार घेतला जातो.

अ) चौकशी व निवासस्थानाकडील खोल्यांची माहिती सेवाआकार डिपॉझीट इत्यादी खालील प्रमाणे–

| अ.नं. | तपशिल | खोली हॉलची संख्या | व्यक्तीची मर्यादा | सेवा आकार २४ तासांसाठी | डिपॉझीट | व्यक्तीमार्यादा व इतर माहिती | प्रस्तावित वाढीव खोली सेवा आकार | प्रस्तावित वाढीव खोली डिपॉझीट | प्रस्तावित वाढीव जादा व्यक्तीसेवा आकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईप्रसाद नं.१ संडास बांथरुमसह | ६० | १० | ५०/- | १००/- | दोन कॉट,८ ते १०व्यक्ती /पुढील वाढीव गादी, चादर, बेडशिट रुपये ६-०० प्रमाणे /गरम पाणी रुपये ३/- (सोसायटी रुपये १-५० बादली ) | १००/- | २००/- | गादी ५ रुपये चादर ३ रुपये बेडशिट २ रुपये एकुण १० रुपये |
| ०२ | साईप्रसाद नं.१ व्ही.आय.पी. संडास बाथरुम, गिझरसह | २१ | ०५ | १००/- | १००/- | दोन कॉट,४ते ०५ व्यक्ती, पुढील वाढीव गादी,चादर,बेडशिट रुपये ६-०० प्रमाणे (भाडे गरम पाण्यासह-गिझरवापर ) | १५०/- | १५०/- | गादी ५ रुपये चादर ३ रुपये बेडशिट २ रुपये एकुण १० रुपये |
| ०३ | साईप्रसाद नं.२ साधे रुम ,संडास बाथरुमसह | ५४ | ०४ | (रु. ५०-०० चे दिनांक २६.०४.२००४ पासून ) २००/- | २००/- | दोन कॉट,४ व्यक्तीसह भाडे चार पेक्षा पुढील जादा प्रत्येक व्यक्तीस २५/- प्रमाणे /पाणी रुपये ३/- | २२५/- | २००/- | चार पेक्षा पुढील जादा प्रत्येक व्यक्तीस ५०/- प्रमाणे |
| ०४ | साईप्रसाद नं.०२ व्ही.आय.पी. संडास, बाथरुम, गिझरसह | १८ | ६ | (रु.१००-०० चे दिनांक २६.०४.२००४ पासून ) ३००/- | ३००/- | तीन कॉट,६ व्यक्ती व त्यापेक्षा पुढील जादा प्रत्येक व्यक्तीस २५/- प्रमाणे(भाडे गरम पाण्यासह गिझरवापर ) | ३००/- | ३००/- | सहा पेक्षा पुढील जादा प्रत्येक व्यक्तीस ५०/- प्रमाणे |
| ०५ | साईप्रसाद नं.०२, मोठे रुम संडास/ बाथरुमसह | ०६ | ८ | (रु.१००-०० चे दिनांक २६.०४.२००४ पासून ) ४००/- | ४००/- | सहा कॉट,८ व्यक्ती मर्यादासह भाडे त्यापेक्षा पुढील जादा प्रत्येक व्यक्तीस २५/- प्रमाणे गरम पाणी रुपये ३/- बादली . | ४००/- | ४००/- | आठ पेक्षा पुढील जादा प्रत्येक व्यक्तीस ५०/- प्रमाणे |
| ०६ | शांतीनिकेतन लहान रुम , संडास , बाथरुम व गरमपाणीसह | ११ | ५ | १५०/- | २००/- | डब्बल कॉट,४ ते ६ व्यक्ती मर्यादा , लिमीट नाही.जादा व्यक्तीसह दर.(भाडे गरम पाण्यासह -सोलर सिस्टम) | २००/- | २००/- | |
| ०७ | शांतीनिकेतन मोठे रुम संडास व बाथरुमसह | ०४ | ६ | २००/- | २००/- | डब्बल कॉट,६ ते ८ व्यक्तीमर्यादा, लिमिट नाही. (एकुण भाडयासह) .(भाडे गरम पाण्यासह -सोलर सिस्टम) | ३००/- | ३००/- | |
| ०८ | समर्पण संडास व बाथरुम, गिझरसह | ०२ | ३ | १००/- | १००/- | तीन कॉट, ३ते ४ व्यक्तीमर्यादा (भाडे गरम पाण्यासह -गिझरवापर) | २००/- | २००/- | तीन कॉट ३ ते ४ व्यक्ती मर्यादा |
| ०९ | साईउद्यान लहान रुम संडास,बाथरुम कॉमन | १६ | ४ | ०२५/- | १००/- | दोन कॉट, ३ते ४ व्यक्ती मर्यादा पुढील वाढीव गादी,चादर,बेडशिट रुपये ६-०० प्रमाणे (सोसायटी रुपये ३/- गरम पाणी ) | ०५०/- | १००/- | गादी ५ रुपये चादर ३ रुपये बेडशिट २ रुपये एकुण १० रुपये |
| १० | साईउद्यान मोठे रुम संडास,बाथरुम कॉमन | २० | १० | ०५०/- | १००/- | दोन कॉट,८ते १० व्यक्तीमर्यादा /दोन पेक्षा | १००/- | १००/- | गादी ५ रुपये चादर ३ रुपये |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | जादा व्यक्तीस गाद्या, चादर, बेडशिटसह रुपये ६ प्रमाणे (सोसायटी रुपये ३/-गरम पाणी ) | | | बेडशिट २ रुपये एकुण १० रुपये |
| ११ | साईउद्यान हॉल संडास,बाथरुम कॉमन | १२ | ४० | २५०/- | २५०/- | ४० ते ५० व्यक्तीमर्यादा गादी प्रत्येकी रुपये ३ प्रमाणे जादा रक्कम (सोसायटी रुपये ३/- गरम पाणी ) | ४००/- | ४००/- | गादी ५ रुपये चादर ३ रुपये बेडशिट २ रुपये एकुण १० रुपये |
| १२ | साईउद्यान लॉकर | ९९ | १ ते ४ | १०/- | १००/- | संडास बाथरुम कॉमन गादी,चादर,बेडशिट ६ प्रमाणे | १०/- | १००/- | गादी ५ रुपये चादर ३ रुपये बेडशिट २ रुपये एकुण १० रुपये |
| १३ | साईनाथ छाया संडास,बाथरुमसह | ०१ | ५० | ६७५/- | १०००/- | ४० ते ५० व्यक्तीमर्यादा २५ गादीसह दर (भाडे गरम पाणीसह -गिझर ) | १०००/- | १०००/- | |
| १४ | साईनिवास अतिथीगृह ए/सी संडास, बाथरुम, गरमपाणीसह. | २४ | २ | ७००/- | ५००/- | दोन कॉट,२ व्यक्ती करीता रुपये ७०० व पुढील जादा पोढ व्यक्तीस २०० रुपये जास्तीत जास्त २ ते ३४ व्यक्तीमर्यादा १० वर्षाचे आतील व्यक्तीस १०० रुपये (गरम पाण्यासह भाडे ३ सोलर सिस्टीम ) | ८००/- | ५००/- | |

## ब) साईबाबा भक्तनिवासस्थान (५००)

| अ.नं. | तपशिल | खोली हॉलची संख्या | व्यक्तीची मर्यादा | सेवा आकार २४ तासांसाठी | डिपॉझीट | व्यक्तीमर्यादा व इतर माहिती | प्रस्तावित वाढीव खोली सेवा आकार | प्रस्तावित वाढीव खोली डिपॉझीट | प्रस्तावित वाढीव जादा व्यक्तीसेवा आकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ३ कॉटच्या खोल्या संडास /बाथरुमसह २०३ | २०३ | ०४ | १००/- | २००/- | ०४ पेक्षा जादा प्रत्येक व्यक्तीस प्रत्येकी रुपये २५/-+३ गरम पाणी =२८ प्रमाणे गादी व चादरसह जादा ४ व्यक्ती मर्यादा (गरम पाणी सोलर रुपये १-५० ) | १२५/- | २००/- | ०४ पेक्षा जादा प्रत्येक व्यक्तीस प्रत्येकी रुपये २७/-+३ गरम पाणी =३० प्रमाणे गादी व चादरसह ४ व्यक्ती मर्यादा |
| ०२ | ४ कॉटच्या खोल्या संडास /बाथरुमसह | १८९ | ०४ | १००/- | २००/- | ०४पेक्षा जादा व्यक्तीस रुपये २५/-+३ गरमपाणी = २८ प्रमाणे गादी व चादरसह /जादा ४ व्यक्ती मर्यादा (गरम पाणी सोलर रुपये १-५० ) | १५०/- | २००/- | ०४ पेक्षा जादा प्रत्येक व्यक्तीस प्रत्येकी रुपये २७/—+३ गरम पाणी =३० प्रमाणे गादी व चादरसह ४ व्यक्ती मर्यादा |
| ०३ | ३ कॉटच्या नॉन ए/सी खोल्या दोन संडास / बाथरुमसह गिझरसह | ०४ | ०३ | ३००/- | ४००/- | ०३ पेक्षा जादा व्यक्तीस प्रत्येकी रुपये ५०/— प्रमाणे (१० वर्षापर्यतचे मुल वगळून) गादी व चादरसह जादा ४ व्यक्ती मर्यादा (गरम पाणी गिझर ) | ४००/- | ६००/- | ०३ पेक्षा जादा व्यक्तीस प्रत्येकी रुपये ५०/— प्रमाणे (१० वर्षापर्यतचे मुल वगळून) गादी व चादरसह जादा ४ व्यक्ती मर्यादा |
| ०४ | ३ कॉटच्या ए/सी खोल्या संडास /बाथरुमसह गिझरसह | १३ | ०३ | ४५०/- | ६००/- | ०३ पेक्षा जादा व्यक्तीस रुपये १००/—प्रमाणे (१० वर्षापर्यतचे मुल वगळून) जादा व्यक्ती ५ पर्यंत. (गरम पाणी गिझर ) | ५५०/- | ७००/- | ०३ पेक्षा जादा व्यक्तीस रुपये १००/—प्रमाणे (१० वर्षापर्यतचे मुल वगळून) जादा व्यक्ती ५ पर्यंत. |
| ०५ | ६ कॉटच्या Non A.C. रुम ट्रन्सीटसूट दोन संडास व बाथरुमसह गिझरसह | ०१ | ६ | ५००/- | ६००/- | पुढील जादा व्यक्तीची मर्यादा ८ पर्यत प्रती व्यक्तीस रुपये ५०/—प्रमाणे सेवा आकार १० वर्षापर्यत मुले वगळून (गरम पाणी गिझर ) | ६००/- | ७००/- | पुढील जादा व्यक्तीची मर्यादा ८ पर्यत प्रती व्यक्तीस रुपये ५०/—प्रमाणे सेवा आकार १० वर्षापर्यत मुले वगळून |
| ०६ | ६ कॉटच्या A.C रूम दोन संडास व बाथरुम गिझरसह | ०३ | ६ | ९००/- | १०००/- | पुढील जादा व्यक्तीची मर्यादा २ पर्यत प्रती व्यक्तीस रुपये १००/—प्रमाणे सेवा आकार १० वर्षापर्यत मुले वगळून (गरम पाणी गिझर ) | १०००/- | १२००/- | पुढील जादा व्यक्तीची मर्यादा २ पर्यत प्रती व्यक्तीस रुपये १००/—प्रमाणे सेवा आकार १० वर्षापर्यत |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | मुले वगळून |
| ०७ | ११ कॉटच्या रुम (दोन संडास / बाथरुम ) गिझरसह | २१ | ११ | ३००/- | ४००/- | ११ पेक्षा जादा व्यक्तीस प्रत्येकी रुपये २८/— प्रमाणे /जादा ५ व्यक्ती पर्यंत मर्यादा (गरम पाणी गिझर ) | ४५०/- | ५५०/- | ११ पेक्षा जादा व्यक्तीस प्रत्येकी रुपये ३०/—प्रमाणे /जादा ५ व्यक्ती पर्यंत मर्यादा |
| ०८ | १२ कॉटच्या रुम (दोन संडास / बाथरुम ) गिझरसह | ०२ | १२ | ३००/- | ६००/- | १२ पेक्षा पुढील जादा व्यक्तीस प्रत्येकी रुपये २८/— प्रमाणे /जादा ४ व्यक्ती पर्यंत मर्यादा.(गरम पाणी गिझर ) | ५००/- | ६००/- | १२ पेक्षा पुढील जादा व्यक्तीस प्रत्येकी रुपये ३०/— प्रमाणे /जादा ४ व्यक्ती पर्यंत मर्यादा. |
| ०९ | तळमजला साध्या खोल्या संडास बाथरुमसह कॉट नाही. | ४७ | १० | १००/- | २००/- | १० पेक्षा जादा व्यक्तीस प्रत्येकी रुपये १०/—+३ गरम पाणी =१३ प्रमाणे ३ जादा व्यक्ती पर्यंत मयादा गरम पाणी सोलर रुपये १-५० | १००/- | २००/- | जादा व्यक्तीस रुपये १०+३ ारमपाणी =१३ प्रमाणे आकार ३ जादा व्यक्तीची मर्यादा |
| १० | जनरल हॉल संडास,बाथरुमसह | ०२ | ५० | ५००/- | ६००/- | ५० गादीसह भाडे /गरम पाणी जादा रुपये ३/- प्रमाणे. | ५००/- | ६००/- | गरम पाणी रुपये ३ /- प्रमाणे जादा आकार |
| ११ | स्टोअर हॉल | ०५ | ५० | ३००/- | ४००/- | (३० ाद्या,संडास बाथरुम नाही ) | ३००/- | ४००/- | |
| १२ | १९८ लॉकर,संडास व बाथरुम कॉमन | | | प्रती लॉकर रुपये १०/- | १००/- | गादी ,चादर ,बेडशिट व पाणी स्वतंत्र सेवा आकार | प्रती लॉकर रुपये १०/- | १००/- | गादी ५ रुपये चादर ३ रुपये बेडशिट २ रुपये एकुण १० रुपये |

ज्या निवासस्थानाचा सेवा आकार रुपये १००-०० आहे. त्यांचा आकार रुपये २००-०० व ज्या निवासस्थानाचा सेवा आकार रुपये २००-०० आहे. त्याचा रुपये ३००-०० करण्यात यावा.असा मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय झाला आहे. उपरोक्त अ.न.३,४,५ चे दर मा.व्यवस्थापन समितीची सभा दिनांक २१ व २२ फेब्रुवारी -२००४ चे सभेतील निर्णय क्रमांक ९७ नुसार वाढविण्यात आले आहे.

या व्यतिरिक्त उपरोक्त प्रमाणे सेवाआकार घेतला जातो. या निवासस्थानात देत असलेल्या सुविधेनुसार त्यांचेही दर बदलावयाचे झाल्यास त्यांचे समोर वाढीव दर अवलोकनार्थ दर्शविलेले आहे तरी सध्याचे कोणते दरात किती वाढ करावी, यावर निर्णय होणेस विनंती.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.५०३** | **प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे संस्थानचे निवासस्थानांचे सेवा आकार वाढविण्यात यावे,असे ठरलें** |

(कार्यवाही-प्र.अ.निवासस्थान/अधिक्षक,चौकशी निवासस्थान,द्वारावती व भक्तनिवासस्थान)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४१ मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत.**

**निर्णय क्र.५०४** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

०१. संस्थान मालमत्तेचे आगीपासून संरक्षण व्हावे याकरीता एक अद्यायावत अग्नीशामक (फायर फायटर ) खरेदी करणेकामी सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे यथावकाश सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-वाहन विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४२ विश्वस्तव्यवस्था अधिनियम - २००४ मधील तरतूदींमध्ये आवश्यक बदल करणेसाठी राज्यशासनाकडे प्रस्तावित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४, (२००४ चा महा. १४) च्या कलम ५ (०१) (०२) अन्वये, संस्थानच्या व्यवस्थापनासाठी मा. व्यवस्थापन समिती नियुक्त करण्यात आली असून, तीचे अधिपत्याखाली संस्थानचे कामकाज चालु आहे.

सदर अधिनियमाची माहे सप्टेंबर, २००४ मध्ये अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर त्यांतील विविध तरतुदींची प्रत्यक्षात अंमलबजावणी करतांना कायदेशिर अडचणी जाणवत आहेत. त्यामुळे प्रशासकिय कामकाजात क्लिष्टता वाढली आहे. तरी प्रशासकिय कामकाजाच्या सुलभतेच्या दृष्टीकोनातून अधिनियमातील तरतूदींमध्ये बदल करणे अत्यावश्यक असून, त्यात बदल करणेस मान्यता देणेबाबत व्यवस्थापन समितीचे दिनांक २९.०१.२००५ चे सभेतील निर्णय क्र.०८ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

सदरचे अधिनियमातील तरतूदीमध्ये बदल करणेबाबत शासनास इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-३७७०-२००५, दिनांक १२.०४.२००५ अन्वये कळविण्यात आले होते.

तसेच श्री.सुधाकर जोशी,निवृत्त आयएएस,मॅनेजमेंट कन्सल्टंट,पुणे यांना अधिनियम दुरुस्त्या व विनिमय व नियमावली करणेचे काम देणेत आलेले होते. श्री.जोशी यांनी तयार केलेली विविध नियमावली व विनियम मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.१०.२००७ चे सभेत सादर करण्यात आलेले होते व त्यानंतर मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,मुंबई यांचेकडे सादर करणेत आलेले आहेत. त्याबाबत

वेळोवेळी मंत्रालयातील सचिव, अधिकारी यांचेशी चर्चा होऊन,करावयाच्या दुरुस्त्यांना अंतिम स्वरुप देणेत आलेले आहे.

त्यानुसार करावयाच्या दुरुस्त्यांचा सुधारित तक्ता सोबत सादर करणेत आलेला आहे. त्यास मंजूरी देवून शासनास कळविणेस मान्यतेसाठी सादर.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.५०५** | **विश्वस्तव्यवस्था अधिनियम - २००४ मधील तरतूदींमध्ये करावयाच्या दुरुस्त्यांचा सुधारित तक्ता मा.कार्यकारी अधिकारी यांनी सभेस वाचून दाखविला. सदर दुरुस्त्या शासनास मान्यतेसाठी पाठविण्यात याव्यात असे ठरले.** |

वरील निर्णय क्र ३८० ते ५०५ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.
यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(किशोर रा.मोरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे )
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)